मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
( जिल्हा वाचनालय )

मासिकाचे नांव — महाराष्ट्र सारस्वत (त्रैमासिक)

संपादक —

मासिक क्रमांक — सन —

अंक — १ ते ६

(महिने) महिने १ ते १२.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. जुनी मासिके (संदर्भ)




वर्ष १३ वें जानेवारी-फेब्रुवारी १९३४ अंक १

शाहीर खाडीलकर, एम्. ए. यांचा नवीन पोवाडा ( रेकॉर्ड )

**श्री संभाजीमहाराज यांचा आत्मयज्ञ**

गिरगांवांत कोठें मिळेल ?

अॅथोराइज्ड एजंटस्— फोन नं. २४१४१

# जी. जे. घैसास आणि कंपनी,

रामचंद्र बिल्डिंग, गिरगांव ट्राम टर्मिनस, मुंबई

लेटेस्ट हिज मास्टर्स व्हॉइस, कोलंबिया, ओडियन व ट्वीन रेकॉर्डस् व ग्रामोफोन मशिन्सचा भरपूर स्टॉक तयार आहे.

नवीन कोरे रेकॉर्डस् गिरगांवांत फक्त आमच्याकडेच मिळतात.

Printed by R. K. Tatnis, at Shree Laxmi Narayan Press, 364 Thakurdwar, Bombay No. 2. and Published by S. L. Kapadi for the Maharashtra Saraswat Mandal, at the Saraswat Brahman Samaj, Girgaum, Bombay 4.

Editor:- S. M. Varde, B. A., LL. B.

# धी इंडिया प्रॉव्हिडंट कंपनी लिमिटेड

( कलकत्ता )

स्थापना १९१० ] **लाईफ फंड आठ लक्ष रुपयांवर** [ सरकारी सिक्युरिटी


कलकत्ता येथील सुप्रसिद्ध इंडियन इन्शुअरन्स जर्नल लिहितें. " हिंदुस्थानांतील विमा कंपन्यांत ज्याप्रमाणें ओरियंटल ही सर्वांत श्रेष्ठ व उच्च दर्जाची गणली जाते, त्याचप्रमाणें प्रॉव्हिडंट कंपन्यांत सदर्हू एकच कंपनी गणली जाते." हींत १८ ते ५० वर्षाच्या स्त्रीपुरुषांस वैद्यकीय तपासणीशिवाय दरमहा सहा आण्यांपासून दोन रुपयेपर्यंत हप्ता भरून १०० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंतची विम्याची पॉलिसी घेतां येते. तरी गरजूंनीं ह्याच कंपनींत आपला विमा उतरून आपला फायदा करून घ्यावा.

गांवोगांव भरपूर एजंट्स पाहिजेत. लिहा अगर समक्ष भेटाः—

भेटण्याची जागा व वेळः—
**घाटकोपरवाला बिल्डिंग, मुगभाट, गिरगांव.** कोणत्याही दिवशीं सायंकाळीं ६ ते १० ( स्टँ. टा.)

**आर. एम्. दिवाडकर** आणि **कंपनी,**
मुंबई इलाख्याचे मुख्य एजंट्स्,
**माझगांव**, मुंबई नं. १०.






सर्वत्र मिळतो.



श्री. कृष्णाबाई वाघ

या समाजशास्त्राचा अभ्यास करण्याकरितां

नुक्त्याच विलायतेस गेल्या



सारस्वत ब्राह्मणसमाज, मुंबई. सरस्वतीमहोत्सवांत दक्षिणी मुलींचें गर्बानृत्य

॥ श्री ॥

# महाराष्ट्र सारस्वत

## द्वैमासिक

वर्ष १३ वें	जानेवारी-फेब्रुवारी १९३४	अंक १ ला

## संपादकीय

महाराष्ट्र सारस्वताची नवीन योजना करतांना गेल्या सालीं अभिवचन दिल्याप्रमाणें आम्हांस नियमितपणा साध्य करतां आला; त्याप्रमाणेंच यंदाही आमच्या वाचकांस नियमितपणें भेट देतां येईल असा विश्वास वाटतो. **महाराष्ट्र सारस्वत** हें द्वैमासिक न ठेवतां, आहे त्याच वर्गणींत हल्लींचा आकार कायम ठेवून दर महिन्यास काढावें अशी चालकांची इच्छा असतांही या वर्षी ती सुधारणा कां करितां आली नाहीं, याचीं कारणें प्रांजलपणें सांगितल्यास स्वज्ञातिबंधुभगिनींच्या सहाय्यानें त्या बाबतींत येणाऱ्या अडचणी दूर होतील अशी अपेक्षा आहे. पहिली अडचण ही कीं, ठिकठिकाणचें ज्ञातिवृत्त वेळेवर हातीं येत नाहीं. महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेर पसरलेल्या महाराष्ट्रीय सारस्वतांच्या संस्था आणि व्यक्ति यांची माहिती महाराष्ट्र सारस्वतांत देण्याच्या कामीं अत्यंत अनास्था दिसून येते. सारस्वत ब्राह्मण ज्ञातिनिष्ठ नाहींत, असें या अनास्थेवरून दिसून येत असल्यामुळें जरी एका दृष्टीनें अशी अनास्था अभिनंदनीय असली, तरी या नियतकालिकाच्या कार्यास ती उपकारक नाहीं. ज्ञातिवृत्त न देतां केवळ इतर लेखांनींच अंक भरून काढून मराठी नियतकालिकांच्या संख्येंत भर घालण्याच्या उद्देशानें **महाराष्ट्र सारस्वत** निघालेलें नाहीं हें विसरतां नये. ज्ञातिवृत्त न देतां केवळ सामान्य महत्त्वाच्या लेखांनीं अंकाची सजावट करणें हा सध्याच्या चालकमंडळाचा उद्देश नसल्यामुळें दर महिन्यास ज्ञातिवृत्त मिळण्याची सोय झाल्याखेरीज द्वैमासिकाचें रूपान्तर मासिक पुस्तकांत करतां येत नाहीं.

दुसरी अडचण लेखांची. सामान्य महत्त्वाचे सामाजिक अथवा राजकीय लेख किंवा गोष्टी, कविता, वगैरे ललितवाङ्मय यांचा प्रसार करणें हा या मासिकाचा उद्देश नाहीं. **महाराष्ट्र सारस्वत** ब्राह्मणांस सामाजिक, आर्थिक, धार्मिक, औद्योगिक व ऐतिहासिक उपयुक्ततेच्या लेखांची अशा नियतकालिकासाठीं जरूर आहे. असे लेख केवळ सारस्वतांच्या परिस्थितीपुरते आकुंचित न ठेवतां त्यांच्यासारख्याच परिस्थितींतील ज्ञातिसमाजांना म्हणजे कायस्थ व पाठारे प्रभु, चित्पावन, कऱ्हाडे, देशस्थ, दैवज्ञ, वैश्य, उच्च राहणीचे मराठे वगैरे ज्ञातिसंघांना उपयुक्त होण्यासारखे तरी असले पाहिजेत. सर्व हिंदूंचे किंवा हिंदी समाजाच्या अथवा मानवजातीच्या कल्याणाचा ऊहापोह करणारे लेख अद्याप या नियतकालिकाच्या कक्षेबाहेरचे आहेत. सारस्वतांच्या इतिहासावर प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें प्रकाश पाडणाऱ्या लेखांची फारच वाण आहे. आज प्रचलित असलेल्या इतिहासांत सहजगत्या अगर बुद्धिपुरःसर

असा कांहीं भाग प्रसिद्धीस आला आहे कीं, त्यामुळें आमच्या ज्ञातीविषयीं सामान्यतः गैरसमज उत्पन्न झालेला आहे. या भागाचें संशोधन होणें अत्यावश्यक आहे. तें करण्याचें सामर्थ्य असलेले इतिहासभक्त असे लेखक आमच्या समाजांत अनेक असतांही त्यांच्या या कामीं झालेल्या अनास्थेचा परिणाम केवळ आमच्या ज्ञातीलाच नव्हे, तर महाराष्ट्राच्या व हिंदुस्थानच्या इतिहासालाही अपायकारक होत आहे. हें औदासीन्य दूर करण्यांत आम्हांस यश आलें, तरी महाराष्ट्र सारस्वत धन्यता मानील.

कु. नीरा मोंडकर यांनीं महाराष्ट्र सारस्वताच्या या सालच्या पहिल्या अंकांत 'स्त्रियांसाठीं करमणुकीच्या संस्था' या विषयावर एक लेख लिहिला होता. अशा संस्थांची जरूर स्त्रीवर्गास भासत आहे, याचें एक प्रत्यंतर सांगली संस्थान महिला परिषदेंत दिसून आलें. या परिषदेंत कु. प्रमिला भडभडे यांनीं बायकांच्या क्लबची किती जरूर आहे हें सांगून असा एक क्लब सांगलीच्या राणीसाहेबांनीं स्थापावयाचें ठरविलें असून त्याची कोनशिला बडोद्याच्या राणीसाहेबांच्या हस्तें बसविण्यांत आल्याची माहिती दिली. सामाजिक परिस्थित्यनुसार कसकशा गरजा भासत आहेत, याची आमच्या भगिनींना होणारी जाणीव या सालांतील दोन लेखांनीं दाखवून दिली, व त्यांच्या सूचनाही प्रत्यक्ष कृतींत उतरल्याचीं उदाहरणें इतक्या लवकर अनुभवास येऊं लागलीं. महाराष्ट्र सारस्वतांत येणारे लेख केवळ सारस्वतांपुरत्याच महत्त्वाचे नसून आमच्याशीं समशील असणाऱ्या सर्व जाति-समाजांना उपयुक्त असतात, अशी आमच्यावर कूपमंडूकवृत्तीचा आरोप करणाऱ्या टीकाकारांचा यावरून खात्री पटेल अशी आम्हांस आशा आहे.

या वर्षीं मध्यम स्थितींतील वर्गास उपयुक्त असे कित्येक आर्थिक प्रश्न हातीं घेण्याचा आमचा इरादा आहे. परस्परसाहाय्यकारी तत्त्वाच्या संस्था, मध्यम वर्गाची राहणी, शिक्षणाची दिशा, सुशिक्षित स्त्रीवर्गाचें ध्येय वगैरे विषयांवर साधकबाधक चर्चा करणारे लेख मिळतील तितके पाहिजेत; नवीन लेखकांना दिशा कळावी म्हणून या विषयांचा उल्लेख केला आहे. तथापि लेख लिहावयाचे ते केवळ भाषेच्या अवडंबरानें व अलंकारांनीं सजविलेले नसावे. माहिती मिळवून आणि अभ्यास करून विचारपूर्वक लिहिलेल्या लेखांचा आमच्याकडून कधींही अव्हेर होणार नाहीं.

अभ्यासपूर्वक आणि तर्कशुद्ध लिहिलेले लेख प्रचलित समजुतींना व रूढींना केवढाही धक्का देणारे असले, किंवा कितीही आग्रहानें जुन्या परंपरेचें समर्थन करणारे असले, तरी त्यांना महाराष्ट्र सारस्वताकडून प्रसिद्धी मिळण्यास अडचण पडणार नाहीं. गेल्या शंभर वर्षांत महाराष्ट्रीय हिंदु समाजांत सारस्वत ब्राह्मणज्ञातीला एक प्रकारचें वैशिष्ट्य प्राप्त झालें आहे. ब्राह्मणेतरांविषयीं सहानुभूति आणि ब्राह्मणसंस्कृतींतील इष्ट धोरणांचा अभिमान यांचा मिलाफ आमच्या समाजांत जितक्या प्रमाणांत आढळतो, तसा इतर कोणत्याही समाजांत क्वचित् आढळेल. यामुळें सामाजिक आणि धार्मिक सुधारणेविषयीं आज सारस्वतांचा जो विचार होतो, तो उद्यां किंवा परवां महाराष्ट्रास मान्य होतो असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. बालविवाह, पुनर्विवाह, अस्पृश्योद्धार, ज्ञातिभेदनिरसन, प्रतिमापूजन, स्त्रीशिक्षण वगैरे बाबतींत सारस्वत ज्ञातींतील थोर व विचारी विभूतींनीं आपल्या उपदेशानें व आचरणानें धडा घालून दिलेला आहे असें निरीक्षणान्तीं आढळून येईल. जातिभेदांचें निर्मूलन होईपर्यंत हें सारस्वत-वैशिष्ट्य कामीं लागण्यास मदत करणें हें महाराष्ट्र सारस्वतांचें एक कार्य आहे. "सारस्वतांची खर्चिक राहणी", "स्त्रिया आणि कलाशिक्षण" "स्त्रियांसाठीं करमणुकीच्या संस्था" हे गेल्या सालांतील लेख पाहिल्यास महाराष्ट्र सारस्वतानें या दृष्टीनें आपली कामगिरी यथाशक्ति बजावल्याचें आढळून येईल.

वर्गणीदार आणि लेखक यांच्याकडून होणाऱ्या साहाय्याइतकीच व्यापारी व उदमी यांच्याकडून मिळणाऱ्या जाहिरातींच्या मदतीची आम्हांस अपेक्षा आहे. महाराष्ट्र सारस्वताचा वाचकवर्ग पाहिल्यास त्यांत दिलेल्या जाहिरातींचा योग्य मोबदला मिळाल्याखेरीज राहात नाहीं असा अनुभव महाराष्ट्र सारस्वतांत जाहिरांत देणारांस गेल्या वर्षीं आलेला आहे. गेल्या वर्षाचे सुरवातीस नेमलेल्या सोल एजंटांकडे यापुढें सोल एजन्सी ठेविलेली नाहीं, हें जाहिरात देणारांस मुद्दाम कळविण्यांत येत आहे. तरी जाहिराती देणारांनीं आमच्याकडेच प्रत्यक्ष व्यवहार केल्यास सोईचें पडेल.

'दक्षिणी मुलींचें गर्बानृत्य' हें चित्र गेल्या अंकीं देण्याचें राहिलें तें या अंकांत दिलें आहे.

# निर्विशेषण ब्राह्मण

हिंदुस्थानांतील जातिभेद दूर होण्यास आज मुख्यतः मोठी अडचण दोन जातिसमाजांची आहे. त्यांपैकीं एक समाज अस्पृश्यांचा. इतर सर्व जाती त्यांना अस्पृश्य मानतात; त्यांच्या स्पर्शानें आपण विटाळतों असें मानतात. दुसरा समाज ब्राह्मणांचा. इतर सर्व जातींना ब्राह्मण कमी–अधिक प्रमाणांत अस्पृश्य मानतात. म्हणजे इतर जातींच्या निकट संबधामुळें आपण कमी-अधिक प्रमाणांत विटाळले जातों असें मानतात. कितीही जालीम उपाय केले तरी हिंदु समाजाच्या वरच्या आणि खालच्या थरांतील हा अस्पृश्यतेचा रोग एकदम दूर होणें दुर्घट आहे, असा अनुभव येतो. कायद्यानें ही परिस्थिति बदलण्याची बरीच शक्यता आहे. परंतु जातिभेदनिरसनाच्या कायद्याचा परिणाम काय होईल, ही राज्यकर्त्यांना भीति आहे व तसा कायदा करणें आज संभवनीय नाहीं.

प्रत्यक्ष कायद्याच्या अभावीं लोकशिक्षण आणि सामाजिक प्रगति हाच एक उपाय आहे. ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्यांतील अस्पृश्य भाव दूर करण्याची एक पायरी म्हणजे ब्राह्मणांतील पोटजातीभेदांच्या निरसनाचा उपाय होय. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांच्यांतील अस्पृश्यतेच्या भावनेइतकीच दृढमूल भावना ब्राह्मणांब्राह्मणांच्या पोटजातींत आहे. शाकाहारी ब्राह्मण आणि शाकेतर भक्ष्याहारी ब्राह्मण हे भेद उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांत आहेत, तसे महाराष्ट्रांत साहजिकच आहेत. गौड किंवा द्रविड या दोन्ही शाखांबाहेरच्या चित्पावनांना एका काळीं महाराष्ट्रांतील शाकाहारी कऱ्हाडे व देशस्थ ब्राह्मण अपंक्त व कनिष्ठ मानीत. सत्तेच्या बळानें पेशव्यांनीं या तिन्ही शाखांचें एकीकरण केलें, तरीही अगदीं कालपर्यंत ही भावना तीव्र होती व अजूनही ती समूळ नाहींशी झालेली नाहीं. तरीही ती बहुतांशीं दूर झाली आहे याचें खरें कारण फार साधें आहे. चित्पावन, देशस्थ आणि कऱ्हाडे या तीन्ही ब्राह्मण पोटजातींनीं आपापल्या पोटभेदांचें निदर्शक नांव वगळून स्वतःचा ब्राह्मण असा साधा उल्लेख करण्याचें धोरण अवलंबिल्यामुळें या एकीकरणास बऱ्याच अंशीं मदत झाली. आगरकर हे कोंकणस्थ का कऱ्हाडे, असा संशय उत्पन्न करण्यासारखा जरी त्यामुळें कित्येक वेळां गोंधळ उत्पन्न झाला, तरी ते कृत्रिम भेद दृष्टीआड करण्याचें कार्य ब्राह्मण्याच्या निर्विशेषण उच्चारामुळें सोपें झालें यांत शंका नाहीं.

पेशवाईंत उगम होऊन आज पूर्ण रूळलेल्या या सामाजिक सुधारणेपासून महत्त्वाचा धडा घेण्यासारखा आहे. माध्यंदिन (पळशे), देवरुखे, किरवंत वगैरे ब्राह्मण पोटजातींनीं तो धडा आज गिरविलेला आढळतो.

सारस्वत किंवा गौडसारस्वत किंवा या नांवानें निर्देशिलेल्या ब्राह्मण जातींसंबंधानें कमीपणाची भावना गोमंतकाबाहेरील महाराष्ट्रांत आढळते व त्या भावनेच्या मुळाशीं त्या जातींचा शाकेतर भक्ष्याहार हें कारण आहे. वैदिक धर्मांत ब्राह्मणांच्या शाकाहाराला आधार नाहीं. उत्तर हिंदुस्थानांत मत्स्याहारी ब्राह्मण कमी दर्जाचे लेखले जात नाहींत. किंबहुना ज्या ब्राह्मण जातींचें ब्राह्मण्य शंकास्पद होतें, त्यांनीं शाकाहाराला नसतें महत्त्व देऊन स्वतःकडे मोठेपणा घेण्याचा प्रयत्न केला व तो यशस्वी झाला, असें आढळेल. कांहीं झालें तरी शाकाहाराचा अभाव ब्राह्मण्याला कमीपणा आणणारा नसून या ब्राह्मण पोटजातींनीं आपल्या जातीच्या नांवामागें कायम ठेवलेलें विशेषण आज त्यांच्यासंबंधानें कमीपणा ( inferiority complex ) उत्पन्न करण्यास कारण होत आहे. पेशव्यांचें अनुकरण करून या ब्राह्मण पोटजातींनीं गौड, सारस्वत, गौडसारस्वत, इत्यादि विशेषणें या काळांत झुगारून देऊन ब्राह्मण इतकेंच जातिदर्शक नांव सध्या बाकी ठेवल्यास ब्राह्मण पोटजातींच्या एकीकरणास मदत होईल आणि उच्चनीचतेची भावना दूर होण्यास सोपें पडेल. दैवज्ञ, औदीच्य, नागर, वगैरे भेददर्शक विशेषणें वापरण्याचें सोडून आज ब्राह्मण या नांवाखालीं येणाऱ्या सर्व जातींनीं स्वतःचा विशेषणरहित उल्लेख

करावा. त्यायोगेंकरून ब्राह्मणांतील अंतर्गत अस्पृश्यता दूर होण्यास मदत मिळेल. त्यानंतर ब्राह्मण व इतर यांतील अस्पृश्यताच राहील व आज अस्पृश्योद्धाराच्या चळवळींतून जशी अंत्यजांची अस्पृश्यता दूर होत आहे, तशी ब्राह्मणांची अस्पृश्यता दूर होण्याची चळवळ आपोआप निघेल. ब्राह्मणवर्ग बुद्धिजीवि असल्यामुळें तशी चळवळ यशस्वी होण्यासही सोपें पडेल.

या प्रकारची जागृति झाली असून महाराष्ट्रीय ब्राह्मण समाज या निर्विशेषण ब्राह्मणजातीच्या नांवें सर्व महाराष्ट्रीय ब्राह्मणांचा अंतर्भाव करणारी संस्था स्थापन करण्याची खटपट चालली आहे व तिला मूर्त स्वरूप लवकरच यावयाचें आहे असें समजतें. या आत्म-जागृतीचें अभिनंदन करून या प्रयत्नास यश येवो, असें आम्ही इच्छितों.

# सारस्वत दीनवत्सल संघ, मुंबई

## रौप्य महोत्सव

सारस्वत ज्ञातींतील असहाय, दीन व दुबळ्या माणसांस आर्थिक मदत करून त्यांचें जिणें कमी कष्टमय करण्याचा प्रयत्न करावा, या हेतूनें प्रेरित होऊन पंचवीस वर्षांपूर्वी मुंबईतील कांहीं सारस्वत बंधूंनीं ही संस्था स्थापन केली. या प्रयत्नास स्वज्ञातींतील बंधुभगिनींची उत्तरोत्तर वाढती सक्रिय सहानुभूति मिळत गेल्यामुळें गेल्या पंचवीस वर्षांच्या अवधींत, सुमारें, ५५००० रुपयांची मदत आपल्या दीनदुबळ्या बंधुभगिनींस करतां आली. संस्थेच्या स्थापनेच्या वर्षी तीनच माणसांस फक्त ७५ रुपयांची मदत करतां आली होती, पण सध्या दरसाल तीनचार हजार रुपयांपर्यंत मदत करण्यास ती समर्थ झाली आहे. व त्याचें श्रेय संघास उदारबुद्धीनें साह्य करणाऱ्या दात्यांस व वर्गणीदारांस आहे.

सारस्वत ज्ञातींतील असहाय, अनाथ, व दुबळ्या माणसांची संख्या पाहूं गेल्यास बरीच मोठी असल्याचें आढळून येईल, व त्या मानानें संघाकडून दिली जाणारी मदत अगदींच अत्यल्प आहे, असें दिसून येईल. या संस्थेच्या कामगिरीच्या उपयुक्ततेसंबंधानें व आवश्यकतेसंबंधानें येथें विस्तृत रीतीनें लिहिण्याची गरज आहे असें नाहीं. हें दयाधर्माचें व पुण्यप्रद कार्य तर आहेच, पण वार्धक्यामुळें, परिस्थितीमुळें, शारीरिक दुबळेपणामुळें आपल्या ज्ञातींतील ज्या बंधुभगिनींस, आपला रोजचा चरितार्थ चालविण्यास सामर्थ्य नाहीं, त्यांना आर्थिक मदत करून, त्यांचें जिणें कमी कष्टप्रद करणें व त्यांची लाचार व लाजिरवाणी स्थिति नाहींसा करण्यास झटणें, हें प्रत्येक सारस्वताचें कर्तव्य आहे.

संघाच्या सध्यांच्या चालकांनीं संघाकडून होणारें कार्य चिरस्थायि पायावर उभारण्यासाठीं संघाच्या पंचवीसाव्या वर्षाच्या रौप्यमहोत्सवाच्या समयीं एक लक्ष रुपयांचा कायमनिधि उभारण्याचें योजिलें असून, या निधीस यथाशक्ति मदत करण्यासाठीं सर्व ज्ञातिबंधुभगिनींस विनंती केली आहे. संघाकडून जी मदत दिली जाते त्यांत पोटजातीकडे लक्ष देण्यांत येत नाहीं. संघाच्या चालकांच्या विनंतीकडे ज्ञातींतील सर्व बंधूभगिनी अगत्यपूर्वक लक्ष देऊन, शक्य तेवढी आर्थिक मदत करतील अशी आम्हांस आशा आहे.

संघाचा रौप्यमहोत्सव लौकरच साजरा करण्यांत येणार आहे. या महोत्सववासाठीं ज्यांना मदत करावयाची असेल, त्यांनीं ती लौकर चालकांकडे पाठवावी. कायमनिधि जमविण्यासाठीं, त्याचप्रमाणें रौप्यमहोत्सवाच्या कामासाठीं एक खास कार्यकारी मंडळी नेमण्यांत आली आहे. कायमफंडासाठीं, चालू खर्चाकरितां अगर समारंभासाठीं म्हणून जी कांहीं रक्कम पाठवावयाची ती संघाचे चिटणीस अगर खजिनदार यांच्या नांवें सारस्वत ब्राह्मण समाजगृह, २६४, गिरगांव, मुंबई, या पत्त्यावर पाठवावी, अगर संघाचे स्वयंसेवक घरीं आल्यास त्यांजकडे देऊन त्यांची पावती घ्यावी.

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्रमांक २८१
ता. १२-२-३८

# अभिप्राय

## श्रीवांदकर महाराज यांचा सचरित्र कवितासंग्रह

संपादकः—श्री.**कृष्ण जगन्नाथ थळी**; रामसेवक चित्रालय, मुंबई, किंमत रु. २:-श्री. थळी यांनीं संपादित व प्रकाशित केलेला हा ग्रंथ अंतर्बाह्य सुंदर आहे. अनेक साधु व गोमंतकांतील बहुतेक देवता यांच्या छायाचित्रांचा ग्रंथांत समावेश केलेला आहे. यांत सारस्वतांच्या बहुतेक कुलदेवता आलेल्या असल्यामुळें ग्रंथ संग्रहीं असल्यास त्यांच्या स्मरण-दर्शनाची संधि प्रत्यहीं अनायासें घेतां येण्यासारखी आहे. ग्रंथारंभीं दिलेलें श्रीवांदकर महाराज यांचें चरित्र फार सुरस आहे. महाराजांची कविता कोंकणप्रांतीय संतकाव्याची परंपरा भूषित करणारी असून आध्यात्मिक बोध आणि ईश्वरगुणानुवाद यांना अनुरूप आहे. मराठींतील संगीत नाटयरचनेचा मान असलेले अण्णासाहेब किर्लोस्कर यांना तशा नाटयरचनेची स्फूर्ति श्रीमहाराजांची कृति पाहून झाली व महाराजांनीं त्या स्फूर्तीस आशीर्वादही दिला. किर्लोस्करांना स्फूर्ति देणारी श्री महाराजांची नाटयकृति उपलब्ध नाहीं, याबद्दल खेद वाटणें साहजिक आहे. रा. थळी यांनीं प्रकाशित व संपादित केलेल्या या ग्रंथास अवश्य आश्रय देऊन कोंकणप्रांतीय काव्याचें रक्षण करण्याच्या या प्रयत्नास अवश्य मदत करावी अशी आमची वाचकांस शिफारस आहे.

**गोमन्तोपनिषत्**, दुसरें खंडः प्रकाशक गोमंतक छापखान्याचे मालक, किंमत रु. १॥:-**शणै गोंयबाब** यांनीं लिहिलेलें हें गोमन्तोपनिषदाचें दुसरें खंड पहिल्या खंडाइतकें हृदयस्पर्शी किंवा चटका लावणारें नाहीं, असें म्हणणें भाग आहे. कुराण-पुराण-बायबल-उपनिषदें या सर्वांच्या भेसळीची ही मिसळ मधून मधून खमंग असली तरी एकंदरींत रुचकर नाहीं. नोव्हाच्या जलप्रलयांत बुडालेले अकरा मानवी आत्मे व एका उंदराचा आत्मा यांच्या आत्मचरित्राच्या कहाण्यांतून विनोदाचा सूर बराच अत्रुटित राहिलेला असला तरी मधून मधून तो उगाच ताणून लांबविलेला दिसतो. उपनिषत् या नांवानुसार या खंडावर पडलेली तत्त्वज्ञानाची छाप कांहींशी कंटाळवाणी भासते. तथापि शणैंच्या लेखणींतील विनोदाची सहजस्फूर्ति आणि कोंकणी भाषेवरील प्रभुत्व हे गुण या खंडांतही कायम आहेत.

" ॐ सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै । ॐ शान्तिः शान्तिः शान्ति ।" या वैदिक प्रार्थनेचें,

"ॐ **आतां आमी वांगडा रांवया । वांगडा खांवया । वांगडा घट जांवया । तेजवंत जवांचेलें गिन्यान जोडुंया । एकमेकांलो द्वेस सोडुंया । एकमेकांक माये मोगान ओडुंया ।**

ॐ थंडाऽय, थंडाऽय, थंडाऽय ।" हें शणैकृत कोंकणी भाषांतर समर्पक व मनोवेधक नाहीं असें कोण म्हणेल ? यमाच्या दरबारांत अर्भकापासून ब्राह्मज्ञान्यापर्यंत निरनिराळ्या आत्म्यांचीं चरित्रें आणि आत्मसमर्थनें अवश्य वाचनीय आहेत. कोंकणी भाषेचें पुनरुज्जीवन करून तिला ग्रंथभाषा करण्याचे प्रयत्न आमच्या गोमंतकीय खिस्ती बांधवांकडून होत आहेत व त्यासाठीं नेमलेल्या कमिटीवर शणै गोंयबाब यांची नेमणूक झाली आहे. यावरून त्यांनीं कोंकणी भाषेसाठीं केलेल्या प्रयत्नांना मान्यता मिळाली आहे, हें उघड दिसून येतें. त्यांच्या इतर ग्रंथांप्रमाणें हें खंड वाचनीय आणि संग्रहीं ठेवण्यायोग्य आहे, हें आमच्या वाचकांस सांगावयास नकोच.

## पोंच

**व्ही. प्रभा आणि कंपनीचें** कॅलेंडरः—फारच सुबक आणि सुंदर असून साधेपणाची सदभिरुचि या कॅलेंडरांत फार नमुनेदार साधली आहे.

**सारस्वत ब्राह्मण समाजः मुंबईः कॅलेंडरः**-सभासदांना कॅलेंडर देऊन त्याबरोबर समाजांत होणारे उत्सव,व्याख्यानें वगैरे स्मरणार्थ टिप्पणी देण्याचा हा उपक्रम अनेक संस्थांना अनुकरणीय आहे. कॅलेंडर साधेंच, पण मोठया मोहक रंगाच्या कागदावर सुबक रीतीनें व्ही. प्रभा आणि कंपनीनें छापलें आहे. या नवीन कल्पनेबद्दल आम्ही समाजाच्या कार्यवाहांचें अभिनंदन करतों.

# महाराष्ट्र सारस्वत मंडळ

महाराष्ट्र सारस्वत मंडळाची वार्षिक साधारण सभा ता. २१ जानेवारी १९३४ रोजीं सारस्वत ब्राह्मण समाजाच्या सभागृहांत श्री. गणपतराव विश्वनाथ लाड यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेंत महाराष्ट्र सारस्वत मंडळाची नवीन नियमावलि मंजूर करण्यांत येऊन, सन १९३४ सालासाठीं खालील **कार्यकारी मंडळ** नेमण्यांत आलें.

१ अध्यक्षः—श्रीयुत भिकाजी सीताराम सबनीस, बी. ए., एल्एल्. बी.
२ संपादकः— ,, श्रीपाद महादेव वर्दे, बी. ए., एल्एल्. बी.
३ प्रकाशकः— ,, सदानंद लक्ष्मण कापडी, बी. एस्सी.
४ खजिनदारः— श्री. लक्ष्मण नारायण दुडकर
५ चिटणीसः— ,, विठ्ठल जिवाजी नाडकर्णी
६ व्यवस्थापकः— ,, नीलकंठ विसाजी नाबर.
७ सभासदः— ,, शिवराम नारायण कानविंदे बी. ए.
८ ,, ,, यशवंत हणमंत सुखठणकर
९ ,, ,, विनायक मंगेश रांगणेकर.
१० ,, ,, वामन पुंडलिक वर्दे, बी कॉम्.
११ ,, ,, बाळकृष्ण दाजी प्रभु
१२ ,, ,, अच्युत गणेश कामत


# कामत आणि कंपनी.

## दोन हत्तीजवळ, गिरगांव बॅकरोड

आमचे दुकानीं नित्य लागणारीं सर्व तऱ्हेचीं धान्यें, नारळ, चहा, साखर, लोणी, तूप, सर्व प्रकारचें सामान, हिंग, केशर सर्व तऱ्हेचे साबण वगैरे माल मार्केटभावानें घरीं पोंचविण्याची व्यवस्था केली आहे. मालाच्या चांगुलपणाविषयीं गिऱ्हाईकांनीं एकवार खात्री करून घ्यावी.

PHONE NO. 42476.

# रा. वर्दे यांचें डॉ. केतकरांना उत्तर

'प्रतिभा' पाक्षिकाच्या ता. ५ जानेवारीच्या अंकांत डॉ. केतकर यांनीं आपल्या व्रात्य विक्षिप्तपणाला साजेसें धमकीवजा आव्हान मला आणि सारस्वत समाजाची मंडळी (?) यांना पुढीलप्रमाणें दिलें आहे.

"महाराष्ट्र सारस्वत वर्ष १२ अंक ६ यांत 'महाराष्ट्राचा व्रात्य शकार'या मथळ्याखालीं एक निंदामय लेख रा. श्रीपाद महादेव वर्दे यांनीं लिहिला आहे. लेखाचा हेतु सारस्वत समाजाची गिऱ्हाइकी डॉ. केतकर यांच्या " प्राचीन महाराष्ट्र " या ग्रंथास मिळूं नये असा आहे.माझी सारस्वत सामाजाविषयीं कोणत्याही तऱ्हेनें द्वेषभावना नाहीं, हें मीं पूर्वी स्पष्ट केलें असल्यामुळें त्याविषयीं येथें जास्त लिहिणें अवश्य नाहीं. सारस्वत समाजाची याविषयीं जर खात्री पटत नसेल, तर ती त्यांनीं अवश्य पटवून घ्यावी, आणि त्यासाठीं स्वतंत्र कमिटी नेमून चौकशीचा अवलंब करावा. चौकशी कमिटीवर न्या. माडगांवकर, न्या. पाटकर, न्या रांगणेकर यांसारखी मंडळी घ्यावी.त्या कमिटीनें रा. वर्दे व त्यांचे मतानुयायी म्हणजे डॉ. केतकर यांचे आक्षेपक यांस आपलें म्हणणें मांडावयास सांगावें.

वरील गृहस्थांसारखी मंडळी जर ही चौकशी करण्याचें अंगिकारीत असतील, आणि त्यांच्यापुढें आक्षेपक मंडळी आपले आक्षेप मांडावयास तयार असतील आणि त्यांचे आक्षेप ऐकून उत्तर द्यावयास जर न्यायाधीश मंडळी पाचरण करतील तर न्यायाधीशांचें आमंत्रण मीं आनंदानें स्वीकारीन. नेमलेले न्यायाधीश जें मत देतील तें माझ्या दृष्टीनें आदरणीय राहील. प्रत्येक विरुद्ध लेखाकडे लक्ष देणें मला शक्य नाहीं. सारस्वत समाजाची मंडळी या बाबतींत जर निवाडा करण्याचें नाकारतील तरच, मला उपद्रव करूं इच्छिणाऱ्या मंडळीचे प्रयत्न थांबविण्यासाठीं किंवा त्यांना शिक्षा करण्यासाठीं अन्य उपायांची योजना करावी लागेल. जातिभावनेचा फायदा घेऊन विरुद्ध प्रयत्न करणाऱ्यांचें एक तर त्यांच्या ज्ञातीकडूनच नियंत्रण केलें पाहिजे किंवा कोर्टामार्फत तरी केलें पाहिजे."

श्री. व्यं. केतकर

डॉ. केतकरांच्या मूळ लेखाइतकाच शकारी अहंकार त्यांच्या या धमकींतून डोकावत आहे. सारस्वत ब्राह्मण ज्ञातींतील तिघां न्यायमूर्तींकडून आपल्या लेखांची छाननी व्हावी इतकें महत्त्व डॉक्टर केतकर आपल्या भिकार आणि कुत्सित लेखांना देऊं पाहतात. ज्या थोर गृहस्थांचीं नांवें त्यांनीं सुचविलीं आहेत, त्यांच्या नजरेस पडण्याइतकी डॉक्टरमजकूर किंवा त्यांचे लेख यांची लायकी नाहीं. डॉ. केतकरांच्या निरर्गल प्रलापांची छाननी करण्याचें काम पत्करण्यास त्यांची संमति आहे कीं नाहीं, याची आगाऊ विचारपूस, त्यांचीं नांवें सुचविण्यापूर्वीं, करण्याइतका साधा शिष्टाचार डॉ. केतकरांना सुचला नाहीं, हें डॉक्टरमजकुरांच्या अंगीं मुरलेल्या व्रात्य अहंमन्यतेस अनुसरूनच आहे.

डॉ. केतकर यांचे आक्षेपास्पद लेख इतक्या उघड कुत्सितपणाचे व दुष्ट आहेत कीं, कोणाही सामान्य वाचकाला ते वाचतांच त्यांचें किळसवाणें रूप सहज समजून येईल. अशा लेखांतून ' काळें गोरें ' शोधून काढण्यास उडीदपारखी कमिटी नेमण्याचा डॉ. केतकरांचा आग्रह हास्यास्पद होय.

डॉ. केतकरांच्या ' प्राचीन महाराष्ट्रा ' स गिऱ्हाइकी मिळूं नये असा माझा हेतु असणें असंभवनीय आहे, हें डॉ. केतकर यांना पक्कें माहित असावयास पाहिजे. तें कसें व कां आणि हा धडधडीत खोटा आरोप डॉ. केतकर मजवर बुद्धिपुरःसर करीत असावे अशी माझी कां समजूत आहे, याचीं कारणें जाहीर किंवा खासगी रीतीनें त्यांना सप्रमाण कळविण्यास मी तयार आहें. परंतु खासगी वैयक्तिक गोष्टींना शक्य तोंवर सार्वजनिक स्वरूप देणें मला उचित वाटत नाहीं. डॉ.मजकुरांचा आग्रहच पडला तर माझा नाइलाज होईल. वाङ्मय कोणत्याही स्वरूपाचें, कितीही दुष्ट किंवा वाईट असलें तरी त्यांत थोडासा तरी उपयुक्त भाग असेल,तर त्याची गळचेपी करणें योग्य नाहीं, असें माझें स्वत:चें मत आहे. त्यामुळें डॉ.मजकुरांच्या इतर लिखाणांप्रमाणें त्यांच्या 'इतिहासांत' सारस्वतनिंदेचा भाग यदाकदाचित् आलाच, तरी काळाच्या कसोटीस तसें खोडसाळ लिखाण टिकणार नाहीं, ग्रंथांतील सत्य व उपयुक्त भाग तिकाच टिकून राहील, असा मला पूर्ण विश्वास आहेत,

डॉ. केतकरांच्या बाष्कळ लेखांचा व्रात्यपणा उघडयावर मांडतांना, मला कसल्या व्यक्तीशीं गांठ घालावी लागत आहे याची पूर्ण माहिती होती. महाराष्ट्र साहित्यपरिषदेच्या अध्यक्षीय खुर्चीवर टेंकतांच 'परिषदे'ला कोर्टांत ओढण्याचा प्रयत्न ज्या व्यक्तीनें केला,त्या व्यक्तीच्या वाटेस गेलें असतां कोर्टांत जाण्याचा प्रसंग येईल, हा संभव मी पूर्ण ओळखून होतों. डॉ. केतकर कोर्टांत जातील, तेंही सरळपणें न जातां मला शक्य तितका त्रास देण्याच्या पद्धतीनें जातील; शकार आणि न्यायकचेरी यांची जोड मृच्छकटिककर्त्यानेंच घालून दिली आहे; या संभवनेचा मला केव्हांही विसर पडलेला नाहीं. त्या अर्थी सारस्वत समाजांतील कोणत्याही मंडळीनें केतकरी धमकीनुसार मला होणारी शिक्षा टाळण्यासाठीं धावांधांव करण्याचें कारण नाहीं. आपल्या कुचाळ लिखाणास अद्याप पुरेशी प्रसिद्धि मिळाली नाहीं, अशी डॉ. केतकरांची भावना असेल तर आणखी काय धांगडधिंगा घालावयाचा असेल तो त्यांनीं खुशाल घालावा. त्यांना कोर्टापर्यंत जाण्याची हुक्की आली असेल, तर ती पुरविण्यास मी तयार आहें. मराठी वाचकवर्गाच्या विवेकबुद्धीसमोर आपलीं विधानें ते मांडूं इच्छितील, तर त्यांना आणि मलाही तसें करण्याची केव्हांही मोकळीक आहे. परंतु डॉ. साहेबांच्या व्रात्य लीलांची चौकशी करण्यासाठीं कोणत्याही भल्या गृहस्थांना कोर्टाबाहेर शिणविण्याच्या पातकांत त्यांच्याबरोबर भागीदार व्हावें असें मला वाटत नाहीं.

**श्री. म. वर्दे**

---

## वर्गणीदारांस सूचना

मुंबईतील वर्गणीदारांनीं चालू सालची वर्गणी अंक घेऊन येणाऱ्या मनुष्याकडे द्यावी अगर आमच्या कार्यालयांत पोंचती करून पावती घ्यावी. बाहेरगांवच्या वर्गणीदारांनीं मनिऑर्डरीनें वर्गणी पाठविल्यास व्ही. पी. खर्च वांचेल. तरी या सालची वर्गणी शक्य तितक्या लवकर पाठविण्याची सर्व वर्गणीदारांस विनंती आहे.

---


**मालवणहून....**

**मुंबईस—**

आलेलें घरगुती **कोकम** व उत्कृष्ट **काजुगर** आम्ही वाटेल तेथें पाठवितों; तसेंच अलिबाग येथील मीठ लावलेले **चिंचेचे गोळे**;आंबोली घाटांतील **गांवठी मध**; भाजी आमटीचा '**सन्डे स्पेशल मसाला**' स्पेशल **फॅमिली चहा मिक्श्चर** वगैरे माल मिळतो. लिहा—

**रेडकर एजन्सी,**

**धान्य व किराणा मालाचे व्यापारी,**

कांदेवाडी, **मुंबई नं. ४.**

**मंगेश ब्रदर्स**

**यांचे**

**हातानें बनविलेले**

**( मशिनमध्यें नव्हे )**

सर्व तऱ्हेचे व सर्व जातींना लागणारे उत्कृष्ट मसाले,सांबार,मिरची भुकी (तिखट), हळदीची भुकी, रुचकर लोणचें, चटण्या, खमंग भाजणी, उडदामेथी, मेतकूट वगैरे चोख मालापासून बनविलेले जिन्नस वापरून स्वत:ची खात्री करा.

तुमच्या खात्रीकरितां अर्ध्या आण्याचा नमुना खालील ठिकाणीं येऊन घ्यावा.

ब्रँच नं. १

**आंबेवाडी पोस्टाशेजारीं, गिरगांव.**

ब्रँच नं. २

**चिराबाजार मार्केटमध्यें.**

# ज्ञाति-वृत्त

**१. सारस्वत विद्यार्थी सहाय्यक मंडळीः-**

नुकत्याच झालेल्या ३० व्या वार्षिक साधारण सभेंत १९३३-३४ सालासाठीं पुढील व्यवस्थापकमंडळ निवडण्यांत आलें:—

**अध्यक्षः**—श्रीयुत शंकर पुंडलिक वर्दे, बी. ए., एलएल् बी.; **चिटणीसः**—श्रीयुत गजानन हरि जांबोटकर, एम्. ए., बी. टी. व श्रीयुत यशवंत हणमंत सुखठणकर. **खजिनदारः**—श्रीयुत सदाशिव विठ्ठल राजाध्यक्ष, जी. डी. ए. व श्रीयुत अनंत गोविंद तेंडुलकर, एस्. टी. सी. **सभासदः**— श्रीमती कृष्णाबाई वाघ; श्रीयुत मंजुनाथ मंगेश कोपीकर, एम्. ए., बी. एस्सी., ए. आय् सी.; श्रीयुत सदानंद लक्ष्मण कापडी, बी. एस्सी.; श्रीयुत बाबा केशव कुळकर्णी; डॉ. काशिराम विष्णु कामत भांगले, एम्. बी., बी. एस्., ए. आय्. आर्. ओ.; श्रीयुत सदाशिव पांडुरंग नाडकर्णी, डी. एम्., एम्. सी., ए. सी., आय् आय्., व श्रीयुत शंकर गोविंद कुळकर्णी गोगवेकर. **हिशेब-तपासनीस**—श्रीयुत आनंदराव नारायण नेरूरकर, बी. कॉम्., व श्रीयुत माधव महेश्वर मुजुमदार, बी. कॉम्.

मंडळीकडे खालील **देणग्या** अलीकडे जमा झाल्या असून या सर्व दात्यांची संस्था ऋणी आहे.:—

(१) डॉ. सोयरू मंजुनाथ कामत, एम्. बी. बी. एस्. (हुबळी)—१२० रु.

(२) श्रीयुत वसंत रघुनाथ इंगळे (मुंबई)— १०१ रु.

(३) श्रीमती सौ. पार्वतीबाई शिवराम रेगे (मुंबई)—१०० रु.

(४) श्रीयुत नरसिंह दामोदर नाईक (मडगाव, गोवें)—१०० रु.

(५) श्रीयुत व्यंकटराव विठ्ठलराव नाडिग, बी. ए. (हुबळी)—१०० रु.

(६) श्रीयुत एन्. व्ही. मंडलीक, बी. ए., एल् एल्. बी., ट्रस्टी, एडवर्ड रेहाटसेक बिक्वेस्ट, (मुंबई)—५० रु. एकूण—रु. ५७१

**२. माननीयांचा सन्मान**

अहमदनगर येथील लोकप्रिय, विद्वान व कार्यदक्ष असिस्टंट जज्ज श्री. **पुरुषोत्तम मंगेश लाड**, बी. ए. (बॅांबे व केंब्रिज), आय्. सी. एस्., यांची बदली झाल्यामुळें त्यांना तेथील वकील मंडळानें ता. २५ नोव्हेंबर १९३३ रोजीं थाटाची मेजवानी दिली. तसेंच त्यांना निरनिराळ्या स्थानिक संस्थाकडून व वैयक्तिक ज्या अनेक पानसुपाऱ्या झाल्या, त्या त्यांच्या विद्वत्तेचें व गोड स्वभावाचें निदर्शक नाहीं असें कोण म्हणेल ?

वेताळवाडी येथील "अनाथ सोमवंशी बोर्डिंग" या अस्पृश्य संस्थेमार्फत रेव्हरंड मोडक, एम्. एल्. सी., यांच्या अध्यक्षतेखालीं ता. २९-११-१९३३ रोजीं त्यांना थाटाची पानसुपारी झाली. त्या वेळीं जिल्ह्यांतील पुष्कळ प्रमुख गृहस्थ हजर होते. त्यापैकीं कांहीं जणांचीं व अध्यक्षांचें श्री. लाड याच्या कामगिरीबद्दल गौरवपर भाषणें झाल्यावर, श्री. लाड यांचें उत्तरादाखल आभारप्रदर्शक भाषण झालें. आपल्या विचारपरिप्लुत व मननीय भाषणात श्री. लाड यांनीं अस्पृश्य समाजाला बहुमोल सूचना केल्या. ते म्हणाले, " महात्माजींनीं या अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळींत मन घातल्यामुळें अस्पृश्यता निवारण कार्याला जोराची चालना मिळाली आहे, आणि त्यामुळें हरिजनांचा भविष्यकाळ उज्ज्वल दिसत आहे. तथापि चळवळ करितांना ती निव्वळ राजकीय स्वरूपाची असू नये; कारण नोकरीच्या आशेनें चालविलेल्या चळवळीपासून अस्पृश्याची केव्हांही उन्नति होणार नाहीं. या बाबतींत त्यांनीं ब्राह्मणसमाजाचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवावें. ब्राह्मणवर्गाला

जास्त जागा मिळूनही आज ब्राह्मणवर्गाची काय स्थिति झाली आहे हें त्यांनीं लक्षांत ठेवावें. अस्पृश्यांनीं स्पृश्यांच्या जुलुमाला वैतागून परधर्माचा केव्हांही स्वीकार करूं नये. एक दिवस असा उगवेल कीं, त्या वेळीं हिंदुधर्म इतरांना शिकविणारा महापुरुष अस्पृश्यांमध्येंच निर्माण होईल, व त्यांचा कार्यभाग होईल. स्वतः अस्पृश्यांनीं आपल्या अंतर्गत अस्पृश्यतेची हकालपट्टी करण्याचा प्रयत्न करावा. आज अस्पृश्यांतही अनेक अस्पृश्य आहेत. त्यांची अस्पृश्यता आधीं घालवावी. याप्रमाणें दोन्ही दिशांनीं अस्पृश्यतानिवारण-कार्य केल्यास चांगलें. निवळ मंदिर-प्रवेशानें अस्पृश्यांची भूक नष्ट होणार नाहीं; तसें असतें तर आज त्यांच्याकरितां असंख्य देवालयें उघडीं झालीं असतीं. खरें अस्पृश्यतानिवारण आर्थिक दृष्ट्या झालें पाहिजे. अस्पृश्यांच्या पोटाला अन्न मिळालें पाहिजे. तेव्हां अस्पृश्यतानिवारण हा निवळ धार्मिक अगर सामाजिक प्रश्न नसून, तो मुख्यत्वेंकरून आर्थिक प्रश्न आहे. अस्पृश्यांनीं याप्रमाणें वागून आपसांत एकी करावी व आपण हिंदु धर्माचे एक प्रबल घटक आहोंत, असें जगाला दाखवावें."

हे विचार मननीय नाहींत असें कोण म्हणेल !

येथील सारस्वत ब्राह्मण समाजांतील एक सन्मान्य वृद्ध पुढारी व कार्यकर्ते श्री. **वामनराव रामचंद्र केरकर**, बी. ए. एल्‌एल्. बी., हे प्रकृतिस्वास्थ्यासाठीं मुंबई सोडून बाहेरगांवीं कायमचे राहावयास जात असल्यामुळें सारस्वत ब्राह्मणसमाजांतील त्यांच्या मित्रमंडळीनें ता. १९ डिसेंबर १९३३ रोजीं त्यांस पानसुपारी केली. समाजाचे सध्याचे अध्यक्ष श्री. भिकाजी सीताराम सबनीस, रा. श्रीपादराव वर्दे, श्री. शिवराम नारायण रेगे, श्री. विठ्ठल जिवाजी नाडकर्णी व श्री. सदानंद लक्ष्मण कापडी यांचीं श्री. वामनरावजींच्या अंगच्या बहुविध गुणांबद्दल व त्यांनीं केलेल्या सारस्वत समाजाच्या सेवेबद्दल वर्णनपर भाषणें झाल्यावर त्यांना पुष्पहारांनीं मंडित करण्यांत येऊन प्रेमाचें स्मृतिचिन्ह म्हणून रुप्याच्या तबकांतून चांदीच्या फुलदाण्या व करंडक अर्पण करण्यांत आला. नंतर वामनरावजींनीं सर्वांचे आभार मानल्यावर अल्पोपहार होऊन हा समारंभ आटोपला.

## ३. विद्यार्जनासाठीं परदेशगमन

फॉरिन एज्युकेशन सोसायटीनें यंदा निवडलेले विद्यार्थी श्री. **गोविंद चिंतामण पालेकर**, बी. एस्‌सी. ( बेळगांव ) हे पी. ॲन्ड. ओ. कंपनीच्या 'रांची' या टपालच्या आगबोटीनें ता. ३० डिसेंबर १९३३ रोजीं विलायतेवरून अमेरिकेस रवाना झाले. श्री. पालेकर यांचें शिक्षण बेळगांव येथील सरदार्स हायस्कूलमध्यें होऊन तेथून १९२९ सालीं ते मुंबई विश्वविद्यालयाची प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाले. पुढील शिक्षण पुणें येथील फर्ग्यूसन कॉलेजांत घेऊन १९३३ सालीं बी. एस्‌सी. परीक्षा ते महिल्या वर्गांत सन्मानानें उत्तीर्ण झाले. इतकेंच नव्हे, तर रसायनशास्त्रांत त्यांनीं सर्वांत अधिक गुण मिळविले. या यशामुळें फर्ग्युसन कॉलेजांत त्यांना फेलो नेमण्यांत आलें व तें काम त्यांनीं एका सहामाहींत केलें. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांतील लुइसिआना स्टेट युनिव्हर्सिटींत शुगर इंजिनियरिंगचा अभ्यास करण्याकरितां फॉरिन एज्युकेशन सोसायटीनें त्यांना मदत केल्यामुळें ते आतां परदेशीं जात आहेत. श्री. पालेकर आपल्या नियोजित अभ्यासक्रमांत यश संपादून यथाकाळीं सुखरूपपणें मातृभूमीस परत येतील अशी आम्हांस उमेद आहे.

**डॉ. दिगंबर विठ्ठल नाडकर्णी**, एम्. एस्. हे ता. ११ जानेवारी १९३४ रोजीं इटॅलिअन कं.च्या "व्हिक्टोरिआ" बोटीनें लंडन येथें एफ्. आर. सी. एस्. परीक्षेचा अभ्यास करण्याकरितां, तसेंच तेथें अमेरिकेंत मेयो क्लिनिकमध्यें शस्त्रक्रियाविषयक कामाचा विशेष अनुभव घेण्याकरितां व शक्य

तर युरोप खंडांतील प्रमुख रुग्णालयांचें निरीक्षण करण्याकरितां जात असून त्यांना आम्ही प्रेमाचा निरोप देतों. डॉ. नाडकर्णी हे तीव्र बुद्धीचे विद्यार्थी असून, मॅट्रिक्युलेशन परीक्षेंत त्यांचा नंबर फार वर आला होता. पुढील शिक्षणासाठीं ते एल्फिन्स्टन कॉलेजांत दाखल झाले व तेथें त्यांना स्कॉलर्शिपही मिळाली. तेथून पहिल्या वर्षाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते ग्रँट मेडिकल कॉलेजांत जाऊं लागले. तेथील इंटर एम्. बी. बी. एस्. परीक्षा ते पहिल्या वर्गांत पास झाले. सन १९२६ मध्यें ते फायनल एम्. बी. बी. एस्. परीक्षा दुसऱ्या वर्गांत जरी उत्तीर्ण झाले तरी सदर परीक्षेस बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांत ते पहिले आले होते.

१९२९ त त्यांनीं मुंबई विश्वविद्यालयाची शस्त्रविद्येची एम्. एस्. ही अत्युच्च पदवी पटकावली. त्यांनीं आजपर्यंत कोणत्याही परीक्षेंत अपयश घेतलेलें नाहीं. विद्यार्जन याप्रमाणें उत्तम रीतीनें पुरें केल्यावर त्यांनीं मुंबईतील निरनिराळ्या वैद्यकीय संस्थांतून काम करून त्या धंद्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळविला. ग्रँट मेडिकल कॉलेज व गोवर्धन सुंदरदास मेडिकल कॉलेज या दोन्ही उच्च वैद्यकीय संस्थांत 'ॲनॉटमी' विषयाचे ते अध्यापक होते. किंग एडवर्ड मेमोरिअल हॉस्पिटलमध्यें हाउस सर्जन, कॅझुअल्टी ऑफिसर, रेसिडंट असिस्टंट सर्जन, ऑनररी असिस्टंट सर्जन वगैरे जागीं त्यांनीं उत्तम काम केलें, व तसेंच गो. सुं. मेडिकल कॉलेजांत ऑनररी लेक्चरर व जेरबाई वाडिआ हॉस्पिटलांत ऑनररी सर्जन म्हणून काम करण्याची त्यांना संधि मिळाली. गेलीं तीन वर्षें त्यांनीं दादर येथें स्वतःचें शस्त्रक्रियागृहही चालविलें होतें. त्यांची विलायतेस जाऊन एफ्. आर. सी. एस्. होण्याची महत्त्वाकांक्षा असून त्यासाठीं आवश्यक द्रव्यसाहाय्य मिळविण्यासाठीं त्यांनीं मुंबईतील धनिक मंडळीकडे याचना केली; परंतु त्यांना उत्तेजन मिळालें नाहीं. परंतु त्यामुळें नाउमेद न होतां, चिकाटीनें ठिकठिकाणीं फिरून व दीर्घ परिश्रम करून अनेक बंधु-भगिनींच्या मदतीनें सुमारें ६००० रु. रक्कम जमविले. त्यांत रा. ब. राजाध्यक्ष गौ. सा. ब्रा. फॉरिन एज्युकेशन सोसायटीनें २००० रु.ची भर घातली, हें तीस भूषणावह आहे. डॉ. नाडकर्णी यांनीं या सर्व कामीं जी विलक्षण चिकाटी दाखविली त्यावरून, तसेंच त्यांच्या आजपर्यंतच्या नांवलौकिकावरून ते उद्दिष्ट शिक्षणक्रम पुरा करून परत येतील यांत शंका नाहीं. आम्ही त्यांचें अभिष्ट चिंतितों.

### ४. अभिनंदन

गेल्या अंकांत गोमंतकीय तरुण चित्रकार श्री. रघुबीर गोविंद चिमूलकर यांचें अभिनंदन करण्यांत आलें होतें; त्या वेळीं लगेच पुढील अंकांतही त्याच व्यवसायांतील दुसऱ्या एका बंधूचें अभिनंदन करण्याची संधि येईल असें वाटलें नव्हतें. रा. ब. स. वि. राजाध्यक्ष गौ. सा. ब्रा. फॉरिन एज्युकेशन सोसायटीचे विलायतेंत शिक्षण घेत असलेले तरुण शिल्पकार विद्यार्थी रा. **रामचंद्र पांडुरंग कामत** यांना लंडन येथील "रॉयल ॲकॅडमी ऑफ आर्टस्" या संस्थेनें या वर्षाचें आपलें **सुवर्ण-पदक** व **२०० पौंडांची एडवर्ड स्टॉल प्रवास-शिष्यवृत्ति** देऊन त्यांच्या अत्युच्च कलेबद्दल गुणग्राहकता दर्शविली अशी सुवार्ता तारेनें नुकतीच आली आहे. या अपूर्व सन्मानाबद्दल श्री. कामत यांचें आम्हीं सप्रेम व साभिमान अभिनंदन करितों. १८६५ मध्यें रॉयल अकॅडमी लंडनमध्यें अस्तित्वांत आल्यापासून आजपावेतों **कोणाही हिंदी इसमास** हें सुवर्ण-पदक देण्यांत आलें नव्हतें; ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे श्री. कामत यांच्या यशाच्या असामान्यतेची कोणासही कल्पना करितां येईल. श्री. कामत यांनीं गेल्या दोन वर्षांत लंडन येथें अनेक पारितोषिकें व शिष्यवृत्त्या पटकावल्या आहेत, ही गोष्टही महशूर आहेच. या नवीन सन्मानानें त्यांनीं स्वज्ञातीच्याच नव्हे तर अखिल भारतवर्षाच्या कीर्तींत जी स्पृहणीय भर घातली आहे, तीबद्दल सर्वजण त्यांना धन्यवाद

देतील यांत संदेह नाहीं. येथील " टाइम्स ऑफ इंडिया " पत्रानें श्री. कामत यांच्या या अपूर्व यशाबद्दल खालील संपादकीय लेख लिहून त्यांचा गौरव केला आहे. ज्या फॉरिन एज्युकेशन सोसायटीच्या मदतीमुळें श्री. कामत यांस आपली अतुल कर्तबगारी दाखवितां आली, त्या संस्थेच्या चालकांच्या दूरदृष्टीबद्दल साभार कौतुक केल्यावांचून येथें राहवत नाहीं.

श्री. कामत यांचा उत्तरोत्तर असाच उत्कर्ष होवो असें आम्हीं इच्छितों.

श्री. कामत यांच्या यशःसिद्धीचा गौरव करून ता. १५-१२-३३ रोजीं टाइम्स ऑफ इंडिया म्हणतो:—

### A Bombay Art Triumph

The news that Mr. R. P. Kamat, a former student of the Bombay School of Art, has won the blue ribbon of the Royal Academy for Sculpture, namely the coveted biennial gold medal, is of more than usual interest. A few years ago the school laws of the Academy described this coveted prize as "a Gold Medal with the Discourses of "Sir Joshua Reynoldas and other "books, for a Model of an His-"torical Subject in the Round or in "Relief being an original composi-"tion......This Medal will carry "Travelling Studentship for travel "and study abroad, of the value of "£200 tenable for one year." It has been rumoured that the travelling studentship no longer accompanies the gold medal. We cannot be sure on this point, for the laws of the Academy, though venerable enough, are not quite as fixed as those of the Medes and Persians. But however this may be, no doubt the rite of inscribing Mr. Kamat's name upon the walls of the Academy along with those of the gold medallists of the past will be duly performed, and for the first time since the Academy was founded in 1865 an Indian will take his place in this artistic roll of honour.

The young artist's success is of interest to all India, but particularly to Bombay and the Bombay School of Art, where Mr. Kamat had his early training. That the School authorities very quickly recognised the uncommon abilities of Mr. Kamat is proved by the series of distinctions conferred upon him, including one of the highest, the Mayo Medal. Mr. Kamat was also fortunate in the fact that the Director of the School who was in London in 1930 organising the Bombay Art Exhibition at India House, personally brought his work to the notice of the Academy, which granted him permission to send photographs of his works instead of the works themselves from India. On the strength of these he was admitted to the Academy Schools in 1931, and signalised his entry by winning a silver and bronze medal at the very next prize-giving, an initial success

which was followed by an unbroken series of triumphs. There are of course some people who like to point out dolefully how few of the Academy's gold medallists have subsequently "arrived' as artists, just as there are those (and they are not few) who freely condemn Sir Joshua Reynold's discourses. This is but captious criticism. The fact that the brilliant youth does not always develop into the famous artist can in no way diminish the great credit due to this plucky Indian student, and to the high standards of training given in the School in which he passed his advanced examination in modelling. Mr. Kamat has pitted himself against his contemporaries in the most famous and most historic art school in England, and has emerged at the head of the students of sculpture. Not only Mr. Kamat but the J. J. School of Art is to be congratulated on this inspiring and significant success, of which this city may be justly proud.

× × ×

इंडिअन मर्कान्टाइल मरीन ट्रेनिंग शिप 'डफरीन'-वरील नाविक शिक्षण घेत असलेले विद्यार्थी कुमार **प्रभाकर रघुनाथ देशपांडे** यांनीं अलीकडे झालेल्या तेंथील परीक्षेंत इतर विद्यार्थ्यांपेक्षां पुष्कळच अधिक मार्क मिळवून पहिला नंबर पटकावल्यामुळें त्यांना मिळत असलेल्या दरमहा २५ रु. आॅग्रे स्कॉलर्शिपशिवाय सालिना २०० रु. ची सिंधिया स्टीम नॅव्हिगेशन स्कॉलर्शिप नं. १ व विविध विषयांतील सर्वसाधारण नैपुण्याबद्दल रौप्य प्याला हीं शालाधिकाऱ्यांकडून बक्षिस देण्यांत आली.

× × ×

कुमारी **लीला राव** ( सुप्रसिद्ध डॉ. राघवेंद्र राव, एम्. डी. ( लंडन ) यांच्या कन्या ) यांचा अत्युच्च टेनिस प्लेअर म्हणून नांवलौकिक पूर्वापार आहेच. ता. २ जानेवारी १९३४ रोजीं मुंबई येथें झालेल्या पारशी जिमखाना ओपन टेनिस टूर्नि-मध्यें त्या खेळांतील आपलें कलापूर्ण नैपुण्य एकवार दाखवून निरनिराळ्या प्रकारच्या तिन्ही सामन्यांत त्यांनीं पुन्हा एकदा आपलें वर्चस्व प्रस्थापित करून चँपियनशिप मिळविली.

× × ×

नाशिक येथें नुकत्याच भरलेल्या शेतकी व गाई-बैल-प्रदर्शन कमिटीनें तेथील शेतकीखात्याचे ओव्हरसिअर श्री. **रामचंद्र श्रीपाद दुभाषी,** बी. एजी. यांस त्यांनीं सदर प्रदर्शन यशस्वी करण्याकरितां दीर्घ परिश्रम केले याकरितां प्रदर्शनसमारंभाचे अध्यक्ष व शेतकीखात्याचे डायरेक्टर डॉ. बर्न्स यांच्या हस्तें सुवर्णपदक व प्रशस्तिपत्र नजर करण्यांत आलें. श्री. दुभाषी हे सारस्वत विद्यार्थी-साहायक मंडळाचे माजी विद्यार्थी आहेत.

× × ×

श्री. **गजानन गोविंद वेलिंग** यांची बेळगांव व मुंबई येथें फोटोग्राफीचें सामान विकण्याची व कॅमेरा बनविण्याची Messrs: S. Mahadeo & Co. या नांवाची कंपनी असून त्या धंद्यांत त्यांना चांगलें यश आलें आहे. लंडन येथें जगांतील फोटोग्राफीचें प्रदर्शन नुकतेंच भरलें होतें. या प्रदर्शनांत निरनिराळ्या देशांतून ४,००० फोटो आले होते. त्यात श्री. वेलिंग यांनीं पाठविलेल्या फोटोचा अनुक्रम १७ वा लागून त्यांना त्याबद्दल बक्षिस मिळालें.

× × ×

—बडोदें येथील कार्यदक्ष न्यायाधिकारी श्री. **वामन नारायण पाटकर,** बी. ए., एलएल्. बी., यांना तेथील हायकोर्ट जज्ज म्हणून नुकतेंच नेमिलें आहे.

—श्री. **विठ्ठल नारायण चंदावरकर,** बी. ए. ( कॅन्टाब ), बार अॅट-लॉ; जे. पी. यांना यंदा मुंबईत भरलेल्या इंडियन सायन्स कॉंग्रेसच्या २१व्या अधिवेशनाच्या स्वागतमंडळाचे अध्यक्ष निवडलें होतें.

× × ×

—श्री. **विश्वनाथ गणपतराव दळवी**, बी.ए., एलएल्. बी. ( कॅन्टाब ), बार-ॲट-लॉ, हे ॲडव्होकेटस्‌तर्फे मुबई बार कौन्सिलवर पुन्हां निवडून आले.

—नूतन वर्षानिमित्त खालील गृहस्थांस त्यांच्या नांवापूर्वी लिहिलेले किताब सरकारकडून देण्यांत आले.

**रावबहादूर**— श्री. कृष्णाजी व्यंकटेश कौण्डिण्य, डेप्युटी कलेक्टर, धारवाड.

**रावसाहेब**—श्री. गणपत शंकर तेलंग, पोलिस प्रॉसिक्युटर—धारवाड; श्री. कासरगोड भुजंग कामत, ज्युनिअर सुपरिंटेंडंट जनरल डिपार्टमेंट, सेक्रेटरियट, मुंबई.

**इंडियन पोलिस मेडल**—रा. रा. एम्. एच्. कामत, सब इन्स्पेक्टर ऑफ पोलिस, सी. आय्. डी. मुंबई; व रा. रा. आर्. के. पै, सब-इन्स्पेक्टर ऑफ पोलिस मुंबई, इलाखा.

—सरकारानें रा. ब. **लक्ष्मण विष्णु परूळेकर** बी. ए., एलएल्. बी., एम्. एल्. सी. ( रत्नागिरी ) व रा. सा. **व्ही. व्ही. शिरगांवकर** ( बेळगांव ) यांस शेतकीखात्याच्या प्रांतिक मंडळाचे सभासद निवडलें आहे.

—रा. सा. **शांताराम सखाराम परूळकर**, बी. ए., एलएल्. बी., वकील यांची सरकारनियुक्त सभासद म्हणून सातारा डिस्ट्रिक्ट बोर्डावर नेमणूक झाली आहे.

—रा.रा. **सुंदरराव डोंगरकेरी**, बी.ए., एलएल्. बी. सॉलिसिटर ( रजिस्ट्रार, मुंबई युनिव्हर्सिटी ) व रा. रा. **बळवंत कृष्णराव वागळे** बी. ए. ( कॅन्टाब ) ( स्टेट ऑडिट ऑफिसर, मुंबई म्युनिसिपालिटी ) यांना सरकारकडून "जस्टिस ऑफ धी पीस" नेमण्यांत आलें आहे.

—कुमारी **कमला सखाराम रेगे** (वायंगणकर), कुमारी **शारदा कृष्णराव कबीर**, व कुमारी **वत्सला एम्. सामंत** या मुंबई विश्वविद्यालयाच्या सेकंड एम्. बी., बी. एम्. परीक्षा उत्तीर्ण झाल्या.

—श्री. के. **एन्. दिवेकर** यांना मुंबई शहरतर्फे एम्. सी. सी. टीमच्या विरुद्ध खेळण्याचा मान मिळाला होता.

× × ×

**वक्तृत्वसमारंभांतील यशस्वी बाल-उमेदवार:—**

**सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीतर्फे** कु. हिराबाई सखाराम राजाध्यक्ष स्मारक बक्षिसांसाठीं यंदा झालेल्या वक्तृत्वसमारंभांत यशस्वी झालेले उमेदवारः—

**गौड सारस्वत ब्राह्मण कुटुंबांसाठीं हवाशीर घरांची सोय**

**गौड सारस्वत ब्राह्मण को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीच्य**

**डॉ. भाऊ दाजी रोडवरील वसाहतींत झालेली आहे.**

१०० चौरस फुटांच्या खोलीस विजेच्या दिव्यासह भाडें : रु. १२-८; परंतु सोसायटीच्या भागीदारांस २५ टक्के कमी पडतें. सिंगल व डबल खोल्या अगर पांच खोल्यांचा स्वतंत्र मजलाही घेतां येतो.

**खोल्यांची चौकशी वसाहतींत करावी.**

**स्पर्धा नं. १:**—(१) कु. पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे, (२) कु. गणपत दत्तात्रय रेगे, (३) कु. सीताकांत गणपत लाड.

**स्पर्धा नं. २:**—(१) कु. मनमोहन रघुनाथ रेडकर, (२) कु. उमाकांत लक्ष्मण देशपांडे, (३) कु. रामनाथ वैकुंठ कामत, (४) कु. वसंत सीताराम घुमे.

**स्पर्धा नं. ३:**—(१) कु.विमल नारायण पंडित, (२) रा. शिवानंद सदाशिव नाडकर्णी, (३) कु. विनायक गुंडोबा माणगांवकर व (४) कु. विमल यशवंत सुखठणकर.

**स्पर्धा नं. ४**—(१) कु. नारायण वसंत नाईक, (२) कु. शालिनी गणपतराव कुडव, (३) कु. मंगेश सखाराम नाडकर्णी,(४) कु.लक्ष्मीकांत द्वारकानाथ भेंडे.

**बडोदें येथील सहचारणी सभेतर्फे** यंदा झालेल्या वक्तृत्वोत्तेजक चढाओढींत खालील उमेदवारांस बक्षिसें मिळालीं:—





दांत स्वच्छ राखण्यास १च साधन

"कोलोडिना"

टूथ पेस्ट वापरा

उत्तम, स्वदेशी व अतिशय स्वस्त

सोल एजंटस्—

व्ही. प्रभा आणि कंपनी,

मुंबई ४.


(१) कु. अरुणा नाडकर्णी, (२) कु. दिलीप कामतेकर, (३) कु. कमला नाडकर्णी, (४) कु. आनंद रांगणेकर, (५) कु. उषा पाटकर, (६) कु. वत्सला नाडकर्णी.

**सावंतवाडी** येथें यंदा झालेल्या गीतापठणाच्या चढाओढीच्या परीक्षेंत पुढील सहा मुलींना सबंध गीता पाठ येत होती. त्या सर्वांत कु. दुर्गा रेगे ही पहिली आली असून तिचें वय अवघें ९ वर्षांचें आहे. इतर यशस्वी उमेदवार:—

(१) कु. दुर्गा वागळे, (२) कृष्णा वागळे, (३) सौ. शांताबाई नाडकर्णी, (४) कु. मंदाकिनी शहापूरकर, (५) कु. इंदू खांडाळेकर.

× × × ×

## ५. सभा व सम्मेलनें

—मुंबई येथील एल्फिन्स्टन कॉलेज व रॉयल इन्स्टिटयूट ऑफ् सायन्स या संस्थांच्या महाराष्ट्र वाङ्मयमंडळाचें १८ वें सम्मेलन नुक्तेंच झालें. त्यांतील नाटयप्रयोगाचा कार्यक्रम उत्कृष्ट वठला. त्यांतील कु. सुशीला गुंजीकर, कु. अनसूया माडगांवकर, रा. मंगेश ज. संझगिरी, रा. आ. वि. मुजुमदार यांनीं आपापलीं कामें उत्तम रीतीनें केल्यामुळें त्याचा सर्वत्र बोलबोला झाल.

—बॉम्बे लाइफ इन्शुअरन्स कंपनीचा रौप्यमहोत्सव त्या कंपनीचे कर्नाटकचे चीफ एजंट श्री. के. पद्मनाभ राव आणि कंपनी यांनीं ता. २ डिसेंबर १९३३ रोजीं बेळगांव येथें सोशल क्लबाच्या जागेंत श्री. विनायक अप्पाराव मुजुमदार, बी. ए., एलूएल्. बी., ॲडव्होकेट, यांच्या अध्यक्षतेखालीं थाटानें साजरा केला.

—गोवा हिंदु ॲसोशिएशनचें सोशल गॅदरिंग ता. ३ डिसेंबर १९३३ रोजीं श्री. सखाराम वामन शिरगांवकर, एम्. ए. यांच्या अध्यक्षतेखालीं थाटानें साजरें झालें.

—दादर सारस्वत ब्राह्मण सेवासंघ—विद्यार्थीमंडळातर्फे रा. रा. शंकर विष्णु फडणीस, बी. ए.,

एस्. टी. सी., बी. टी. यांचें "विनायकाची कविता" या विषयावर श्री. वसंतराव नारायण नाईक, एम्. ए. यांच्या अध्यक्षतेखालीं. ता. ३१ डिसेंबर १९३३ रोजीं व्याख्यान झालें.

—श्री. शंकरराव कांतेबेट, ए. एम्., आय्. इ. इ., एम्. आय्. आर्. ई. (लंडन) यांचें "Electrical Transmission of Pictures" या विषयावर इंडियन सायन्स काँग्रेसच्या विद्यमानें ता. ६ जानेवारी १९३४ रोजीं कॉनव्होकेशन हॉलमध्यें व्याख्यान झालें.

——दादर येथील सारस्वत ब्राह्मण सेवासंघातर्फे रविवार ता. १७ जानेवारी १९३४ रोजीं श्री. परशुराम आबाजी कर्णीक यांच्या अध्यक्षतेखालीं समारंभ होऊन डॉ. दिगंबर विठ्ठल नाडकर्णी एम्. एस्. एफ्. इ आर.सी. एस्. चा अभ्यास करण्याकरितां विलायतेस जात असल्यामुळें प्रेमाचा निरोप देण्यात आला.

× × ×

—मुंबईतील एक सुप्रसिद्ध समाजसेविका श्रीमती कृष्णाबाई वाघ या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स-मध्यें समाजशास्त्राचा अभ्यास करण्यासाठीं सिटी व हॉल लाइनच्या " सिटी ऑफ बरोडा " या बोटीनें ता. ५ फेब्रुवारी १९३४ रोजीं विलायतेस रवाना झाल्या. कृष्णाबाई यांचा जन्म इ. स. १९०० मध्यें सावंतवाडी येथील एका मध्यम वर्गातील कुटुंबांत झाला. त्यांना बाल्यावस्थेंतच वैधव्यावस्था प्राप्त झाली. परंतु प्राप्तस्थितीस धीरानें तोंड देऊन त्यांनीं प्रो. कर्वे यांच्या हिंगणें येथील महिलाश्रमांत राहून शिक्षण घेतलें. १९२० सालांत चिकित्सक समूह हायस्कूल-मधून त्या मुंबई विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाल्या. विल्सन कॉलेजांत पुढील शिक्षण दोन वर्षें घेतल्यावर, त्यांनीं सेक्रेटरियटमध्यें लेबर ऑफिसांत लेडी इन्व्हेस्टिगेटरची नोकरी धरली. मुंबईतील गिरण्यांतील मजूरबायांत फिरून त्यांची स्थिति सुधारण्याच्या हेतूनें त्यांना शिक्षण देण्यांत



त्यांनीं पुष्कळ परिश्रम केले आहेत. ब्रिटिश पार्लमेंटनें लॉर्ड व्हिटले यांच्या अध्यक्षतेखालीं १९२९ मध्यें " रॉयल कमिशन ऑन लेबर " नेमिलें. तें कमिशन मुंबईस आल्या वेळी त्यावर ' लेडी ॲसेसर ' म्हणून कृष्णाबाई यांची नेमणूक करण्यांत आली होती. त्या कमिशनच्या अध्यक्षांनीं तेथील त्यांच्या कामगिरी-बद्दल मुक्त कंठानें स्तुति केली होती. कृष्णाबाई यांनीं " बॉम्बे प्रेसिडेन्सी वुइमेन्स कौन्सिल " व " नॅशनल वुइमेन्स कौन्सिल " या संस्थांच्या द्वारा महिलावर्गाची यथामति सेवा केली आहे. "सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी"च्या कार्यकारी मंडळावर गेलीं पांच वर्षें त्या प्रामुख्यानें काम करीत असून, त्या संस्थेच्या एक वर्ष त्या सेक्रेटरीही होत्या. सदर संस्थेवरील त्यांच्या सहकारी मित्रांनीं ता. २८ जानेवारी १९३४ रोजीं श्रीयुत शंकरराव पुंडलिक वर्दे, बी. ए., एलूएल्. बी. यांच्या अध्यक्षतेखालीं एक छोटासा समारंभ करून त्यांना प्रेमाचा निरोप दिला. त्यावेळीं उत्तर देतांना आपल्या मातुःश्री, बंधू, व गुरुवर्य अण्णासाहेब कर्वे यांनीं शिक्षणाच्या बाबतींत दिलेल्या प्रोत्साहनाचा व मदतीचा त्यांनीं सद्गदित अंतःकरणानें उल्लेख केला, व शिक्षण पुरें करून विलायतेहून परत आल्यावरही, आपल्या अल्पस्वल्प ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग गरीब भगिनींच्या उन्नतीकडे करीन अशा अर्थाचें त्यांनीं आश्वासन दिलें, तें आजपर्यंतच्या त्यांच्या चारित्र्यास पुष्टीच देतें. लेबर कमिशनरच्या कचेरींतील मंडळीनींहीं गेल्या शनिवारीं त्यांचा सन्मान केला.

श्रीमती कृष्णाबाई वाघ या आपला नियोजित शिक्षणक्रम उत्तम रीतीनें पुरा करून स्वदेशीं सुखरूप-पणें परत येतील व समाज-सेवेचें आपलें अंगीकृत कार्य अधिक उत्साहानें पुढें चालवितील अशी आम्हांस आशा आहे.

—श्री. **भालचंद्र पुंडलीक आडारकर**, बी. ए. (मुंबई व केंब्रिज), बनारस येथील हिंदु युनिव्हर्सिटीचे अर्थशास्त्राचे अध्यापक, यांची मुम्बई विश्वविद्यालयानें **"रीडर इन इकॉनॉमिक्स"**च्या जागीं नुक्तीच नेमणूक केली आहे, हें वृत्त जाहीर करण्यास आनंद वाटतो.

श्री. आडारकर यांचें शिक्षण एल्फिन्स्टन कॉलेजांत होऊन तेथून १९२५ सालीं ते मुंबई युनिव्हर्सिटीची बी. ए. परीक्षा 'संस्कृत' विषय घेऊन सन्मानानें पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले. १९२८ मध्यें उच्च शिक्षणासाठीं ते विलायतेस रवाना झाले. तेथें किंग्ज कॉलेजांत त्यांनीं अभ्यास केला. १९३० सालीं तेथील एकॉनॉमिक्स ट्रायपॉसच्या पहिल्या विभागाच्या परीक्षेंत ते पहिल्या वर्गांत पास झाले. पहिल्या वर्गांत येणारे ते एकटेच विद्यार्थी होते, एवढें सांगितलें कीं त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेची कोणासही कल्पना करितां येईल. १९३१ सालीं इकॉनॉमिक्स ट्रायपॉसची दुसरी परीक्षा ते दुसऱ्या


**सोसायटीच्या १ ल्या त्रैवार्षिकाचा आढावा घेण्याचें काम चालू आहे त्याकडे लक्ष असूं द्या !**

**बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटी, लि.**

**(९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई)**

सोसायटीची पॉलिसी घेणारांनीं अगर एजंट होऊं इच्छिणाऱ्यांनीं **कुळकर्णी** आणि **कंपनी**च्या नावें पत्रव्यवहार करावा.

वर्गांतील पहिल्या विभागांत उत्तीर्ण झाले. त्यांच्या "Federal Finance" या निबंधाबद्दल त्यांना, ५० पौंडाचें "ॲडॉम्स स्मिथ प्राइझ" मिळालें आहे. त्यांनीं एल्फिन्स्टन कॉलेजांत विद्यार्थी असतांना "वेणीसंहारम्" या संस्कृत नाटकाची एक टीकात्मक आवृत्ति प्रसिद्ध केली होती. अलीकडे त्यांनीं The Principles and Problems of Federal Finance"या नांवाचें पुस्तक लिहिलें असून, बनारस हिंदु युनिव्हर्सिटीचे अर्थशास्त्राचे माजी अध्यापक सर सेसिल किंश यांनीं त्याला उपोद्घात लिहिला असून लंडन येथील पी. एस्. किंग ॲन्ड सन् या कंपनीनें तें नुक्तेंच प्रसिद्ध केलें आहे. आपल्या अंगच्या अनेक गुणांमुळें नवीन कार्यक्षेत्रांतही चमकतील अशी आम्हास आशा आहे.

\+ + +

## कवळे येथील 'पंच गौड राजभुवन'

### देवस्थान कमिटीच्या प्रेसिडेंटचा इशारा

गोव्यांतील कवळें येथील श्री शांतादुर्गा देवस्थान कमिटीचे प्रेसिडेंट श्री. जयवंत पांडुरंग कारापूरकर यांच्या सहीनें छापलेलें एक पत्रक आमच्याकडे आलें असून त्यांत " कवळे येथें "पंच गौडराजभुवन" अशी इमारत नाहीं, आपण तेथें १९३२ सालीं सुमारें साडे तीन हजार रुपये किंमतीची एक धर्मशाळा बांधली आहे, पण पं. गौ. राजभुवनासाठीं फंड गोळा करणारे श्री. नरहर व्यंकाजी राजाध्यक्ष यांच्याशीं आमच्या धर्मशाळेचा कसलाच संबंध नाहीं. श्री राजाध्यक्ष यांस कोणत्याही महाजन मंडळींनीं अगर कमिटीनें फंड गोळा करण्यास अधिकार दिला नाहीं. तरी लोकांनीं वेळीं सावध व्हावें," असा इशारा दिला आहे.

---

# शोचनीय मृत्यु !

### कै. पांडुरंग बाबुराव वालावलकर

अनेक लहान-मोठ्या संस्थानांच्या दिवाणपदावर अधिष्ठित झालेले, सेवानिवृत्त वयोवृद्ध ज्ञातिबंधु पांडुरंग बाबुराव ऊर्फ पी. बाबुराव वालावलकर, बी. ए. एलएल. बी. यांस ता. ८।१२।३३ रोजीं शाहूपुरींतील त्यांच्या निवासस्थानीं, पक्षघाताच्या विकारानें देवाज्ञा झाली, हें कळविण्यास आम्हांस अत्यंत वाईट वाटतें. मरणसमयीं त्याचें वय ७७ वर्षे होतें. पी. बाबुराव यांचें शिक्षण कोल्हापुर येथील राजाराम हायस्कूल व कॉलेज येथेंच झालें व पदवी-परीक्षेचा अभ्यास त्यांनीं डेक्कन कॉलेज व मुंबई कॉलेजमध्यें पूर्ण केला. हुषार विद्यार्थ्यांत त्यांची गणना होती. एल. एल. बी. झाल्यावर कांहीं काल त्यांनीं उमरावतीस वकिली केली. नंतर त्यांनीं रतलाम संस्थानांत चीफ जज्ज व दिवाण म्हणून अधिकारारूढ होऊन सोळा वर्षे काम केलें. नंतर ग्वाल्हेर दरबारच्या कॅबिनेटमध्यें पोलिटिकल मेंबर म्हणून सुमारें आठ वर्षें काम करून कै. श्री. माधवराव शिंदे सरकार यांचा विश्वास व कृपा संपादन केली. तेथून इंदूर स्टेटचे प्राइम मिनिस्टर म्हणून दोन वर्षें त्यांनीं कारभार केला व नंतर इकडील सावंतवाडी व मुधोळ संस्थानांत मिळून ७।८ वर्षें दिवाणाच्या हुद्यावर राहून नंतर ते सेवाविवृत्त झाले. त्यांची राहणी मोठी टापटिपीची व नियमित असल्यानें त्यांचें वृद्धापकालांतही आरोग्य उत्तम होतें. मरणापूर्वी फक्त दोनच दिवस त्यांची प्रकृति पक्षघाताच्या झटक्यानें बिघडून त्यांतच शेवटीं त्यांचा अंत झाला. त्यांच्या मागें त्यांस ५ मुलगे व ६ मुली असून पैकीं ३ मोठे मुलगे चांगले कर्तबगार आहेत. सर्वांत मोठे श्री. बाबुराव हे बी. एस्सी. असून सिनेमा रेका

डिस्ट म्हणून प्रसिद्ध आहेत. दुसरे लेफ्टनंट भालचंद्रराव सँडहर्स्ट कमिशन मिळवून क्वेटा येथें पलणीवर लष्करी अधिकारी आहेत. तिसरे ग्वाल्हेर स्टेट फोर्सेसमध्यें नोकरीवर असून चौथा पुणें शिवाजी मिलिटरी स्कूलमध्यें कॅडेट आहे. हे सर्व आपल्या वडिलांचा लौकिक वाढवितील अशी आशा आहे. ईश्वर मृताच्या आत्म्यास शांति देवो.

---

## कै. राघवेंद्र पुंडलिकराव पंडित

बेळगांव येथील कार्यक्षम व लोकप्रिय अस्टिस्टंट कमिशनर, रा. रा. **राघवेंद्र पुंडलिकराव पंडित,** एम्. ए., एल्एल्. बी., यांस ता. २१ डिसेंबर १९३३ रोजीं हृदयक्रिया बंद पडून अकस्मात देवाज्ञा झाली हें कळविण्यास आम्हांस दुःख वाटतें. निधनसमयीं त्यांचें वय अवघें ४२ वर्षांचें होतें.

त्याचें मूळ गांव उत्तर कानडा जिल्ह्यांतील शिरसी हें होय. त्याचें इंग्रजी उच्च शिक्षण मुंबई येथें सेंट झेविअर कॉलेजांत झालें. तेथून फ्रेंच व हिस्टरी हे विषय घेऊन १९१४ सालीं ते बी. ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. पुढील वर्षी इतिहास विषय घेऊन एम्. ए.ची परीक्षा दुसऱ्या वर्गात पसार झाले. १९१५ मध्यें फर्स्ट एल्एल्. बी. व १९१६ मध्यें सेकंड एल्एल्. बी. परीक्षा त्यांनीं दिल्या. सेकंड एल्एल्. बींत त्यांना पहिला वर्ग मिळून जज्ज स्पेन्सर प्राइझ मिळालें. नंतर त्यांनीं शिरशी येथें वकिली सुरू केली. ता. १ डिसेंबर १९१९ पासून त्यांची बॉम्बे प्रॉव्हिन्शियल सिव्हिल सर्व्हिसमध्यें डेप्युटी कलेक्टर म्हणून नेमणूक झाल्यावर धारवाड, पश्चिम खानदेश, कुलाबा, विजापूर, बेळगांव वगैरे अनेक जिल्ह्यांत त्यांनीं काम केलें. गेलीं ६ वर्षें ते दक्षिण भागाचे असिस्टंट कमिशनर म्हणून काम करीत असून १९३१ सालीं बेळगांव जिल्ह्याचे कलेक्टर म्हणून हंगामी काम केलें होतें. आपल्या अंगच्या कर्तबगारीमुळें व सुस्वभावामुळें ते वरिष्ठांस, हाताखालच्या लोकांस व जनतेस सारखेच लोकप्रिय झाले होते. बेळगांव येथील ज्ञातिविषयक सार्वजनिक कार्यांत ते आस्थेनें लक्ष घालीत असत. अशा उदयोन्मुख गृहस्थावर ऐन तारुण्यांत मृत्यूचा घाला पडावा हें केवढें दुर्दैव! त्यांच्या पाठीमागें ८० वर्षांच्या घरांत आलेलीं त्यांचीं मातापितरें, त्यांची पत्नी व ८ मुलें आहेत. त्यांचें सान्त्वन करणें कठीण आहे. त्यांचे दुसरे बंधु श्री. सुंदरराव हे एल्एल्. बी. असून शिरशी येथें वकिली करीत असतात. तिसरे बंधु श्री. रामराव बॅरिस्टर असून रंगून येथें प्रॅक्टिस करीत असतात; व कनिष्ठ बंधु धारवाड येथें कर्नाटक कॉलेजांत विद्याभ्यास करीत आहेत.

ईश्वर मृतांच्या आत्म्यास शांति देवो !

# "सारस्वत आणि त्यांची खर्चिक राहणी"

( लेखकः—श्री. **वा. मं. तेलंग** )

महाराष्ट्र सारस्वताच्या गेल्या अंकांत वरील मथळ्याखाली आमचे विद्वान मित्र श्रीयुत वर्टी यांनीं आपले विचार निर्भीडपणें मांडून या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नास जी चालना दिली, त्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. परंतु त्यांचे कित्येक विचार व्यावहारिकदृष्ट्या सर्वांसच पटतील असें दिसत नाहीं.

" साधी राहाणी आणि उच्च विचारसरणी " या तत्त्वानुसार "ज्यांची प्राप्ति मोठी असून ज्यांना नबाबासारखें राहतां येईल, त्यांनींसुद्धां ऐषआराम सोडून साध्या राहणीचा अवलंब करावा व बचत पावलेल्या आपल्या संपत्तीचा सार्वजनिक धर्मादायाकडे उपयोग करावा," असें श्री. वर्टी सुचवितात. अशा तऱ्हेचा उपदेश करणें हें फारच सोपें काम आहे. परंतु व्यवहारांत अशा तऱ्हेनें राहाणें कितपत शक्य आहे, याचा आपण विचार करणें जरूर आहे. सर्वजण जर अशा तऱ्हेनें राहाते, तर गांधीजींना " महात्मा " हें पद देण्याची आवश्यकताच उरली नसती. मनुष्यप्राणी हा स्वभावतःच स्वार्थपरायण आहे. शिवाय " ऐषआराम " व " साधी राहणी " यांची व्याख्या ठरविणें हेंही कठीण काम आहे. उदाहरणार्थ, जस्टिस, मेयर, मिनिस्टर, कलेक्टर इत्यादि हुद्यांवर असलेली मंडळी आपआपल्या जागांची पत राखण्याकरितां बंगल्यांतून राहणार, चारदोन नोकर पदरीं ठेवणार, मोटरींतून फिरणार, व हा सर्व खर्च त्यांना आवश्यक म्हणूनच करावा लागतो. तो योग्य नाहीं असें कोण म्हणेल ? परंतु आमच्यासारख्या मध्यम स्थितींतल्या लोकांच्या बाबतींत तो ऐषआरामच ठरेल. तसेंच, आम्हीं आपआपल्या आफिसांत जातांना बस किंवा ट्रॅममधून जाणार, व हा खर्च आवश्यक आहे असें म्हणणार; तर आमच्याच हाताखालीं काम करणारे शिपाई व मजूरदार लोक ह्या खर्चाला ऐषआराम या सदरांत ढकलणार. विचार केल्यास असें दिसून येईल कीं, हायकोर्टाच्या न्यायाधीशापासून तो सामान्य मजुरापर्यंत सर्वजणांनीं जर आपआपल्या कामावर पायीं जाण्याचें ठरविलें, तर तें केव्हांही हास्यास्पद ठरेल व ही इतकी अशक्य गोष्ट घडून येणें शक्य आहे असें धरून चाललें तरी, प्रत्येकानें साधेपणानें राहून आपल्याजवळची बचत धर्मादाय करावयाचें ठरविल्यास मनुष्याची उपजत महत्त्वाकांक्षा लुप्तप्राय झाल्याशिवाय राहणार नाहीं जास्त मिळणारा पैसा जर धर्मादायच करावयाचा, तर जास्त मिळवावाच कां, हा प्रश्न उपस्थित होणारच. स्वतःस पुरेसा पैसा मिळूं लागतांच जास्त मिळविण्याची इच्छा कोणी करणार नाहीं; अर्थात् आळसास उत्तेजन दिल्याप्रमाणेंच होणार. परंतु आजपर्यंत जगांत जे मोठमोठे शोध लागले ते महत्त्वाकांक्षेमुळेंच हें विसरून चालणार नाहीं.

भपकेबाज पोषाखाचीही तीच स्थिति. आधीं भपकेबाज म्हणजे काय याची व्याख्या ठरविणें कठीण आहे. भपकेबाज पोषाख करणें हें डामडौलाचें लक्षण आहे, असें जरी कदाचित् म्हणतां आलें, तरी कित्येक वेळां तसा पोषाख केल्याशिवाय केवळ बुद्धिबळावर नोकरीसुद्धा मिळणें बरेच वेळां कठीण जातें, व मिळाली तरी पगार कमी दिला जातो, हें स्वतंत्र धंद्यांत पडलेल्या श्री. वर्टी यांच्यापेक्षां नोकरीपेशांत असलेल्यांस तरी जास्त पटेल यांत संशय नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे समाजांतील अमुक व्यक्तींनीं अमुक एका पद्धतीनें राहावें असें ठासून सांगणें हें फार बिकट काम आहे. माझें स्वतःचें तर असें म्हणणें आहे कीं,समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें दुसऱ्याचें

अंध अनुकरण करण्याच्या भलत्याच मोहास बळी न पडतां आपलें स्वतःचें उत्पन्न, आपल्या कुटुंबाची एकंदर परिस्थिति, आपल्यावर अवलंबून असणारी मंडळी व थोडी फार भविष्यकाळची तरतुद, या सर्व गोष्टींचा जबाबदारपणें विचार करून त्याप्रमाणें कमी-जास्त पद्धतीनें आपली राहाणी ठेवावी; मग लोक आपणास कांहींही म्हणोत.

सारस्वतांचा ओढा दिवसेंदिवस ख्यालीखुशाली-कडे जास्त जास्त वाहवत चालला आहे हें कथन केल्यानंतर श्री. वर्टी पुढें म्हणतात, "गृहस्वामिनीच्या कलावर ही वृत्ति बहुशः अवलंबून असते. जर ती हात राखून खर्चणारी असेल, जर तिचा दरारा घरांत नियमित असेल, तर नवऱ्याची वागणूक सर्वस्वी नाहीं तरी बरीचशी आवरतां येते." हे उद्गार कांहीसे खरे असले, तरी एकतर्फी आहेत. मी श्री. वर्टी यांना असें विचारतों कीं, प्रत्येक गृहस्वामिनीची वृत्ति खरोखरच तिच्या कलावर अवलंबून असते, कीं गृहस्वामीच्या मतावर असते ! कित्येक तरुणांना आपल्या बायकांनीं कांहीं विशिष्ट तऱ्हेच्या फॅशनचा पोषाख केल्याशिवाय त्यांना आपल्याबरोबर फिराव-यास घेऊन जावयास लाज वाटते, व त्यांना स्पष्ट शब्दांनीं तसें दर्शविणें शक्य वाटत नाहीं,असे कित्येक-जण आपल्या माणसांबरोबर फिरावयास वगैरे गेल्या-वेळीं आपल्या आजूबाजूनें फिरणाऱ्या इतर फॅशनेबल स्त्रियांच्या पोषाखाचा उल्लेख करण्याचा प्रसंग आल्यास आपणास अशी फॅशन आवडते असें अप्रत्यक्षपणें दर्शवितात. स्त्रिया तर बोलून चालून जात्याच फॅशनप्रिय, व नवऱ्याला आपल्या अगदीं मुठींत ठेवावें ही तर त्यांची नैसर्गिक महत्त्वाकांक्षा; मग प्रत्यक्ष आपल्या नवऱ्यांनाच फॅशन प्रिय आहे, हें दिसून येतांच त्या थोड्याच स्वस्थ बसणार ! मग त्याचा दोष कोणाकडे ! त्यांच्याकडे का पुरुषवर्गाकडे!

हात राखून खर्च करण्याच्या बाबतींतही वरील नियमच लागू पडतो. शेंकडा किती बायकांना आपापल्या नवऱ्यांचा खराखुरा पगार माहित असतो, याची आंकडेवारी जर कोणी प्रसिद्ध करील, तर ती खरोख-रच फार मनोरंजक गोष्ट होईल, यांत संशय नाहीं. सुदैवानें ज्यांना चांगल्या पगाराची नोकरी मिळालेली आहे, असे थोडे तरुण सोडल्यास इतर तरुण मंडळी आपआपल्या बायकांस आपल्या पगाराची संख्या किती प्रमाणांत वाढवून सांगत असतात, याची जरी मला पक्की माहिती प्रत्यक्षपणें नाहीं, तरी त्यांनींच गांवीं असलेल्या आपल्या वृद्ध मातापित्यांस व इतर नातेवाइकांस आपल्या पगारांचे आंकडे किती प्रमा-णांत वाढवून सांगितलेले असतात याची माहिती मला भरपूर आहे. (व तशी ती श्री. वर्टी यांनाही असावी असा माझा तर्क आहे.) आणि त्यावरून पाणी कुठें मुरत असावें याचा तर्क करणें कठीण नाहीं. स्त्रिया या नैसर्गिक रीत्या फॅशनप्रिय असतात हें जितकें खरें आहे, तितकेंच त्या जात्या काटकसरी व कुटुंब-वत्सल असतात हेंही खरें आहे. त्यामुळें स्वभावतःच उधळपट्टी करणारीं अपवादात्मक माणसें सोडून दिल्यास व कादंबऱ्यांच्या वाचनानें वगैरे उत्पन्न झालेल्या काल्पनिक सृष्टींत वावरण्याच्या मोहामुळें प्रत्यक्ष स्थितीस विसरून फॅशनप्रियतेस चटावलेल्या कित्येक तरुणी अपवाद म्हणून सोडून दिल्यास, इतर पुष्कळ भगिनींस जर आपापल्या पतींच्या खऱ्या उत्पन्नाची पूर्ण जाणीव होईल,तर त्या आपल्या फॅशन-प्रियतेस बराचसा आळा घातल्याशिवाय राहणार नाहींत अशी खात्री वाटते. परंतु ज्या वेळीं आम्ही स्वतःस ६०–७० रुपये पगार मिळत असतां तसें आपल्या प्रिय पत्नीस सांगावयास लाज वाटल्यामुळें आपला पगार १००-१२५ रुपये असल्याच्या तिला थापा देतों, निरनिराळ्या तऱ्हेचे परीटघडीचे पोषाख घालून हिंडावयास जातों, एक दिवसाआड गोल्डफ्लेकचा एक रुपया किंमतीचा एक डबा फस्त करतों, घरचा चहा 'टेसदार' नसल्याच्या सबबीवर दिवसाकांठीं ४-६ आणे इराण्याच्या पदरीं बांधतों, त्या वेळीं नवऱ्याला

इतकें उत्पन्न मिळत आहे, तर आपणही निरनिराळ्या प्रकारचीं फॅशनेबल लुगडीं ब्लाउझ वगैरे जिन्नस वापरावे व चारदोन ठळक दागिने अंगावर घालावे असें कांहीं भगिनींस वाटल्यास हा सर्वस्वी त्यांचा दोष आहे असें आपण म्हणूं शकूं काय? तात्पर्य काय, तर आपल्या बायकांनीं हात राखून खर्च करावा असें पुरुषांस खरोखरी वाटत असल्यास प्रथम आपण त्यांना आपली खरी परिस्थिति समजावून देण्याचा प्रामाणिकपणा दाखविला पाहिजे. त्यांत लाज वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. शिवाय आम्ही आपलें स्वतःचें वर्तनही चोख ठेवणें भाग आहे. इतक्यानेंही न भागल्यास प्रसंगीं स्त्रैण न बनता योग्य प्रमाणांत कठोर वृत्ति धारण करण्याचें धैर्य अंगीं असावयास पाहिजे.

दागिने, फॅशनचे चोंचले, अगर फर्निचर पायीं आपल्या समाजांतील घटकांकडून जी उधळपट्टी केली जाते किंवा जे कर्जाचे बोजे वाढत जातात, असें श्री. वर्टी यांचें म्हणणें आहे, त्यापेक्षां जास्त भयंकर हानि ज्या व्यसनापायीं आज येथें आपल्या समाजाची होत आहे, त्यांकडे त्यांच्या सारख्या एका अधिकृत गृहस्थानें अगदींच दुर्लक्ष केलेलें पाहून मला तर फारच आश्चर्य वाटत आहे. इतके दिवस चहापान, सिगारेटस्, चिरूट इत्यादि व्यसनांचाच आपल्या समाजांत सुळसुळाट होता. अलीकडे या व्यसनांचा अतिरेक तर झालाच आहे पण याशिवाय त्यांच्या जोडीला रेसीस, अमेरिकन फ्यूचर्स, लॉटरीज् निरनिराळ्या तऱ्हेची सट्टेबाजी यांची भर पडली असून त्यामुळें कित्येक मोठमोठीं कुटुंबांची धुळधाण उडाली आहे व उडत आहे; परिस्थिति अशीच राहिल्यास पुढेंही उडत रहाणार हें उघड दिसत आहे. एके काळीं प्रामाणिकपणा, दीर्घोद्योग, स्वामिनिष्ठा, स्वाभिमान, अक्कलहुशारी इत्यादि अनेक सद्गुणांमुळें प्रसिद्धि पावलेल्या व इतरांना त्यांच्या गुणांचा हेवा वाटावा अशी स्थिति असलेल्या आपल्या या सारस्वत समाजास गेल्या ७-८ वर्षांत पैशाच्या अफरातफरीसंबंधानें झालेल्या कित्येक खटल्यांत मोठमोठ्या हुद्द्यांवर असलेल्या आपल्या कित्येक अब्रूदार ज्ञातिबांधवांचीं नांवें केवळ वरील व्यसनांच्या नादीं लागल्यामुळें आलेलीं पाहून खालीं मान घालण्याचा प्रसंग आलेला आहे, ही अत्यंत खेदाची गोष्ट होय. बायकांच्या खर्चिक राहणीला आळा घालण्याचे प्रयत्न करीत असतांना प्रथम आम्हा पुरुषांच्या पायाखालीं जळत असलेल्या व प्रत्यहीं त्यांत निरनिराळ्या आहुति पडत असलेल्या या महारोगांचा समूळ नायनाट करण्याचा कसून प्रयत्न आपल्या समाजांतील जबाबदार समाजधुरीणांनीं करावयास नको काय!

निरनिराळ्या कारणांनीं सामुदायिक कुटुंबपद्धतीस लागलेली उतरती कळा, व त्यामुळें तारुण्याच्या ऐन उच्छृंखळपणांत अनुभवी व विचारी वडील माणसांच्या असलेल्या योग्य दाबाचा, तसेंच खऱ्या धार्मिक व गृहशिक्षणाचा अभाव, पाश्चात्यांच्या अंधअनुकरणानें बोकाळलेल्या व्यक्तिस्वातंत्र्याचा अतिरेक व त्यामुळें आपल्या स्वतःच्या, आपल्या घराण्याच्या, आपल्या ज्ञातीच्या व पर्यायानें आपल्या देशाच्या अब्रूविषयीं अंगीं बाणलेली बेफिकिरी इत्यादि अनेक कारणांमुळें आपला समाज जो दिवसेंदिवस अधोगतीस जात चालला आहे त्याला वेळींच पायबंद घालण्याचे जोरदार प्रयत्न आपल्या समाजांतील जबाबदार पुढारी लवकरच करूं लागतील अशी आशा आहे. या बाबतींत महाराष्ट्र सारस्वताकडून योग्य तो हातभार लावला जाईल अशी सदिच्छा प्रकट करून हा फार लांबलेला लेख येथेंच आटोपता घेतों.

# स्त्रिया आणि कलाशिक्षण

( लेखक—श्री. लक्ष्मण रघुनाथ कुलकर्णी )

'महाराष्ट्र सारस्वता'च्या मे महिन्याच्या अंकांतील 'एक सरस्वतीतनया' यांनीं लिहिलेला लेख ' स्त्रिया आणि कलाशिक्षण ' हल्लींच मी वाचला. त्यावरून सुचलेले विचार खालीं दिले आहेत.

चित्रकला, गायन व नृत्य या तीनही कला आपल्या ज्ञातींतील स्त्रियांत कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत वसत होत्या. जसें, रांगोळ्या काढणें, वट-पौर्णिमेच्या दिवशीं भिंतीवर झाडाची व माणसाची आकृति काढणें, परकर, खण व लुगडीं वगैरेवर कशिदा काढणें, यांस त्यांची चित्रकला म्हणतां येईल; जात्यावर बसलें म्हणजे ओव्या म्हणणें, मुलांचे व स्वतःचें मन रंजविण्यासाठीं देवादिकांचीं गाणीं किंवा भजन म्हणणें, घाणे भरतांना गाणीं म्हणणें, वगैरे गायनकलेचे प्रकार अजूनही बायकांत रूढ आहेत. त्यांचें नृत्य म्हणजे फुगड्या. मंगला-गौरीकडे, गणपतीपुढें व इतर प्रसंगीं फुरसतीच्या वेळीं मुली व तरुण स्त्रियाच केवळ नव्हत, तर वृद्ध बायाही हौशीनें फुगड्या घालण्याची संधि वांया जाऊं देत नसत. हें खरें कीं, त्या वेळीं पुरुष मंडळी तेथें हजर रहात नसत. अशा वेळीं पुरुष मंडळीस घरा-बाहेर जाण्यास अगर रात्र असल्यास झोंपण्याच्या खोलींत कोंडून घेण्यास स्पष्ट व अस्पष्ट सूचना मिळत असे. आतां इतर बाबतींप्रमाणें कालमानानें करमणुकीच्या प्रकारांतही फरक होत चाललेला आहे व आणखीही होईल. ज्या वेळीं आपल्या समाजांत आजच्या इतक्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पना नव्हत्या, त्या वेळीं वरील गोष्टी होत असत; तर त्याच गोष्टी कांहीं फरकानें कां होईना, आज होण्यास समाज आड येणार नाहीं.

ज्या मुलींना सशास्त्र चित्रकला शिकण्यास लाग-णारी बुद्धि, आवड, मनःस्वास्थ्य, व आर्थिक अनु-कूलता आहे, त्यांस विरोध तर नाहींच, पण पालकां-कडून उत्तेजनच मिळतें. ही कला केवळ हौसेखातर अगर मोबदल्याच्या इच्छेनें चालू ठेवणाऱ्या स्त्रियांना समाज मुळींच प्रतिकूल नाहीं.


गायनकलेचेंही शिक्षण प्राप्त करून घेण्यास समाज अगर आप्तवर्ग यांचा बहुधा विरोध होत नाहीं. या कलेच्या योगानें आपल्या कुटुंबांतील मंडळीचें अगर इष्टमित्रांचें सात्त्विक मनोरंजन करण्याइतका मनमोकळेपणा सुशिक्षित स्त्रियांत येत आहे. लग्नमुंजीसारखे समारंभ सामाजिक संस्थांसंबंधीं उत्सव व सभा यांत कुलीन स्त्रियांस गायन करूं दिल्यास कांहीं हानि नाहीं. असल्या गायनामुळें समारंभास अधिक शोभा आणल्याबद्दल गाणाऱ्या व्यक्तीविषयीं आदर व कौतुक मानण्याइतका समाज पुढें गेलेला आहे असें मला वाटतें.

याप्रमाणें फुगड्या, त्याचप्रमाणें इतर प्रकारचे शारीरिक खेळ व नाच स्त्रियांनीं स्त्रियांमध्यें करण्यास कोणीही आडकाठी करणार नाहीं. पण पुरुषमंडळी-मध्यें स्त्रियांनीं कलेच्या नांवावर आपल्या लावण्याचें प्रदर्शन करणें समाजहिताचें नाहीं. कारण, नृत्य व इतर कला यांत फरक आहे. चित्रकार आपल्या कलेनें आपलें स्वतःचेंसुद्धां एकांतांत मनोरंजन करूं शकतो व हीनवृत्तीच्या लोकांतही बीभत्स विचार न येतां त्यांचेंही मनोरंजन करतां येण्यासारखीं चित्रें तिला काढतां येतात. कुलीन स्त्रियांच्या गाण्यांत बीभत्स अगर शृंगारिक वर्णनें साहजिकच टाळण्यांत येतात. गाय-नाचा विषय फार उदात्त, उद्बोधक अगर वर्णनपर असूं शकतो. गायन ऐकणाऱ्या व्यक्ति गाणाऱ्याचें सौंदर्य व हावभाव यांपेक्षां काव्यांतील कल्पना, आवाजी, व चाल यांमध्यें जास्त रमतात. नाचाचें स्वरूप दर्शनीय व सामुदायिक असल्यामुळें नयन-

मोहक आभरणाची नर्तकींना पुरुषसमाजापुढें नाचावयाचें असल्यास जरूरी भासते; व त्या मानानें आर्थिक दृष्टीनेंही नाच लोकांत रूढ होतील असें वाटत नाहीं. नाचणारीचें कौतुक होणें हें समाजाच्या हल्लींच्या स्थितींत तरी तिच्या तारुण्यावर व सौंदर्यावर जास्त अवलंबून राहील, व तिच्या कलेकडे कला ह्या दृष्टीनें पाहाणारे पण सात्त्विक विचाराचे पुरुष थोडे मिळतील. मी असें म्हणत नाहीं कीं, समाजांतील बहुतेक पुरुष चंचल वृत्तीचे असतात; परंतु माझें असें म्हणणें आहे कीं, सात्त्विक वृत्तीच्या पण नृत्यकलेंत पूर्ण पारंगत असलेल्या कुलीन स्त्रिया समाजांत मिळणें क्वचित्.यामुळें ज्या स्त्रिया नाचावयास येणार, त्यांविषयीं सभ्य पण पूर्वग्रहदूषित गृहस्थांस स्त्रियांचे नाच आवडणार नाहींत. केवळ आपलें व आपल्या मैत्रिणींचें मनोरंजन व्हावें, एवढ्याचसाठीं नृत्यकला पूर्ण अवगत करण्याचे श्रम स्त्रिया घेणार नाहींत. गुजराती स्त्रियांमध्यें होणाऱ्या सामुदायिक नाचांत विशेष सशास्त्र शिक्षण अगर कौशल्य नसतें, व तसले नाच दक्षिणी स्त्रियांमध्यें नावीन्य व व्यायाम या दृष्टीनें आणावयास समाज विशेष विरोध करणार नाहीं. धंदेवाईक कुशल नर्तकींना समाजांत मान कां मिळत नाहीं, याच्या कारणांविषयीं चर्चा स्थलाभावामुळें येथें मी करीत नाहीं.

'बॉल' या नांवाच्या युरोपियन नाचाचा 'एक सरस्वतीतनया' यांनीं उल्लेख केला आहे. पाश्चात्यांच्या अनुकरणानें हिंदी ख्रिस्ती समाजांत हे खेळ रूढ होत आहेत. या खेळांत स्त्री व पुरुष अशा जोडयांनीं संगीत वाद्याच्या तालावर एकमेकांस धरून पावलें टाकीत नाचतात. या नाचामुळें उल्हासी वृत्तींचा विकास होतो, व्यायाम घडतो, शिस्त, टापटीप, मोहक वागणूक, चपळपणा, व तरतरी येते; ओळखी होतात; वरशोधन व वधूशोधन करण्यास सोपें होतें. पण त्याचबरोबर सभ्यपणाच्या बुरख्याखालीं हीन वृत्तीच्या लोकांस अनुरूप मैत्री जमवून आणण्याची संधि असल्या प्रसंगामुळें जितकी बिनधोकपणें मिळते, तितकी इतर प्रसंगीं क्वचित् मिळत असेल. कलावंत स्त्रियांस असल्या प्रसंगामुळें समाजांत अधिक सन्मानानें वागणें सुलभ होतें. सद्यःस्थितींत असले नाच आपल्या समाजांत रूढ केल्यास समाजाचें हितापेक्षां अहित जास्त होईल, व त्यांतल्या त्यांत स्त्रियांचें तर फारच अहित होईल. असें माझें मत आहे.

नृत्यापेक्षां कमी मोहक पण नावीन्यपूर्ण व नृत्यापासून मिळण्यासारखे इतर सर्व फायदे मिळतील असा करमणुकीचा एक प्रकार मला सुचतो. गिरगांवांत आर्य समाजांत, व माटुंगा येथें नप्पू हॉलमध्यें कुलीन स्त्रियांनीं व्यायामाचे वर्ग सुरू केले आहेत. त्यांत जंबिया, काठी वगैरे वापरण्याची कला शिकवितात. हे प्रयोग शिकून हळदीकुंकु, सामाजिक उत्सव, सण, वगैरे प्रसंगीं गायन, वादन, याप्रमाणें शक्तीचेही खेळ करून समारंभ साजरा केल्यास नावीन्य, मनोरंजन, व व्यायाम हे हेतु साधूनही सध्याच्या आमच्या सामाजिक परिस्थितींत समाज व धर्मसेवा केल्याचें श्रेय मिळून स्त्रियांचा दर्जा बराच वाढेल. दुर्दैवानें हिंदु समाज गाफील, भ्याड, व आपलपोटा बनला असून त्याचा होत असलेला ऱ्हास, कित्येक ठिकाणीं होणारे दंगे व विवाहित, अविवाहित व विधवा स्त्रियांवर येणारे आणीबाणीचे प्रसंग हे त्यांच्या ध्यानींही नाहींत. अशा प्रसंगींही आपलें, मुलांबाळांचें व शेजाऱ्यापाजाऱ्यांचें रक्षण करण्याची कला आमच्या सुशिक्षित बहीणी व मुली प्राप्त करून घेण्याची खटपट करतील, तर शांततेच्या व आनंदाच्या वेळीं सात्त्विक करमणूक व गडबडीच्या वेळीं रक्षण होऊन, दोन्ही वेळीं सुशिक्षित म्हणविणाऱ्या पांढरपेशा पुरुषांस उदाहरण घालून देण्याचें महत्कार्य त्यांच्या हातून घडेल व पुढील पिढी तरी अधिक तेजस्वी होईल.




वर्ष १३ वें   मार्च-एप्रिल १९३४   अंक २

हिज मास्टर्स व्हॉइस, ओडियन, कोलंबिया व ट्वीन वगैरे कंपन्यांचे

**नवीन कोरे रेकॉर्डस् व ग्रामोफोन मशीन्स**

**गिरगांवांत मिळण्याचें एकच ठिकाण.**

ॲथोराईज्ड एजंटस्—

# जी. जे. घैसास आणि कंपनी,

**रामचंद्र बिल्डिंग, गिरगांव ट्राम टर्मिनस, मुंबई**

**फोन नं. २४१४१**

Printed by R. K. Tatnis, at Shree Laxmi Narayan Press, 364 Thakurdwar Bombay No. 2, and Published by S. L. Kapadi for the Maharashtra Saraswat Mandal, at the Saraswat Brahman Samaj, Girgaum, Bombay 4.

Editor:-S. M. Varde, B. A., LL. B.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स यांचा

**बाळंतकाढा**

नंबर १-२ वापरा.

सर्वत्र मिळतो

द. कृ. सांडू ब्रदर्स,

आर्योषधी कारखाना चेंबूर-ठाणे

दुकान-दवाखाना-ठाकूरद्वार-मुंबई नं. २

शाखा-पोयबावडी-परेल.

सर्वत्र मिळतो.

# धी इंडिया प्राव्हिडंट कंपनी लिमिटेड

(कलकत्ता)


स्थपना १९१० ] **लाईफ फंड आठ लक्ष रुपयांवर** [ सरकारी सिक्युरिटी

कलकत्ता येथील सुप्रसिद्ध इंडियन इन्शुअरन्स जर्नल लिहितें. " हिंदुस्थानांतील विमा कंपन्यांत ज्याप्रमाणें ओरियंटल ही सर्वांत श्रेष्ठ व उच्च दर्जाची गणली जाते, त्याचप्रमाणें प्रॉव्हिडंट कंपन्यांत सदहू एकच कंपनी गणली जाते. " हींत १८ ते ५० वयाच्या स्त्रीपुरुषांस वैद्यकीय तपासणीशिवाय दरमहा सहा आण्यांपासून दोन रुपयेपर्यंत हप्ता भरून १०० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंतची विम्याची पॉलिसी घेतां येते. तरी गरजूंनीं ह्याच कंपनींत आपला विमा उतरून आपला फायदा करून घ्यावा.

**गांवोगांव भरपूर एजंट्स पाहिजेत. लिहा अगर समक्ष भेटाः—**

भेटण्याची जागा व वेळः—
**घाटकोपरवाला बिल्डिंग, मुगभाट, गिरगांव.** कोणत्याही दिवशीं सायंकाळीं ६ ते १० ( स्टँ. टा.)

**आर. एम्. दिवाडकर** आणि **कंपनी,**
मुंबई इलाख्याचे मुख्य एजंट्स,
**माझगांव,** मुंबई नं. १०.



ता. १७।१८ मार्च रोजीं मालाड येथें भरलेल्या सारस्वत ब्राह्मण समाजाच्या मंडळीच्या संमेलनाचा फोटो

॥ श्री ॥

# महाराष्ट्र सारस्वत

द्वैमासिक

वर्ष १३ वें मार्च-एप्रिल १९३४ अंक २ रा

## संपादकीय

महाराष्ट्र सारस्वताच्या आजच्या अंकांत ज्ञातिवृत्ताखेरीज आलेले सर्व विषय चर्चा करण्यासारखे आहेत. त्यांची साधकबाधक चर्चा होईल, अशी आम्हांला फार आशा आहे. ज्ञातिपरिषद, सुशिक्षित कुमारिकांची परिस्थिति, मिश्रविवाह, हुंडा, वगैरे जिव्हाळ्याच्या विषयांकडे दुर्लक्ष न करितां समाजहितेच्छु प्रत्येक व्यक्तीनें त्यांचा सक्रिय विचार करणें आवश्यक आहे. लेखनाच्या द्वारें समाजाचें मन या विषयांकडे वेधणें हें जसें या मासिकासारख्या नियतकालिकाचें कर्तव्य आहे, त्याप्रमाणेंच त्यांविषयीं पूर्ण विचारांतीं दिशा ठरवून त्या दिशेनें वागण्यास समाजाला प्रवृत्त करणें हें समाजांतील पुढारी व्यक्तींचें आणि महाजनांचें कर्तव्य होय. आज हे विषय कमीजास्त प्रमाणांत वादग्रस्त असले तरी त्यांविषयीं मतभेद आहे म्हणून त्यांची अनास्था करणें योग्य नाहीं.

× × ×

चर्चात्मक किंवा वादग्रस्त विषयांचा उहापोह करतांना चर्चा करावयाची ती त्या विषयांतील तत्त्वें, विचारसरणी, तर्कशुद्धता यांना धरून असावी. तात्त्विक विवेचन करतांना कोणाही व्यक्तीला किंवा टीकाविषयक लेख लिहिणाऱ्या लेखकाला कोपरखळ्या मारण्याची प्रवृत्ति असूं नये. वैयक्तिक टीकेमुळें वादाचा मुद्दा बाजूस राहून वादाअंतीं तत्त्वबोध न होतां, वैरभाव मात्र वाढतो. यासाठीं अशा वादांत व्यक्तिनिर्देश न करण्याची आमची सर्व लेखकांना अत्यंत विनयपूर्वक विनंति आहे.

× × ×

मडगांव येथील वार्षिक ज्ञानसत्राचा अहवाल हा एका दृष्टीनें ज्ञातिवृत्ताचा एक भाग असला, तरी रा. वरेरकर यांच्या अध्यक्षीय भाषणाला महाराष्ट्राच्या दृष्टीनें सार्वजनिक महत्व आहे. त्यांचें प्रास्ताविक आणि उत्सवारंभींचें भाषण या अंकांत दिलें आहे. उत्सवाच्या समारोपाच्या वेळीं त्यांनीं केलेलें भाषणही उद्बोधक आणि मननीय आहे. गोमंतकांतील हिंदुसमाजानें आपल्या विशिष्ट परिस्थितीकडे विशेष लक्ष पुरवावें कीं, घरच्या व्यवहारापेक्षां अवघ्या महाराष्ट्राच्या संसाराची आस्था धरून वागावें, हा

एक महत्त्वाचा प्रश्न आहे. गोमंतकांतील सारस्वत ब्राम्हण समाज हा तेथील हिंदु समाजांत आजवर पुढारी गणलेला असल्यामुळें स्वज्ञातिदृष्ट्या या प्रश्नाची चर्चा जिव्हाळ्याची आहे. ब्रिटिश महाराष्ट्रांतील हिंदुसमाजांत जसे ब्राह्मण व ब्राह्मणेतर असे पक्ष आहेत, तसे आज गोमंतकांत सारस्वत आणि सारस्वतेतर असे पक्षभेद उपस्थित होऊं पहात आहेत. सारस्वतांचा आजवरचा गोमंतकांतील किंवा गोमंतकाबाहेरील इतिहास पाहिल्यास असा पक्षभेद उत्पन्न होणें, इष्ट नाहीं आणि स्वाभाविकही नाहीं. ज्ञातिश्रेष्ठतेच्या घातकी कल्पनेनें इतरांविषयीं सहानुभूतिशून्यता किंवा तुच्छता असणें, हा सारस्वतांचा स्वभाव नाहीं, असें आजवरचा इतिहास सांगतो. तरी पहिल्यानें आत्मपरीक्षण करून अशी आढ्यतेची भावना खरोखरच स्वकीय समाजांत घुसूं पहात असेल, तर ती दूर करणें, हें गोमंतकांतील सारस्वत पुढाऱ्यांचें एक अत्यावश्यक कर्तव्य आहे व तें पार पाडण्यास त्यांजकडून कसूर होणार नाहीं, असा आम्हांस दृढ विश्वास आहे.

× × ×

पोर्तुगीज महाराष्ट्र अणि ब्रिटिश महाराष्ट्र, गोमंतकीय हिंदु व गोमंतकस्थ ख्रिश्चन यांच्या परस्परांशीं येणाऱ्या संबंधास अनुसरूनच गोमंतकाची भाषा मराठी असावी कीं कोंकणी असावी, या प्रश्नाला महत्त्व येतें. कोंकणी भाषेची सुसंघटित रचना करून तिला गोमंतकाची भाषा करण्यासाठीं अलीकडे एक कमिटी नेमण्यांत आली आहे. कोंकणी भाषेची लिपी देवनागरी किंवा मराठी असावी, कीं रोमन लिपी असावी; हा एक महत्त्वाचा प्रश्न त्या कमिटीपुढें आहे. 'वसणूक'कर्ते शणै गोंयबाब हे एकच हिंदू सभासद त्या कमेटींत आहेत. कोंकणी भाषेचा त्यांना फार अभिमान आहे, हें सांगावयास नकोच. गोमंतकाची प्रांतिक भाषा कोंकणी असें ठरविलें व ती ग्रंथभाषा झाली तर गोमंतकांतील हिंदु व ख्रिश्चन यांच्यांतील दुजाभाव कमी होण्याच्या पंथास लागेल, असें मानणारा एक पक्ष आहे. तर गोमंतकानें कोंकणीचा स्वीकार केल्यास पोर्तुगीज महाराष्ट्र आणि ब्रिटिश महाराष्ट्र यांना आज एकमेकांविषयीं वाटणारा आपलेपणा कमी होऊन त्यांच्यांत फूट पडेल असें दुसऱ्या पक्षास वाटतें. गौडसारस्वत ब्राह्मणांपैकीं बऱ्याच मोठ्या समाजाच्या कुलदेवता, त्यांचे धर्मगुरु व आप्तसंबंध गोमंतकाशीं संलग्न आहेत. म्हणून या प्रश्नांचा विचार अत्यंत महत्त्वाचा असतांही तिकडे आमच्या समाजाचें लक्ष पोंचलेलें दिसत नाहीं. किंबहुना याविषयींची माहितीही फारच थोड्या व्यक्तींना असेल. ही अनास्था परिणामीं अनर्थकारक होईल. यासाठीं आमच्या गोमंतकस्थ बांधवांनीं त्याविषयीं स्वकीय समाजांत जागृति करण्यास विशेष झटलें पाहिजे.

× × ×

महाराष्ट्र सारस्वताचे एक जुने संपादक, आमचे मित्र रा. **वसंतराव नारायण नाईक** हे मुंबई युनिव्हर्सिटीच्या सेनेटच्या येत्या निवडणुकींत पदवीधरांतर्फे एक उमेदवार म्हणून उभे राहिले आहेत. रा. नाईक यांच्या विद्याव्यासंगाविषयीं आमच्या वाचकांना सांगावयास नकोच. मनाच्या आवडीनें आजन्म ज्ञानार्जनास वाहिलेल्या त्यांच्यासारख्या विद्वानांचें युनिव्हर्सिटी हें माहेरघर होय. युनिव्हर्सिटीच्या सदस्यमंडळांत त्यांच्यासारख्या व्यासंगी सारस्वताला निवडून देणें, हें प्रत्येक पदवीधराचें कर्तव्य आहे. युनिव्हर्सिटीसारख्या विद्यापीठाचें ध्येय व कार्य या विषयींचें ज्ञान त्यांच्या अनेक व्याख्यानांत व लेखांत दिसून येतें. मुंबई युनिव्हर्सिटीच्या कार्यक्रमांतील गुणदोषांच्या चिकित्सेवरील त्यांचीं व्याख्यानें अत्यंत उद्बोधक असतात. इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषांवरील त्यांचें प्रभुत्व सर्वश्रुत आहे. प्रत्येक मताधिकारी पदवीधरानें रा. वसंतराव नाईक यांना आपलें **पहिलें मत** (First Vote) देऊन आपली गुणग्राहकता व्यक्त करावी, अशी आमची आग्रहाची शिफारस आहे.

# परिषदेची आवश्यकता

पहिली गौडसारस्वत ब्राह्मण परिषद सन १९०९ सालीं मंगळूर येथें भरली. गौडसारस्वत ब्राह्मण या नांवानें संबोधिले जाणाऱ्या कित्येक ज्ञातिसंघांचा त्या परिषदेंत समावेश झाला नाहीं म्हणून पुढील वर्षी बेळगांव येथें संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेची स्थापना झाली. दाक्षिणात्य गौड सारस्वत ब्राह्मण जातींतील सर्व भेद आणि पोटभेद यांचें एकीकरण करणें, हा या परिषदेच्या स्थापनेचा मुख्य उद्देश होता. परिषदेच्या सुरवातीस महाराष्ट्रीयांच्या स्वभाव-गुणानुसार वाद उपस्थित होऊन एकीपक्ष व बेकीपक्ष असे दोन पक्ष उपस्थित झाले व रणेंही माजलीं. कित्येक लग्नांच्या सोयरिका मोडल्या, कांहीं स्नेही एकमेकांस दुरावले, कोणाच्या वृत्तीही गेल्या. तथापि संयुक्त परिषद आणि एकीकरण यांना अनुकूलता असलेल्या पक्षाचा उत्साह विजयी होऊन परिषदेला प्रतिकूल असलेला पक्ष दिवसेंदिवस नामशेष होत जाणार अशीं लक्षणें दिसत होतीं. परंतु ' प्रारंभशूराः खलु दाक्षिणात्याः । ' अशी परिषदेच्या आरंभीं कित्येकांना वाटलेली भीति अखेरीस खरी ठरली ! एकसारखीं सालोसाल सात अधिवेशनें होऊन सर्व भेदोपभेदांना मायपोटांत आश्रय देणारी परिषद सरस्वती नदीच्या प्रवाहासारखी एकाएकीं गुप्त झाली, ती आज सतरा वर्षे तशीच अज्ञातवासांत आहे. परिषदेची संघटना जाहीर आहे, तिचे कार्य-वाहक कार्यक्षम आहेत, आणि परिषदेचें कार्य अद्याप-अपुरें राहिलेलें आहे ! अशा स्थितींत परिषद सुप्ता-वस्थेंत कां राहिली ? याचा काथ्याकूट केल्यानें कस-लाही उपयोग न होतां उलट परिणाम मात्र घडतील. यासाठीं त्या जंजाळांत न पडतां परिषदेच्या पुनरुत्था-नाची आज आवश्यकता आहे किंवा नाहीं, इतकाच विचार या लेखांत करण्याचें योजिलें आहे.

परिषदेचा मुख्य उद्देश गौडसारस्वत ज्ञातींतील भेद आणि पोटभेद यांचें एकीकरण करण्याचा होता. सहभोजन आणि विवाह हे एकीकरणाचे दोन मार्ग असून रोटीव्यवहार आणि बेटीव्यवहार अशीं त्या मार्गांना प्राकृत नांवें आहेत. गौड सारस्वतांच्या भेद-पोटभेदांत रोटीव्यवहाराला प्रतिबंध असा कधींच नव्हता. कांहीं गांवांतून स्थानिक वैमनस्यांमुळें तेथील भेद-पोटभेदांनीं एकमेकांना कांहीं वेळां अपंक्त मानिलें, तरी तशा गांवांबाहेर सरसहा राजरोस पंक्तिभेद केव्हांही होत नसे आणि आजच्या मनूंत तसा पंक्ति-भेद कोठेंही होत नाहीं. विवाहसंबंधास मात्र आजही बरीच आडकाठी आहे. ज्या भेद-पोटभेदांत बेटीव्यव-हारास प्रतिबंध आहे अशी सामान्यतः समजूत होती, तशा कांहीं पोटभेदांत परिषदेमुळें आलेल्या उत्सा-हाच्या भरांत मुद्दाम विवाहसंबंध घडविण्यांत आले. त्या विवाहांना जातिबहिष्कार पडला नाहीं किंवा विवाह करणारांना कोणी वाळींत टाकिलें नाहीं. परिषद चालू राहाती तर अशा प्रकारचे विवाह जास्त प्रमाणांत घडून आले असते. त्यांना उत्तेजन देण्याची थोडी-बहुत व्यवस्थाही परिषदेकडून झालेली आहे. परंतु परिषद लुप्तप्राय झाल्यावर पुनः तेताळ पूर्वस्थळावर आलेला दिसत आहे. गौडसारस्वत तरुण-तरुणींचे विवाह परजातींत किंवा परधर्मांतही झाले, परंतु ज्ञातींतील भेद-पोटभेदांमधील विवाह मात्र बंद पडल्या-सारखे दिसत आहेत. परिषदेचा मुख्य उद्देश अशा प्रकारें विफल झाला असून, तो साध्य करण्याची अत्यंत जरूर आहे. परिषदेचा पुनर्जन्म झाल्याखेरीज तें कार्य होणार नाहीं.

दाक्षिणात्य गौडसारस्वत ब्राह्मणांची संख्या फार कमी असून हा जातिसमाज फार दूरदूरच्या ठिकाणीं पांगलेला आहे. ग्वाल्हेर, इंदूर, सिंध, खानदेश, कारवार, मंगळूर, मद्रास वगैरे ठिकाणीं स्थायिक झालेले ज्ञातिबांधव मुंबई, पुणें, उत्तर कोंकण व गोमंतक

येथील मध्यवर्ती वस्तीपासून दुरावल्यासारखे झाले असून त्यांचा एकमेकांशीं परिचय होण्याचा योग क्वचितच येतो. गोमंतकांतील गौडसारस्वतांना आज तीव्रतेनें जाणवणाऱ्या गोष्टींविषयीं, मुंबई, पुणें अगर नाशिक येथील पर्यायानें नजीक असलेले त्यांचे जातभाई देखील उदासीन आहेत. कित्येक ठिकाणच्या भेद-पोटभेदांत दिवसेंदिवस वैरभाव पेटविण्याचें कार्य कित्येक हरीचे लाल कमरा कसून करीत आहेत. हा दुजाभाव व हें औदासीन्य घालवून आपसांतील भाऊबंदकी दूर करण्याचें कार्य परिषदेवांचून होणार नाहीं.

आजच्या राजकीय परिस्थितींत हिंदुस्थानांतील जातिभावनांस ऊत आला आहे. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांच्यांतील भेदभाव हल्लींइतक्या तीव्र स्वरूपांत यापूर्वी कधींही दिसला नाहीं. गौडसारस्वतांविषयीं ब्राह्मणेतरांच्या ठायीं इतर ब्राह्मणवर्गाइतकी अढी नाहीं, हें खरें असलें तरी आजच्या परिस्थितींत गौडसारस्वतांचा ब्राह्मणेतरांत अंतर्भाव होणें शक्य नाहीं व तें उभयतांनाही हितावह होणार नाहीं. गौडसारस्वतांचा महाराष्ट्रीय द्रवीड अगर तत्सम ब्राह्मण जातींत मिलाफ होणें हें देखील दुरापास्त असून इष्टही नाहीं. अशा स्थितींत दिवसेंदिवस जास्त कठीण होत असलेल्या जीवनकलहांत गौडसारस्वतांनीं स्वतःची संघटना करणें अत्यावश्यक आहे व तशी संघटना करण्याचा परिषद हाच एक उपाय आहे.

हिंदुसमाजांतील जातिभेद नाहींसे झाल्याखेरीज हिंदूंना तरणोपाय नाहीं. तथापि लाथाळीच्या स्वरूपाची अव्यवस्थित क्रांति होऊन समाजिक अराजकता माजली, तर जातिभेद मोडतील खरे, पण इतर अनेक दुष्परिणाम भोगावे लागतील. त्यापेक्षां प्रत्येक मुख्य जातीची संघटना होऊन प्रत्येक जातीच्या भेद-पोटभेदांच्या एकीकरणाप्रमाणें निरनिराळ्या जातिसंघांचें व्यवस्थित व सुसंघटित एकीकरण झाल्यासच राष्ट्रहित साधेल. जतिभेदनिरसनाला जी जात सुसंघटित राहून संमति देईल, तिलाच जतिभेदनिरसनाचे खरे फायदे लाभतील. यासाठीं सुधारणेचा लाभ होण्यासाठ देखील जातिसंघटना करण्यास परिषदेची जरूर आहे.

गौडसारस्वतांच्या अनेक संस्था ठिकठिकाणीं आहेत. त्यांतील कांहीं संस्था भेद-पोटभेद न मानतां सर्वांच्या हिताचीं कार्यें करितात व कित्येक संस्था फक्त आपआपल्या भेद-पोटभेदांपुरतेंच कार्य करितात. अशा दोन्ही प्रकारच्या संस्थांत काम करणारीं उत्साही माणसें सर्वत्र आहेत. या संस्थांना परस्परांची माहिती झाली, त्यांतील कार्यकारी माणसांचा एकमेकांशीं परिचय घडला, तर 'एकमेकां साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ ॥' अशा सहकारितेनें सर्वांची कार्यक्षमता वृद्धिंगत होईल. परस्परांच्या विचारांचा व अनुभवाचा विनिमय करून एकमेकांच्या कार्यास मदत करणें सुसाध्य होईल. परिषदेच्या योगानें अशीं कार्यकारी माणसें एकत्र येतील.

परिषद चालू होती, त्या सात वर्षांत अनेक बरेवाईट अनुभव आले. परिचय व सहानुभूति यांची वाढ झाली, विद्यावृद्धीच्या कार्यास बहुमोल मदत झाली, महाराष्ट्र सारस्वत या मासिकाच्या जन्माचा उगम परिषदेंतूनच झाला, अशा प्रकारचे अनेक फायदे झाले;तशा कांहीं चुकाही झाल्या असें कित्येकांस वाटण्यासारखे कांहीं प्रसंग घडले.उत्साही सुधारकांचा उतावीळ आवेश आणि परंपरेचा अभिमान मानणाऱ्यांचा धिमेपणा यांचे केव्हां केव्हां खटके उडाले; स्नेहवृद्धि घडली, तसे प्रसंगीं वैयक्तिक गैरसमज होण्याचीही वेळ आली; परंतु कोणत्याही सामाजिक परिषदेला मतभेदापासून अलिप्त राहतां येणें शक्य नाहीं. त्या मतभेदाचे दुष्परिणाम अंतिम ध्येयाला बाधूं नयेत अशी व्यवस्था करणें दुर्घट नाहीं, हें देखील अनुभवानें कळून चुकलें आहे. मतभेदाची बाधा शक्य तितकी कमी व्हावी, अशी घटना केल्यास मागील चुकांची पुनरुक्ति होण्याचा संभव टाळतां येईल. परिषदेची आवश्यकता आहे, हें जाणून परिषदेला पुनः जागृति देण्याचा प्रयत्न यशस्वी झाला तर तशा घटनेचा विचार सहज करतां येईल.

# श्री. भा. वि. वरेरकर यांचें अध्यक्षीय भाषण

## सारस्वत ब्राह्मणसमाज, मडगांव, गोवा

( १६ मार्च १९३४ )

श्री. मामा वरेरकर यांच्या अध्यक्षतेखालीं हा समारंभ जरी ७ वाजतां सुरू व्हावयाचा होता, तरी मामासाहेबांचा परिचय, त्यांचीं नाटकें, कादंबऱ्या, लघुकथा इ. द्वारें अखिल महाराष्ट्राप्रमाणें गोमंतकासही पूर्णपणें असल्यानें, समाजाचें भव्य सभागृह गोमंतकाच्या निरनिराळ्या भागांतून अत्यंत उत्कंठेनें आलेल्या श्रोत्यांनीं ६ वाजण्यापूर्वीच भरून गेलें होतें.

प्रारंभीं बरोबर ७ वाजतां श्री. नमशीकर यांनीं, गोमंतकीय कवि श्री. दामोदर आणि कारेकृत 'सविनय नमन तुला' हें ईशस्तवनपर आणि 'दिन नव उमगला' हें स्वागतपर अशीं पद्यें गायिलीं.

श्री. यशवंतराव सू. सरदेसाई स्वागतपर भाषणांत म्हणाले, " आपण आपल्या आयुष्यांतील एक वर्ष संपल्यावर पुढील वर्षाचा टप्पा गांठतों, तेव्हां मागील वर्षाचा सिंहावलोकनानें आढावा घेतों. मानवी आयुष्यापेक्षां संस्थेचें आयुष्य किती तरी पट मोठें; अर्थात् संस्थेच्या बाबतींत तर असा आढावा घेणें अवश्य आहे; असा आढावा घेतां प्रतिवर्षी संस्थेचें कार्य वाढत आहे; आणि तिच्या वाढत्या कार्याबरोबर जनतेंत तिच्याविषयीं आदर आणि सहानुभूतीही वाढत आहे, असें दिसून येतें, ही गोष्ट मोठ्या आनंदाची असून भाग्याचीही आहे

आपण हिंदूंनीं मुख्य मानलेल्या ३॥ सणांत आजचा हा वर्षप्रतिपदेचा सण ( गुढी पाडवा ) सर्वांत महत्त्वाचा गणला आहे. या नव्या वर्षांत आपण आपली इष्ट दिशेनें प्रगतीच करूं, अशी प्रतिज्ञा प्रत्येकानें करावी. ह्या समाजानें अनेक प्रागतिक गोष्टींना चालना दिली असून, हें कार्य तो पुढेंही चालू ठेवील अशी उमेद आहे. अशा या संस्थेच्या आमंत्रणानुसार आपण एथें येऊन, आभारी केलें, याबद्दल संस्थेतर्फे आपणा सर्वांचें मी स्वागत करतों, आणि संस्थेवर असेंच आपलें प्रेम सदैव राहावें म्हणून ईश्वराकडे प्रार्थना करतों.

आतां आमच्या समारंभाचे नियोजित अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्याचार्य श्री. भार्गवराम विठ्ठल ऊर्फ मामासाहेब वरेरकर यांची सर्व महाराष्ट्राला ओळख आहेच. कारण, त्यांनीं आपलीं नाटकें, लघुकथा, कादंबऱ्या इत्यादिकांच्या द्वारें महाराष्ट्राच्या अंतःकरणांत स्थान पटकावलें आहेच; पण विशेषतः त्यांचीं अलीकडील भाषणें व लेख, हे विचारक्रांतिकारक असल्यानें त्यांनीं एका विशिष्ट वर्गाच्या लोकांत खळबळ उडवून दिली आहे; आणि त्यांच्यावर टीकेचा भडिमारही होऊं लागला आहे. जेव्हां एखाद्या अनिष्ट आचारविचारावर एखाद्या व्यक्तीकडून निर्भीडपणें टीका होते; त्या वेळीं त्या व्यक्तीची अनेक प्रकारांनीं निंदा सुरू होते. जेव्हां त्यांच्या त्या तत्वांचा स्पष्टपणा मागाहून कळतो, तेव्हां तीं शुद्ध व स्वच्छ तेजानें चमकतात. श्री. वरेरकरमामा हे भार्गवरामाप्रमाणेंच " अग्रतः चतुरोवेदः पृष्ठतः सशरं धनुः । इदं ब्राह्मं इदं क्षात्रं शापादपि शरादपि॥" असे आहेत! (टाळ्या) त्यांची जीभ आणि लेखणी खासगी स्नेह्यांकडे प्रेमळ आणि स्नेहाळू असते. पण तीच आपमतलबी, ढोंगी अशा लोकांवर टीका करतांना प्रखरता धारण करते. ज्या वेळीं आपणास एखाद्याकडून एखाद्या गोष्टीची आपेक्षा असते, तेव्हां आपल्यास त्या व्यक्तिविरुद्ध स्पष्टपणें बोलवत नाहीं. पण मामासाहेबांना कोणाकडून कसलीही अपेक्षा करावयाची नसल्यानें वाङ्मयदृष्ट्या जो एक वर्ग अधिकारी होऊन बसला आहे, त्याच्यावर त्यांनीं शस्त्र उभारलें. त्यांच्या या तत्वनिष्टेचें फळ पुढील पिढ्यांना लाभेल. महाराष्ट्रीय लेखकांसंबंधीं मलाही बराच अनुभव आहे. एखाद्या गोष्टीबद्दल नापसंती दर्शविण्याचे प्रकार कडक आणि सौम्य असतात. मामासाहेबांची स्पष्टोक्ति आणि स्पष्ट-लेखन-पद्धति पहिल्या प्रकारची आहे. अशा प्रकारें अधिकारी गृहस्थांचा लाभ आज आपल्याला झाला ही आनंदाची गोष्ट होय. मी त्यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याविषयीं सूचना करतों, तिला आपण टाळ्यांच्या गजरांत संमति द्याल अशी आशा करतों.

श्री. दामोदर अच्युत कारे यांनीं दुजोरा दिल्यावर श्री. मामासाहेब वरेरकर अध्यक्षस्थानीं विराजमान होऊन म्हणले:—

"एकादी वृद्ध सून फारां दिवसांनीं माहेरीं परत आली, म्हणजे तिला जो आनंद होतो, तो आज मला झाला आहे. (हंशा व टाळया) माहेरीं येण्याची उत्कंठा तिला अगोदरपासून नसते असें नाहीं. पण मुलांबाळांचें लेंढार मागें लागल्यामुळें प्रपंचाचा पसारा वाढत जाऊन अनावर होत असल्यामुळें तिला आपली इच्छा मनांतल्या मनांत दाबून ठेवावी लागते; शिवाय माहेरून बोलावणें आल्याशिवाय उठल्यासुटल्या माहेरीं निघून येणेंही तिला शक्य नसतें. तेव्हां आज आपण मला माहेरीं बोलावून घेतलें, या बद्दल मी आपले मनापासून आभार मानतों. (हंशा) आपल्यापैकीं पुष्कळांना सांगितलें तर आश्चर्य वाटेल कीं, मी स्वतः गोमंतकीय आहें. माझ्या वडिलांना गोमंतकाचा फार अभिमान असून आपल्या मुलाची मुंज गोव्यांतच व्हावी, ही त्यांची फार इच्छा व त्याप्रमाणें त्यांनीं माझें उपनयन मंगेशी येथें केलें. उपनयन म्हणजे द्विजन्म म्हणायचें तर गोमांतक माझी जन्मभूमी ठरते. तेव्हां आपल्यासमोर मी उभा आहें, तो कोणी तरी परकी इसम या नात्यानें नसून आपणांपैकींच एक, या नात्यानें आहें."

यानंतर अध्यक्षांच्या सूचनेवरून संस्थेचे चिटणीस श्री. केशव अनंत नायक यांनीं गतवर्षाचा वृत्तांत वाचून दाखविला. त्यावरून असें दिसून आलें कीं, वृत्तांतवर्षी ८ नवीन सभासदांची जोड संस्थेस मिळाली व संस्थेच्या खजिन्यांत रु. ८१०-१४ आणे, ३ पै जमा होऊन, त्यांतून रु. ७००-३ आणे ९ पै खर्च झाला. या वर्षी संस्थेच्या पुस्तकसंग्रहांत १५५ पुस्तकांची भर पडून एकंदर पुस्तकसंख्या ७२४१ वर आली, हीं पुतकें ५८९२ वेळां वाचावयास नेलीं, श्री. प्रो धर्मानंद कोसंबी, प्रिन्सिपाल तावडे, नामदार बाबासाहेब कामत, श्री. पंडिताप्पा चिकोडी, श्री. वासुदेवशास्त्री कोनकर, श्री. शंकरराव जोशी, श्री. गणपतराव जांबोटकर यांनीं संस्थेस भेटी दिल्या व यांपैकीं कित्येक सद्गृहस्थांचीं व्याख्यानेंही झालीं ता. १४-२ ३३ रोजीं श्री. विष्णु रामचंद्र नायक यांच्या अध्यक्षतेखालीं संस्थेच्या पुरस्कारानें एक महत्त्वाचा व संस्मरणीय समारंभ घडवून आणण्यांत आला, आणि तो म्हणजे श्री. पुरुषोत्तम श्री. सुकेरकर हे अत्यवस्थ असल्यामुळें त्यांनीं आजवर बजावलेली कामगिरी व त्यांचें आदर्शभूत नैतिक आचरण यांबद्दल कृतज्ञता व आदर व्यक्त करण्यासाठीं संस्थेच्या विद्यमानें बोलावलेली जाहीर सभा! सभेस गोमंतकांतील बहुतेक भागांतील लोक हजर होते. तसेंच सभेंत श्रीयुत सुकेरकर यांबद्दल आदर व्यक्त करणारा ठराव पास करण्यांत आला, व सभेस जमलेल्या-लोकांनीं त्यांच्या घरीं जाऊन तो त्यांना सादर केला.

वृत्तांतवाचन झाल्यावर अध्यक्षांनीं भाषण केलें. ते म्हणाले, "आज सारस्वत ब्राह्मण समाज या संस्थेचा २३ वा वाढदिवस आहे. सारस्वत या शब्दाचा अर्थ वाङ्मय असा आहे. साहित्य हा शब्द अलीकडे बंगालींतून घेण्यांत आला आहे. तत्पूर्वी सारस्वत व वाङ्मय हे दोनच शब्द विशेष प्रचारांत होते. सारस्वत समाज याचा अर्थ मी वाङ्मयनिर्मिति करणारा समाज असा करतों. हिंदु लोकांपैकीं मुंबईंत पहिल्यानें स्थायिक झालेले लोक सारस्वतच असून मराठींत वाङ्मयनिर्मितीही त्यांनींच प्रथम केली. श्री. गो. ना. माडगांवकर यांचीं पुस्तकें त्या क्षेत्रांतील सुरवातीचीं होत. पण या उज्ज्वल अमदानींत सारस्वतांनीं वाङ्मयनिर्मितीच्या कामांत जेवढा भाग घेतला होता, तेवढा त्यांनीं आज घेतलेला दिसून येत नाहीं. वास्तविक इतर सर्व जातींशीं तुलना केली तर पदवीधरांचें प्रमाण त्यांच्यांतच अधिक आहे. पण सार्वजनिक कामासाठीं बहुजनसमाजाच्या आध्यात्मिक व आधिभौतिक चरितार्थासाठीं त्यांनीं आजच्याहून धडाडीनें पुढें आलें पाहिजे. दोन दे आणि दोन घे असा आजचा काल आहे. अशा वेळीं आपला जिवंतपणा दाखवावयाचा झाला, तर धडाखा मारून पुढें झालें पाहिजे. आजची ही परिस्थिति गोमंतकानेंही ओळखली पाहिजे. गोमंतकाच्या एकंदर रचनेकडे लक्ष दिलें म्हणजे गोमंतक हा नुसता एक प्रांत नसून एक राष्ट्र आहे, असें म्हटलें पाहिजे आणि याची घोषणा स्वतः गोमंतकीयांनींच केली पाहिजे. आजचें युग जाहिरातीचें आहे. जो मोठया टाईपांत व रंगीबेरंगी जाहिरात देईल त्याच्याच

मालाचा खप अधिक होईल. शालीनता दाखविण्याचा हा आजचा काल नाहीं. शालीनता वैभवाच्या कालांत दाखवावयाची असते.

येथली परिस्थिति मला चांगलीशी माहिती नाहीं. पण हें प्रजासत्ताक राज्य आहे. ज्या कित्येक गोष्टी मिळाव्या म्हणून ब्रिटिश हिंदुस्थानांत इतकी धडपड चालली आहे त्यांपैकीं बऱ्याचशा तुम्हाला पूर्वीच मिळाल्या आहेत. पण असें असतां महाराष्ट्राच्या तकलुपी झळाळीनें तुम्हीं दिपून जाऊन आपले डोळे मिटून घेतले व स्वतःचें स्वरूप विसरलां. महाराष्ट्रीयांपुढें तुम्ही विनाकारण डोकें वांकविलें आणि त्यांनींही आपल्या पुढें वांकलेल्या डोक्यावर पाय देण्याची आपली प्रवृत्ति प्रकट केली. ज्या महाराष्ट्रपदपादशाहीच्या कल्पनेनें प्रेरित होऊन आपण महाराष्ट्राशीं समरस होऊं पाहतां, ती खरोखरी अस्तित्वांत होती किंवा काय, याची शंकाच आहे ! शिवाजीनें आपल्या कारकीर्दींत वंशपरंपरा जमिनी तोडून न देण्याची चांगलीच खबरदारी घेतली; पण त्याच्या मृत्यूनंतर या बाबतींत हळू हळू वाढतें दुर्लक्ष होत चाललें. स्वार्थसाधु लोक आपला डाव साधण्यासाठीं टपून बसले होते. राजारामाकडे सत्ता आल्यावर त्याच्या दौर्बल्यामुळें त्यांचें बरेंच फावलें. यानंतर ताराबाईनें आपल्याकडे सत्ता घेतल्यावर करारी वृत्तीनें ती बाकीच्यांना दाबूं शकली; पण शाहूच्या वेळीं ही स्थिति पालटली. शाहु हा बाळपणापासून मोंगलांकडे वाढल्यामुळें मराठेशाहीचा व हिंदुत्वाचा अभिमान त्याच्या अंगीं शिल्लक राहिलेला नव्हता. मराठयांचा हा राजा औरंगजेबाच्या कबरीवर फुलें वाहून आला ! तेव्हां शाहुला राज्याभिषेक होतांच सातारची गादी हिंदुपदपादशाही राहिली नव्हती, तर ती 'दिल्लीश्वराच्या मांडलिकाची गादी' बनली होती ! सातारची गादी दडपून पुण्याला सवतासुभा स्थापन करणाऱ्या पेशवाईच्या बाबतींतही असेंच म्हणतां येईल. दिल्लीच्या मांडलिकांच्या आजच्या वंशजांमध्यें पूर्वीची विकृत दृष्टि अजून शिल्लक आहे. 'राजाचे मेहुणे' म्हणून मिरवणारे हे लोक जगाकडे शकाराच्या दृष्टीनें पाहतात आणि राजाचें राजपद गेलें तरी या शकारांची दृष्टि बदलत नाहीं ! 'आपलें तेवढें चांगलें आणि आपण म्हणूं तेंच खरें' असें या लोकांना वाटत असतें. आपल्यांमधील क्षुल्लक व्यक्तींनाही हे इतिहासांत महत्त्वाला चढवतील, तर दुसऱ्यांच्या मोठया लोकांचींही नावें दडपून ठेवतील. नाहीं तर रामचंद्र बाबा सुखटणकर किंवा पितांबर शेणवी गुळगुळे यांच्यासारख्यांचा समग्र इतिहास इतिहासांत आढळूं नये, याचा अर्थ काय ? सारस्वतांना आपल्यांतील मोठया लोकांना पुढें आणण्याची कला अवगत नाहीं. एक जिवबादादा केरकरांचें चरित्र मात्र याला अपवाद आहे. दिल्लीचे मांडलिक या कलेंत निष्णात आहेत. शिवाजीला नेस्तनाबूद करण्यासाठीं हे त्याच्या उरावर रामदासाचा जड धोंडा आणून ठेवतील. सोहिरोबासारख्या संतापेक्षां रामजोशासारख्या लावण्या रचणाराला हे वरचढ ठरविण्याचा प्रयत्न करतील. पण खुद्द रामदासांशीं तुलना केली तरी सोहिरोबा किती तरी वरचढ ठरतील ! कुठें शिवाजीची पत्रांतून आळवणी करणारे नारायणराव कुळकर्णी उर्फ समर्थ आणि कुठें महादजी शिंद्यांनीं स्तुतिच्या अपेक्षेनें कविता दाखविली असतां तिच्यावर निर्भीड मत देतांना सिंहासनाधिष्ठिताला धुडकावून देणारे ! व त्याबद्दल शिंद्यांनीं नाखुषी दाखवल्यावरून 'अवधूत ! नहीं गरज तेरी ! हम बेपर्वा फकिरी ! दौलत तेरी + + बराबर' असें सडेतोड उत्तर देणारे सोहिरोबा आंबिये ! परंतु त्यांचें नांव गोमंतकीयांनीं अस्पष्ट आवाजांत उच्चारलें, तरी तें 'दिल्लीच्या मांडलिकां'च्या कोलाहलांत विरून जातें. पुण्याच्या लोकांच्या दडपेगिरीचा आणखी एक मासला मी आपणांस सांगतों. हरिभाऊंना आपलें करमणूक पत्र चालविणें पुण्याच्या लोकांच्या कारवाईमुळें जेव्हां अशक्य झालें, तेव्हां त्या पत्राची जबाबदारी डुकले यांनीं आपल्यावर घेतली. त्यांचें चरित्र लिहितांना श्री. वि. जि. नाडकर्णी यांनीं ही जबाबदारीच डुकले यांच्या नाशाला कारण झाली, असें लिहिलें. परंतु या प्रकरणांतले महत्त्वाचे साक्षीदार केशवराव बाळ यांच्या मृत्यूनंतर पुण्याच्या प्रकाशकांनीं सदर वाक्य बदलून त्या जागीं डुकले हे वेळोवेळीं हरिभाऊंकडे मदतीसाठीं तोंड वेंगाडीत व हरिभाऊ त्यांना साह्य करीत; यामुळें हरिभाऊंचेंच नुकसान झालें, असा विपर्यासात्मक मजकूर घातला !

महाराष्ट्रपदपादशाहीचा खुद्द महाराष्ट्रीयांना तरी असा कितीसा अभिमान आहे, कीं गोमंतकीयांनीं तो बाळगावा? खुद्द शिवाजीचा वाडा सुद्धां त्यांना पुण्याच्या ऐन अमदानींत राखून ठेवतां आलेला नाहीं. महाडच्या लोकांनीं शिवाजी स्मारकाची सगळी पूर्वतयारी केल्या-वर अखेरीस श्रेयाच्या वेळीं तेवढे हे लोक तिथें हजर!

भाषा व कला हे समाजाचे प्राण आहेत आणि आमच्या कला जिवंत ठेवण्याचें महत्त्वाचें कार्य गोमंत-कानेंच केलें आहे. सबंध मराठेशाहींत किंवा पेशवाईंत सौंदर्याचें प्रतीक अशी एकही कलाकृति निर्माण झालेली दिसत नाहीं. पण गोमंतकानें गायन, वादन, नृत्य, चित्र-कला, या सर्व कला राखून ठेवल्या. असें असतां परक्यांना गुरु करण्याची आपणाला काय जरूर आहे? गुरुस्थान जर कुठें असेल तर तें गोमंतकांतच! शंकराचार्यांना सुद्धां आपल्या गुरुपरंपरेसाठीं गोमंतकाकडेच धांव घ्यावी लागेल. वाङ्मयाभिवृद्धिचें कार्य खरोखरी या गुरूंचेंच आहे; पण वाङ्मय हा पदार्थ जगांत असतो किंवा नाहीं याचीही त्यांना दाद लागलेली दिसत नाहीं. वास्तविक हा दोष त्यांचा नाहीं. गुरूंकडून काम करून घेण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. अशा रीतीनें हे गुरू कार्य करित नसतील तर त्यांना आपण भाग पाडलें पाहिजे किंवा गादी—मग ती शंकराचार्यांची असो कीं गौडपादाचार्यांची असो—सोडायला भाग पाडलें पाहिजे.

गोमंतक आपलें स्वतःचें खरें स्वरूप विसरला आहे; त्याची जाणीव करून घेऊन तो प्रयत्नाला लागेल तर हां हां म्हणतां पुढें येईल. गोमंतकाच्या उत्क-र्षाची गुरुकिल्ली हिंदु व खिस्ती यांच्या ऐक्यांत आहे. या दोघांमधील जिव्हाळ्याचा दुवा म्हणजे कोंकणी भाषा आहे. ती मारून टाकतां उपयोगी नाहीं. धर्माची अडचण यापुढें व्यवहारांत विशेष येणार नाहीं. हळू हळू सर्वांचा धर्म एकच होत जाणार आहे. अशा वेळीं भाषेचा दुवा तोडून न टाकतां विशेष दृढ करण्याकडें लक्ष दिले पाहिजे. हिंदु व खिस्ती या दोघांचीं वाङ्मयें एक होतील, तेव्हां 'म्हगेलें गोंय' असें दोघेही एकदमच म्हणतील. खिस्त्यांच्या कांहीं चुका झाल्या असतील, तर त्यांना आपला धाकटा भाऊ मानून हिंदु समाजानें त्या पोटांत घातल्या पाहिजेत. ज्या दृष्टीनें शांतादुर्गेकडे आपण पाहतों त्याच दृष्टीनें मेरीकडे पाहण्यास शिकलें पाहिजे. हिंदु व खिस्ती या दोघांच्यामधला पीळ तेवढा काढून टाकला, म्हणजे ते दोघे पुनः बंधुच आहेत. दोघे एक झाले तर केवळ महाराष्ट्राच्या आणि हिंदुस्थानाच्याच नव्हे तर सबंध जगाच्या इतिहासांत आपले नांव कायमचें ठेवतील. घरच्या पोरीचे हे पोटतिडकीचे बोल आपण मनावर घ्याल अशी मला आशा आहे."

याप्रमाणें उद्बोधक आणि विद्वत्तापूर्ण असें भाषण करून अध्यक्ष खालीं बसल्यावर लोकांनीं टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला.

नंतर श्री. रघुवीरराव नमशीकर यांचें वंदेमातरम् राष्ट्रगीत गायन झालें.

प्रो. सुब्राव रामकृष्ण सामंत—वास्को द गाम हे आभार मानतांना सद्गदित होऊन म्हणाले, "आजपर्यंत मीं ऐकलेल्या भाषणांत हें पहिल्या नंबरचें भाषण आहे. (टाळ्या) वाङ्मय दृष्टीनें, तर्कशुद्ध मांडणीच्या दृष्टीनें, आणि व्यवस्थित विचारपद्धतीच्या दृष्टीनेंही हें भाषण श्रेष्ठ प्रकारचें असून, आम्हांस त्यांनीं ह्या भाषणाच्या द्वारें उपदेशामृतच पाजलें आहे! आपली प्रत्यक्ष मातासुद्धा एखाद्या वेळीं आपणास कडू औषध देते; पण मामांनीं हें औषध गोड करूनच आम्हाला दिलें आहे! महाराष्ट्रांत श्री. वरेरकरांना मामा म्हणतात; मीही त्यांना मामा म्हणूनच वंदन करतों."

शेवटीं श्री. पुंडलीक वामन विर्जिनकर आभार मानतांना कोंकणींत म्हणाले, "पुष्कळ वर्षांनीं माहेरीं आलेल्या या वृद्ध मुलीची ओटी भरण्याचें कार्य मी करतों. या मुलीनें आतां आपल्या घरीं परत गेल्यावर आपल्या इतर बहिणींनाही 'आपल्या माहेरीं चला' म्हणून सांगावें अशी विनंती करतों!" असें सांगून सर्व श्रोत्यांचे, श्री. नमशीकर, श्री. करमळकर इत्यादिकांचे आभार मानून दुसऱ्या दिवसाचा कार्यक्रम जाहीर केला व पहिल्या दिवसाचा कार्यक्रम पूर्ण झाला.

# ज्ञाति-वृत्त

### १ ज्ञातिसंस्थांचा परामर्ष.

**सारस्वत विद्यार्थी साहाय्यक** मंडळीः **बक्षिस समारंभः**—सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीच्या विद्यमानें हिराबाई सखाराम राजाध्यक्ष स्मारक वक्तृत्त्वोत्तेजक व इतर परितोषकें देण्याचा समारंभ रविवार ता. २१ जानेआरी १९३४ रोजीं सायंकाळीं स्टॅ. वे. ४ वाजतां गिरगांवांत सारस्वत ब्राह्मण समाजगृहांत भरविण्यांत आला होता. त्या वेळीं डॉ. श्रीमती सौ. **मालिनीबाई भालचंद्र सुखठणकर**, एम्. बी. बी. एस्, जे. पी., मुंबई स्कूलस कमिटीच्या अध्यक्ष, यांची अध्यक्षस्थानीं योजना करण्यांत आली होती.

लहान बालिकांनीं ईशस्तुतिपर व स्वागतपर पद्यें म्हटल्यावर, व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष श्रीयुत **शंकरराव पुंडलिक वर्दे**, बी. ए., एल्एल्. बी., यांनीं संस्थेतर्फे सर्वांचें सप्रेम स्वागत करून वक्तृत्वोत्तेजक समारंभाचा पूर्वेतिहास व गेल्या ७ वर्षांतील त्याची प्रगति यांबद्दल थोडक्यांत माहिती सांगितली.

संस्थेचे चिटणीस श्रीयुत **यशवंत हणमंत सुखठणकर** यांनीं संक्षिप्त अहवाल वाचून संस्थेची शिक्षणविषयक कामगिरी निवेदन केली. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणें:—

संस्थेकडून गेल्या ३१ वर्षांत ७१८ विद्यार्थ्यांस विद्यार्जनाच्या कामीं १,५३,३२३ रुपयांची मदत झाली असून गंगाजळी व स्मारकफंड मिळून १,६५, ३०२ रु. रक्कम तिच्या हातीं आहे. संस्थेच्या पहिल्या वर्षी तिच्या पटावर अवघे ६५ सभासद होते. ते गेल्या वर्षअखेर १८ पेट्रन, १२ फेलो, ३७३ लाइफ मेंबर व १,४१३ साधारण सभासद मिळून १८१६ सभासद तिच्या पटावर होते. संस्थेनें स्त्री-शिक्षणासाठीं आजवर ३२००० रुपयांपेक्षां अधिक रक्कम खर्च केली असून तिच्या स्त्री-सभासदांची संख्या १९५ आहे. गेलीं पांच वर्षे संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर स्त्री-सभासद प्रामुख्यानें काम करीतही आहेत. संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाच्या १२ सभासदांपैकीं ४ सभासद तिचे माजी विद्यार्थी आहेत, या गोष्टीचाही रिपोर्टांत अभिमानपूर्वक उल्लेख केला होता.

श्रीयुत **भिकाजी सीताराम सबनीस**, बी. ए., एल्एल्. बी., ॲड्व्होकेट, श्रीयुत **वामन मंगेश दुभाषी**, श्रीयुत **वसंतराव नारायण नाईक**, एम्. ए., यांचीं समयोचित भाषणें झाल्यावर यशस्वी विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना अध्यक्षांच्या हस्तें बक्षिसें देण्यांत आलीं. नंतर अध्यक्षांना पुष्पहार अर्पण करण्यांत आल्यावर त्यांचें लहानसें पण मुद्देसूद असें भाषण झालें.

संस्थेनें केलेल्या उपयुक्त शिक्षणविषयक कार्याबद्दल तसेंच तिनें अप्रत्यक्ष रीतीनें केलेल्या सामाजिक सुधारणेच्या कार्याबद्दल त्यांनीं संतोष व्यक्त केला. संस्थेनें आपल्या स्थापनेपासूनच म्हणजे ३१ वर्षांपूर्वी आपलें सदस्यत्व स्त्री-वर्गास मोकळें ठेवण्याचें व सर्व भेदांच्या विद्यार्थ्यांस मदत करण्याचें उच्च ध्येय आपल्यापुढें ठेवल्याबद्दल त्यांनीं तिचें अभिनंदन केलें. पुष्कळ सुशिक्षित भगिनी सार्वजनिक कार्यांत पडत नाहींत, याबद्दल निराशा प्रदर्शित करून, आपापल्या आवडीप्रमाणें काहीं तरी सार्वजनिक काम अंगावर घेण्यास पुढें यावें, अशी त्यांनीं त्यांस कळकळीची विनंती केली.

श्रीयुत **गजानन हरि जांबोटकर**, एम्. ए., बी. टी., संस्थेचे दुसरे चिटणीस, यांनीं अध्यक्षांचे व जमलेल्या सर्व मंडळीचे आभार मानले. त्यास श्रीयुत **सदानंद लक्ष्मण कापडी**, बी. एस्सी. यांनीं दुजोरा दिल्यावर तो ठराव टाळ्यांच्या गजरांत पास झाला.

नंतर आभारगीत व राष्ट्रगीत म्हणण्यांत आल्यावर अध्यक्षांचा व यशस्वी विद्यार्थ्यांचा फोटो घेण्यांत आला व समारंभ समाप्त झाला.

### २ अभिनंदन.

मुंबई सरकारच्या इंडस्ट्रीज डिपार्टमेंटचे १९३०-३२ सालासाठीं निवडलेले स्कॉलर रा. रा. **बाळकृष्ण शिवराम कानविंदे**, एम्. एस्सी., यांनीं सर-

कारचे इंडस्ट्रिअल केमिस्ट डॉ. पटेल, व रॉयल इन्स्टि-ट्यूट ऑफ सायन्सचे प्रिन्सिपॉल, डॉ. व्हीलर यांच्या देखरेखीखालीं इन्स्टिटयूटमध्यें संशोधन (रिसर्च) करून प्राणिजन्य चरबीच्या जागीं तितकीच उपयुक्त **वनस्पतिजन्य चरबी** शोधून काढलेली आहे. असल्या चरबीचा उपयोग विशेषेंकरून कापडाच्या गिरण्यांत सायझिंगसाठीं करण्यांत येतो. प्राणिजन्य चरबी आजपर्यंत निरुपायास्तव हिंदुस्थानांत वापरण्यांत येत असे. म्हणून वनस्पतिजन्य चरबी निघूं शकेल कीं काय याविषयीं रा. रा. कानविंदे यांनीं केलेला शोध यशस्वी झालेला असून फक्त मालमसाल्याच्या हल्लींच्या किंमती लक्षांत घेतल्या तर वनस्पतिजन्य चरबी, एक हंड्रेडवेटमागें तीन रुपयांनीं महाग पडते. परदेशी माल आणि तोही किफायतशीर घेण्याचें टाळलें, तर किंमतींतील वरील थोडयाशा अंतरास इकडील देशाभिमानी व्यापारी-वर्ग महत्त्व देईल असें वाटत नाहीं. एतद्देशीय उद्योग-धंद्यांत शास्त्रीय शोधांनीं उत्क्रांति घडवून आण-ण्याचा उपक्रम केल्याबद्दल रा. रा. कानविंदे यांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करितों. वरील शोधासंबंधीं विस्तृत विवेचन ज्या निबंधांत रा. रा. कानविंदे यांनीं लिहून काढलें आहे, तो निबंध बॉम्बे गव्हर्मेंट बुलेटिन नं. ८ म्हणून छापला गेला असून गव्हर्मेंट इन्डस्ट्रीज् डिपार्टमेंटचे सेंट्रल प्रेसमध्यें एक आण्यास विकत मिळतो.

× × ×

जुनागडच्या बहाउद्दीन कॉलेजचे प्रोफेसर श्रीयुत **वासुदेव सदाशिव घुर्ये**, एम्. ए. हे इंग्लंडमध्यें व कॉन्टिनेंटवर स्काउटच्या पद्धतीची विस्तृत माहिति मिळविण्यासाठीं गेल्या १२ मार्चला 'व्हिक्टोरिया' बोटीनें विलायतेस रवाना झाले. घुर्ये यांचा, मालवण येथील एका मध्यम स्थितींतील सारस्वत ब्राह्मण घराण्यांत जन्म झाला असून बुद्धिमत्तेच्या बळावर इ. स. १९०० सालीं म्याट्रिकमध्यें बऱ्याच वरच्या नंबरास ते पास झाले. पुढील एम्. ए. पर्यंतच्या परीक्षा यशस्वी रीतीनें पास होऊन त्यांस जुनागडच्या बहाउद्दीन कॉलेजमध्यें फिजिक्सच्या प्रोफेसरची जागा मिळाली. त्यांना हायस्कूलमध्यें असल्यापासून शारीरिक शिक्षणाची फार आवड व स्वभाव मनमिळाऊ यांमुळें त्या वेळेपासून सहाध्यायि अगर त्यांच्या शिक्षणाखालीं असलेल्या विद्यार्थीवर्गास ते फार प्रिय असत. हे त्यांच्या अंगचे गुण जुनागड संस्थानांत स्काउटच्या चळवळींत पुढाकार घेण्यास त्यांस उपयोगी पडले. विलायतच्या प्रवासाची तरतूद करून जुनागड सरकारनें आपली गुणग्राहकता व्यक्त केली, याबद्दल त्यांचें आम्हीं अभि-नंदन करितों, व प्रो. घुर्ये हे मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन आपल्या ज्ञानांत व कीर्तींत भर घालतील अशी आशा प्रदर्शित करितों.

—रा. रा. **व्ही. पांडुरंग राव**, एम्. ए., आय्. सी एस्., डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज, नॉर्थ अर्काट, यांना ता. ३ जानेवारी १९३४ पासून मद्रास हायकोर्टाचे जज्ज नेमण्यांत आलें आहे.

—श्रीमती सौ. **आनंदीबाई बसरूर**, बी.ए., बी. एल्.एल्., अॅडव्होकेट, या बंगलोर म्युनिसिपालिटीच्या सभासद निवडून आल्या आहेत. त्यांना तेथें दुसऱ्या वर्गाचे स्पेशल मॅजिस्ट्रेटही नेमिलें आहे.

—कुमारी **लीला राव** या नुकत्याच झालेल्या वेस्टर्न इंडिआ टूर्नामेंटमधील वुइमेन्स सिंगल्स व डबल्समध्यें यशस्वी झाल्या.

—डॉ. **जी. एन्. कौशिक** एम्. बी. बी. एस्., बी. एच् वाय्. यांना मुंबई विश्वविद्यालयाच्या बी. एच् वाय्. परीक्षेंत 'टर्नर सुवर्णपदक' मिळालें.

—वास्तुवाचस्पति **रघुनाथ श्रीपाद देशपांडे**, बी. ई., ए. एम्. आय्. ई. यांच्या "**मोटर कशी चालते**" या पुस्तकास डेक्कन व्हर्न्याक्युलर सोसा-यटीनें "दि. ब. का. रा. गोडबोले प्राइझ" चालू सालीं दिलें.

—रा.रा. **वामन मंगेश दुभाषी** (ऋग्वेदी) यांनीं लिहिलेल्या व मेसर्स **व्ही. प्रभा कंपनीनें** प्रसिद्ध केलेल्या '**हिंदुधर्मदीपिका**' या पुस्तकास डेक्कन व्हर्न्याक्यूलर ट्रॅन्स्लेशन सोसायटीनें ५० रु. बक्षिस दिलें आहे.

—पुणें येथील वाडिआ कॉलेजच्या यंदाच्या फर्स्ट इअर आर्ट क्लासच्या वार्षिक परीक्षेंत कुमारी **कृष्णा नारायणराव नाडकर्णी** या **पहिल्या वर्गांत पहिल्या** आल्या आहेत. तसेंच एल्फिन्स्टन कॉलेजांत

सदर्हू परीक्षेंत रा. **दिनकर नारायणराव आजगांवकर** हेहि **पहिल्या वर्गांत पहिले** आले असून त्यांच्या व दुसऱ्या नंबराच्या बेरजेंत १०० मार्कांपेक्षां जास्त मार्कांचा फरक आहे.

× × ×

मालवणांतील निःस्वार्थी समाजसेवक व स्त्रीशिक्षणाकरितां तनमनधनानें अहोरात्र झटणारे सुप्रसिद्ध कर्मवीर श्री. **कृष्णराव सीताराम** उर्फ **आबासाहेब देसाई** यांना ता. ११–२–१९३४ रविवार रोजीं नुकत्याच स्थापना झालेल्या महिलासमाजातर्फे मानपत्रदानाचा समारंभ पार पाडण्यांत आला. कोंकणांत स्त्री–शिक्षणासारख्या महत्त्वाच्या राष्ट्रोद्धारक विचाराला चालना देऊन आज वीस वर्षें रूढिप्रिय समाजाच्या अप्रियतेशीं त्यांनीं जी टक्कर दिली, व आपल्या अविरत श्रमानें त्या विचाराला 'कन्याशाळे'च्या मूर्त स्वरूपांत आणलें, त्या त्यांच्या कामगिरीबद्दल त्यांचा गौरव होणें स्वाभाविकच होतें. परंतु त्यांना मानपत्र अर्पण करण्याची कल्पना येथें नवीनच निघालेल्या 'कोंकणसमाचार' या साप्ताहिकानें पुढें मांडिली, व जनतेनें जाहीर सभा भरवून त्यांना मानपत्राबरोबर थैलीही अर्पण करण्याचें ठरविलें. परंतु हें काम कालावधीचें असल्याकारणानें विनाकारण विचारांच्या वाटाघाटींत वेळ न घालवितां मानपत्राची कल्पना महिलासमाजानें पूर्णावस्थेस नेऊन आबासाहेबानीं ज्ञानदानानें केलेल्या उपकारांच्या ऋणांतून अंशतः तरी उतराई होण्याची संधि साधून घेतली.

मानपत्रदानाचा हा समारंभ आबासाहेबांच्या कन्याशाळेच्या नवीनच बांधलेल्या इमारतीच्या दिवाणखान्यांत करण्यांत आला. दिवाणखाना पताकांनीं उत्तम शृंगारला असून मध्यभागीं पुष्पहार घातलेलें आबासाहेबांचें भव्य तैलचित्र टांगलेलें होतें. दिवाणखान्याच्या मध्यभागीं एका कोचावर श्री. आबासाहेब व त्यांच्या सुशील पत्नी सौ. ताईसाहेब बसल्या असून त्यांच्या दोन्ही बाजूंना कन्याशाळेंतील शिक्षक व इतर सन्मान्य निमंत्रित पाहुणे मंडळी बसली होती. समारंभास गांवांतील बराचसा महिलासमुदाय हजर होता. समारंभास बरोबर ४॥ वाजतां सुरुवात झाली. सुरुवातीस कन्याशाळेंतील मुलींनीं ईशस्तवन व स्वागतपर पद्य म्हटल्यावर सौ. सुशीलाबाई पै यांनीं श्री. म्हाळसाबाई भांडारकर यांच्या हस्तें मानपत्र अर्पण करण्याचा ठराव मांडला व त्याला सौ. मंदाकिनी वझे यांनीं महिलावर्गातर्फे अनुमोदन दिल्यावर, कन्याशाळेंतील एक विद्यार्थिनी कु. गुलाब रेगे यांचें आबासाहेबांच्या कार्याविषयीं, निःस्वार्थीपणाविषयीं, व शाळेंतील मुलींच्या हितासाठीं ते घेत असलेल्या काळजीविषयीं वगैरे माहितीनें भरलेलें असें सुंदर भाषण झालें. त्यानंतर नवयुग नाट्यमंडळांतील होतकरु गवई श्री. मधुकर वराडकर यांचें सुश्राव्य गायन झालें. गायनानंतर कु. इंदिराबाई नेरुरकर यांनीं आबासाहेबांना अर्पण करण्याचें मानपत्र वाचून दाखविल्यानंतर श्री. म्हाळसाबाई भांडारकर यांनीं राष्ट्रोद्धारास स्त्रीशिक्षण किती आवश्यक आहे व त्याची आपल्या कोंकणांत हेळसांड होत असतां आबासाहेबांनीं सतत वीस वर्षें प्रयत्न करून तें कसें लोकप्रिय केलें व त्या त्यांच्या प्रयत्नांचीं गोड फळें पूर्ण मोफत शिक्षणाच्या रूपानें आपणांस मालवणांत कशीं चाखावयास मिळत आहेत, याचें थोडक्यांत वर्णन केलें, व सोन्याचें जडाऊ काम केलेल्या चांदीच्या करंडकांतून तें मानपत्र आबासाहेबांस अर्पण केलें. नंतर कन्याशाळेंतील मुलींनीं 'ठेवीं सुखी सदया, नरवरा' हें जीवनपुरी रागांतील पद म्हटल्यावर श्री. आबासाहेब व श्री. सौ. ताईसाहेब देसाई यांस पुष्पहार व गुच्छ अर्पण करण्यांत आले. आबासाहेबांच्या प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें व डॉक्टरनें त्यांस भाषणबंदी केल्याकारणानें त्यांच्याकरितां श्री. तात्यासाहेब परुळेकर यांचें अत्यंत भावनापूर्ण, विद्वत्ताप्रचुर व विनोदी भाषण झालें. शेवटीं कन्याशाळेंतील कु. वत्सला दांडेकर हिनें सर्वांचे आभार मानले. राष्ट्रगीत झाल्यावर थोडयाशा अल्पोपहारानंतर हा छोटेखानी, साधा परंतु अत्यंत प्रेमळ असा मानपत्र-समारंभ आटोपला.

× × ×

सोलापूर येथील सारस्वत ब्राह्मण सोशल क्लब या संस्थेतर्फे दोघां सन्माननीय ज्ञातिबंधूंचा सत्कार करण्यांत आला. कराची ( सिंध ) येथील 'दाक्षिणात्य गौड सारस्वत ब्राह्मण समाज' या ज्ञातिसंस्थेचे

अध्यक्ष रावसाहेब **जगन्नाथ वामनराव मुजुमदार,** पर्सनल असिस्टंट टु धी चीफ् इंजीनियर, कराची, हे येथें आपले जामात लोकप्रिय डॉक्टर तेलंग यांना भेटण्यास आल्यावेळीं क्लबच्या निमंत्रणावरून तारीख २८-२-३४ रोजीं सायंकाळीं चार वाजतां क्लबच्या जमलेल्या सभासद-मंडळीस त्यांनीं आपली अलभ्य भेट दिली. आरंभीं क्लबचे अध्यक्ष श्रीयुत कृ. द. नेरूरकर यांनीं यथोचित भाषण करून पाहुण्यांचें स्वागत केलें, व सभासदांस त्यांची ओळख करून दिल्यावर कराची येथील स्वकीय समाज संस्थेचे ते अध्यक्ष असल्यामुळें त्यांनीं आपले अनुभव येथील क्लबच्या सभासदांस ऐकवावे अशी विनंती करून टाळ्यांच्या गजरांत पुष्पहारसमर्पणपूर्वक त्यांचा गौरव करण्यांत आला.

यानंतर रावसाहेब मुजुमदार यांनीं प्रथम कराचीच्या स्वकीय समाजसंस्थेसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगून "सामाजिक संस्था व त्यांचें कार्य" या विषयावर अतिशय उद्बोधक व विचारप्रवर्तक असें सुमारें एक तासभर भाषण केलें. या भाषणांत त्यांनी स्वतःच्या जीवन-चारित्र्यावरून स्वतंत्रपणें ज्ञातिविशिष्ट सामाजिक संस्था स्थापण्याची अत्यावश्यकता निदर्शनास आणून दिली. आमच्या पूर्वकालीन धार्मिक विषयांसंबंधीं समाजांत उत्पन्न झालेली अनास्था व चालू सुधारणेचें अनिश्चित स्वरूप, यांमुळें समाजामध्यें एक प्रकारचा जो गोंधळ माजून राहिलेला दिसत आहे, तो नाहींसा होण्यासाठीं सामाजिक संस्थांनीं परिणामकारक खटपट केली पाहिजे. या कामीं संस्थांच्या सभासदांनीं औदासीन्य टाकून समाजसुधारणेच्या निरनिराळ्या तऱ्हेच्या योजना एकत्र विचारविनिमयानें ठरवाव्या, त्याशिवाय कोणत्याही समाजाचा तरणोपाय नाहीं. सुशिक्षित म्हटला जाणारा जो मध्यमवर्ग त्या वर्गानेंच या कामीं मनापासून परस्परसहकार्य करणें अत्यावश्यक आहे. तरी या गोष्टीकडे आमचे ज्ञातिबंधु सहानुभूतिपूर्वक लक्ष


# कामत आणि कंपनी.

## दोन हत्तीजवळ, गिरगांव बॅकरोड

आमचे दुकानीं नित्य लागणारीं सर्व तऱ्हेचीं धान्यें, नारळ, चहा, साखर, लोणी, तूप, सर्व प्रकारचें सामान, हिंग, केशर सर्व तऱ्हेचे साबण वगैरे माल मार्केटभावानें घरीं पोंचविण्याची व्यवस्था केली आहे. मालाच्या चांगुलपणाविषयीं गिऱ्हाईकांनीं एकवार खात्री करून घ्यावी.

PHONE NO. 42476.

देतील व इतर समाजांस आदर्शभूत होतील, अशी आशा प्रदर्शित करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

क्लबला भेट दिल्याबद्दल अध्यक्ष अण्णासाहेब नेरूरकर यांनीं समारोपात्मक भाषण करून क्लबाच्या वतीनें त्यांचे आभार मानले व पुढें अल्पोपहार, पानसुपारी वगैरे होऊन हा पहिला सत्कारसमारंभ आटोपला.

यानंतर ता. ९-३-३४ रोजीं सायंकाळीं साडेसहा वाजतां क्लबच्या दिवाणखान्यांत येथील सन्माननीय ज्ञातिबंधू श्रीयुत **शांताराम नारायण कोटणीस** यांची सरकारनें सोलापुरांत बेंच-मॅजिस्ट्रेटच्या जागीं निवडूणूक केल्याबद्दल त्यांचें जाहीर अभिनंदन करण्याकरितां २ रा सत्कारसमारंभ करण्यांत आला. या प्रसंगींही क्लबची सभासद मंडळी प्रामुख्यानें हजर राहिली होती.

आरंभीं क्लबाचे सेक्रेटरी श्रीयुत वेलिंग वकील यांनीं औपचारिक भाषण करून समारंभ भरविण्याचा उद्देश सांगितला व क्लबच्या नियोजित अध्यक्षांनींच हा समारंभ साजरा करावा असें सुचविलें. तद्नुरूप सर्व सभासदांच्या अनुमतीनें टाळ्यांच्या गजरांत श्रीयुत अण्णासाहेब नेरूरकर हे अध्यक्षस्थानापन्न होऊन आपल्याबरोबरच त्यांनीं श्रीयुत कोटणीस यांनाही बसण्याची विनंती केली. तिला मान देऊन श्री. कोटणीस स्थानापन्न होतांच अध्यक्षांनीं कोटणीसांच्या सोलापूर येथील म्युनिसिपालिर्टीतील कौन्सिलर या नात्यानें वेळोवेळीं केलेल्या सार्वजनिक कार्यव्यावृत्तीचा निर्देश करून त्यांचा यथोचित गुणगौरव केला. आणि अशा गुणी माणसांचें सहकार्य मिळविण्याकरितां सरकारनें त्यांना मॅजिस्ट्रेटचा मान दिला, याबद्दल क्लबच्या वतीनें हा पुष्पहार अर्पण करून मी त्यांचें सप्रेम अभिनंदन करतों असें म्हणून प्रचंड टाळ्याच्या गजरांत कोटणीससाहेबांना पुष्पहार अर्पण करण्यांत आला, आणि यापुढें अध्यक्षांच्या सूचनेवरून श्रीयुत वर्दे वकील, नार्थकोट हॅायस्कूलचे हेडमास्तर श्री. कामत व वे. शा. सं. गणेश शर्मा शास्त्री ह्या तिघां वक्त्यांचीं समयोचित भाषणें होऊन कोटणीसांबद्दल गुणगौरव व्यक्त करण्यांत आला. यानंतर स्वतः कोटणीसांनींहीं अल्पशा भाषणानें सर्वांचे आभार मानले. समारोपात्मक अध्यक्षीय भाषण झाल्यावर एकंदर मंडळींना अल्पोपाहार देण्यांत आला. ग्रीष्म काळाचे प्रखर दिवस असल्यामुळें मामुली रिवाजाप्रमाणें मंडळीना चहापान न देतां अत्यंत थंड असें बर्फमिश्रित दुग्धपान देण्यांत आल्यामुळें व्यवस्थापकांच्या दूरदर्शित्वाबद्दल सभासद मंडळीकडून वाखाणणी करण्यांत आली.

× × ×

मुंबई आर्ट सोसायटीचें ४३ वें वार्षिक प्रदर्शन ता. २९ जानेवारी १९३४ रोजीं ने. ना. गव्हर्नरसाहेबांनीं उघडलें; त्यांत खालील स्वकीय चित्रकारांना त्यांच्या नांवांपुढें निर्दिष्ट केलेलीं पारितोषिकें मिळालीं आहेतः–

(१) रा. **रघुवीर गोविंद चिमुलकर**—खा. ब. डोसाभॉय एच्. भिवंडीवाला, प्राइझ–५१ रु.

(२) रा. **व्ही. आर. राव**–पोस्टर डिझाइन प्राइझ.

(३) रा. **एस्. बी. शिरगांवकर**—सोसायटीचें पेस्टल कामाचें पारितोषिक–५० रु.

(४) श्री. सौ. **मंजुळा भांडारे**—एन्. एम्. वाडिया चॅरिटीज्चें नीड्लवर्कसाठीं ठेवलेलें ५० रु. चें बक्षिस (अर्धें).

× × ×

पुणें येथील शाळांचें शैक्षणिक चित्रकलाप्रदर्शन तेथील ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन या संस्थेच्या ड्राइंग हॅालमध्यें ता. ५ व ता. ६ फेब्रुवारी १९३४ रोजीं मध्यविभागाचे एज्युकेशनल इन्स्पेक्टर मि. कॅमरॅान यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें. त्यांत खालील विद्यार्थ्यांस पारितोषिकें मिळालीं आहेतः—

**नेचर ड्रॅाइंगः**—१ लें बक्षिस–रा. **आर. व्ही. साखळकर** (भावे स्कूल) २ रें बक्षिस–रा. **एस्. एस्. हवालदार** (ट्रेनिंग कॉलेज)

**डिझाइन्सः**— १ लें बक्षिसें– **तारा रेगे** (महिलाश्रम, हिंगणें). २ रें बक्षिस–रा. **आर. व्ही. साखळकर**

× × ×

भूकंपानें दुःखांत लोटलेल्या बिहार प्रांतांतील स्त्रियांना मदत करण्याकरितां कुमारी डॉ. **सावित्री-विठ्ठलराव महाजन,** एम्. बी. बी. एस्. या स्वयं-स्फूर्तीनें बिहारला गेल्या आहेत.

## ३ नेमणुका.

—रा. रा. राजाराम श्रीपाद बावडेकर, बी. ए. (बॉम्बे व केंब्रिज), आय्. सी. एस्. (डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज, भडोच व पंचमहाल) यांना ता. १८ जून १९३४ पासून मुंबई हायकोर्टाच्या ॲपिलेट साइडकडील रजिस्ट्रार नेमण्यांत आलें आहे.

—डॉ. देवदत्त रामकृष्ण भांडारकर, एम्. ए., पी. एच्‌डी., (कलकत्ता) यांस हिंदुस्थान सरकारनें इंडिअन हिस्टॉरिकल रेकॉर्डस्‌चे आणखी तीन वर्षें-पर्यंत सभासद नेमलें आहे.

—मेजर ए. वाय्. दाभोळकर, आय्. एम्. एस्. यांना मुंबई सरकारनें कायदेकौन्सिलचे हंगामी सभासद निवडलें होतें.

—रा. रा. विनायक दत्तात्रय मुजुमदार, एम्.ए., (इन्कम्‌टॅक्स ऑफिसर, कंपनीज् सर्कल, मुंबई) यांची पुणें येथें ॲसिस्टंट कमिशनर ऑफ इन्कम-टॅक्स, सेंट्रल डिव्हिजन, म्हणून नुक्तीच नेमणूक झाली आहे.

—रावसाहेब रामकृष्ण नारायण नायमपल्ली यांची मुंबई शहरांत सुपरिंटेंडंट ऑफ पोलिस म्हणून हंगामी नेमणूक झाली आहे.

—रावबहादूर के. व्ही. कौंडिन्य यांस सदर्न डिव्हिजनचे असिस्टंट कमिशनर नेमण्यांत आलें आहे.

—रा. रा. ए. एस्. मुंडकुर, बी. ए. (डेप्युटी कलेक्टर, रत्नागिरी) यांची मुधोळ संस्थानचे दिवाण म्हणून नेमणूक झाली आहे.

—मुंबई सॉल्ट डिपार्टमेंटमधील सरकारकून रा. रा. डी. बी. नाडकर्णी यांना ता. ६ –२–३४ पासून कानडा रेंजचे सॉल्ट रेव्हिन्यूचे ॲसिस्टंट कलेक्टर नेमिलें आहे.

—रावसाहेब विनायक महादेव तेंडुलकर (कोक-वन, जिल्हा कुलाबा) यांना सरकारनें तिसऱ्या वर्गाचे सरदार केलें आहे.

—डॉ. एस्. एम्. कात्रे, एम्. ए.,पी. एच्. डी. यांना पुणें येथील वाडिआ कॉलेजमध्यें संस्कृत विषयाचे अध्यापक नेमिलें आहे.

—सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीच्या कार्य-कारी मंडळाचे सभासद श्रीमती कृष्णाबाई वाघ या उच्च शिक्षणासाठीं विलायतेस गेल्यामुळें, त्यांच्या जागीं कुमारी नीरा लक्ष्मण मोंडकर, बी. ए., बी.टी. (स्टुडंटस् लिटररी ॲन्ड सायंटिफिक सोसायटीचें हायस्कूल, मुंबई) यांची व्यवस्थापक मंडळानें निव-डणूक केली आहे.

—मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या व्यवस्थापक-मंडळाची नवीन निवडणूक नुक्तीच झाली असून तींत रा. रा. शिवाजी कृष्ण पल्लळकर, एफ्. सी. आर. ए., जे. पी. यांची उपाध्यक्ष व कुमारी नीरा लक्ष्मण मोंडकर, बी. ए., बी. टी., रा. रा. श्रीपाद केशव नाईक व रा. रा. मुकुंद श्रीकृष्ण झारापकर, एम्. ए. यांची सभासद म्हणून निवडणूक झाली आहे.

## ४ सभा–सम्मेलनें.

—श्री टाकी महाराज यांचें "सद्भक्तिपंथ व सना-तन धर्म यांची तुलना" या विषयावर ता. २९–१–१९३४ रोजीं फ्रेंच पूलानजिक ब्लॅव्हॅटस्की लॉजमध्यें व्याख्यान झालें.

—चिकित्सक समूह हायस्कूलचा बक्षिससमारंभ ता.१–२–३४ रोजीं रॉयल ऑपेरा हाउसमध्यें नाम-दार दिवाणबहादूर एस्. टी. कंबळी, बी. ए., एलएल्. बी. यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडला.

—गोमांतक मराठा समाज, मुंबई, या संस्थेच्या महिला मंडळातर्फे कुमारी माई वरेरकर यांचें "स्त्री-शिक्षण" या विषयावर ता. ४–२–३४ रोजीं व्याख्यान झालें.

—ता. ८–२–३४ रोजीं कोल्हापूर येथें धी कोल्हापूर शुगर मिल्स, लिमिटेड, या साखरेच्या कारखान्याची इमारत उघडण्याचा समारंभ दक्षिणी संस्थानाचे एजंट टु धी गव्हर्नर जनरल कर्नल विल्बरफोर्स यांच्या हस्तें झाला. या कारखान्याचें भांडवल १२ लाख रुपये असून रोज ४० टन साखर निघण्याची योजना आहे. त्यामध्यें एकाच वेळीं ५०० माणसें कारखान्यांत काम करूं शकतील. मेसर्स शिरगांवकर ब्रदर्स हे सदहू कंपनीचे एजंट आहेत.

—बेळगांव जिल्हा रयत परिषदः–रावसाहेब हरि विठ्ठलराव शिरगांवकर यांच्या अध्यक्षतेखालीं बेळगांव येथें डिस्ट्रिक्ट सेंट्रल बँकेचे जाग्यांत ता. ११–२–३४ रोजीं भरली होती.

—संस्थान सावंतवाडी जमिनदार संघाची पहिली साधारण सभा ता. ११–२–३४ रोजीं सावंतवाडी येथें म्युनिसिपल हॉलमध्यें डॉ. हरि शिवराम परूळेकर, एम्. बी., बी. एस्. यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती.

—दादर ( मुंबई ) येथील सारस्वत ब्राह्मण सेवा-संघ विद्यार्थीमंडळातर्फें ता. ११–२–३४ रोजीं रा. रा. भार्गवराम विठ्ठल वरेरकर यांचें "मराठी कथा वाङ्मय" या विषयावर व्याख्यान झालें.

—महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, पुणें, या संस्थेच्या डेक्कन जिमखान्यावरील शाळेचा बक्षिस-समारंभ ता. १२–२–३४ रोजीं रा. रा. सुमित्रराव ए. हत्यंगडी, बी. ए., एल्एल्. बी. पुणें येथील स्मॉल कॉझिस् कोर्टाचे जज्ज यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यांत आला.

—महाराष्ट्र इन्शुअरन्स ॲसोशिएशनतर्फें पुणें येथील न्यू किताबमहाल इमारतींत रा. रा. बाबासाहेब कामत, बी. ए., एम्. एल्. सी. यांच्या अध्यक्षतेखालीं ता. १२-२-३४ रोजीं सभा भरवून रा. रा. पुरंदर गणेश मराठे यांना विलायतेस जाण्यापूर्वं निरोप देण्याचा समारंभ झाला.

—मुंबई विद्यापीठाच्या सिनेटच्या ता.२-२-३४ रोजीं झालेल्या बैठकींत ( १ ) आरोग्य ( २ ) साबण तयार करणें, (३) रंग, वॉर्निश वगैरे तयार करणें, ( ४) रंगविणें व खडी काढणें, ( ५ )विजेचीं कामें, ( ६ ) औषधें तयार करणें, ( ७ ) शेतीची व्यवस्था—या विषयांचे डिप्लोमा चालू करावेत असा सिंडिकेटला शिफारशीचा ठराव रा.रा. दत्ताराम गणपत दळवी, एम्. ए., एल् एल्. बी., ॲडव्होकेट, यांनीं मांडला, व वरील विषय शिकविणाऱ्या अनेक लहानमोठ्या संस्था आहेत, त्यांना विद्यापीठानें मान्यता देऊन उत्तेजन द्यावें व मॅट्रिक झालेल्या विद्यार्थ्यांचें लक्ष उद्योगधंद्यांकडे लावावें असा या ठरावाचा उद्देश आहे, असें त्यांनीं सांगितलें.

—रा. रा. सखाराम सीताराम नाईक, बी. ए., एल्. सी. ई., बी. एस्सी., ए. एम्. आय्. ई. यांनीं (१ ) कातडीं कमविणें, ( २ ) शिक्षण, (३) छपाई व लिथो – हे आणखी तीन विषय डिप्लोमासाठीं ठेवावे अशी उपसूचना आणली व तीसह मूळ ठराव मान्य करण्यांत आला.

—बक्षीबहाद्दर जिवबादादा केरकर यांची पुण्यतिथि ता. १८-२ ३४ रोजीं मुंबई येथें सारस्वत ब्राह्मण समाजगृहांत साजरी करण्यांत आली. त्या वेळीं रा. रा. श्रीपाद महादेव वर्दे, बी. ए., एल्एल्. बी., ॲडव्होकेट, यांच्या अध्यक्षतेखालीं रा. रा. गणपत रामचंद्र नाईक, बी.ए., एल्एल्. बी. यांचें व्याख्यान झालें.

—मुंबई येथील प्रायमरी टीचर्स ॲसोशिएशनच्या विद्यमानें प्रि. वसंत रामचंद्र नेरूरकर, एम्.ए., एस्. टी. सी. टी. डी. यांचें "आजचें प्राथमिक शिक्षण" या विषयावर व्याख्यान झालें.

—मुंबई येथील शारदामंदिर संस्थेचें प्रथम-सम्मेलन ब्लॅव्हट्स्की हॉलमध्यें ता. १७-२-३४ रोजीं डॉ. श्री. सौ. मालिनीबाई भालचंद्र सुखटणकर,

एम्. बी. बी. एस्., जे. पी., यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें.

—रा. रा. भार्गवराम विठ्ठल वरेरकर यांचें 'आर्ट सोसायटी ऑफ इंडिया' तर्फे ता. २२–२–३४ रोजीं "इंडिया हाउस डेकोरेशनसाठीं हिंदी चित्रकारांच्या बाबतींत दाखविण्यांत आलेला पक्षपात" या विषयावर व्याख्यान झालें.

—मुंबई युनिव्हर्सिटीच्या विद्यमानें व्हावयाच्या चालू सालच्या विल्सन फिलॉलॉजिकल लेक्चर्ससाठीं डॉ. वासुदेव सीताराम सुखठणकर, एम्. ए., पी. एच. डी., यांची नेमणूक झाली असून, Life and growth of Language या विषयावर त्यांचीं ५ व्याख्यानें झालीं.

—बॉम्बे प्रेसिडेन्सी सोशल रिफॉर्म असोशियनच्या तर्फे ता. ३–३–३४ रोजीं प्रार्थनासमाज-हॉलमध्यें रा. रा. वसंत नारायण नाईक, एम्. ए. यांचें रा. रा. सीताराम सुंदरराव पाटकर, बी. ए., एल् एल्. बी., जे. पी. यांच्या अध्यक्षतेखालीं "अस्पृश्यांचा प्रश्न" या विषयावर व्याख्यान झालें.

—बिहारफंडाच्या मदतीसाठीं प्रार्थनासमाजाच्या वार्षिक उत्सवांत ता. १०-३-३४ रोजीं श्रीमती सौ. शांताबाई पाटकर, जे. पी. यांच्या हस्तें 'मीना बाजार' उघडण्यांत आला.

—महिलांमध्यें जागृति, स्नेह, व संघटना इत्यादि गोष्टींची वृद्धि करण्याच्या हेतूनें ता. १०–३–३४ रोजीं पुणें येथें ठिकठिकाणीं स्त्रियांच्या जाहीर सभा भरविण्याचें पुना वुइमेन्स कौन्सिलनें ठरविलें असून त्याच्या स्टँडिंग कमिटीच्या अध्यक्षाच्या जागीं श्रीमती सौ. सरलाबाई नाईक, एम्. ए. यांची निवडणूक करण्यांत आली आहे.

—मडगांव ( गोवें ) येथील सारस्वत ब्राह्मण समाज या संस्थेचा वार्षिकोत्सव ता. १६–३–३४ रोजीं रा. रा. भार्गवराम विठ्ठल वरेरकर यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडला.

### ५ स्तुत्य देणग्या.

—रा. रा. काका कालेलकर यांनीं आपली शहापूर ( बेळगांव ) येथील जमीन मिळकत आपल्या उभयता मुलांच्या सम्मतीनें हरिजनकार्याला अर्पण केली असून त्याचा ट्रस्ट व्हावयाचा आहे.

—बुलढाणा येथील डेप्युटी कमिशनर रा. रा. दत्तात्रय वामन रेगे, बी ए. ( बॉम्बे व केंब्रिज ) बार-ॲट-लॉ, आय्. सी. एस्. यांनीं सहा महिने-पर्यंत प्रत्येक महिन्याच्या पगारांतील शेंकडा ३ टक्के रक्कम व्हाइसरॉयसाहेबांच्या बिहार–भूकंप-निधीला देण्याचें ठरविलें आहे.

—डॉ. वामन दत्तात्रय तेलंग, एम्.बी.बी.एस्. यांच्या अनुक्रमें ११ व ९ वर्षें वयाच्या कुमारी मंजुळा व कुमारी मालिनी या नांवाच्या दोन मुलींनीं श्रीगणेशोत्सव-सम्मेलनांत गायन केलें होतें, व या त्यांच्या गुणगौरवासाठीं त्यांना पदकें देण्यासाठीं १५ रु. मंजूर करण्यांत आले होते. परंतु वरील दोन्हीं मुलींनीं ते पैसे वरील गोष्टींत खर्च न करतां बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या बिहार-रिलीफ-फंडांत जमा करण्याकरितां पाठवून देण्यांत यावे अशी इच्छा प्रदर्शित केली असल्याचें जाहीर झालें आहे.

### ६ स्मारक.

प. वा. रा.रा. यशवंत मंगेश लाड, बी.ए., गोखले एज्युकेशन सोसायटीज् परेल हायस्कूलचे पहिले प्रिन्सिपॉल, यांचें स्मारक करण्याचें सदर्हू शाळेच्या माजी विद्यार्थीसंघानें ठरविलें असून त्यासाठीं मदत मिळावी म्हणून जाहीर विनंती करण्यांत आली आहे.

## पुनर्विवाह.

विधवा-विवाह–सहाय्यकमंडळातर्फे मुंबई येथील मराठा हायस्कूलचे हेडमास्तर रा. रा. विनायक हरि देशपांडे, बी. ए., बी. टी. यांचा पुनर्विवाह श्रीमती सुभद्राबाई सोंदे या गतभर्तृकेबरोबर नाशिक येथें रा. ब. प्रधान यांच्या बंगल्यांत ता. १०-२-३४ रोजीं झाला.

# शिकलेल्या मुलींवर आरोप.

"अलीकडच्या शिकलेल्या मुलींना अविवाहित राहणें आवडतें," असे उद्गार हल्लीं पुष्कळ ठिकाणीं ऐकूं येतात. ह्यासंबंधीं एखाद्या अलीकडच्या शिकलेल्या अविवाहित मुलीनें लिहिणेंही कदाचित् अयोग्य वाटेल. परंतु ज्याअर्थीं संभावितपणाखालीं मोडणारे सुशिक्षित लोक असे उद्गार शिकलेल्या मुलींनीं ऐकावे, त्यांना ते शब्द बोंचावे ह्यासाठीं त्यांना ऐकूं येतील अशा तऱ्हेनें काढतात व एक प्रकारचा कुत्सितपणा प्रकट करतात, त्याअर्थीं आपल्याला जें वाटतें तें मनमोकळेपणानें सांगण्यांत अयोग्यपणा होईल असें वाटत नाहीं. आतां वर लिहिल्याप्रमाणें शिकलेल्या मुलींवर आक्षेप करणाऱ्या लोकांना जर वाटत असेल कीं, मुली शिकल्या कीं त्यांच्यामधील स्त्रीजातींत असणाऱ्या भावना व विकार शिक्षणामुळें नष्ट होतात, तर ही त्यांची समजूत साफ चुकीची आहे.

निसर्गनियमाप्रमाणें प्रत्येक प्राणिमात्राला वयाच्या ठराविक मर्यादेंत कांहीं तरी भावना व विकार हे असणारच. ते नाहीं म्हणून सांगून असत्यपणा पदरांत घेणें योग्य नाहीं. शिक्षणानें ह्या नियमांत थोडासा बदल होतो, व तो म्हणजे शिक्षणानें मनावर झालेल्या संस्कारांमुळें विकार कमी होऊन विचारशक्ति वाढते. त्याचप्रमाणें कसलाही नवरा मिळाला तरी चालेल पण एकदा "सावधान" हे मंत्र उच्चारून भटजीबुवांच्या हातच्या चार अक्षता कपाळावर पडल्या, कीं पावन झालें, ही भावना बदलते; इतकेंच नव्हे, तर विवाह हा एक आयुष्यांतला महत्त्वाचा प्रसंग असून त्याचा दूरदर्शीपणानें विचार केल्यावांचून त्यांत पडतां नये, त्याच प्रश्नाच्या विचारावर आपलें भावी आयुष्य व आयुष्याचा सुखदुःखदायकपणा अवलंबून आहे, म्हणून विवाहबद्ध होण्यापूर्वी वडील मंडळीपेक्षांही त्या प्रश्नाचा आपण पूर्ण विचार केला पाहिजे. ह्यांत वडील मंडळींना कांहीं कळत नाहीं, किंवा ती मंडळी आपल्या सुखदुःखाची पर्वा करीत नाहींत, अशी शिकलेल्या मुलींची समजूत असते असें नाहीं. परंतु वयोमानाच्या फरकामुळें म्हणा, अगर नव्याजुन्या विचारांत पडणाऱ्या फरकामुळें म्हणा त्यांच्या व तरुणांच्या भावनांत बराच फरक पडून वडील मंडळींनीं तरुणांच्या चांगल्यासाठीं, हितासाठीं म्हणून केलेल्या गोष्टी तरुणांना कधीं कधीं रुचत नाहींत व शेवटीं वडील मंडळी राहते बाजूला व त्यांच्या करण्याचा परिणाम तिसऱ्याच व्यक्तींना भोगावा लागून त्यांचें भावि आयुष्य शून्य, ध्येयहीन बनतें. हा विचार करण्यापुरती व आपला पति किंवा पत्नी ही एक अमुक एक विचारांची असावी इतकें ठरविण्यापुरती शिक्षणाच्या संस्कारानें मनाची तयारी होते. तसेंच, आपला पति किंवा पत्नी कोणत्या विचारांची असावी, हें जें एक ध्येय बनतें, त्या ध्येयामध्यें कितपत कमीपणा असला तरी चालेल, त्याचाही विचार करण्याची शक्ति येते. शेवटीं थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, कसें तरी एकदा विवाहित झालेंच पाहिजे; कीं अविवाहित राहिलें तरी चालेल; परंतु ज्याच्याशीं जन्माची गांठ पडावयाची, तो जन्माचा सोबती अमुक एक प्रकारचा असावा, हें ठरविण्याची अंगांत लायकी येते. दुसरी गोष्ट कबूल केली पाहिजे ती ही कीं, पुरुष शिकला व त्याचें पत्नीसंबंधीं एक ध्येय ठरलें; परंतु पुढें कदाचित् तशा प्रकारची पत्नी न मिळतां त्याच्या ध्येयापासून पुष्कळ कमी योग्यतेची स्त्री मिळाली, तरी त्याला ती चालेल किंवा तो तिला चालवून घेईल, असा अनुभव येतो. ह्याचें कारण असें असलें पाहिजे कीं, विवाहाच्या योगानें "गृहिणी सचिवः सखी प्रिया" अशी सहचरी न लाभतां जन्मभर अन्नवस्त्राचा मोबदला घेऊन काम करणारी दासी मिळाली तरी तिची नड येण्याचा त्याला संभव नसतो. ज्याप्रमाणें चांगलें म्हणून एखादें गाय ढोर घेतलें, परंतु अनुभवानें तें खोडकर, दांडगट आहे असें कळून आलें तर त्याला थोडीशी मारहाण करावी लागते; परंतु त्याचा उपयोग करून घेण्यांत कांहीं कमतरता पडते असें नाहीं. त्याचप्रमाणें पत्नी ही दासी किंवा एक मालकीचा प्राणी ही जुनी कल्पना असल्यामुळें सुशिक्षित पति व अजाण अशिक्षित पत्नी ह्यांचा हा विषम विवाह समाजदृष्टीनें अयोग्य ठरत नाहीं, व ज्या सामाजिक राहणीची लोकांना संवय पडली आहे, त्यांत नड येत नाहीं. पदवी किंवा अधिकार ह्यांच्यामुळें सामाजिक

समारंभाच्या प्रसंगीं पत्नीला चारचौघांत नेण्याचें सुशिक्षित पुरुष बहुधा टाळतात. त्यांनीं पत्नीला बरोबर नेली नाहीं, तरी त्याविषयीं फारशी चर्चाही होत नाहीं. हा प्रकार विशेष अंगवळणीं पडल्यामुळें लोकांनाही कांहीं वाटत नाहीं. बरें, इतकेंही असून कधीं पत्नीला बरोबर नेलीच व त्या ठिकाणीं तिचा अशिक्षितपणा नजरेस आला, तरी तिच्या नवऱ्याची पदवी व अधिकार ह्यांकडे लक्ष देऊन लोक तिकडे कानाडोळाच करतात. परंतु सुशिक्षित स्त्रियांची स्थिति मात्र ह्याच्या अगदीं उलट असते! ज्या सुशिक्षित स्त्रीला चारचौघांत मिसळण्याचा प्रसंग येतो, तिचा पति जरी तिला प्रिय असला, तरी तो जर अडाणी, अशिक्षित असेल, तर त्याविषयींची चर्चा तिच्या कानावर जाईल अशा रीतीनें करून तिला हिणवावी अशा प्रकारची आमच्या समाजाची वृत्ति आहे. दुसरें, सुशिक्षित स्त्रीनें अडाणी पति न करतां सुशिक्षित पति वरावयाचा असें जर म्हटलें, तर सुशिक्षित स्त्रीनें सुशिक्षित पतीच कां करावा? आपल्याहून थोडा अशिक्षित केल्यास काय बिघडेल? सगळेच सुशिक्षित पुरुष काय सुशिक्षितच बायका पसंत करतात? स्त्रिया जर पुरुषांशीं समान हक्कांसाठीं भांडतात, तर इतकेंच त्यांनीं कां टाळावें? असे प्रश्न विचारणारेही लोक असतातच. एकूण सुशिक्षित स्त्री म्हटली कीं तिच्या प्रत्येक बऱ्यावाईट हालचालीवर नजर ठेवण्यास एक विशिष्ट प्रकारचा वर्ग अगदीं डोळा ठेऊन असतोच असतो, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पुनः पदवीधर व सुशिक्षित असणारे पुरुष जर आज पाहिले, तर पत्नीचें शिक्षण व त्यामुळें उत्पन्न झालेल्या आवडी ह्यांना अनुसरून आपली राहणी ठेवतां येईल असें सामर्थ्य किती पुरुषांच्या अंगीं आहे? पदवीधर आदिकरून पुरुषांच्या बेकारीचा प्रश्न दिवसेंदिवस इतका वाढत चालला आहे कीं, एखादी इंग्रजी पांचसहा इयत्ता शिकलेली मुलगीही कांहींच नाहीं तर एखाद्या नर्सिंगचा कोर्स पुरा करून स्वतःच्या पोटापुरतें तीसचाळीस रुपये तरी मिळवूं शकते; परंतु बी. ए. झालेल्या पदवीधराला शेंकडों ठिकाणीं अर्ज पाठविले तरी तीस रुपयांची जागा मिळूं शकत नाहीं! मग अशा स्थितींत शिकलेल्या मुलींमध्यें लग्नाची तीव्र भावना उत्पन्न होण्याची गरज काय? तसेंच, सुशिक्षित पत्नी


## न्यू डायमंड इलेक्ट्रिक वर्क्स


**इलेक्ट्रिक, इंजीनियर्स, लायसेन्ड् कॉन्ट्रॅक्टर्स आणि जनरल मर्चंट्स,**

१४१, गिरगांव, मुंबई नं. ४ ( मॅजेस्टिक सिनेमासमोर ) प्रोप्रायटरः—**बी. पी. नाडकर्णी**

**आश्रयदात्यांस विनंतीः—**

आपल्या येथें इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशन्सचीं कामें उत्तम, सुबक व मनपसंतानुसार बंगले, घरें, चाळी तसेच वर्कशॉप्स् किंवा बाहेरगांवीं सिनेमांचीं कामें उत्तम प्रकारें केलीं जातील.

इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशन करण्यापूर्वी आमचा खास सल्ला घ्या, किंवा वरील पत्त्यावर पत्रव्यवहार करा. म्हणजे




**एव्हर रेडी पॉकेट टॉर्चिस्**

**जर्मन डेमन बॅटरीज्**

**टॉर्चिस् मिळतील**

**स्वस्त तितकें महाग**

हलक्या सलक्या मालास भुलून न जातां आमच्याकडील स्वस्त, सुबक व टिकाऊ व "इलेक्ट्रिक कंन्झम्शनास" कमी असे "स्टोन" ट्रेडमार्कचे दिवे वापरून खात्री करा. एकदम घेणारास विशेष सवलत.

**ता. क.**:—आमच्या येथें शुभप्रसंगीं टेंपररी इल्युमिनेशनचीं कामें मनपसंतानुसार करण्यात येतील.

केल्यास आपल्या दोघांच्याही शिक्षणांत समतोलपणा असल्यामुळें आपल्याबद्दल पत्नीच्या मनांत आदरबुद्धि राहणार नाहीं, अशी भीति सुशिक्षित पुरुषांत बऱ्याच प्रमाणांत आढळून येते. ही मीमांसा कदाचित् बऱ्याच जणांना रुचणार नाहीं; परंतु थोडासा विचार केल्यास ती सत्य आहे असें म्हणावें लागेल.

त्याचप्रमाणें आजचे आमचे बरेचसे पदवीधर तरुण पैशासाठीं श्रीमंतीच्या चोंचल्यांत वाढलेले! आपणांस शिक्षणाच्या म्हणा अगर ध्येयसिद्धीच्या मार्गांत म्हणा, अगदीं नालायक असें एखादें सोंग पदरांत घेतील; परंतु फक्त पैशाच्या अभावीं अविवाहित असलेली, –आपणास सर्वतोपरी योग्य असें जरी मनास पटलें, तरी मनाचीही घटकाभर फसवणूक करून-एखादी गरिबाची मुलगी पत्करणें त्यांना योग्य वाटणार नाहीं. ही त्यांची सुशिक्षित ह्या सदराखालीं होत असलेली हलकेपणाची कृति ज्यांना शिक्षणामुळें कांहीं अक्कल आली आहे, अशा मुलींना न खपून त्यासुद्धां अशा पुरुषांशीं लग्न न करणें हेंच आपलें ध्येय ठरवितात. कारण आपल्याला एखाद्यानें पत्करावें, अंगीकार करावा, ह्यासाठीं पैशाच्या रूपानें त्याला कांहीं लांच देऊन आपण आपलाच भार वाहण्यास असमर्थ आहोंत अशी त्याला जाणीव करून द्यावयाची व नंतर आपल्याकडून मिळालेल्या पैशाच्या मानानें त्यानें आपली लायकी, योग्यता ठरवावयाची. फक्त पैशाखेरीज इतर सर्व गुणांकडे दुर्लक्ष (निदान लग्न आटपेपर्यंत तरी) व हें सारें कळत असून आपण डोळेझांक करावयाची, हें शिकलेल्या मुलींना रुचत नाहीं व म्हणून त्या अशा स्वार्थी पुरुषांशीं लग्न करण्याचें टाळतात.

ह्या सर्व कारणांमुळें जिला विचार करण्याची शक्ति शिक्षणामुळें आली आहे अशा मुलीला तिच्या मताप्रमाणें अनुरूप वाटणारा पति हल्लींच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितींत मिळणें कठीण झाल्यामुळें, मनासारखा पति मिळत नसेल तर अविवाहित राहिलेलें पत्करलें, असें ठरविणें बऱ्याच शिकलेल्या मुलींना भाग पडतें व ह्याचा मुळींच विचार न करतां आपल्या मनाप्रमाणें एखाद्याबद्दल तर्क लढवून वरीलप्रमाणें उद्गार काढून ते अलीकडच्या मुलींना ऐकविण्यांत येतात; परंतु खऱ्या विचारी मुली अशा पोकळ बागुलबुवाला भीत नसतात, हें अशा लोकांनीं लक्षांत ठेवावें.

कु. गुलाब



# मिश्र-विवाह

आपल्या सारस्वत ब्राह्मणांतील सुशिक्षित तरुण स्त्रिया परजातींतील तरुणांशीं लग्नें करितात, अशीं कांहीं उदाहरणें अलीकडे घडलीं. 'याविषयीं तुम्ही कांहींतरी लिहिलें पाहिजे,' अशी हुकुमवजा सूचना मला अलीकडे दहाबारा स्वज्ञातीय गृहस्थांनीं केली. अशा जिव्हाळ्याच्या विषयावर लिहावें म्हणून मींही ती विनंती कित्येक स्वज्ञातीय विद्वान लेखकांकडे पोंचविली. परंतु माझ्या विनंतीचा स्वीकार झाला नाहीं. विषय महत्त्वाचा आणि सारस्वत ब्राह्मण जातीला जिव्हाळ्याचा वाटणारा असल्यामुळें त्याची उपेक्षाही करतां येत नाहीं. अशा स्थितींत माझे विचार रुचणार नाहींत असा संभव असला तरी कर्तव्य म्हणून ते महाराष्ट्र सारस्वतांत मी मांडीत आहें. अर्थात् या लेखांतील विचारसरणी व्यक्तिशः माझी आहे. महाराष्ट्र सारस्वताच्या धोरणाचें किंवा या मासिकाच्या चालकवर्गाचें मत त्या विचारांना अनुकूल असेलच असें कोणी समजूं नये. किंबहुना मी या विषयास चालना देत आहें. हा विषय सारस्वत ब्राह्मणांइतकाच इतरांनाही जिव्हाळ्याचा आहे. यासाठीं या विषयावरील सर्व प्रकारचा ऊहापोह होईल तितका थोडा.

वयांत येऊन सज्ञान झालेल्या व्यक्तीचा विवाह ही बाब अशी आहे कीं, त्यांत इतरांनीं मन घालण्याचें कारण नाहीं व त्याचा उपयोगही नाहीं. आपापल्या आवडीप्रमाणें विवाहबंधनानें जन्माची सोबत गांठतांना चूक झाल्यास जन्मभर पश्चात्ताप करण्याची पाळी येणार, हें जाणून ज्यांनीं निवड केली असेल, त्यांचा विचार इतरांनीं करणें व्यर्थ आहे. तशांत आईबापांनीं केलेल्या निवडीस मुकाट्यानें मान तुकावून ठराविक चाकोरींत आयुष्य कंठण्याचा क्रम ज्यांनीं सोडला असेल, त्यांच्या स्वतंत्र वृत्तीचें आणि धैर्याचेंही कौतुक केलें पाहिजे. आपल्या मनाचें संयमन करून वडिलांचें समाधान करण्याची कर्तव्यबुद्धि जितकी अभिनंदनीय आहे, तितकीच आप्तेष्टांच्या मनाविरुद्ध आपल्या विवेकानुरूप मार्ग चोखाळणाऱ्या बुद्धीची स्वतंत्रता कौतुकास्पद आहे. मात्र ही स्वतंत्रता अंमलांत आणल्यावर आपण केलेली निवड चुकीची ठरल्यास भोगावे लागणारे अनिष्ट परिणाम जाणून, त्या बुद्धिस्वातंत्र्याचा उपयोग करण्यांत आला पाहिजे.

मिश्रविवाह तात्त्विक दृष्ट्या जरी वरीलप्रमाणें समर्थनीय असला, तरी आजच्या आमच्या सामाजिक परिस्थितींत त्याचा निराळ्या एका दृष्टीनें विचार केला पाहिजे. आमच्या हिंदुसमाजाचीं जातिबंधनें अद्याप तुटलेलीं नाहींत. स्वजातिकक्षेच्या बाहेर विवाह करणें म्हणजे आप्तस्वकीयांशीं असलेले नात्याचे संबंध


सोसायटीच्या १ ल्या त्रैवार्षिकाचा आढावा घेण्याचें काम चालू आहे
त्याकडे लक्ष असूं द्या !

**बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटी, लि.**

**( ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई )**

सोसायटीची पॉलिसी घेणारांनीं अगर एजंट होऊं इच्छिणाऱ्यांनीं
**कुळकर्णी** आणि **कंपनी**च्या नांवें पत्रव्यवहार करावा

तोडून टाकणें होय. तसेंच मुलगे व मुली कुटुंबांत लहानपणापासून असल्यामुळें स्वजातींतील चाली-रीति आणि राहणी यांची त्यांना संवय झालेली असते. नेहमींच्या व्यवसायांत स्वजातीय इतर मुलांमुलींशीं त्यांचा परिचय होत असतो. हा परिचय सोडून, अपरिचित अशा अन्य जातींतील राहणी स्वीकारून, आप्तांचा निकट संबंध तोडून एखाद्या तरुण मुलानें किंवा एखाद्या मुलीनें भिन्न जातींतील व्यक्तीशीं जन्माची सोबत करण्यास कां तयार व्हावें हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. स्वज्ञातींतील तरुणींचा अव्हेर करून परजातींतील मुलीशीं विवाह करण्यास एखाद्या मुलानें उत्सुक व्हावें किंवा स्वकीय तरुणांपैकीं निवड न करतां भिन्न जातींतील तरुणाला वरण्यास एखाद्या तरुणीनें उद्युक्त व्हावें, हें आपल्या ज्ञातीला कमीपणा आणणारें आहे, असें ज्ञातींतील बहुजन-समाजाला वाटणें आजच्या जातिबद्ध हिंदु समाजांत साहजिक आहे. पारशी लोकांसारख्या सामाजिक वागणुकींत पुढारलेल्या समाजांतसुद्धां मिश्रविवाहाचें वैषम्य वाटतें; मग सारस्वत ब्राह्मण जातीसारख्या जाति-बद्ध समाजाला खेद वाटला तर त्यांत नवल नाहीं.

परंतु, केवळ खेद मानून या बाबतींत चालणार नाहीं. स्वज्ञातींतील तरुण मुलें ज्ञातिबाह्य विवाह करण्यास कां तयार होतात, त्यांच्या कारणांचा विचार करून आपल्या समाजांत सुधारणा केली तरच विवाहासाठीं स्वकीय समाजाबाहेर जाण्याची लालसा उपवर मुलींना व तरुण मुलांना होणार नाहीं. परंपरा सोडण्यास हिंदु समाजांतील व्यक्ति सहसा धजत नसते. प्रार्थनासमाज हा जाती न मानणारांचा पंथ असतांही त्या समाजाचे अनुयायी किंवा पुढारी यांना देखील जें गेल्या पन्नास वर्षांत क्वचितच साधतां आलें, तें मिश्रविवाहाचें तत्त्व फारशी तत्वनिष्ठा नसलेल्या सनातनी हिंदु कुटुंबातील तरुण पिढींत आचरिलें जात आहे, याचें कारण काय? हा परिणाम केवळ परिस्थितीचा होय. आज आमच्या समाजाची राहणी अशा प्रकारची झाली आहे कीं, धड जुनेंही नाहीं आणि नवेंही नाहीं! अशा अर्धवट अवस्थेंत समाज कसे तरी दिवस काढीत आहे. मुलगे व मुली यांना शिक्षण मिळालें, मग जुन्या अंधश्रद्धेचा पगडा त्यांच्यावर राहत नाहीं. स्त्रिया आणि पुरुष यांचे निरनिराळे गट करून राहणें आवडत नाहीं आणि शक्यही नसतें. सुशिक्षित मुलींची संख्या फार थोडक्या प्रमाणांत होती, तोंपर्यंत पडद्याच्या पद्धतीहून कांहींशा मोकळ्या, परंतु जवळ जवळ तशाच आडपडद्याच्या कुंपणांत वावरणें शक्य होतें. हल्लीं मुंबईसारख्या शहरां-तील कॉलेजांत जाणाऱ्या मुलींची समवयस्क अशा अन्य जातीच्या सहाध्यायी मुलींबरोबर मैत्री जडते. त्या मुलींचे भाऊ, आप्त, स्नेही यांच्याशीं त्यांचाही परिचय जडतो. स्वज्ञातीय तरुण मुलांशीं होणाऱ्या परिचयाची, घरच्या मंडळींना लवकरच माहिती होते व असा परिचय जास्त वाढूं नये म्हणून त्या मंडळीकडून प्रयत्नही होतात. परंतु जातीच्या कक्षेबाहेर होणाऱ्या परिचयाची माहिती घरीं होण्यास फार वेळ लागतो. ती माहिती घरीं पोंचते तों परिचयाचें रूपांतर स्नेहांत होऊन गेलेलें असतें. तरुण मुलींनीं तरुण मुलांचा परिचय करूं नये, ही जी हिंदु समाजाची कदर आहे तीच आमच्या मुलांमुलींचा इतर जातींतील समवयस्कांशीं स्नेह जडण्यास कारण होते. स्वज्ञातींतील किंवा आप्तेष्टांतील तरुण मुलांमुलींना वडील माणसांच्या नजरेखालीं एकमेकांचा परिचय व स्नेह करण्याची संधि जास्त प्रमाणांत मिळाल्यास जातिसमाजांना अनिष्ट वाटणारा हा प्रकार घडण्याचा संभव कांहींसा तरी कमी होईल.

सारस्वतांसारख्या चालीरीति असलेल्या पांढरपेशा समाजांतील मुलींना मिश्र विवाहास उद्युक्त करणारी दुसरी गोष्ट म्हणजे हुंडयाची चाल. स्वज्ञातीय तरुण हुंडयासाठीं हपापलेले पाहून मुलींनीं वरसंशोधनार्थ जातीबाहेर नजर टाकणें अपरिहार्य आहे. हुंडयाच्या चालीला आळा पडला नाहीं, तर मिश्र विवा-

हांचें प्रमाण वाढत जाईल यांत शंका नको. अन्य जातींतील वर आपल्या वधूच्या आईबापांना लुटून हुंडा घेण्याची अपेक्षा सहसा करीत नसतो. विवाहास त्यांची नुसती संमति मिळाली तरी तो स्वतःस धन्य समजतो. विवाहामुळें आपली पत्नी स्वतःच्या मातापितरांपासून दूरावली नाहीं, पुढेंमागें बरावाईट प्रसंग आल्यास तिला त्यांचा पाठिंबा मिळेल, इतकें जरी समाधान असलें तरी तो खुष होतो. तसेंच, आपलें जीवन सफल करण्याकरितां आपलीं मातापितरें कर्जबाजारी झालीं नाहींत, आपलीं भावंडें लुबाडलीं नाहींत, याचें मुलीलाही समाधान वाटतें. हुंड्याचा बोजा पितरांवर लादण्यापेक्षां स्वज्ञातीला व आप्तेष्टांच्या स्नेहाला मुकावें लागलें तरी पत्करेल, असें मानणाऱ्या मुलीला दोष देणें वाजवी होणार नाहीं.

स्वज्ञातींतील समवयस्कांचा परिचय होण्याची अडचण आणि हुंड्याची चाल हीं मिश्र विवाहाला उत्तेजन देणारीं प्रमुख करणें होत. लग्नसमारंभाच्या खर्चाचें पालकांवर पडणारें ओझें, सुशिक्षित तरुण पुरुषांची वाढती बेकारी, शिक्षणामुळें वाढणारा दारिद्र्यांतील संसाराचा तिटकारा, वगैरे दुसरींही कित्येक कारणें आहेत. परंतु हीं मुख्य कारणें दूर झालीं नाहींत तर स्वज्ञातिय तरुणांना लाजिरवाणा आणि जातीला उणेपणाची जाणीव देणारा मिश्रविवाहाचा प्रकार दिवसेंदिवस वाढत गेल्यावांचून राहणार नाहीं. खऱ्या समाजसुधारकांना कदाचित ही इष्टापत्ति वाटण्याचा संभव आहे, हें देखील विसरतां नये. परंतु अशा रीतीनें नाइलाज म्हणून समाजांतील व्यंगामुळें होणारी सुधारणा नेहमीं सदोष असते. सारस्वत ब्राह्मणांतील बहुजनसमाज जर विचारपूर्वक मिश्र-


**मालवणहून....**

**मुंबईस**

**आ**लेलें घरगुती **कोकम** व उत्कृष्ट **काजूगर** आम्ही वाटेल तेथें पाठवितों; तसेंच अलिबाग येथील मीठ लावलेले **चिंचेचे गोळे**; आंबोली घाटांतील **गांवठी मध**; भाजी आमटीचा '**सन्डे स्पेशल मसाला**' स्पेशल **फॅमिली चहा मिक्श्चर** वगैरे माल मिळतो. लिहा—

**रेडकर एजन्सी,**

धान्य व किराणा मालाचे व्यापारी,

कांदेवाडी, **मुंबई नं. ४.**

**मंगेश ब्रदर्स**

**याच**

**हातानें बनविलेले**

(**मशिनमध्यें नव्हे**)

सर्व तऱ्हेचे व सर्व जातींना लागणारे उत्कृष्ट मसाले, सांबार, मिरची भुकी (तिखट), हळदीची भुकी, रुचकर लोणचें, चटण्या, खमंग भाजणी, उडदामेथी, मेतकूट वगैरे चोख मालापासून बनविलेले जिन्नस वापरून स्वतःची खात्री करा.

तुमच्या खात्रीकरितां अर्ध्या आण्याचा नमुना खालील ठिकाणीं येऊन घ्यावा.

ब्रँच नं. १

**आंबेवाडी पोस्टाशेजारीं, गिरगांव.**

ब्रँच नं. २

**चिराबाजार मार्केटमध्यें.**

विवाहांना मान्यता देईल, तर ती सुधारणा अभिनंदनीय होईल. परंतु मिश्र विवाहाचें उदाहरण घडलेलें ऐकतांच मनांत शरमावें, अन्य जातींत विवाह करणाऱ्या तरुणीचा किंवा तरुणाचा उल्लेख तिरस्कारानें करावा, त्यांना व त्यांच्या संततीला जातिबाह्य व नीच जातीचे मानावें आणि अशा प्रकाराला आळा घालण्याचे प्रयत्न मात्र करूं नये, हें जातीला हितावह नाहीं आणि खऱ्या कल्याणकारक सुधारणेलाही उपकारक नाहीं. एका नाजुक परंतु जिव्हाळ्याच्या अशा सामाजिक प्रश्नाची प्रस्तावना करून सध्या मी येथेंच थांबतों. या जिव्हाळ्याच्या प्रश्नाचा ऊहापोह जातिहितेच्छु विचारी माणसांकडून होईल अशी मला फार आशा आहे. माझी विचारसरणी सदोष वाटली, तर ते दोष दाखवण्याच्या कामीं हयगय करूं नये अशी माझी त्यांना आग्रहाची विनंती आहे.

**श्रीपाद महादेव वर्दे**

# ‘ जरा थांबा ! ’

( लेखिका— कु. सुशीला रेगे. )

‘ जरा थांबा !’ हे शब्द माझ्या हृदयांतून कधींच जाणें शक्य नाहीं.

१९३३ सालाची गोष्ट. मीं नुक्ताच कॉलेजांतून घरीं येऊन कॉटवर स्वस्थ पडून राहिलों होतों. थोडीशी विश्रांति घेतल्यावर स्टोव्ह पेटवून चहाचें भांडें वर ठेवून मीं स्टोवजवळच बसलों होतों. तोंच माझे शेजारीं वसंतराव माझ्या खोलींत येऊन बसले. चहापान वगैरे आटपल्यानंतर बरोबर साडेपांच वाजतां ते व मी फिरावयास टेकडीवर गेलों. थोडा वेळ इकडे तिकडे फिरल्यानंतर आम्हीं एका दगडावर जाऊन बसलों.

“ उद्यां तुम्हांला या ठिकाणीं एकटेंच फिरावयास यावें लागणार.”

“ कां बुवा ? तुम्हीं नाहीं आहांत का बरोबर ?”

“ छे; उद्यां मीं पुण्यास जाणार आहे. ”

“ कां ? कांहीं जरूरीचें काम आहे ? ”

“ होय. कालच पुण्याहून बाबांचें निघून येण्याविषयीं पत्र आलें आहे,” असें म्हणून मी माझ्या खिशांतून पत्र काढून त्यांच्याजवळ दिलें.

“चि. प्रभाकर यास आशीर्वाद. आम्ही इकडे आपणांकरितां रा. रा. केळकरांची मुलगी कु. इंदुमति इजला वधू नेमस्त केली आहे. मुलगी सुशिक्षित, स्वरूपवान् असून एकंदरींत आपणास साजेशी आहे. हुंडा मानपान करणी, मिळून दोन हजार रुपये ठरविले आहेत. तिथिनिश्चयसुद्धां कायम झाला आहे तरी एकदां सवड काढून स्वतः मुलगी पाहून जावी. क. हे आ.

**बाबासाहेब** ”

वसंतरावांनीं तें पत्र मनःपूर्वक वाचल्यावर ते थोडावेळ विचारांत पडल्यासारखें दिसले. त्यांनीं तें पत्र परत माझ्या हवालीं केलें.

“ गप्प कां राहिलांत ? ”

“ प्रभाकर, मीं तुमचें पत्र वाचलें. जरा थांबा ! उद्यां तुम्हीं जाण्याच्या भानगडींत पडूं नका. ”

“ कां—कांहीं मुहूर्तबिहूर्त पाहणार कीं काय ? ”

“ छे; छे, पण जरा थांबा, घाई करूं नका. ”

“ मग मीं उद्यां जाऊं नको तर ?—”

“हो बुवा. जरा थांबा. विचार करा आणि मग जा.” असें बोलत बोलत आम्ही दोघेही साडेआठ वाजतां घरीं आलों. जेवणखाण वगैरे आटोपून मी व वसंतराव गॅलरींत बसलों होतों. तोंच मला मघांशीं वसंतरावांनीं सांगितलेल्या ‘ जरा थांबा’ या शब्दांची आठवण झाली, व मी त्यांना तें स्पष्ट सांगण्याविषयीं पृच्छा केली.

" प्रभाकर, मला सांगण्यास फार वाईट वाटतें कीं, तुझ्या वडिलांनीं जी ही मुलगी ठरविली, आहे त्याचा कांहीं तरी विचार केला आहे का ?"

"कसला बुवा विचार ? मुलगी मला अनुरूप अशी नाहीं का ? "

" छे; छे ! मुलगी सर्व बाबतींत तुला अनुरूप अशी आहे. पण हा जो २००० रु. हुण्डा तूं घेणार, तो मात्र अगदीं तुला अननुरूप असा आहे. अरे, हा जो हुण्डा देणार, तो केळकरांनीं माझ्याकडून कर्ज काढून घेतला आहे. आज केळकरांच्या घरांत कर्तेसवरते असे एकटे तेच असून बाकी सगळीं कच्चीं बच्चीं पोरें आहेत. अशी परिस्थती असतांना तूं इतका हुण्डा उकळणें हें मला योग्य वाटत नाहीं. त्यांचा-माझा पूर्णपरिचय आहे; ह्याबद्दल तुला काय विचार करायचा असेल तो कर."

साडेदहा वाजतांच वसंतराव आपल्या खोलींत झोंपण्यास गेले. मीसुद्धां दिवा मालवून अंथरुणावर पडलों, पण मला कांहीं केल्या झोंप येईना.......मनाची बेचैन स्थिती झाली, व डोळ्यांपुढें एकसारखें केळकरांच्या दीन स्थितीचें चित्र दिसूं लागलें. माझ्या मनांत माझ्या वडिलांच्या जुन्या मतांबद्दल व माझ्या नव्या मतांबद्दल लढा सुरू झाला. शेवटीं मीं असा निकाल ठरविला कीं, कांहीं झालें तरी हुण्डा न घेण्याविषयीं म्हणून बाबांना अडथळा करावयाचाच. लगेच मीं दिवा पेटवून वडिलांस पत्र लिहिण्यास सुरवात केली.

"ति. बाबा यांस शि. सा. न. वि. वि. आपलें पत्र मिळालें; आपण केलेली निवड मला योग्य अशीच आहे; परंतु तुम्हीं हा जो हुंडा घेण्याचें ठरविलें आहे. तें मला मुळींच पसंत नाहीं, व त्यामुळें मला लग्न करावयाचें नाहीं. इतका हुण्डा देण्याइतकी केळकरांची आजची स्थिति नाहीं गरिबांकडून पैसा मला उकळून घ्यावयाचा नाहीं, ह्या अडचणीमुळें मला येतां येत नाहीं. क. हे वि.

आ. चि.

**प्रभाकर**"

पत्र वाचतांच बाबासाहेबांच्या अंगाची लाही लाही झाली. त्यांना प्रभाकराचा पुष्कळ राग आला. शेवटीं आपला मानभंग होऊं नये म्हणून, मनांत नसतांसुद्धां बाबासाहेबांनीं माझ्या म्हणण्यास रुकार देऊन त्याबद्दलचें मला पत्र लिहिलें. पत्र वाचून मला फारच आनंद झाला. वसंतरावाच्या 'जरा थांबा' ह्या शब्दांमुळेंच आज आपणांस ह्या आनंदाचा सुखोपभोग घेतां आला आहे असें मला वाटूं लागलें. जर मी त्या शब्दांना झिडकारून दिलें असतें, तर माझें मोठया थाटामाटानें लग्न झालें असतें; पण केळकरांच्या घरांतील लहानमोठया मंडळीचा हाहाःकार माझ्या माथीं बसला असता. असो. लवकरच १५ दिवसांनीं माझें व इंदुमतीचें लग्न झालें. कधीं कधीं माझ्या इंदूला मी वसंतरावांच्या 'जरा थांबा' ह्या शब्दांची आठवण करून देतों.

---

गौड सारस्वत ब्राह्मण कुटुंबांसाठीं हवाशीर घरांची सोय

# गौड सारस्वत ब्राह्मण को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीच्या

**डॉ. भाऊ दाजी रोडवरील वसाहतींत झालेली आहे.**

१०० चौरस फुटांच्या खोलीस विजेच्या दिव्यासह भाडें : रु. १२-८; परंतु सोसायटीच्या भागीदारांस २५ टक्के कमी पडतें. सिंगल व डबल खोल्या अगर पांच खोल्यांचा स्वतंत्र मजलाही घेतां येतो.

**खोल्यांची चौकशी वसाहतींत करावी.**





वर्ष १३ वें | मे–जून १९३४ | अंक ३



हिज मास्टर्स व्हॉइस, ओडियन, कोलंबिया व ट्वीन वगैरे कंपन्यांचे

**नवीन कोरे रेकॉर्डस् व ग्रामोफोन मशीन्स**

**गिरगांवांत मिळण्याचें एकच ठिकाण.**

ॲथोराईज्ड एजंटस्—

# जी. जे. घैसास आणि कंपनी,

**रामचंद्र बिल्डिंग, गिरगांव ट्राम टर्मिनस, मुंबई**

**फोन नं. २४१४१**



Printed by R. K. Tatnis, at Shree Laxmi Narayan Press, 364 Thakurdwar, Bombay No. 2 and Published by S. L. Kapadi for the Maharashtra Saraswat Mandal, at the Saraswat Brahman Samaj, Girgaum, Bombay 4

Editor:-S. M. Varde, B. A., LL. B.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स यांचा

# बाळंतकाढा

नंबर १-२ वापरा.

सर्वत्र मिळतो

द. कृ. सांडू ब्रदर्स,
आर्यौषधी कारखाना चेंबूर-ठाणें
दुकान-दवाखाना-ठाकुरद्वार-मुंबई-नं. २
शाखा-पोयबावडी-परेल.

सर्वत्र मिळतो

# धी इंडिया प्रॉव्हिडंट कंपनी लिमिटेड

( कलकत्ता )

स्थापना १९१०] लाईफ फंड आठ लक्ष रुपयांवर [ सरकारी सिक्युरिटी

कलकत्ता येथील सुप्रसिद्ध इंडियन इन्शुअरन्स जर्नल लिहितें, "हिंदुस्थानांतील विमा कंपन्यांत ज्याप्रमाणें ओरियंटल ही सर्वांत श्रेष्ठ व उच्च दर्जाची गणली जाते, त्याचप्रमाणें प्रॉव्हिडंट कंपन्यांत सदर्हू एकच कंपनी गणली जाते." हींत १८ ते ५० वयाच्या स्त्रीपुरुषांस वैद्यकीय तपासणीशिवाय दरमहा सहा आण्यांपासून दोन रुपयेपर्यंत हप्ता भरून १०० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंतची विम्याची पॉलिसी घेतां येते. तरी गरजूंनीं ह्याच कंपनींत आपला विमा उतरून आपला फायदा करून घ्यावा.

**गांवोगांव भरपूर एजंट्स पाहिजेत. लिहा अगर समक्ष भेटाः—**

भेटण्याची जागा व वेळ:—
**घाटकोपरवाला बिल्डिंग, मुगभाट, गिरगांव.** कोणत्याही दिवशीं सायंकाळीं ६ ते १० ( स्टँ. टा.)

**आर. एम्. दिवाडकर** आणि **कंपनी,**
मुंबई इलाख्याचे मुख्य एजंट्स,
**माझगांव,** मुंबई नं. १०.

२८

॥ श्री ॥

# महाराष्ट्र सारस्वत

## द्वैमासिक

वर्ष १३ वें | मे-जून १९३४ | अंक २ रा

## संपादकीय

महाराष्ट्र सारस्वताच्या या अंकाची प्रसिद्धि जोड महिना होऊन गेल्यावर होत असून थोडयाशा दिवसांचा विलंब झाला याबद्दल आम्हांस फार खेद होतो. परंतु त्याबरोबरच लेखकवर्गाकडून आम्हांस मिळावें तसें सहकारित्व मिळत नसल्यामुळें असा विलंब टाळण्याच्या प्रयत्नांस यश येत नाहीं, हें आमच्या वाचकांस व लेखकांसही कळविल्यावांचून गत्यंतर नाहीं. महाराष्ट्र सारस्वतासंबंधानें लेखकांची इतकी अनास्था कां असावी, याचीं कारणें समजल्यास तीं दूर करण्याचा शक्य तो प्रयत्न आमच्याकडून झाल्याखेरीज राहणार नाहीं.

× × × ×

मुंबई येथील सारस्वत ब्राह्मण समाजाच्या विद्यमानें डॉ. भाऊ दाजी स्मारक म्हणून कॉलेजांतील व विद्यालयांतील विद्यार्थ्यांकडून निबंध मागवून बक्षिसें देण्यांत येतात. कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून येणाऱ्या सर्वोत्कृष्ट निबंधास रु. ४० चें बक्षिस असतांही फक्त चार किंवा दोनच निबंध येतात असा अनुभव आला आहे. शिष्यवृत्त्यांसाठीं निरनिराळ्या फंडांकडे होणारे अर्ज पाहिल्यास उच्च दर्जाचे बुद्धिमान विद्यार्थी सारस्वत ज्ञातिसमाजांत भरपूर आहेत असें आढळतें. बक्षिस अखेर एकाच निबंधाला मिळतें हें खरें असलें, तरी निबंध लिहिण्यासाठीं होणारा व्यासंग आणि अभ्यास अनाठायीं जातो असें म्हणतां येणार नाहीं. बक्षिस नसलें, तरी देखील केवळ विद्येच्या लालसेनें अशा प्रकारचे निबंध लिहिण्यांतच विद्यार्जनाचें खरें महत्त्व आमच्या विद्यार्थीवर्गाला कळलें असें दिसून यावें. असें असतां या बाबतींत दिसून येणाऱ्या अनास्थेवरून जो निष्कर्ष निघतो, तो अत्यंत उद्वेगकारक आहे. येत्या वर्षी तरी ही अनास्था दूर झाल्याचें आढळेल अशी आशा आहे. ती सफल न झाल्यास स्मारकाची कांहीं तरी निराळी योजना केल्यावांचून चालकांना गत्यंतर नाहीं.

× × ×

**मुंबई युनिव्हर्सिटीच्या निरनिराळ्या परीक्षांत** सन्मानानें उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचीं नांवें या अंकांत इतरत्र आम्हीं दिलेलीं आहेत. त्यावरून ज्यांनीं अत्युच्च जागा पटकावल्या, अशा स्वकीय विद्यार्थ्यांसंबंधीं पुढील कोष्टक बसवितां येतें:—

## फर्स्ट क्लास

| | | |
|---|---|---|
| एम्. ए. | १ प्राइझ अथवा स्कॉलरशिप्स | |
| बी. ए. | ४ | |
| बी. एस्सी. | ९ ( ६ फर्स्टक्लास वुइथ डिस्टिंक्शन.) | |
| इंटर सायन्स | १ | |
| इंटर आर्टस् | २ | १ |
| मॅट्रिक्युलेशन | ४ | ५ |

मॅट्रिकचे विद्यार्थी पहिल्या १०५ नंबरांतले असून यांपैकीं एक पहिले आले आहेत. यावरून स्वकीय बुद्धिमत्तेच्या वर्तमानकालीन उज्ज्वलतेविषयीं साशंक अगर उदासीन राहण्यास जागा राहत नाहीं. विशेषेंकरून गेल्या सहा वर्षांत मॅट्रिकमध्यें पहिल्या नंबरास पास होण्याचा मान स्वकीय विद्यार्थ्यांच्या वांटयास **पांचदा** आला, ही वस्तुस्थिति ध्यानीं आणतां भविष्यत्कालाविषयींही आशाजनक मनोभावना उभी राहिल्यास क्षम्य समजली जाईल असें आम्हांस वाटतें. यापूर्वींच्या सुमारें साठ वर्षांच्या अवधींत हा मान क्वचित लाभत असे. म्हणून या अश्रुतपूर्व अभिमानास्पद वस्तुस्थितीबद्दल वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनीं ज्ञातीस भूषण आणल्याबद्दल त्यांचें अभिनंदन व्यक्त करावें तितकें थोडेंच.

या विषयावर लिहितांना विश्वविद्यालयीन विद्यार्थीस अनुलक्षून आणखी एकदोन विचार व्यक्त करावे असें वाटतें. युनिव्हर्सिटींतील यशापेक्षांही चारित्र्याचें महत्त्व जास्त आहे हें आमच्या—विशेषेंकरून विश्वविद्यालयीन—विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविणें आम्ही आपलें कर्तव्य समजतों. चरित्र्यामुळें भरभराटीस मार्ग मोकळा होतोच, पण विशेषेंकरून दिगंतकीर्ति लाभते, हें गतकालीन स्वकीय थोर पुरुषांच्या उदाहरणांवरून दिसून येणारें आहे. आमच्या बुद्धिमत्तेस अविश्रांत उद्योगाची जोड दिल्यास हें सहज शक्य आहे. नाहींपेक्षां ससा आणि कांसव यांच्या स्पर्धेचें उदाहरण आपल्यासमोर आहेच.

दुसरी विचारांत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे ज्या अन्य प्रांतांत ह्या प्रांताइतकी तीव्र चढाओढ नाहीं, अशा प्रांतांत वास्तव्य करून आपला धंदा अगर उद्योग चालविणें, हें विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांना इंग्लिश भाषाप्रभुत्वामुळें इतरांपेक्षां सोपें आहे. कूपमंडुकवृत्तीचा आपल्या जातींत जितका फैलाव आहे, तितका दुसऱ्या जातींत नाहीं. हीं वृत्ति सोडून धाडशीपणा दाखविण्याची जबाबदारी सुशिक्षितांवर जास्त येते. धाडशीपणा व व्यावहारिक ज्ञान यांचा मिलाफ झाल्यास यशःश्री माळ घेऊन सज्ज असते, हें इंग्लिश लोकांच्या इतिहासावरून सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. शिवाय तद्देशीय सारस्वत बंधूंशीं दळणवळण वाढेल हा फायदा निराळाच. आमचे सुशिक्षित बंधु वरील सूचना विचारांत घेतील अशी आम्हांस उमेद आहे.

× × ×

**धि सारस्वत कोऑपरेटिव बँक, मुंबई** या संस्थेचा १९३३-३४ सालचा रिपोर्ट नुक्ताच प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून ही संस्था दिवसेंदिवस लोकादरास जास्त पात्र होत आहे असें दिसून येतें. संस्थेच्या सभासदांची संख्या गेल्या वर्षापेक्षां १२० नीं वाढली असून सभासद व इतर यांनीं या बँकेंत ठेवलेल्या ठेवींची रक्कम रु. १, ६१, ५५० झाली आहे. गेल्या वर्षी ती रु. ८५,१८१ होती. सभासदांस फायदा दरसालप्रमाणें भागाच्या किंमतीच्या सोळाव्या हिश्शाइतका मिळत असून फायद्यांतील रु.८०० रिझर्व फंडांत सामील करण्यांत येत आहेत, ही संस्थेच्या सुरक्षितपणाच्या दृष्टीनें इष्ट व्यवस्था होय. पगारी मॅनेजर नेमण्यासंबंधींची सूचनाही आम्हांस योग्य वाटते.

आपलें दुसरीकडचें कर्ज फेडण्यासाठीं या संस्थेकडे ३० इसमांना धांव घ्यावी लागावी, हें मात्र विलक्षण दिसतें. अजपर्यंत अशा किती इसमांना रकमा दिल्या, त्यांपैकीं किती जणांनीं त्या बिनबोभाट फेडल्या व कितीजणांनीं आपल्या जामिनांस जमीनदोस्त केलें, हें समजणें अगत्याचें आहे. त्याचप्रमाणें धंदेउद्योगाच्या ( Business ) नांवावर ज्या व्यक्तींनीं आजपर्यंत पैसे

काढले, त्यांपैकीं कितीजणांनीं ते नांवारूपास आणले, किती जणांनीं ते जेमतेम सांवरले व किती जणांस जामीनावर आपला बोजा ढकलणेंच सोईचें झालें हें प्रसिद्ध झालें पाहिजे. त्यावरून ज्ञातीच्या उद्योगप्रियतेचा, नेकीचा वगैरे कयास काढण्यास सोपें होईल.

जामिनकीच्या तारणावर देण्यांत आलेल्या रकमेपैकीं सुमारें रु. ३२५०० वसूल होणें राहिले, हें ऋणकोंस भूपणावह नाहीं. जामीन राहणारांनीं स्वतःची जबाबदारी ओळखणें जरूर आहे. कर्ज मंजूर करतांना व्य. मं.नें या बाबतींत डोळ्यांत तेल घालून जपलें पाहिजे हें आम्हीं सुचविलें पाहिजे असें नाहीं. ज्या इसमांनीं आजपर्यंत आपल्या जामिनांस तोंडघशीं पाडलें, त्यांचीं नांवें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होणें जरूर असून त्यांच्या नांवाची एक यादी बँकेच्या दरवाजावर टांगल्यास अशा व्यक्तींच्या उजळ माथ्यानें फिरून प्रामाणिक लोकांच्या गळ्यास फांस लावण्याच्या वृत्तीस आळा पडेल असें आम्हांस वाटतें. देणें राहिलेला फायदा (Dividend) मागण्यास दोन वर्षांऐवजीं पांच वर्षांची सवलत ठेवली जाणें इष्ट आहे. तूर्त एवढेच विचार व्यक्त करून आम्हीं थांबतों.

× × ×

श्रीयुत **गणपतराव सखाराम राजाध्यक्ष,** M. A., Bar-at-Law, I. C. S, यांस तूर्त सहा महिन्यांसाठीं लीगल रिमेंब्रन्सर व सेक्रेटरी टु गव्हमेंट, लीगल डिपार्टमेंट, या अत्युच्च जागेवर मुंबई-सरकारनें नेमलें आहे, हें नमूद करण्यास आम्हांस आनंद वाटतो. सौजन्यामुळें व ज्ञातीच्या आणि सार्वजनिक हिताविषयीं आत्यंतिक झीज सोसूनही कळकळ दाखविल्यामुळें ते जसे लोकप्रिय झाले आहेत, त्याचप्रमाणें आपल्या बुद्धिमत्तेमुळें व कार्यक्षमतेमुळें सरकारच्या विश्वासास व आदरास ते पात्र झालेले दिसून येत आहेत. अशीच उत्तरोत्तर त्यांची बढती झालेली आम्हांस नमूद करण्यास संधि मिळावी अशी ईश्वराकडे आमची नम्र व कळकळीची प्रार्थना आहे.


## न्यू डायमंड इलेक्ट्रिक वर्क्स


**इलेक्ट्रिक इंजीनियर्स, लायसेन्स्ड् कॉन्ट्रॅक्टर्स आणि जनरल मर्चंट्स,**

१४१, गिरगांव, मुंबई नं. ४ ( मॅजेस्टिक सिनेमासमोर ) प्रोप्रायटरः—**वी. पी. नाडकर्णी**

**आश्रयदात्यांस विनंती:—**

आपल्या येथें इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशन्सचीं कामें उत्तम, सुबक व मनपसंतीनुसार बंगले, घरें, चाळी तसेंच वर्कशॉप्स् किंवा बाहेरगांवीं सिनेमाचीं कामें उत्तम प्रकारें केली जातील.

इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशन करण्यापूर्वी आमचा खास सल्ला घ्या.




**एव्हर रेडी पॉकेट टॉर्चिस्**

**जर्मन डेमन बॅटरीज्**

**टॉर्चिस् मिळतील**

किंवा वरील पत्त्यावर पत्रव्यवहार करा. म्हणजे **स्वस्त तितकें महाग** हलक्यासलक्या मालास भुलून न जातां आमच्याकडील स्वस्त, सुबक व टिकाऊ व "इलेक्ट्रिक कन्झम्शनास" कमी असे "स्टोन" ट्रेडमार्कचे दिवे वापरून खात्री करा. एकदम घेणारास विशेष सवलत.

**ता. क.:**—आमच्या येथें शुभप्रसंगीं टेंपररी इल्युमिनेशनचीं कामें मनपसंतीनुसार करण्यांत येतील.

# चांदोबास आव्हान !

( 'सारस्वत भगिनी' )

कां चांदोबा तूं हंससि असा मज वरुनी ?
जणुं असशी पुतळा मूर्तिमंत सद्गुणी !
हळुहळू चालतों मीहि, तसा मागोनी
हळुहळू चालसी; हळुच हांससी फिरुनि ! १
खेळतां चेंडुनें पडुनि लागली माती;
ती मीं न लाविली मजला माझ्या हातीं !
मग कशास हंससी गबाळ मातें गणुनि ?
तव कलंक भालीं का न दिसे तव नयनीं ? २
"हा चांदोबा आला; घरिं चल आतां.
ही आली रजनी." आईनें मज म्हणतां—
मी घरीं जातसें; हंसशी तूं तें बघुनी ?
तुजकडे पाहतां दिसतसे हास्य तें नयनीं ! ३
मी दादाशीं रडतों हट्ट धरून;
मग घेवोनी इथ आणी हातिं धरून !
तरि अखंड गळते; ना थांबे अश्रूमाला !
ती बघून हंसशी डोकावून कशाला ? ४
मम कुसळ दिसे; परि मुसळ असे तव नयनीं
ते अश्रु तुझे भिजविती पर्णे धरणी !
उनाडपणें तूं भटकसि सोडुनि काम !
मग कोंडि तुला तव मेघ सहोदर श्याम !! ५
तरि लाज नसे हंसशी मजला लपुनि !
मी वरि बघतां दडसि पयोदावरणीं !
मग हंससि पुनः हळुच काढुनी तोंड!
ये सांग तरी झालास कसा तूं झोंड ? ६
कां त्रास वृथा देशि असा तूं बाळा ?
जोंवरि न दाविला बागुलबावा काळा !
सांगेन सर्व हें जाऊन घरिं आईला !
मग येइल आई विचार बघ तूं अपुला ! ७

# मिश्र-विवाह

( लेखकः—रा. रा. वा. म. तेलंग )

महाराष्ट्र सारस्वताचे संपादक श्रीयुत श्रीपाद महादेव वर्दे यांच्या लेखावर समाजशास्त्राची स्वभावतःच आवड असणारा एक विद्यार्थी या नात्यानें आपल्या व आपल्या मित्रमंडळीच्या मनांत येणारे विचार स्पष्टपणें पुढें मांडून त्यांतील शंकांचें निरसन कां करवून घेऊं नये असें वाटल्यावरूनच खालील चार ओळी लिहिण्याचें धाडस मी करीत आहें.

प्रथमतःच एका स्वार्थी दृष्टीचा निषेध करणें मला भाग आहे. ज्या सद्गृहस्थांनीं श्री. वर्दे यांना वरील विषयावर लेख लिहिण्याबद्दल विनंती केली, त्यांचा ज्ञात्यभिमान अलीकडे स्वज्ञातींतील कांहीं सुशिक्षित तरुण स्त्रियांनीं परजातींतील तरुणांशीं लग्नें केल्यानंतर जागृत झालेला दिसतो. परंतु गेल्या १०-१५ वर्षांत स्वज्ञातींतील तरुणांनीं जे मिश्रविवाह केले, त्याबद्दल त्यांनीं कधीं ओरड केली होती, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. पुरुषांनीं कांहीं केलें तरी हरकत नाहीं, त्यांना सर्व गुन्हे माफ, परंतु त्यांचें उदाहरण पाहून स्त्रियांनीं जर तसेंच वागण्याचा प्रयत्न केला, तर तेव्हां मात्र ओरड करावयाची, असा जर एखादा ठाम सिद्धांत असेल, तर मला कांहींच म्हणावयाचें नाहीं; परंतु तसें नसल्यास असली ही स्वार्थी दृष्टि सुधारण्याचा आपण प्रथम प्रयत्न करावयास हवा. शत्रु घरांत घुसेपर्यंत वाट पाहत बसण्यापेक्षां त्याला घराच्या जवळपाससुद्धां येऊं न देणें हें जास्त शहाणपणाचें होईल. श्री. वर्दे यांनीं मात्र अशी दृष्टि ठेविलेली नाहीं. त्यांनीं स्वज्ञातींतील तरुण व तरुणी हल्लीं कोणत्या परिस्थितींत वाढत आहेत व त्याचे अनिष्ट परिणाम समाजास कसे भोगावे लागतील, याचें फार सुंदर विवेचन केलेलें आहे, तें प्रत्येक ज्ञातिबंधुभगिनीनें मननपूर्वक अवश्य वाचावें.

लेखासंबंधीं वरीलप्रमाणें सर्वसाधारण मत दिल्यानंतर आतां आमचा मतभेद कोठें होतो तो पाहूं. श्री. वर्दे म्हणतात, "तरुण मुलींनीं तरुण मुलांचा परिचय करूं नये, ही जी हिंदु समाजाची कदर आहे तीच आमच्या मुलां-मुलींचा इतर जातींतील समवयस्कांशीं स्नेह जडण्यास कारण होते." माझ्या मतें हा समज अगदीं चुकीचा आहे. पारशी व ख्रिश्चन या दोन जाती सोडल्यास इतर सर्व हिंदवासीयांत अशा तऱ्हेची कदर सर्व जातींतून कमीअधिक प्रमाणांत आहेच व वरील दोन्ही जतींत दिसून येणारी स्वतंत्रता वास्तविक पाहतां स्वज्ञातिपुरती मर्यादित आहे. ही स्वतंत्रता वाढून इतर ज्ञातींतील मुलां-मुलींचा एकमेकांशीं परिचय होण्यास जीं कांहीं कारणें आहेत, त्यांत शिक्षणाचा वाढता प्रसार, निरनिराळ्या संस्थांतून, क्लबांतून, समारंभांतून वरचेवर एकत्र येण्याचे योग हीं होत. त्यामुळें जसजसा शिक्षणाचा प्रसार जास्त जास्त वाढत जाईल, तसतसे असे परिचयही वाढत जाणार, यांत संशय नाहीं. असें होणें हें अपरिहार्य आहे. अशा परिचयाचें रूपांतर स्नेहांत होऊन कधीं कधीं मिश्रविवाह घडून येणें संभवनीय आहे. पण तेंही अपरिहार्यच आहे. कारण असा परिचय घडून येणारीं माणसें सुशिक्षित असतात.

" स्वज्ञातींतील किंवा आप्तेष्टांतील तरुण मुलांमुलींना वडील माणसांच्या नजरेखालीं ( हा इशारा फार महत्त्वाचा आहे. कारण, स्वतंत्रतेच्या नांवाखालीं युरोपीय देशांत रूढ झालेल्या कोर्टशिप्सारख्या अनिष्ट चाली आपल्या इकडील समाजांत रूढ झाल्यास त्याचे अनेक दुष्परिणाम तिकडील समजांप्रमाणें इकडील समाजांसही भोगावे लागल्याशिवाय राहणार नाहींत. ) एकमेकांचा परिचय व स्नेह करण्याची

संधि जास्तजास्त प्रमाणांत ( मी म्हणतों 'पूर्णपणें' ) मिळाल्यास त्याच्यायोगें मिश्रविवाहास आळा पडेल" असें वाटण्यास कांहीं आधार नाहीं.परंतु अशा तऱ्हेचें इष्ट स्वातंत्र्य दिलें गेल्यास आपल्या समाजांतील "विवाह" या महत्त्वाच्या संस्थेस बरेंचसें सत्यरूप व स्थैर्य आल्याशिवाय राहणार नाहीं. हल्लीं आपल्यामध्यें प्रचलित असलेली लग्नपद्धति पाहिल्यास साधारणपणें महालक्ष्मीवरील रेसकोर्सची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. रेसच्या दिवशीं संध्याकाळचें वर्तमानपत्र उघडतांच आपणास काय आढळतें? प्रत्येक रेसमध्यें सरासरी २४-२५ घोडे धांवलेले असतात. त्यांतील एक Win मध्यें, दोन Place मध्यें, एक Foruth या जागीं व बाकीचे सर्व Also Ran या सदराखालीं आलेले असतात. दरवर्षी शेंकडोंनीं घडून येणाऱ्या विवाहांची जर आपण चांचपणी केली, तर आपणास काय आढळून येईल? त्यांतील थोडीं Win या सदरांत येतील, त्यांहून थोडीं जास्त Place या सदरांत आलेलीं दिसतील, त्यानंतर आणखी कांहीं Foruth च्या जागेपर्यंत आलेलीं असतील व बाकीचीं ९६ टक्के Also Ran या सदरांत ढकलणें भाग पडेल. रेसमध्यें निदान धांवणाऱ्या घोड्याला व त्याच्या पाठीवर बसणाऱ्या जॉकीला एकमेकांचा परिचय तरी असतोच, त्या घोड्यावर पैसे लावणाऱ्यांनाही त्या दोघांची माहिती पुरविलेली असते.लग्नामध्यें जमणाऱ्या मंडळींतील बहुतेकांना वधूवरांची माहिती तर नसतेच, परंतु प्रत्यक्ष वधूवरांनाही एकमेकांची नसते! पूर्वीच्या काळीं आतांप्रमाणेंच जरी वधूवरांची निवड त्यांचे आईबाप किंवा वडील मंडळी करीत असत, तरी त्या काळीं प्रेमाचें अगत्य फार असल्यामुळें लग्नमुंजीसारख्या अगर इतर मंगल प्रसंगीं स्त्री-पुरुष मंडळींना मोकळेपणीं वागण्याची मुभा असल्यामुळें पुष्कळशा तरुण-तरुणींना एकमेकांची, निदान त्यांच्या वडील मंडळींना अशा तरुणतरुणींची बरीचशी माहिती मिळण्याची सोय असे. अलीकडे खऱ्या कळकळीच्या प्रेमास ओहोटी लागत चाललेली असून "पैसा म्हणजे प्रेम" अशी नवीन व्याख्या पडूं पाहत आहे. त्याचप्रमाणें निरनिराळ्या व्यवसायवेधनामुळें मुंबईसारख्या शहरीं एखादा मुझफरआबाद हॉल गांठून २-३ तासांत लग्नमुंजीची इतिश्री करणें भाग पडत असल्यामुळें एकमेकांची नुसती तोंडओळख होण्याचीही जेथें मुष्कील, तेथें एकमेकांबद्दल माहिती कोठून होणार? ही परिस्थिति सुधारून वडील मंडळीच्या देखरेखीखालीं स्वज्ञातींतील तरुणतरुणींना एकमेकांशीं बोलण्याचालण्याची मोकळीक ठेवल्यास बरेचसे विवाह सुखकर होण्यास जरी मदत होणार असली, तरी अशी मोकळीक ठेविल्यानें इतर ज्ञातींतील तरुणतरुणींशीं त्यांचा परिचय व स्नेह होण्यास अडथळा येण्यासारखें त्यांत कांहीं नसल्यामुळें मिश्रविवाहाला त्यामुळें आळा पडेल अशी आशा बाळगणें व्यर्थ आहे.

श्री. वर्दे यांच्या मतें मिश्रविवाहाला उद्युक्त करणारी दुसरी गोष्ट म्हणजे आपल्यामधील हुंड्याची चाल ही होय. ही चाल वाईट तर खरीच, व ती जितक्या लवकर नष्ट होईल तितकी चांगली याबद्दल दुमत होणार नाहीं. परंतु कित्येकांना ज्याप्रमाणें ती राक्षसी वाटते, तशी ती राक्षसी मात्र खास नाहीं. या चालीनें कित्येकांची ज्याप्रमाणें दुर्दशा उडविलेली आहे, त्याप्रमाणें कित्येकांवर तिनें उपकारही केलेले आहेत. ही चाल जर अस्तित्वांत नसती, तर कित्येक काळ्यासांवळ्या मुलींचीं तोंडें ( अर्थात् हा कांहीं त्यांचा दोष नव्हे ) हजार-दोन हजार रुपयांच्या चकचकाटानें गोरीं बनून त्यांचे जे अनुरूप वरांशीं विवाह घडून आले, तसे ते घडले असते कीं काय याबद्दल संशय आहे. ही चाल जर अस्तित्वांत नसती, तर अशा मुलींचे विवाह बहुतेक कनिष्ठ प्रतीच्या वरांशींच घडून आले असते, हें दृष्टीआड करण्यांत कांहीं अर्थ

नाहीं. त्याचप्रमाणें ज्यांना ही चाल राक्षसी आहे असें वाटतें, त्यांना तरी तसें प्रामाणिकपणें वाटतें कीं काय तें पाहूं. यासंबंधीं माझ्या माहितींतील एक गमतीदार उदाहरण देतों. एका गृहस्थाला चार मुली व दोन मुलगे होते. प्रत्येक मुलीच्या लग्नाच्या वेळीं त्यानें एक एक हजार रुपये हुंडा दिला असें धरूं; म्हणजे एकंदरींत हुंड्याच्या रूपानें त्यानें चार हजार रुपये खर्च केले. या प्रत्येक लग्नाच्या वेळीं त्यानें या राक्षसी चालीच्या व त्याचप्रमाणें विवाहयोग्य अशा तरुणांचा व त्यांच्या आईबापांच्या वेचाळीस कुळांचा उद्धार केलेला होता. पुढें त्याचे मुलगे विवाहास योग्य झाले, व त्यांना मुली सांगून येऊं लागल्या. मध्यंतरीं कोणत्या यक्षिणीची कांडी फिरली कुणास ठाऊक, परंतु या गृहस्थास हुंड्याची चाल जी राक्षसी वाटत होती; ती एकदम देवतास्वरूपांत दिसूं लागली व त्यानें प्रत्येक मुलीच्या बापाकडून दोन दोन हजार रुपये वसूल केले! कारण त्याला आपले चार हजार रुपये वसूल करावयाचे होते. जणूं काय या गृहस्थाला ज्या चार मुली झाल्या, त्या त्याच्या दोघी सुनांच्या आईबापांच्या एखाद्या घोर अपराधामुळेंच! या चालीविरुद्ध आजपर्यंत इतके लेख लिहिले गेले, इतकीं नाटकें झालीं, कादंबऱ्या झाल्या, कविता रचल्या गेल्या, तरी तिला कोणत्याही प्रकारें आळा न पडतां ती जी एकसारखी जोरावत आहे, त्याला कारण म्हणजे वरील प्रकारचा आमचा अप्रामाणिकपणा व स्वार्थी दृष्टि हें होय. एकाच आईबापांच्या पोटीं जन्म घेतलेल्या, एकाच रक्तापिंडाच्या मुलांमुलींमध्यें निष्कारण जो भेदभाव केला जातो, तो पाहून खेद झाल्याशिवाय राहत नाहीं. "मुलगी झाली," हे शब्द कानीं पडतांच बहुतेकांच्या कपाळाला आंठ्या पडतात, तिच्याबद्दल तिरस्कार दर्शविला जातो, व ती परक्याची "वस्तु" आहे, अशी तिला लहानपणापासून वरच्यावर आठवण दिली जाते. ही जी आपली स्वार्थी व दोपेकदृष्टि आहे, ती बदलल्यास हुंड्याबद्दल वाटणारी भीति पुष्कळशी कमी होईल. एखादा गरीब स्थितींतील गृहस्थ आपल्या मुलाला बी. ए. करण्याकरितां—कीं जी डिग्री मिळविली असतां २५-३० रुपयांची नोकरीही हल्लींच्या काळीं मिळत नाहीं—प्रसंगीं पोटाला चिमटा घेऊन, हालअपेष्टा भोगून, अगर कधीं कधीं कर्ज काढूनही धडपडत असतो, त्याच गृहस्थाला त्याच मार्गानें आपल्या मुलीला एक तर बी. ए. करण्याकरितां अगर ती सुस्थळीं पडावी म्हणून हुंड्याच्या रूपानें तितकेच पैसे खर्च करावयास जड कां वाटावें? ही चाल नष्ट व्हावयास पाहिजे हें खरें, पण ती तशी नष्ट व्हावयास दोनच उपाय आहेत. पहिला उपाय म्हणजे स्वज्ञातीय तरुणतरुणींना एकत्र मिळण्यास देऊन त्यांना एकमेकांची निवड स्वतःच्या मताप्रमाणें करूं देणें हा होय. वधूवरांनीं एकमेकांची निवड केलेली असली, म्हणजे त्या ठिकाणीं हुंड्याला गौणत्व प्राप्त होतें. दुसरा उपाय म्हणजे मुलांमुलींमध्यें भेदभाव न करतां दोघांनाही वडिलार्जित इस्टेटीमध्यें सारखी विभागणी देणें हा होय. या विषयावर कांहीं महिन्यांमागें All India Saraswat मध्यें श्री. जी. अण्णाजीराव, एम्. ए. यांनीं एक सुंदर निबंध लिहिला आहे, तो ज्यांना शक्य असेल त्यांनीं अवश्य वाचून पाहावा.

वरील अपरिहार्य विषयान्तर सोडून आतां आपण हुंड्याच्या चालीमुळें मिश्रविवाहास उत्तेजन मिळतें कीं काय तें पाहूं. आजपर्यंतचा समाजसुधारणेचा इतिहास पाहतां आपणांस काय आढळून येईल? समाजांत सुधारणेचा फैलाव करण्यास (अर्थात् त्याचप्रमाणें अनीतिचा प्रसार करण्यासही) जर कोणी कारणीभूत झाले असतील, तर ते श्रीमंत व अधिकारी लोक होत. असे लोक पैशाच्या व अधिकाराच्या जोरावर काय वाटेल तें करूं शकतात. याच्या उलट जे लोक अगदीं गरीब असतात, त्यांना नेहमीं दुसऱ्यांपुढें मान वांकवावी लागत असल्यामुळें ते व त्यांच्या कुटुंबांतील

इतर मंडळी आपआपल्या समाजाला व त्यांच्या नियमांना फार भिऊन वागत असते यांत कांहीं आश्चर्य नाहीं. खरी स्थिति अशी असल्यामुळें ज्या मुलीच्या आईबापांना हुंडा देण्याचें सामर्थ्य नाहीं, अशा एखाद्या गरीब घराण्यांतील मुलगी प्रसंगीं आपल्या आवडीनिवडीला बाजूस सारून व आपल्याच ज्ञातींतील एखाद्या कनिष्ट वराशीं विवाह करून घेऊन हाल-अपेष्टा भोगील; परंतु केवळ तेवढ्याच कारणाकरितां मिश्रविवाहास तयार होऊन आपणावर व आपल्या कुटुंबीयांवर नसती आपत्ति ओढवून घेण्यास ती केव्हांही धजणार नाहीं. अशा तऱ्हेचीं उदाहरणें घडल्याचेंही माझ्या ऐकिवांत नाहीं. अर्थात् हुंड्याच्या चालीच्या उच्चाटनानेंही मिश्रविवाहास आळा पडणें शक्य दिसत नाहीं.

मिश्रविवाहास आळा घालण्यास माझ्या मतें स्वज्ञातींतील मुलांमुलींना लहानपणापासून योग्य प्रकारचें धार्मिक व गृहशिक्षण देणें व स्वज्ञातीच्या इतिहासाचें व त्यांतील थोर पुरुषांच्या चरित्रांचें त्यांना परिशीलन करावयास लावून त्यांच्यांत आपल्या ज्ञातीबद्दल योग्य तऱ्हेचा सदभिमान जागृत करणें हा होय. हल्लींच्या इंग्रजी अमदानींत धार्मिक शिक्षणास मुळींच वाव नाहीं. धार्मिक शिक्षण म्हणजे कांहीं दोनदोन तास नाक धरून बसून संध्यावंदन करणें नव्हे; तर प्रत्येकाला आपआपल्या धर्मांतील उच्च तत्त्वांची ओळख करून देणें हें होय. त्याचप्रमाणें गृहशिक्षण म्हणजे येतांजातां मुलांना थोपटून त्यांना कोरडा उपदेश करणेंही नव्हे; तर आईबापांनीं व वडील मंडळींनीं स्वतःच्या शुद्ध व निर्व्यसनी राहणीनें मुलांना योग्य तऱ्हेचें वळण लावणें हें होय. प्रत्येक तरुणाचा व तरुणीचा स्वभावपरिपोष इंग्रजींत ( ज्याला Character Building असें म्हणतात ) व्हावयास या दोन्ही प्रकारच्या शिक्षणाचा फार उपयोग होतो, हे मी स्वानुभवानें सांगूं शकेन. धार्मिक शिक्षणानें स्वधर्माविषयीं व उत्तम गृहशिक्षणानें स्वतःविषयीं व आपल्या कुटुंबाविषयीं एक प्रकारचा योग्य अभिमान अंगीं बाणतो. त्याचप्रमाणें स्वज्ञातीच्या इतिहासाचें व त्यांतील थोर पुरुषांच्या व स्त्रियांच्या चरित्रांचें परिशीलन केल्यानें स्वज्ञातीबद्दल एक प्रकारचा आदरयुक्त सदभिमान जागृत होण्यास मदत होते. अलीकडे आपल्या ज्ञातीची किती शोचनीय अवस्था झालेली आहे तें पाहा. सेन्ससच्या वेळीं, ज्यूरीच्या वेळीं व इतर प्रसंगीं आपल्या ज्ञातींतील कित्येक पदवीधरांना "Are you a Brahmin or a Non-Brahmin?" असा प्रश्न केला असतां थोडा वेळ विचारांत घालवून नंतर "No, I am a Shenavi" किंवा "No, I am a Sarswat" अशीं उत्तरें त्यांनीं दिल्याचें मला माहित आहे. सारस्वत हे "Non-Brahmin" नव्हेत, याची त्यांना जाणीव असते; परंतु ज्यांच्या हातीं सध्याचीं बहुतेक वर्तमानपत्रें व मासिकें आहेत, ते पुण्या-रत्नागिरीकडील भट तेवढे ब्राह्मण, व ते तसें म्हणतात म्हणून सारस्वत हे त्यांच्याहून कमी प्रतीचे, ही भावना बऱ्याच जणांच्या हाडींमांसीं खिळलेली दिसते; पण ती किती चुकीची आहे हें मीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. सारस्वत या ज्ञातींत मत्स्याहार किंवा मांसाहार रूढ असल्यामुळेंही कित्येकांची दिशाभूल झालेली दिसते. परंतु बंगालमध्यें आपणास काय आढळतें? तिकडील सर्वांत श्रेष्ठ ब्राह्मण म्हणून गणल्या गेलेल्या सारस्वत ज्ञातींत मासे असल्याशिवाय देवास नैवेद्य दाखविण्यांत येत नाहीं व दोनतीन वेळां मला कलकत्त्याला जाण्याचा प्रसंग आला असतां मी स्वतः कडकडीत शाकाहारि असल्यामुळें तिकडील कित्येक थोर बंगाली सारस्वत गृहस्थांनीं मी सारस्वत असल्याचें कबूल करण्याचें नाकारलें. देशकालपरिस्थितिप्रमाणें आहार हे बदलावयाचेच; त्यांचा उच्चनीचत्वाशीं कांहीं संबंध नाहीं.

गिरगांवांतील जवळ जवळ दोनतृतीयांश सारस्वतांची वस्ति असलेल्या एका सुप्रसिद्ध वाडींत, गतवर्षी

( पृष्ठ २३ वर पाहा )

# राम कामती.

(रा. भि. सी. सबनीस बी., ए., एल्एल्. बी. ॲडव्होकेट, यांजकडून.)

(फॉसेटसाहेबांच्या मुंबई रॉ. ए. सोसायटीच्या जर्नल डि. १९३३मधील लेखावरून)

राम कामती हे सारस्वत गृहस्थ मुंबई बेट व ईस्ट इंडिया कंपनी यांच्या इतिहासांत सुप्रसिद्ध आहेत. १७ व्या शतकाच्या शेवटीं व अठराव्याच्या आरंभीं सुमारें अर्धशतक त्यांचें नांव मुंबईच्या हिंदु रहिवाशांत प्रामुख्यानें झळकत होतें. राम कामतीच्या उदयास्तास फॉसेटसाहेबांनीं इंग्रजी इतिहासांतील कॉर्डिनल वुल्सेच्या उदयास्ताची उपमा दिली आहे, यावरून त्याचें महत्त्व वाचकांच्या ध्यानांत येईल.

राम कामतीचें नांव मुंबई रेकॉर्डांत सन १६८०च्या जुलई महिन्यांत उल्लेखिलेलें आढळतें. त्या सालच्या जून महिन्यांत मुंबईत खोटीं नाणीं चालविण्याचा एक कट उघडकीस आला. त्याची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून नाणीं बदलून देणाऱ्या सराफांची संख्या नियमित करण्यांत आली व त्यांच्यावर देखरेख करण्यासाठीं राम कामती हा हुशार सराफ व एक अब्रूदार गृहस्थ म्हणून त्याची कंपनीच्या तिजोरी-ऑफिसांत नेमणूक करण्यांत आली. या जागेचा पगार जरी दरमहा २५ सेराफिन म्हणजे सुमारें रु. २० होता, तथापी ती जबाबदारीची जागा मानली जात असे. या हुद्यावर त्यानें १४ वर्षें काम केलें. या नेमणुकीमुळें त्याला कंपनीसरकारच्या कारभारांत पुढें यावयास जी संधि मिळाली, तिचा पूर्ण फायदा त्यानें घेतला.

राम कामती नुसता सराफीच्या कामावरच थांबला नाहीं. १६८९।९० सालांत शिद्दीनें मुंबईवर स्वारी केली, तेव्हां कंपनीच्या चाकरींत त्यानें लढाऊ शिपायांची भरती केली; त्या शिपायांस शत्रूबरोबर लढण्यास उत्तेजन दिलें व स्वतःही जातीनें लढाईत भाग घेतला. या धामधुमींत त्याच्या पायावर तोफेचा गोळा लागून जखम झाली, व त्याच्या वाड्यांची शत्रूंनीं फार नासधूस केली. त्याच्या या बहादुरीची प्रसंशा जनरल चाईल्डनें केली व मुंबईसरकारनें त्यास बढती मिळावी व त्याचें नुकसान भरून द्यावें अशी डायरेक्टरांकडे शिफारस केली. त्या वेळीं मुंबईचें उत्पन्न फार कमी झाल्यामुळें ती शिफारस अमलांत आली नाहीं.परंतु चार वर्षांनीं गव्हर्नर गेयरनें सन १६९४त राम कामतीस कंपनीच्या मुंबईच्या रेव्हेन्यूचा ओव्हरसियर जनरल नेमिलें. या हुद्यामुळें त्याचा अधिकार "पर्वाज" म्हणजे परभु कारकून, व दुसरे कमी दर्जाचे नोकर यांवर चालत असे. या जागेचा पगार ४० सेराफिन होता. त्याच्या लढाऊ कामगिरीबद्दल त्यास कंपनीसरकारच्या हिंदु सैनिकांवर 'मस्टर मास्टर जनरल' नेमण्यांत आलें. या जागेचा मासिक तनखा ३० सेराफिन होता. तसेंच त्याचा भाऊ लोला कामत यास त्याच्या बदली 'तिजोरी सराफ' नेमण्यांत आलें. याप्रमाणें कंपनीसरकारच्या तिजोरीशीं राम कामतीचा संबंध शेवटपर्यंत राहिला.

ओव्हरसियर जनरल या हुद्याचें काम फार जबाबदारीचें होतें. कंपनीच्या कारभाराची माहिती त्याच्याइतकी दुसऱ्या कोणास नसल्यामुळें व त्याच्या इमानदारीमुळें हें काम त्याजकडे सोंपविण्यांत आलें होतें. मुंबई बेटांतील जमिनीची लागवड करून कंपनीचें उत्पन्न वाढविणें, या कामाकडे त्याला विशेष लक्ष द्यावयाचें होतें. सन १६९४ त शिद्दीच्या पक्षाच्या मूर लोकांच्या सर्व जमिनी व वाड्या मक्त्यानें द्यावयाचा त्यास अधिकार देण्यांत आला होता. 'ओल्डवूमन्स' बेटावरील नारळीच्या झाडांचा मक्ता १५ वर्षेंपर्यंत त्यानें घेतला होता. 'ब्यूचर्स' बेटावरील झाडांचा मक्ता सालोसाल राम किंवा त्याचा मुलगा दुर्गा लिलांवानें घेत असे. सन १७०६ त माझगांव येथील पाकड्या तेथील शेतीचें उत्पन्न वाढविण्यासाठीं त्यानें स्वतःकडे मक्त्यानें घेतल्या. या सालांत त्याच्या वाड्या वगैरेंची किंमत १५१५७

सेराफीन ठरविण्यांत आली होती. सन १७०९ त त्यानें मुंबईतील कंपनीच्या मालकीच्या सर्व झाडांचा मक्ता ३ वर्षांकरितां घेतला. सन १७१९ त कंपनीच्या मालकीच्या निरनिराळ्या वाड्या वगैरेंच्या भाड्याबद्दल त्यास रु. ८४३८०३५ द्यावे लागले. त्यांत मलबार हिलचें भाडें रु.३६ होतें, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

कंपनी सरकारची नोकरी, शेतीचे मक्ते, यांशिवाय राम कामती तंबाकूचेही मक्ते घेत असे. मुंबईतील तंबाकूच्या मक्त्याचा सालोसाल तोच लिलांवदार कैक वर्षेंपर्यंत होता व त्याच्या वजनामुळें दुसरा कोणी मक्तेदार पुढें यावयास धजेना. म्हणून कंपनीनें तंबाकूचा मक्ता स्वतःकडे ठेवण्याचें ठरवून तो चालविण्यास दोलबा भांडारे व त्याचा माऊ विसू हे माहीम येथील मोठे धोरणी सारस्वत जमीनदार व व्यापारी यांस नेमिलें. परंतु हा प्रयोग यशस्वी न झाल्यामुळें त्याची व्यवस्था कंपनीनें मुंबईच्या 'वेरिआदोर' (village officers) कडे सोंपविली. परंतु याही व्यवस्थेमुळें उत्पन्नांत खोट येऊं लागल्यामुळें फिरून १७०७ सालांत तंबाकूचा मक्ता राम कामतीकडे आला, व त्यानें तो आपले मुलगे दुर्गा व बाळकृष्ण यांच्यासाठीं घेतला, आणि तो शेवटपर्यंत म्हणजे सन १७१९-२०पर्यंत त्याच्याकडे चालत होता.

उपरिनिर्दिष्ट धंद्याशिवाय राम कामतीनें मुंबई व माहीम येथील कस्टम्सचा मक्ता सन १७०६ त पोस्टमास्तर जॉन बंडनुरेन याबरोबर भागींत घेतला. तंबाकूच्या मक्त्याप्रमाणेंच कस्टम्सच्या मक्त्याच्या लिलावांत त्याच्याविरुद्ध चढाओढ करावयास कोणीही धजला नाहीं. परंतु मक्त्याची पद्धति मुंबईच्या व्यापारास फायदेशीर नसल्यामुळें ती बंद करण्यांत आली व राम कामतीकडे कंपनीच्या तर्फे मुंबईच्या कस्टम्सची व्यवस्था करण्याचें काम सोंपविण्यांत आलें. ही व्यवस्था राम कामतीच्या फायद्यावरच पडली. कस्टम्स ऑफिसरची जागा ही बहुमानाची जागा होती; कामाचा चार्ज घेतला त्या दिवशीं त्यानें प्रेसिडेंट व कौन्सिलर यांस कस्टम्स हाउससमध्यें मेजवानी दिली, व प्रेसिडेंटनें त्याला एक घोडा व सरपाव नजर दिला.

राम कामतीच्या बहुविध व्यवसायांत कंपनीसरकारचा टंकसाळी 'mint master' म्हणून नाणीं पाडावयाचें कामही त्याजकडे होतें. याशिवाय कंपनीचा सराफ व दलाल या नात्यानें तो कंपनीच्या हुंड्या वटावणें, खराब माल विकणें, दंडवसुली करणें, पैसे देण्याच्या कामीं मध्यस्थी करणें, वगैरे सटरफटर कामेंही करीत असे.

कंपनीसरकारच्या कामाशिवाय राम कामतीचा खासगी व्यापारही विस्तीर्ण प्रमाणावर होता. कंपनीमार्फत त्यानें शिसें, लोखंड, कथील, साखर वगैरे माल घेतल्याबद्दल कंपनीच्या रेकॉर्डांत दाखला आहे. तो अफूही परदेशीं पाठवीत असे. त्याच्या स्वतःच्या मालकीचीं कित्येक जहाजें होतीं. एका जहाजावर इंग्लिश कप्तान होता. दुसरें एक जहाज त्यानें कंपनीस रु. १७००० स विकलें तें माल ठेवण्यास फार सोईचें होतें असा दाखला आहे.

शेतीच्या प्रश्नांसंबंधीं रामकामतीचा सल्ला वारंवार घेतला जात असे. इ. स. १७१३ व १७१७ त त्यानें कंपनीच्या मुंबईतील भातशेत जमिनीची सर्व्हे करून खंड कमी करविले. कंपनीच्या स्टोअर्समधून ५० मोरे भात घेऊन दुष्काळपीडित गरीब लोकांस स्वस्त दरानें विकत देवविलें.

राम कामती मुंबई व माहीमसाठीं जे दहा वेरेदोर निवडले होते, त्यांपैकीं एकटाच हिंदु वेरेदोर होता. वेरेदोरास जातीजातींतील तंटे तोडावयाचें काम करावें लागत असे. या नंतर त्यास कोर्ट ऑफ जुडिकेचरचा न्यायाधीश नेमण्यांत आलें. या कोर्टाचे १० न्यायाधीश असत, व त्यांत चार हिंदी असत, बाकी तीन न्यायाधीश एक पोर्तुगीज, एक पारशी व एक मुसलमान असे होते. ता. २५।३।१७१८ रोजीं हें कोर्ट उघडलें तेव्हां मोठ्या समारंभानें राम कामतीनें या जागेचा स्वीकार केला.

यांप्रमाणें राम कामतीनें कंपनीचा सराफ, दलाल, मक्तेदार, रेव्हेन्यु ओव्हरसियर, मस्टरमास्टर जनरल, टंकसाळी, न्यायाधीश, राजकारणी मुत्सद्दी इत्यादि निरनिराळीं कामें एकसारखीं केलीं व स्वतःची हुशारी, अनुभव व लायकी यांच्या योगानें मुंबईच्या कारभारांत स्वतःची अत्यावश्यकता स्थापित करून बहुमानाचें स्थान पटकाविलें. कंपनीच्या नोकरीशिवाय त्याचा खासगी व्यापार फार मोठा होता हें वर आलेंच आहे. कंपनीच्या नोकरींत शिरण्यापूर्वीच तो अतिशय अब्रूदार गृहस्थ म्हणून प्रसिद्ध होता. तो प्रामाणिक व विश्वासपात्र आहे, असे रिपोर्ट त्या वेळच्या बहुतेक ऑफिसरांनीं केले आहेत. मक्त्याचे पैसे कंपनीला वेळेवर भरण्यांत त्याची कधीं कसूर झाली नाहीं. शिद्दी व आंग्रे यांच्यावरील मोहिमांत त्यानें आपले शौर्य-धैर्यादिगुण व राजकारणकौशल्य प्रगट केलें. त्यानें श्रीवाळुकेश्वराचें देवालय (इ. स. १७१५) व दुसरींही पुष्कळ देवालयें बांधिलीं. इ. स. १७१८।१९ त राम कामतीचें वैभव कळसास पोंचलें.

परंतु ज्या कंपनीच्या सरकार-चाकरींत राम कामतीनें आपलें आयुष्य वेंचिलें, तिचाच द्रोह ( Treason ) केल्याचा आरोप येणें, व ज्या गव्हर्नर बूनचा परम विश्वास व मर्जी त्यानें संपादन केली होती, त्याच्याच हातून त्याला शिक्षा होणें हें चमत्कारिक दैवदुर्विलसित होय ! राम कामती आंग्र्याशीं पत्रव्यवहार करून मिळालेली माहिती कौन्सिलला पुरवीत असे. इ. स. १७१८ च्या जून महिन्यांत "कंपनीच्या आश्रयाखालील लोकांनीं कान्होजी आंग्र्याशीं कसलाच संबंध ठेऊं नये " असा जाहिरनामा मुंबईकौन्सिलनें प्रसिद्ध केला. या जाहिरनाम्याविरुद्ध रामकामतीचा आंग्र्याशीं गुप्त पत्रव्यवहार सुरू आहे अशी बातमी बूनसाहेबास कळली, व ता. २६।२।१७२० रोजीं त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवण्यांत आला. त्याच्याकडून आंग्र्याला लिहिलेलीं व त्याचा शिक्का असलेलीं अशीं दोन पत्रें त्याच्यावरील आरोपाचा पुरावा म्हणून पुढें आलीं. एका पत्रांत आंग्र्यानें केनेरी बेटावर हल्ला करावा असें सुचविलें होतें. दुसऱ्या पत्रांत उत्तरेकडील पोर्तुगीज कप्तानानें बूनसाहेबास लिहिलेलें एक महत्त्वाचें पत्र मध्येंच पकडून आंग्र्याकडे पाठवून दिलें होतें व आंग्र्यानें मुंबईवर हल्ला करून गव्हर्नरास पकडावें, असें सुचविण्यांत आलें होतें. या आरोपांची चौकशी गव्हर्नर व कौन्सिल यांच्यापुढें होऊन ते शाबीत ठरविण्यांत आले व राम कामतीस जन्मठेप तुरुंगवासाची शिक्षा झाली, व त्याची सर्व मालमत्ता जप्त करण्यांत आली. ही शिक्षा भोगीत असतां रामकामतीचा ( इ. स. १७२५।२६ ) अंत झाला.

राम कामतीवरील आरोपांच्या सत्यतेबद्दल दुमत आहे. प्रारंभींच राम कामतीचा चिटणीस गोविंदजी यास बून साहेबानें पुरावा मिळविण्यासाठीं चाप (Thumb-screw) लावून त्याचे हाल केले, म्हणून इन्साफाच्या निःपक्षपातित्वाबद्दल संशय


**मंगेश ब्रदर्स**

**यांचे**

**हातानें बनविलेले**

**( मशिनमध्यें नव्हे )**

सर्व तऱ्हेचे व सर्व जातींना लागणारे उत्कृष्ट मसाले, सांबार, मिरची भुकी (तिखट), हळदीची भुकी, रुचकर लोणचें, चटण्या, खमंग भाजणी, उडदामेथी, मेतकूट वगैरे चोख मालापासून बनविलेले जिन्नस वापरून स्वतःची खात्री करा.

तुमच्या खात्रीकरितां अर्ध्या आण्याचा नमुना खालील ठिकाणीं येऊन घ्यावा.

ब्रँच नं. १

**आंबेवाडी पोस्टाशेजारीं, गिरगांव.**

ब्रँच नं. २

**चिराबाजार मार्केटमध्यें.**

उत्पन्न झाला; त्यामुळें कौन्सिलचा एक सभासद पार्कर चौकशीच्या वेळीं हजरही राहिला नाहीं. पुराव्यांतील पत्राच्या खरेपणाचा शहानिशा करण्यासाठीं म्हणून बूनसाहेबानें पोर्तुगीज कप्तानाशीं पत्रव्यवहार केला. त्याचें उत्तर (ता. १२।५।१७२० चें) तें पत्र बनावट व शिक्का खोटा बनविलेला असें आलें. तथापि बूनसाहेबाच्या मतांत फरक पडला नाहीं व गुन्ह्याच्या गंभीरतेच्या मानानें राम कामतीस शिक्षा फारच सौम्य झाली असेंच त्याचें मत होतें. गोविंदजीचे हाल केले, ते पुरावा मिळविण्याकरितां नसून तो तुरुंगांतून बाहेरच्या मित्रांबरोबर पत्रव्यवहार करीत होता म्हणून, असा बूनसाहेबाचा खुलासा होता.

या शिक्षेविरुद्ध राम कामतीच्या मुलांनीं पार्कर व मुंबईचा पहिला मेयर ड्रेपर यांच्यामार्फत अपील केलें. त्याचप्रमाणें बूनसाहेबाच्या कौन्सिलचा दुसरा एक मेंबर ब्रॅडिल, गव्हर्नर फिप्स, व मुंबई कोर्टाचा न्यायाधीश कोर्टने या सर्वांच्या शिफारशींचा विचार करून तेवीस वर्षांनीं इ. स. (१७४३) कंपनीसरकारनें राम कामतीस झालेली शिक्षा रद्द ठरवून त्याच्या जप्त केलेल्या इस्टेटीचा मोबदला म्हणून चार हजार रुपये त्याचा पुत्र दुर्गा यास दिले.

राम कामती पूर्वीच हें जग सोडून गेला होता. नांवास लागलेला डाग धुवून जाण्यापलीकडे त्यास कांहींच लाभ झाला नाहीं.

राम कामतीच्या बाबतींत अन्याय झाला असें बून गव्हर्नरशिवाय बाकी पुष्कळांस वाटत होतें असें दिसतें. नंतरच्या मुंबई कौन्सिलनें राम कामतीस कडक शिक्षा झाली असें लिहिलें व अन्यायाच्या परिमार्जनासाठीं म्हणा, किंवा दया दाखविण्यासाठीं म्हणा, त्यांचा मुलगा बाळकृष्ण यास कंपनीचे बाग व वाड्या यांचा ओव्हरसियर नेमिलें (इ. स. १७२३-२४) तंबाकूच्या मक्त्याची व्यवस्थाही त्याजकडे सोंपविण्यांत आली (इ. स. १७२५) तो इ. स. १७२७ त मरण पावला.

---


# कामत आणि कंपनी.

## दोन हत्तीजवळ, गिरगांव बॅकरोड

आमचे दुकानीं नित्य लागणारीं सर्व तऱ्हेचीं धान्यें, नारळ, चहा, साखर, लोणी, तूप, सर्व प्रकारचें सामान, हिंग, केशर सर्व तऱ्हेचे साबण वगैरे माल मार्केटभावानें घरीं पोंचविण्याची व्यवस्था केली आहे. मालाच्या चांगुलपणाविषयीं गिऱ्हाइकांनीं एकवार खात्री करून घ्यावी.

PHONE No. 42476.

# श्री भुलेश्वरचा तलाव

श्रीभुलेश्वरच्या तलावामुळें मलेरिया पसरतो, म्हणून मुंबई म्युनिसिपालिटीनें सारस्वत ब्राह्मणांच्या देवालयांच्या ट्रस्टींस तलाव भरून काढण्याबद्दल नोटीस दिली. त्या नोटिसीप्रमाणें १९२८ सालांत तो तलाव भरून काढावयाचें काम सुरू असतां रा. श्रीनिवास खेमराज वगैरे गृहस्थांनीं सर्व हिंदु जातींच्या तर्फे म्हणून ट्रस्टींवर मुंबई हायकोर्टांत दावा केला. वादींची मागणी अशी होती कीं, 'या तलावावर गौडसारस्वत ब्राह्मणज्ञातीचा कांहीं हक्क नसून तो सर्व हिंदु जातीचा आहे असें हायकोर्टानें ठरवून योग्य इसमांस ट्रस्टी नेमावें व ट्रस्टींना तलाव भरून काढावयाची मनाई करावी.' वादींचा दावा असा होता कीं, भाईदास सखीदास, आत्माराम बाळाजी, व मुरलीधर संभू या तीन हिंदूंनीं सन १८३२ च्या सुमारास हा तलाव सर्व हिंदूंच्या उपयोगासाठीं स्वखर्चानें बांधला, व त्याची व्यवस्था आत्माराम बाळाजी व त्याचे वंशज यांचेकडे होती. इ. स. १९१२ हा तलाव सुस्थितींत नाहीं असा, प्रश्न म्यु. कमिशनरनें उपस्थित केला व त्याची दुरुस्ती करण्यास आत्माराम बाळाजीच्या मॅनेजरास कळविलें. यासंबंधीं पत्रव्यवहार सुरू असतां गौड सा. ब्रा. ज्ञातीच्या देवालयांच्या ट्रस्टींनीं आपल्या हक्काचें घोडें पुढें सारलें, व तलाव भरून स्वतःचा नफा करावा, या उद्देशानें तलावांत बेकायदा शिरून पायऱ्या तोडल्या. या बेकायदा कृत्याबद्दल ट्रस्टींकडून नुकसानभरपाई मिळावी, अशीही मागणी करण्यांत आली होती.

ट्रस्टींची कैफीयत अशी होती कीं, भाईदास वगैरे लोकांनीं सन १८३२ त सार्वजनिक उपयोगासाठीं तलाव बांधला ही गोष्टच मुळीं खोटी. कारण डिकिन्सननें सन १८२७ त केलेल्या सर्व्हेंत हा तलाव भुलेश्वरचा तलाव असें नमूद केलें आहे. सन १८६६–६७ त प्रसिद्ध झालेल्या लाफटनच्या सर्व्हेंतही तसेंच आहे. श्रीभुलेश्वर देवालय व तलाव ज्या जमिनीवर आहे ती जमीन नारायण कृष्ण लाड नांवाच्या पूर्वीच्या एक ट्रस्टीच्या नांवें आहे. पूर्वीपासून तलावाची व्यवस्था ट्रस्टींकडेच आहे. ट्रस्टी व म्युनिसिपालिटी यांच्यामध्यें तलावासंबंधीं पत्रव्यवहार सुरू झाल्यानंतर इ. स. १९१५ त, ट्रस्टी हे भुलेश्वरच्या तलावाचे मालक आहेत, असें म्यु. कमिशनर कॅडेलसाहेब हे कबूल करावयास तयार झाले, व त्यानंतर म्युनिसिपालिटीचा ट्रस्टींशीं तलावाचे मालक या नात्यानें व्यवहार सुरू आहे. आत्माराम बाळाजी वगैरे मंडळीकडे तलावाची व्यवस्था कधींही नव्हती, व गौडसारस्वत ब्राह्मण ज्ञातीशिवाय तलावावर दुसऱ्या कोणाचा हक्कसंबंध नाहीं.

वादींनीं मनाईहुकुम मिळविण्यासाठीं जी नोटिस ऑफ मोशन घेतली होती, तिचा निकाल न्यायमूर्ति केंपसाहेबांनीं ता. १४–९–१९२८ रोजीं दिला. केंपसाहेब निकालांत म्हणतात, " हिंदु जातीचा हक्क भुलेश्वर तलावावर आहे, किंवा तो तलाव वादीच्या ताब्यांत होता, हें वादींस बिलकूल शाबीत करतां आलें नाहीं. प्रतिवादींकडेच तलावाचा ताबा होता व आहे. " म्हणून केंपसाहेबांनीं 'मोशन' खर्चासह काढून टाकिली. त्या निकालावर वादींनीं केलेलें अपील ता. २८-३-२९ रोजीं निकालांत निघालें, व अपील-कोर्टानें केंपसाहेबांचा हुकूम कायम केला.

यानंतर तलाव ट्रस्टींच्या तर्फे भरण्यांत आला, व त्या जागेसाठीं हायकोर्टानें रिसीव्हर नेमला, व रिसीव्हरमार्फत जागा भाड्यानें देण्यांत आली. ती जागा अद्याप रिसीव्हरच्या ताब्यांत आहे.

जवळ जवळ साडेपांच वर्षांनीं हा दावा गेल्या मार्च महिन्यांत न्यायमूर्ति वाडिया यांजपुढें निघून उभय पक्षांच्या संमतीनें काढून टाकण्यांत आला.

दाव्याचा अशा रीतीनें निकाल झाला खरा, परंतु वादींपैकी बहुतेकांची सांपत्तिक स्थिति गेल्या पांच वर्षांत बदलली असल्यामुळें ट्रस्टींचा झालेला खर्च मात्र मिळाला नाहीं. ही खर्चाची रकम कित्येक हजार होईल असें समजतें

# ज्ञातिवृत्त

## १ संस्थांचा परामर्ष.

**गौड सारस्वत ब्राह्मण समाजः**--शहापूर, बेळगांव, ता. १६-३-३४ रोजीं शहापूर येथील श्री-मारुती मंदिरांत गौ. सा. ब्रा. समाजाची सभा भरली होती. सन १९३३-३४ चें प्रथम वार्षिक वृत्त सदर सभेंत संमत करण्यांत आलें. नवीन कार्यकारी मंडळाची निवडणूक पुढीलप्रमाणें झाली. **अध्यक्षः-रावजी गंगाधर खोत; उपाध्यक्ष** श्री. **ल. ना. अनंतभट** उर्फ **बाबुराव तिळवे;** चिटणीस **कृ.स. बडसकर;** श्री. **ए.आर. नाईक** वकील यांची निवडणूक झाली व जॉ. सेक्रेटरीच्या जागीं श्री. व. के. कब्बे व श्री. बा. रं. सुंठणकर यांची नेमणूक करण्यांत आली. सभेच्या वेळीं श्री. बाबुराव तिळवे यांनीं संस्थेस १०१ रु. दिले व ते संस्थेचे वाली झाले. समाजाचें ट्रस्ट डीड करण्याचें निश्चित झालें असून (१) श्री. वि. आ. मुजूमदार वकील, (२) श्री.इ.वि. शिरगांवकर, वकील, (३) श्री.नारायण नागेश नाईक या तिघांची ट्रस्टी म्हणून निवडणूक झाली. त्याप्रमाणें ट्रस्ट डीड रजिस्टर करण्याकरितां श्री.मुजूमदार वकील यांच्या हवालीं रु. ३७३९ आणे ८ पै ४ करण्याचें ठरलें. शेवटीं श्री. ना. वा. गुणाजी यांनीं थोडें भाषण करून संस्थेचें काम नेटानें चालवावें अशी विनंती केली. आभारप्रदर्शनानंतर सभा बरखास्त झाली.

रिपोर्टाच्या सालीं या संस्थेस श्री. पां. इ. गिंडे, श्री. रा. श्री. केशकामत, श्री. इ. कृ. गुणाजी, श्री. रा. गो. जोशी, श्री. ना. ना. नाईक, श्री. वि. आ. मुजूमदार व श्री. रा. वि. गिंडे हे (प्रत्येकीं १०० रु' देऊन) वाली लाभले व आणखी कांहीं गृहस्थांनीं वाली होण्याचें अभिवचन दिलें असून त्याप्रमाणें भागशः रकमा ते पाठवीत आहेत. रावब. व्ही. एन्. परुळकर हे तहाहयात सभासद झाले असून कांहीं हितचिंतक देणगी देणारेही लाभले आहेत.

या संस्थेकडून तीन विद्यार्थ्यांस मदत करण्यांत आली. संस्थेच्या ऑफिससाठीं व सार्वजनिक उपयोगासाठीं जागा घेऊन इमारत बांधण्याचा चालकांचा प्रयत्न चालू आहे. या पुनरुज्जीवित संस्थेस आम्ही दीर्घायुष्य चिंतितों.

**सरस्वती वाचनालय व क्रीडाभुवन शहापूरः**—या संस्थेचा उद्घाटन व नामकरण समारंभ गेल्या एप्रिल महिन्यांत हर हायनेस श्रीमंत सौ. राणीसरकार, सांगली, यांच्या हस्तें करण्यांत आला. त्या वेळीं वाचण्यांत आलेल्या रिपोर्टावरून या संस्थेस आजचें स्वरूप आणण्यासाठीं ज्या सद्गृहस्थांचा पैसा व अंगमेहनत लाभली त्यांत बऱ्याच स्वकीय गृहस्थांचा उल्लेख झालेला दिसून येतो. प्रामुख्यानें कै. रघुनाथ राव सराफ, कै. श्रीनिवासराव कब्बे, रा. गजाननराव-वेलंगी, कै. राव. विष्णु विठ्ठल कामत, मुन्सफ, रा. महादेव विठल नाईक, सराफ, आणि विशेषतः डॉ. गोविंद वामन हेरेकर, एम्. बी., बी. एस्., यांची आर्थिक मदत व परिश्रम या कामीं उपयोगास आले आहेत.

**शिरगांवकरबंधूंची कोल्हापुरांतील कामगिरीः**— गेल्या एप्रिलांत **कोल्हापूर बँकेची** आठवी जनरल वार्षिक सभा भरण्यांत आली. त्या वेळीं वाचण्यांत आलेल्या अहवालावरून कोल्हापूर संस्थानच्या औद्योगिक प्रगतीस शिरगांवकरबंधूंनीं लावलेला हातभार तरुण पिढीस अनुकरणीय म्हणून दिग्दर्शित करणें आवश्यक दिसतें. सदर बँक १९२६ मध्यें स्थापन झाली व तिची व्यवस्था सेक्रेटरीज व एजंट्स या नात्यानें शिरगांवकर ब्रदर्स यांच्याकडे असून वर्षानुवर्षें तिची भरभराट होत आहे. पहिल्या वर्षी

नफा सुमारें ३७,००० रुपये झाला होता. १९३३ च्या अखेरीस सुमारें एक लक्ष रुपये झाला. ७५००० रुपये खर्चून बँकेच्या मालकीची इमारत लवकरच उभारण्यांत येणार आहे. एकंदरींत जनतेंत आत्मविश्वास उत्पन्न करण्यास वरील व्यवस्था कारणीभूत झाली. कांहीं स्वार्थी, व्यक्तींनीं यापूर्वी नांवारूपास येत असलेल्या स्वदेशी धंदेउद्योगाच्या संस्था आपल्या पोळीवर तूप ओढण्यासाठीं रसातळास नेल्याचीं आपल्यापुढें अनेक उदाहरणें आहेत. असल्या वर्तनामुळें स्वदेशीयांच्या कर्तबगारीवरील सामान्य जनतेचा विश्वास उडत चालल्यास नवल नाहीं. अशा वेळीं उच्च मनोवृत्तींनीं प्रेरित अशीं नेकीची, व चिकाटीचीं माणसें पुढें येऊन कर्तबगारी दाखवूं लागल्यास त्यांस गौरवाच्या शब्दांनीं उत्तेजित करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

शिरगांवकरबंधूनीं कोल्हापुरांतच धि **राजाराम महाराज ऑइल मिल व कोल्हापूर शुगर** मिल या दोन संस्था सार्वजनिक भांडवलावर उभारून चालविल्या आहेत. या अलीकडेच स्थापन झाल्यामुळें तूर्त त्यांसंबंधानें कांहीं लिहितां येणार नाहीं, परंतु बँकेइतक्याच अभिनंदनीय रीतीनें याही संस्था चालविल्या जातील व स्वज्ञातीच्या निःस्वार्थता, नेकी व कार्यदक्षता या गुणांबद्दलच्या कीर्तींत भर घालण्यास शिरगांवकरबंधू कारणीभूत होतील अशी आम्हीं उमेद बाळगतों.

**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेडः**— या बँकेचा सोळावा वार्षिक रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला. त्यावरून या बँकेची अहवालसालीं सर्वतोपरी उन्नति झालेली दिसून येते. भागांचें भांडवल सुमारें तीन हजार रुपयांनीं वाढलें आहे व ठेवींची वाढ दुपटीनें झाली आहे. वर्षअखेर सेव्हिंग्ज्, चालू व मुदतीच्या वगैरे सर्व प्रकारच्या ठेवींची रक्कम एक लक्ष एकसष्ट हजारांवर गेली आहे. त्यांपैकीं सभासदांच्या ठेवी सुमारें एक लक्ष तीस हजार आहेत. ठेवींची एकंदर देवघेव साडेसतरा लक्षांवर झाली. सहकारी बँकांचे व्यवहार लहान रकमांचे असतात, व या बँकांशीं व्यवहार करणारे लोक लहानसहान व्यापारी व मध्यम वर्गांतील नोकरीवाले असतात हें लक्षांत घेतां सदरहू बँकेचा उपयोग गिरगांवांतील व्यापाऱ्यांना व मध्यम वर्गांतील लोकांना किती होतो याचा अज-


बाई यमुनाबाई एल्. नायर हॉस्पिटलाचे खास नेमलेले ऑप्टिशियन्स

# भांडारे आणि कंपनी, चष्मे बनविणार

लंडन आणि ऑक्सफर्ड येथील डोळ्यांच्या इस्पितळांतून अनुभव घेऊन आलेल्या क्वालिफाइड सर्जनकडून शास्त्रशुद्ध पद्धतीनें डोळे काळजीपूर्वक फुकट तपासून चष्मा दिला जातो; तसेंच डोळ्यांच्या सर्व विकारांची पूर्ण चिकित्सा करून योग्य तो इलाज केला जातो.

आम्हीं सर्व तऱ्हेच्या रोल्ड गोल्ड, इमिटेशन टारटॉइज शेल व फुल–व्यु फ्रेमचा भरपूर स्टॉक ठेवतों. क्रीसस पंक्टल, अंब्रल, क्रुक्स वगैरे उत्तम, उंची व डोळ्यांना थंडावा देणाऱ्या अशाच लेन्सिस वापरण्यांत येतात.

डोळ्यांस लागणारीं सर्व औषधें आमच्याकडे मिळतात, व नुकत्याच सुरवात झालेल्या मोतीबिंदुवर आमचा इलाज केल्यास, पुढें शस्त्रक्रियेची जरूरी राहत नाहीं. इस्पितळांतून चष्म्याचे नंबर आणणाऱ्यास खास किफायत भाव.

पत्ता—**स्टोन हाउस**, २१० चर्नीरोड, प्रार्थना समाजनजीक, गिरगांव, **मुंबई**

माल वरील देवघेवीच्या एकंदर रकमेच्या आंकड्यां-वरून होईल.

सभासदांना कर्ज व चालू खात्यांवर ओवर-ड्राफ्ट व कॅश क्रेडिट या रूपानें एकंदर एक्याणव हजार रुपये देण्यांत आले आहेत. त्यांपैकीं सुमारें तेहतीस हजार सहकारी कर्जें म्हणजे सभासदांच्या पतीवर व एक अगर अधिक इसमांच्या जामिनावर दिलेलीं आहेत व बाकी सत्तावन हजार इतर बँकांप्रमाणें व्यापारी माल, सोन्याचांदीचे दागिने, सरकारी रोखे, विम्याची पॉलिसी, कारखान्यांतील यंत्रसामुग्री, स्थावर मिळकत वगैरे तारणावर दिलेलीं आहेत. बाकीचे सर्व पैसे सरकारी व इतर कर्जरोख्यांत गुंतविले आहेत; त्यांची खरेदी-किंमत एक लक्ष आहे व चालू बाजारभावानें एक लक्ष दहा हजारांवर आहे. एकंदर १६१,००० ठेवीविरुद्ध सरकारी व इतर रोखे (कीं, ज्यांचें रूपांतर रोकडींत ताबडतोब करितां येईल) एक लक्ष दहा हजार किंमतीचे आहेत. यावरून ठेवीदारांना किती सुरक्षित तारण आहे याची खात्री पटेल.

सालअखेर बँकेला रु. ३१७८ निव्वळ नफा झाला. त्यापैकीं आठशें रुपये रिझर्व फंड, सव्वाशें रुपये डिव्हिडंड इक्वलायझेशन फंड, अडीचशें रुपये कॉंटिजन्सीफंड वगैरेकडे जमा करून रिझर्व व इतर फंडाची रक्कम रु. ८,१०० करण्यांत आली आहे, व बाकी शिल्लक नफ्यांतून भागीदारांना द. सा. द. शे. ६। प्रमाणें डिव्हिडंड वांटण्यांत येऊन बँकेंत ऑनररी कामें करणाऱ्यांना पांचशे रुपये ऑनरेरियम व वक्तशीर कर्जाचा हप्ता देणाऱ्यांना रुपयांत एक आण्याची व्याजाची सूट देण्यांत येणार आहे. हें संस्थेला खरोखर भूषणावह आहे, व संस्था खऱ्या सहकारी तत्त्वावर चालल्याचें द्योतक आहे. १९२२ सालापासून सतत ६। प्रमाणें भागीदारांना डिव्हिडंड वांटण्यांत येत आहे व रिझर्व व इतर फंडांतही उत्तरोत्तर वाढ होत आहे याचें मुख्य कारण बँके-सारख्या जबाबदारीच्या व वाढत्या कामाचा भार घेण्यास चांगली लक्ष मागमें कांहींही मोबदल्याची अपेक्षा न करितां वर्षोवर्ष या संस्थेला लाभलीं हें होय. बँकेचा कारभार प्रतिवर्षी निवडलेल्या बारा सभासदांच्या व्यवस्थापक मंडळाकडे आहे. व्यवस्थापक मंडळांत सुशिक्षित अनुभवी व जबाबदार असे गृहस्थ आहेत. त्यांना इतर बँकांप्रमाणें बँकेचें काम करण्याबद्दल कोणत्याही तऱ्हेची फी वगैरे मिळत नाहीं. असें असतांही मंडळाच्या सभा बहुतेक दर आठवड्याला होतात व सभासदांच्या हजेरीचें प्रमाणही चांगलें असतें. यावरून त्यांची कर्तव्याची जाणीव व समाज-सेवेची हौस स्पष्ट होते. बँकेचे ऑनररी सेक्रेटरी रा. रेडकर हे युनियन बँकेच्या अधिकारी वर्गापैकीं एक आहेत. हिशेब प्रतिवर्षी सरकारी स्पेशल ऑडिटर-कडून तपासले जातात. त्याशिवाय साधारण सभेनें निवडलेले रा. पै व सुप्रसिद्ध मेसर्स कुळकर्णी आणि खानोलकर या कंपनीचे रा. खानोलकर यांनीं या वर्षींचे हिशोब तपासले.आहेत. कामाच्या वेळा सकाळीं ८ ते १० व संध्याकाळीं ५॥ ते ७॥ म्हणजे गिरगांव भागांतील लहान व्यापाऱ्यांना व मध्यम वर्गांतील लोकांना सोयवार अशा असून बँकेचें ऑफिस गिरगांव ट्रॅम नाक्यावर मध्यवर्तीत आहे. वार्षिक साधारण सभा शनिवारीं ३० जून रोजीं ५॥ वाजतां होऊन व त्यानंतर सभासदांचें छोटेसें संमेलनही झालें.

## २ सभा–सम्मेलनें

—मुंबई विभाग शिक्षण सप्ताहाचें ४ थें अधिवेशन ता. ३०-३-३४ पासून तीन दिवस दादरच्या किंग जॉर्ज इंग्लिश स्कूलमध्यें होऊन त्यांत अनेक वक्त्यांचीं व्याख्यानें झालीं. रा. रा. महादेव पांडुरंग सबनीस, बी. ए., एस्. टी. सी. डी. यांचें ‘ इतिहास ’ या विषयावर व्याख्यान झालें. मुंबई विश्व-विद्यालयाचे व्हाइस-चॅन्सेलर बॅरिस्टर विठ्ठलराव चंदावरकर यांनीं सदरहू सप्ताहाचा समारोप केला.

—प्रायमरी टीचर्स ॲसोसिएशन, मुंबई, या संस्थेच्या विद्यमानें ता. ८-४-३४ रोजीं डॉ. सौ.

मालिनीबाई सुखटणकर, एम्. बी. बी. एम्., जे. पी., चेअरमन, स्कूल्स कमिटी, मुंबई, यांच्या हस्तें रा. रा. कृष्णाजी बाबुराव पाडगांवकर, बी. ए., माजी सुपरिंटेंडेंट, म्युनिसिपल मराठी स्कूल्स, यांच्या तैलचित्राचा अनावरणसमारंभ झाला.

—*इंडियन लिटररी ॲसोशिएशन, या संस्थेतर्फे* रा. रा. आर. ए. कानविंदे यांचें " *श्रीमद्भगवद्गीता* व भक्तिमार्ग " या विषयावर मदन हाउस, कांदेवाडी येथें ता. १५-४-३४ रोजीं व्याख्यान झालें.

—गौड सारस्वत क्रिकेट क्लबची २३ वी वार्षिक साधारण सभा व सम्मेलन रविवार ता. २९ एप्रिल १९३४ रोजीं गांवदेवी येथे दादोबा जगन्नाथ रिलीजस ट्रस्ट बिल्डिंगमध्यें भरलें होतें.

—सारस्वत सोशल युनियन, पुणें, या संस्थेच्या ता. ८ व ता. १५ एप्रिल १९३४ रोजीं भरलेल्या साधारण सभांत डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनीं 'प्रतिभा' या पाक्षिकाच्या आक्टोबर व नोव्हेंबर १९३३ च्या दोन अंकांत " आपल्या जुन्या आठवणी " प्रसिद्ध करितांना सारस्वत ब्राह्मण ज्ञातीला व त्यांतील कांहीं पूज्य व्यक्तींना कमीपणा आणणारीं कांहीं विधानें केलीं, याबद्दल त्यांचा निषेध करण्याचा ठराव पसार करण्यांत आला.

—पुणें येथील टिळकरोडवरील महाराष्ट्रीय मंडळाच्या मोफत शारीरिक शिक्षणवर्गाचा औपचारिक उद्घाटन-समारंभ श्रीमती सौ. सरलाबाई नाईक, एम्. ए. यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडला.

## ३ अभिनंदन

—रावसाहेब शांताराम सखाराम परुळकर, बी. ए., एल्एल्. बी., वकील, सातारा, यांना येथें अलीकडे स्थापन झालेल्या सातारा जिल्हा ग्रामसुधारणा-प्रचार-कमिटीनें आपले उपाध्यक्ष निवडलें आहे.

—रा. ब. लक्ष्मण विष्णु परुळेकर, एम्. एल्. सी., यांची रत्नागिरी म्युनिसिपालिटीवर सरकारनियुक्त सभासद म्हणून पुनः नेमणूक झाली आहे.

—श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिलापीठाच्या सेनेटच्या मे महिन्यांत झालेल्या निवडणुकींत डॉ. सौ. मालिनीबाई सुखटणकर, एम्. बी. बी. एस्., जे. पी. या रजिस्टर्ड ग्रॅज्युएटस् मतदारसंघातर्फे निवडून आल्या.

—मालवण म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षांच्या जागेवर रा. रा. पै वकील, हे मताधिक्यानें पुढील तीन वर्षांसाठीं निवडून आले.

रा. रा. कृष्णाजी वासुदेव कबीर यांना मुंबई मेडिकल कौन्सिलनें रजिस्ट्रार निमिलें आहे.

—विश्वरूपदर्शनाच्या चित्रासाठीं औंध संस्थानचे अधिपति यांनीं उत्तम चित्रकारास बक्षिस देण्याचें कबूल केलें होतें. परंतु त्यांच्या अपेक्षेसारखीं उत्कृष्ट चित्रें आलीं नाहींत. आलेल्या चित्रांत स्वकीय चित्रकार श्रीयुत रघुवीर गोविंद चिमूलकर यांच्या कृतीला ३ रा नंबर मिळून १०० रु. चें पारितोषिक मिळालें.

—डॉ. दिगंबर विठ्ठल नाडकर्णी, एम्. एस्. हे विलायतेंत नुक्तीच झालेली प्रायमरी एफ्. आर. सी. एस्. परीक्षा उत्तीर्ण झाले.


**मालवणहून....**

**मुंबईस—**

**आ**लेले घरगुती **कोकम** व उत्कृष्ट **काजूगर** आम्ही वाटेल तेथें पाठवितों; तसेंच अलिबाग येथील मीठ लावलेले **चिंचेचे गोळे**; आंबोली घाटांतील **गांवठी मध**; भाजी आमटीचा '**सन्डे स्पेशल मसाला**' स्पेशल **फॅमिली चहा मिक्श्चर** वगैरे माल मिळतो. लिहा—

**रेडकर एजन्सी,**

**धान्य व किराणा मालाचे व्यापारी,**

कांदेवाडी, **मुंबई नं. ४.**

# शोचनीयमृत्यु

इंदूर संस्थानचे गृहमंत्री रा. रा. **विश्वनाथ प्रभाकर भांडारकर** हे ता. २ एप्रिल १९३४ रोजीं न्यूमोनिया व प्लूरसीच्या विकारानें कालवश झाले हें कळविण्यास दुःख वाटतें. रा. भांडारकर सुमारें एक महिनाभर आजारी असून त्यांच्यावर शस्त्रक्रिया केली होती. तेव्हांपासून त्यांची प्रकृति अधिकच बिघडली. प. वा. डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकर यांचे हे नातू होते. होळकर संस्थानांत त्यांनीं २० वर्षें नोकरी केली. गृहमंत्री यांच्या जागेवर नेमणूक होण्यापूर्वी ते दिवाण व सध्याचे महाराज यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी होते. मरणसमयीं त्यांचें वय अवघें ४६ वर्षांचें होतें.

* * *

मडगांव (गोवें) येथील सुप्रसिद्ध कार्यकर्ते रा. रा. **पुरूषोत्तम श्रीनिवास सुकेरकर** हे ता. ३० एप्रिल १९३४ रोजीं परलोकवासी झाले, हें नमूद करण्यास वाईट वाटतें. १९१० सालीं गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातींतील पोटभेदांच्या एकीकरणाची चळवळ सुरू झाली. तिचा त्यांनीं मोठ्या जोरानें पुरस्कार केला. केपें येथें निघत असलेल्या 'भारत' पत्राचे ते एक आद्य संस्थापक होते. नंतर त्यांनीं 'हिंदु' नांवांचें वृत्तपत्र काढलें व त्याप्रीत्यर्थ खिशाला पुष्कळ चट्टा लावून घेतला. सारस्वत ब्राह्मण सभा, मठग्रामस्थ सभा, हिंदुसभेचें शिक्षणमंडळ, सेवासमिति, गीताधर्ममंडळ वगैरे अनेक स्थानिक संस्थांशीं त्यांचा निकट संबंध होता. त्यांच्या निधनानिमित्त दुःख व्यक्त करण्याकरितां अखिल गोमंतकीयांची सभा १४ मे १९३४ रोजीं मडगांव येथें सारस्वत ब्राह्मणगृहांत डॉ. आत्माराम गोविंद बोरकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती.

* * *

मुंबईंतील सुप्रसिद्ध नागरिक व व्यापारी रा. रा. **बळवंत रामचंद्र माडगांवकर** यांस ता. ५ मे १९३४ रोजीं देवाज्ञा झाली हें जाहीर करण्यास दुःख होतें. ते समाजसुधारक होते. सार्वजनिक कार्यासंबंधीं त्यांना आस्था असून त्यासाठीं सढळ हातानें ते मदत करीत असत.

× × ×

रा. रा. **महादेव सावाजी तिरोडकर,** बी.ए. हे रा.ब. सावाजीराव रघुनाथ तिरोडकर यांचे जेष्ठ चिरंजीव व डॉ. आर. एस्. तिरोडकर, एम्. डी. (लंडन) यांचे बंधु यांस ता. १७ मे **१९३४** रोजीं मुंबई येथें देवाज्ञा झाली हें कळविण्यास आम्हांस वाईट वाटतें. त्यांची प्रकृति एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासून थोडी बिघडल्यामुळें औषधोपचारासाठीं त्यांना मुंबई येथें आणिलें होतें; **सेंट** इलिजाबेथ नर्सिंग होममध्यें ठेवून जरूर ते इलाज करण्यांत आल्यावर त्यांची प्रकृति सुधारून ते घरीं आले होते. परंतु अकस्मात प्रकृति बिघडून त्यांचें देहावसान झालें.

रा. माधवराव यांचें शिक्षण सेंट झेवियर कॉलेजांत होऊन तेथून ते १८९९ सालीं ते बी. ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर सरकारी शिक्षणखात्यांत नोकरी धरून तेथें ते अत्युच्च जागेपर्यंत चढले. धुळें, ठाणें रत्नागिरी येथील हायस्कूलचे हेडमास्तर म्हणून काम करून ते सुमारें २ वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाले व पुणें येथें स्थायिक झाले होते. इतक्यांत दुर्दैवानें मृत्यूनें त्यांना गांठलें. त्यांच्या मागें त्यांचीं वयोवृद्ध मातापितरें, पत्नी, व तीन मुली आहेत. त्यांची जेष्ठ कन्या मालुताई या ग्रँट मेडिकल कॉलेजांत एम्. बी. बी एस्. कोर्सच्या शेवटच्या वर्षांत विद्यार्थिनी आहेत. त्या हें दुःख आवरून आपला अभ्यासक्रम उत्तम रीतीनें पुरा करून वडिलांची इच्छा तडीस नेतील अशी आम्हांस उमेद आहे.

× × ×

**कै. माणिकराव मुळगांवकर**—येथील कागदाचा व्यापार करणाऱ्या बाळकृष्ण साजबा आणि कंपनीचे मालक श्री. माणिकराव एकनाथ मुळगांवकर यांना ५ जून रोजीं देवाज्ञा झाली हें कळविण्यास आम्हांस वाईट वाटतें. मरणसमयीं त्यांचें वय अवघें ४४ वर्षांचें होतें. त्यांचा स्वभाव प्रेमळ, उदार व धर्मनिष्ठ होता. सारस्वत ज्ञातींतील अनेक संस्थांशीं त्यांचा संबंध असून त्यांपैकीं अनेक संस्थांस त्यांनीं सढळ हातानें मदत केली होती. येथील सारस्वत दीनवत्सल संघाचे ते एक ट्रस्टी होते. त्यांच्या घरीं गेलेला कोणीही याचक विन्मुख परत जात नसे. त्यांच्या मृत्यूनें सारस्वत ज्ञातींतील एक पुढारी नाहींसा झाला. ईश्वर मृतांच्या आत्म्यास शांति देवो !

# मुंबई-विश्वविद्यालयाच्या परीक्षांचे निकाल*

## —यशस्वी विद्यार्थिनी—

### मॅट्रिक्युलेशन परीक्षा

| नंबर | संपूर्ण नांव | | शाळा | | मार्कांची बेरीज |
|---|---|---|---|---|---|
| १ | वत्सला विठ्ठल मुंडकूर | यांना विश्वविद्यालयाची यमुनाबाई दळवी शिष्यवृत्ति मिळाली आहे. | सेंट कोलंबा, | मुंबई | ४७४ |
| २ | चंपा यशवंत गुणाजी | | हुजूर पागा, | पुणें | ४५५ |
| ३ | लीला गणपत नाडकर्णी | | चिकित्सक समूह, | मुंबई | ४३२ |
| ४ | इंदुमती शंकरराव होसनगडी | | पॅट | | ४१४ |
| ५ | कुमुदिनी गणेश भांडारकर | | स्टुडंटस् लिटररी, | मुंबई | ३९२ |
| ६ | सगुण श्रीनिवास सवूर | | एन्. पी. | | ३७२ |
| | मुक्ताबाई श्रीपादराव चिकरमानें | | सार्वजनिक शाळा, | सुरत | ३७२ |
| ८ | किशोरी वसंतराव संझगिरी | | सेंट थेरेसा, | मुंबई | ३६७ |
| | कमळाबाई गणपतराव वागळे | | युनियन, | मुंबई | ३६७ |
| १० | कमळ काशीनाथ दणायत | | किंग जॉर्ज, | दादर | ३६४ |
| | विमल पंढरिनाथ परूळकर | | सेंट कोलंबो, | मुंबई | ३६४ |
| १२ | सरस्वतीबाई विश्वनाथ आरोस्कर | | हुजुरपागा, | पुणें | ३६३ |
| १३ | हिरा साखाराम नाडकर्णी | | बेळगांव | | ३६१ |
| १४ | सुलोचना जगन्नाथ नाडकर्णी | | के, | | ३६० |
| १५ | इंदुमती रघुनाथ देशपांडे | | इ. जी. संगमनेर | | ३५२ |
| १६ | वासंतिका गणेश धारेश्वर | | चिकित्सक समूह, | मुंबई | ३५० |
| १७ | कमळ सुब्राव कुळकर्णी | | सेंट कोलंबा, | मुंबई | ३४३ |
| | शांता रामराव वागळे | | ,, ,, | ,, | ३४३ |
| १९ | लीला मंगेश कुळकर्णी | | हुजुरपागा, | पुणें | ३४२ |
| २० | मालिनी दत्तात्रेय तेलंग | | राममोहन, | मुंबई | ३३९ |
| २१ | ललिता वामन संझगिरी | | चंदारामजी, | मुंबई | ३३३ |
| | कमळ विष्णु सामंत | | राममोहन, | मुंबई | ३३३ |
| | कुसुम केशव देशपांडे | | हुजुरपागा, | पुणें | ३३३ |
| २४ | सुमती विनायक मोने | | स्टुंडटस् लिटटरी, | मुंबई | ३३१ |
| | विजया मंगेश नाडकर्णी | | महाराणी, | बडोदें | ३३१ |
| २६ | रेवती मंगेश भटकळ | | राममोहन | मुंबई | ३२९ |
| २७ | शालिनी रामचंद्र चंद्रगिरी | | हायस्कूल | बेळगांव | ३२८ |
| | हिरा रामचंद्र सबनीस | | हायस्कूल, | धारवाड | ३२८ |
| २९ | शंकुतला नारायण पंडित | | सेंट कोलंबा, | मुंबई | ३२४ |

* या यादींतून एखादें नांव वगळलें गेलें असल्यास अगर तींत चुकीचें नांव दाखल झालें असल्यास, तसें संपादकांस कळविण्याची अवश्य कृपा करावी.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | सुशिला गणपतराव बुरडे | आर. डी. | | ३१७ |
| | लीला नरसिंगराव दिवगी | गिब, | कुमठा | ३१७ |
| ३२ | सुशिला गोविंदराव देशपांडे | राममोहन, | मुंबई | ३१६ |
| | चंद्रा सीताराम कर्णिक | किंगजॉर्ज, | दादर | ३१६ |
| | सरोजिनी नारायण पोतनीस | चिकित्सक, | मुंबई | ३१६ |
| ३५ | कुमुदिनी वसंतराव मसूरेकर | सेंट थेरेसा, | मुंबई | ३१५ |
| ३६ | कृष्णा महाबळेश्वर कैसरे | राममोहन, | मुंबई | ३१३ |
| ३७ | मंजुळा शेषगिरी गायतोंडे | सेंट कोलंबा, | मुंबई | ३१२ |
| ३८ | कमळ दिंगबर पै | ,, ,, | ,, | ३११ |
| ३९ | इंदु लक्ष्मणराव कायकिणी | हुजुरपागा, | पुणें | ३०९ |
| ४० | इंदुमती आनंदराव मॅंगलोर | सेंट कोलंबा, | मुंबई | ३०८ |
| ४१ | पुष्पमाला नारायण कित्तूर | बेळगांव, | | ३०७ |
| ४२ | सुमती शिवराम कल्याणपूरकर | सेंट कोलंबा, | | ३०४ |
| ४३ | इंदु मंगेश इडगुंजी | किंग जॉर्ज, | दादर | ३०३ |
| ४४ | गुलाब जयराम साखळकर | स्टुडंटस् लिटररी, | मुंबई | ३०१ |
| ४५ | सुशीला नारायण स्थळेकर | जॉर्ज | | ३०० |
| ४६ | सुमित्रा श्रीपाद वावडेकर | आर्. एस्. | | २९८ |
| ४७ | कमल रामचंद्र सामंत | चिकित्सक, | मुंबई | २९६ |
| ४८ | कुसुव जनार्दन सराफ | हुजुरपागा, | मुंबई | २९१ |
| ४९ | शांता काशीनाथ मित्र | राममोहन, | मुंबई | २८६ |
| ५० | वासंतिका वेंकटराव किणी | सेंट कोलंबा, | मुंबई | २७८ |
| ५१ | सुधा पांडुरंग वालावलकर | राजाराम, | कोल्हापूर | २७७ |
| ५२ | मनोरमा दत्तात्रय भेंडे | राममोहन, | मुंबई | २७२ |
| ५३ | अनसूया विष्णु घोलकर | हुजुरपागा, | पुणें | २७० |
| ५४ | सुलोचना रघुनंदन पडबिद्र | राममोहन, | मुंबई | पास |
| ५५ | कमल अनंत धारेश्वर | सॅन्टक्रुझ | | ,, |
| ५६ | कमल पांडुरंग उदयावर | ,, | | ,, |
| ५७ | लीला महादेव नाडकर्णी | चिकित्सक, | मुंबई | ,, |
| ५८ | सीताबाई बिजूर | एन्. जी. | | ,, |
| ५९ | इंदिराबाई वेंकटराव येन्निमडी | सार्वजनिक, | सुरत | ,, |

## इंटर सायन्स

| | |
|---|---|
| चंपू मुकुंदराव मुझुमदार | दुसरा वर्ग |
| कमल देवराव गव्हाणकर | ,, ,, |
| कल्याणी रामनाथ पै | तिसरा वर्ग |
| अहिल्या वामनराव डुकले | ,, ,, |
| गुलाब रामकृष्ण नेरूरकर | ,, ,, |

## मुंबई-विश्वविद्यालयाच्या परीक्षांचे निकाल

ता. .... न. .... नी. .... टा. ग.

### इंटर आर्टस्

| | |
|---|---|
| मोहन शांताराम नेरूरकर | दुसरा वर्ग |
| शांता शांताराम पै | तिसरा वर्ग |
| विमल शांताराम सबनीस | ,, ,, |
| सुशीला बळवंत वर्दे | ,, ,, |
| विमल दत्तात्रय लाजमी | ,, ,, |
| सुमती वामन पाठकर | ,, ,, |
| तारा वामन देसाई | ,, ,, |

### बी. ए.

| | |
|---|---|
| अनसूया वामनराव देसाई | —दुसरा वर्ग. |
| कुमुदिनी काशीनाथ मित्र | — ,, ,, |
| मालती दिगंबर पै | —तिसरा वर्ग. |
| बयो सखाराम नाईक | — ,, ,, |

### बी. टी.

**चंद्रा श्रीनिवास कर्नाटकी**, एम्. ए.

## इतर परीक्षा.

| | |
|---|---|
| शशिलेखा विश्वनाथ भांडारकर | —टीचिंग डिप्लोमा परीक्षा, लखनौ युनिव्हर्सिटी. |
| इंदिराबाई कुळकर्णी | —जुनिअर परीक्षा, ट्रेनिंग कॉलेज, पुणें-सेवासदन. |
| लक्ष्मीबाई तिनईकर | — ,, ,, ,, ,, ,, ,, |
| अनसूया गांवस्कर | —सेकंड एल्. सी. पी. एस्. |

### नाथीबाई ठाकरसी भारतवर्षीय विद्यापीठाच्या परीक्षा.

**जी. ए.:**—कृष्णा भांडारकर, गजरा रेडकर, गिरीजा वागळे, सुशीला देशपांडे,

**२ रें वर्षः**—शालिनी पै, इंदुमती सबनीस.

**१ लें वर्षः**—प्रमिला भिसे, सुलभा आडारकर, सोना कामत.

**प्रवेशपरीक्षाः**—( दुसरा वर्ग ) मुक्ता वागळे, तारा खोत, दुर्गा शिरगांवकर, रेणू गव्हाणकर, गंगू परूळेकर, गंगू बोरकर, ( तिसरा वर्ग ) गुलाब पागनीस, मिरा वाघ. ( नॉट् क्लास ) सुनीति कालेलकर, इंदुमती गुणाजी, मंगलागौरी दाणी, इंदिरा शिरगांवकर, सुशीला वाघ, सुमित्रा भांडारकर, विमला सबनीस, रमा पालेकर.

**व्हर्न्याक्युलर फायनल ( मुंबई )—कुसुम आत्माराम नाडकर्णी**, या सदर परीक्षेस बसलेल्या सर्व विद्यार्थिनींत **पहिल्या** आल्या. **प्रेमा मंगेश नाडकर्णी** या सदर परीक्षेंत **दुसऱ्या** आल्या.

# मुंबई-विश्वविद्यालयाच्या परीक्षांत विशेष सन्मान मिळविणारे विद्यार्थी

## एम. ए.

रा. गजानन शांबा प्रियोळकर—पहिला वर्ग.

## बी. ए.

रा. गणपत महेश्वर मुजुमदार—पहिला वर्ग.
,, मोहन लक्ष्मण बलसे ,, ,,
,, माधव बाळकृष्ण पालेकर ,, ,,
,, दत्तात्रय भवानीशंकर वाघ ,, ,,

## बी. एस्सी.

रा. गणपत विश्वनाथ दळवी— फर्स्ट क्लास वुइथ डिस्टिंगशन.
,, नारायण रंगाप्पा कामत ,, ,, ,, ,,
,, शशिधर हरिहर भट ,, ,, ,, ,,
,, पंढरीनाथ वामनराव केरकर— ,, ,, ,, ,,
,, अनंत रावजी कामत ,, ,, ,, ,,
,, मारुतिराय शशिधर घारसे ,, ,, ,, ,,
,, शिवराम वामन देसाई फर्स्ट क्लास
,, मंजुनाथ श्रीनिवास तेलंग ,, ,,
,, पांडुरंग दत्तात्रय नगरकट्टी ,, ,,

## इन्टर आर्टस्

,, पांडुरंग शांबा प्रियोळकर—फर्स्ट क्लास फर्स्ट. ( यांना ह्युगिंलज प्राइझ व वर्डस्वर्थ प्राइझ व स्कॉलर्शिप मिळाली. )

## इन्टर सायन्स्.

,, रा. भगवंत दत्तात्रय दाणी— फर्स्ट क्लास.


सोसायटीच्या १ ल्या त्रैवार्षिकाचा आढावा घेण्याचें काम चालू आहे त्याकडे लक्ष असं द्या !

**बॉम्बे को-आपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटी, लि.**


**( ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई )**

सोसायटीची पॉलिसी घेणारांनीं अगर एजंट होऊं इच्छिणाऱ्यांनीं
**कुळकर्णी** आणि **कंपनी**च्या नांवें पत्रव्यवहार करावा.

( पृष्ठ ८ वरून चालू )

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या दिवसांत गणपतीची पूजा स्वहस्तानें करण्याचा आपल्या ज्ञातीचा हक्क प्रस्थापित करण्याकरितां स्वज्ञातींतील एका तडफदार तरुणा-वर, स्वतःच्या व आपल्या थोडयाशा मित्रमंडळीच्या हिंमतीवर इतरांशीं दोन हात करण्याचा प्रसंग येतो, व अशा वेळीं स्वज्ञातीय गृहस्थांकडून त्याला मदत मिळत नाहीं, इतकी स्वाभिमानशून्यता व स्वज्ञाती-बद्दल गाढ अज्ञान ज्या समाजाच्या घटकांमध्यें दिसून येतें, त्या ज्ञातींतील कांहीं गृहस्थांनीं मिश्र-विवाहाविरुद्ध ओरड करणें चमत्कारिक दिसतें. आपल्या ज्ञातींतील वडील मंडळीच्या अंगींच जर स्वज्ञात्यभिमान नाहीं, तर स्वज्ञातींतील तरुण-तरुणींच्या अंगीं तो कोठून येणार ! आडयांत जर पाणी नाहीं, तर पोहऱ्यांत कोठून येणार ! ज्या ज्ञातींतील तरुण-तरुणींना स्वज्ञा-तीचा अभिमान नाहीं, आपल्या उच्च प्रतीच्या सार-स्वत रक्ताची ज्यांना जाणीव नाहीं, त्यांतील कित्येकांची मिश्रविवाहाकडे प्रवृत्ति झाल्यास त्यांत नवल वाटण्या-सारखें कांहीं नाहीं आणि म्हणूनच स्वज्ञातींतील ज्या गृहस्थांस मिश्रविवाहासारख्या अनिष्ट चाली आपल्या समाजांत रूढ होऊं नये असें खऱ्या कळकळीनें वाटत असेल, त्यांनीं आपल्या घरांतील मुलां-मुलींना स्वज्ञातीच्या इतिहासाचें योग्य ज्ञान व त्यांच्या नसांनसांतून खेळणाऱ्या उच्च सारस्वत रक्ताची योग्य जाणीव करून देऊन त्यांच्यामध्यें स्वतःबद्दल, आपल्या घराण्याबद्दल व आपल्या ज्ञाती-बद्दल उत्तम प्रकारचा सदभिमान जागृत करणें अवश्य आहे. अशा तऱ्हेनें जात्यभिमान वाढविणें सध्याच्या काळीं योग्य नव्हे असें कित्येकांस वाटत असेल; परंतु स्वसंरक्षणार्थ स्वतःचें शरीरसामर्थ्य वाढविणें म्हणजे ज्याप्रमाणें आजूबाजूनें जाणारायेणारास ठोसा लगावलाच पाहिजे असें होत नाहीं, त्याचप्रमाणें स्वज्ञातीबद्दल सदभिमान वाढविण्यानें इतर जातींचा द्वेष केलाच पाहिजे असेंही होत नाहीं.

वरीलप्रमाणेंच स्वज्ञातीमध्यें एकमेकांबद्दल जी अनास्थाबुद्धि दिसून येते, तीही नष्ट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आमच्यांत एकीचा अभाव



फारच दिसून येतो. "मी व माझें" ही वृत्ति टाकून त्याबाहेर आपणांस कांहीं सामाजिक कर्तव्यें आहेत असें प्रत्येकास वाटावयास हवें. "एकमेकां साह्य करूं, अवघे धरूं सुपंथ" या उत्कृष्ट कव्युक्ति-प्रमाणें जर आपण वागण्याचा प्रयत्न करूं, तर आपल्या ज्ञातीचें पाऊल पुढें पडल्याशिवाय खास राहणार नाहीं. परंतु अशा तऱ्हेचे प्रयत्न न करतां स्वस्थ बसून महाराष्ट्र सारस्वतांतून कोरडे लेख लिहिण्याची पोकळ आरडाओरड करण्यानें कांहीं एक फायदा होणार नाहीं.

विषय फार महत्त्वाचा असल्यामुळें प्रयत्न करू-नही हा लेख इतका लांबल्याबद्दल वाचकांची क्षमा मागून व तो मी केवळ ज्ञातिदृष्टीनेंच लिहिलेला आहे, व्यक्तिशः माझीं मतें श्री. वर्दे यांच्याप्रमाणें पुष्कळच उदारपणाचीं आहेत, एवढेंच सांगून येथेंच आटोपतें घेतों.

---



शतावरी कॉर्डियल

REGD.

THE BEST UTERINE TONIC

—डॉ. कुळकर्णीज लेबोरेटरी मुंबई नं. १२.

## वर्गणीदारांस विनंती.

ज्या वर्गणीदारांकडून चालू वर्षाची वर्गणी अद्याप आलेली नाहीं, त्यांनीं ती मनिऑर्डरीनें पाठविण्याची कृपा करावी. ता. ३१ जुलैपर्यंत ज्यांच्याकडून वर्गणी आली नसेल त्यांच्याकडे पुढील अंक ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यांत व्ही. पी.नें पाठविण्यांत येईल.

**व्यवस्थापक—महाराष्ट्र-सारस्वत**

गौड सारस्वत ब्राह्मण कुटुंबांसाठीं हवाशीर घरांची सोय

डॉ. भाऊ दाजी रोडवरील वसाहतींत झालेली आहे.

१०० चौरस फुटांच्या खोलीस विजेच्या दिव्यासह भाडें: रु. १२-८; परंतु सोसायटीच्या भागिदारांस २५ टक्के कमी पडतें. सिंगल व डबल खोल्या अगर पांच खोल्यांचा स्वतंत्र मजलाही घेतां येतो.

**खोल्यांची चौकशी वसाहतींत करावी.**




वर्ष १३ वें　　　　जुलै–आगस्ट १९३४　　　　अंक ४

हिज मास्टर्स व्हॉइस, ओडियन, कोलंबिया व ट्वीन वगैरे कंपन्यांचे

**नवीन कोरे रेकॉर्डस् व ग्रामोफोन मशीन्स**

**गिरगांवांत मिळण्याचें एकच ठिकाण.**

ॲथोराईज्ड एजंटस्—

# जी. जे. घैसास आणि कंपनी,

**रामचंद्र बिल्डिंग, गिरगांव ट्राम टर्मिनस, मुंबई**

**फोन नं. २४१४१**

Printed by R. K. Tatnis, at Shree Laxmi Narayan Press, 364 Thakurdwar, Bombay No. 2 and Published by S. L. Kapadi for the Maharashtra Saraswat Mandal, at the Saraswat Brahman Samaj, Girgaum, Bombay 4

Editor:-S. M. Varde, B. A., LL. B.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स यांचा

# बाळंतकाढा

नंबर १-२ वापरा

सर्वत्र मिळतो

द. कृ. सांडू ब्रदर्स,

आर्यौषधी कारखाना चेंबूर-ठाणें

दुकान-दवाखाना ठाकुरद्वार-मुंबई

शाखा-पोयबावडी-परेल.

**सर्वत्र मिळतो**



# धी इंडिया प्रॉव्हिडंट कंपनी लिमिटेड

**( कलकत्ता )**

स्थापना १९१०] **लाईफ फंड आठ लक्ष रुपयांवर** [ सरकारी सिक्युरिटी

कलकत्ता येथील सुप्रसिद्ध इंडियन इन्शुअरन्स जर्नल लिहितें, " हिंदुस्थानांतील विमाकंपन्यांत ज्याप्रमाणें ओरियंटल ही सर्वांत श्रेष्ठ व उच्च दर्जाची गणली जाते, त्याचप्रमाणें प्रॉव्हिडंट कंपन्यांत सदहू एकच कंपनी गणली जाते." हींत १८ ते ५० वयाच्या स्त्रीपुरुषांस वैद्यकीय तपासणीशिवाय दरमहा सहा आण्यांपासून दोन रुपयेपर्यंत हप्ता भरून १०० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंतची विम्याची पॉलिसी घेतां येते. तरी गरजूंनीं ह्याच कंपनींत आपला विमा उतरून आपला फायदा करून घ्यावा.

**गांवोगांव भरपूर एजंट्स पाहिजेत. लिहा अगर समक्ष भेटाः—**

भेटण्याची जागा व वेळः—
**घाटकोपरवाला बिल्डिंग, मगभाट, गिरगांव.** कोणत्याही दिवशीं सायंकाळीं ६ ते १० ( स्टॅं. टा.)

**आर. एम्. दिवाडकर आणि कंपनी,**
मुंबई इलाख्याचे मुख्य एजंट्स,
**माझगांव, मुंबई नं. १०.**

॥ श्री ॥

# महाराष्ट्र सारस्वत

द्वैमासिक

वर्ष १३ वें | जुलै–आगस्ट १९३४ | अंक ४ रा

## संपादकीय

**महाराष्ट्र सार**स्वताचा हा जुलै-ऑगस्टचा द्वैमासिक अंक निदान गेल्या महिन्यांत तरी प्रसिद्ध व्हावयाचा. परंतु तसा न होतां त्याला विलंब लागला, व सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत तो प्रसिद्ध होत आहे, याबद्दल आम्हांस फारच दिलगिरी वाटते. परंतु या विलंबाला जीं अनेक कारणें घडलीं, तीं सहज कळून येण्यासारखीं आहेत. जुलै–आगस्ट अंकाला असा विलंब झालेला असला, तरी येता अंक नेहमीं-प्रमाणें विजयादशमीस काढण्याचा आमचा संकल्प आहे व त्याप्रमाणें बरीच तयारीही झालेली आहे. हा अंक जुलै-आगस्टचा असला, तरीही सप्टेंबर महिन्याचे अखेरीस तो प्रसिद्ध होत असल्यामुळें मुंबईतील सारस्वत ब्राह्मणांच्या संस्थांशीं आणि महाराष्ट्र सारस्वताशीं ज्यांचा निकट संबंध आला अशा आपल्या समाजांतीला थोर व्यक्तींच्या निधनाची बातमी पुढील अंकासाठीं मागें ठेवून संपादकीय विलंब सावरून न घेतां ती याच अंकांत देण्यांत येत आहे.

× × ×

**कै. वामनराव रामचंद्र केरकर**, ॲडव्होकेट यांच्या निधनानें मुंबईतील अनेक सारस्वत संस्था एका उत्साही कार्यकर्त्याला अंतरल्या. अलीकडे त्यांच्या प्रकृतीला स्वास्थ्य नसल्यामुळें सहा महिन्यां-पूर्वी मुंबई सोडून ते केरीस रहाण्यास गेले व तेथें त्यांची प्रकृति फारच बिघडल्याबद्दल त्यांच्या येथील स्नेह्यांना पत्रें येत असत. त्यांत अलीकडे त्यांची प्रकृति थोडीशी सुधारल्याचें आशाजनक वृत्त असे. सारस्वत दीनवत्सल संघाचे ते एक महत्वाचे आधार आणि सारस्वत ब्राह्मण समाजांतील उत्साही कार्यकर्ते प्रकृति सुधारून आपल्या सहकाऱ्यांशीं पूर्ववत् कार्य करण्यास येतील अशी आशा देखील त्यांच्या कित्येक मित्रांना वाटत होती; तोंच त्यांच्यावर ता. १९ ऑगस्ट रोजीं निष्ठुर काळाची झडप पडल्याची दुर्वार्ता आली! कै. वामनरावांच्या साध्या आणि सरळ वृत्तीमुळें ते आबाल-वृद्धांना प्रिय होते. त्यांचें वाचन आणि विद्याव्यासंग दांडगा होता. अत्यंत निकट परिचयामुळें प्रसंगीं त्यांच्या व्यापक वाचनाची ओळख पटे. एरवीं त्यांच्या साध्या आणि मनमिळाऊ स्वभावामुळें आणि प्रेमळ वृत्तीमुळें त्यांच्याविषयीं अत्यंत आदर असलेल्या तरुण माणसांना त्यांच्याशीं बोलण्यास, हास्यविनोद करण्यास किंवा खेळण्यास मुळींच संकोच वाटत नसे. वादाचा प्रसंग उद्भवला असतां दोन्ही पक्षांची हंसत समजूत घालण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. संस्थांचें कार्य तें आपलेंच कर्तव्य अशा बुद्धीनें निरनिराळ्या संस्थांचें कार्य करणारे कार्यकर्ते फार दुर्मिळ असतात. ज्या घराण्याच्या मूळ पुरुषानें सारस्वत ब्राह्मण ज्ञातीला हिंदुस्थानच्या इतिहासांत अजरामर स्थान दिलें, त्या घराण्यांत जन्म, अफाट बुद्धिमत्ता, महान विद्याव्यासंग असे अनेक गुण अंगीं असतांही आपण आपल्या बांधवांहून कोणीतरी श्रेष्ठ आहों अशा प्रकारच्या अभिमानाची अंधुक छटा

देखील कधीं त्यांच्या ठायीं दिसून आली नाहीं, म्हणूनच अनेक माणसांना एकत्र आणवून त्यांजकडून अनेक समाजकार्ये करवून घेणाऱ्या समाजाग्रणीचें कर्तव्य त्यांनीं उत्कृष्ट साधलें होतें. व्याख्यान असो, प्रवचन किंवा दुसरा कोणताही कार्यक्रम असो, त्यांत करावें लागेल तें कार्य उत्साहानें व उल्हासानें करण्याची त्यांची सदोदित तयारी असे. मुंबईतील सामाजिक कार्यांत त्यांच्या मृत्यूनें पडलेली कायमची खिंड भरून येण्यास पुष्कळच कालावधि लागेल.

× × ×

ज्यांच्या योग्यतेची जाणीव आणि कर्तृत्वाची उणीव त्यांच्या निधनानंतर विशेष भासमान होऊं लागते, अशा निरभिमान वृत्तीच्या कर्मवीरांत कै. **अनंतराव आत्माराम मोरमकर** यांची गणना होते. कै. रा. सा. मोरमकर यांच्या निधनानंतर **विविधज्ञानविस्तार** हें मराठींतील सर्वांत जुनें आणि विद्वन्मान्य मासिक पुस्तक कसें निभाव काढील, अशी अनेकांना भीति वाटत होती. विश्वविद्यालयाचा संस्कार किंवा लेखनाचा व्यासंग नसलेल्या कै. अनंतरावांसारख्या व्यवहारी माणसाला या भारदस्त परंतु आंतबट्ट्याच्या मासिकाची जोपासना करतां येणार नाहीं हा अनेकांचा भ्रम त्यांनीं नाहींसा केला. कै. अनंतराव स्वतः विद्वान नव्हते, किंवा लेखकही नव्हते. परंतु विद्वान आणि लेखक यांची योग्यता ओळखून त्यांचा दृढ स्नेह संपादन करण्याचा त्यांचा गुण लोकोत्तर होता. **विविधज्ञानविस्ताराचें** चालकत्व मुंबईच्या सारस्वत विद्वानांकडे आरंभापासून असल्याचा त्यांना अभिमान होता. कै. रावसाहेब मोरमकरांच्या निधनानंतर आपण **विस्तार** चालविण्यास घेतों अशी अनेकांकडून सूचना आली असतांही **विस्ताराच्या** चालकत्वासाठीं पैशाची घस सोसण्याची जबाबदारी त्यांनीं खुषीनें अंगीकारून पार पाडली. मुंबईच्या महाराष्ट्रीय समाजांत राजकीय, सामाजिक आणि वाङ्मयविषयक कार्य अगदींच थंडावलें आहे हा योग्य वृत्तपत्राच्या अभावीं होत चाललेला समज त्यांनीं काढलेल्या **विविध वृत्तानें** कसा दूर केला हें सांगावयास नकोच. त्यांनीं श्रीलक्ष्मीनारायण छापखाना कौशल्यानें चालवून नांवारूपास आणला म्हणूनच **विविधज्ञानविस्तार, विविध-वृत्त, विविधमाला, तुतारी, विहार, अरुण** वगैरे नियतकालिकांच्या द्वारा मराठी वाङ्मयांत बहुमोल भर पडली आहे. त्यांच्या सान्निध्यांत आलेल्या माणसाला त्यांच्या प्रेमळ स्वभावानें आपलेपणा वाटल्याखेरीच राहत नसे. ज्ञातिहिताविषयीं त्यांना फार कळकळ असून स्वज्ञातींतील गुणवान माणसें व लोकोपयोगी संस्था यांना सहाय्य करण्यास ते नेहमीं तत्पर असत. **महाराष्ट्र सारस्वताला** त्यांची पहिल्यापासून सक्रिय सहानुभूति होती व या द्वैमासिकाची पुनर्घटना करण्याची उमेद त्यांच्या मदतीमुळेंच आली. त्यांच्या निधनामुळें आमचा एक आधारच गेला आहे. त्यांच्या आप्तांचे आम्ही दुःखविभागी आहों.

× × ×

**कै. दिनकरराव सखाराम वर्दे,** यांचें शोचनीय निधन सप्टेंबरच्या ९ तारखेस झालें. कै. अनंतरावांच्या मृत्यूस चार दिवस झाले नाहींत तोंच **महाराष्ट्र सारस्वताचा** आणखी एक आधार कठोर काळानें हिरावून नेला. येथील सारस्वत ब्राह्मण समाज, आणि सारस्वत विद्यार्थी सहाय्यक मंडळी या दोन्ही संस्थांची बहुमोल सेवा त्यांनीं आपल्या आयुष्याच्या ऐन उमेदींत केली होती. संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेची स्थापना करणारांत ते एक प्रमुख कार्यकर्ते होते. 'ब्राह्मण आणि हिंदुसमाज' ही त्यांची लेखमाला **महाराष्ट्र सारस्वतांत** पांच वर्षांपूर्वी आली; त्यावरून त्यांची वृत्ति राष्ट्रीय असून ज्ञातीपुरती आकुंचित नव्हती, हें दिसून येतें. त्यांची चरित्ररेखा या अंकांत आलीच आहे. उतार वयांत अनेक व्याप मागें असतांही सार्वजनिक कार्य करण्याचा त्यांचा उत्साह तरुणांनीं उदाहरण घेण्यासारखा होता. या द्वैमासिकाच्या सांप्रतच्या संपादकास ते पितृस्थानीं होते. लेखन आणि सार्वजनिक कार्य यांत त्याला ते गुरुस्थानीं होते. त्यांच्या निधनानें झालेलें दुःख व्यक्त करण्यास त्याची लेखणी असमर्थ आहे.

× × ×

सारस्वत ब्राह्मण ज्ञातींतील हीं तीन रत्नें तीन आठवड्यांच्या अवधींत हिरावून काळानें आमची अपरिमित हानि केली आहे. त्यांनीं हयातींत केलेलें कार्य सफळ झाल्यानेंच त्यांच्या आत्म्यास मिळणारी खरी शांति देण्यास परमेश्वर आमच्या बांधवांना सामर्थ्य देवो.

# सारस्वत ब्राह्मण समाज, मुंबई

## ३९ वा वर्धापनदिन

### श्री. शिवरामपंत रेगे यांचें भाषण.

[ सा. ब्रा. समाजाचा ३९ वा वर्धापनदिन ता. १६ मार्च १९३४ रोजीं श्री. स. सी. नाईक, बी.ए., एल्. सी. ई., बी. एस्. डी. ( एडिंबरो ) यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. त्या प्रसंगीं श्री. शि. ना. रेगे यांचें मुख्य भाषण झालें त्याचा सारांश खालीं दिला आहे. ]

"आजच्या प्रसंगीं व्यवस्थापक मंडळीनें मला बोलण्याचा प्रसंग आणून दिला याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. वृद्धांच्या कोटीपैकीं मी एका कोटींतील म्हणजे "वयोवृद्ध" या कोटींतील एक सभासद असल्यामुळें माझ्याकडून विशेष माहिती मिळण्याची आपली साहाजिकच अपेक्षा असणार. परंतु पहिल्यापासूनची माहिती मिळण्यासारखी नसल्यामुळें मला ज्या कांहीं गोष्टी माहित आहेत, त्या शिळोप्याच्या गोष्टींप्रमाणें आपल्यापुढें मांडण्याची परवानगी घेतों.

संस्थेचें आयुष्य मनुष्यांच्या आयुष्याप्रमाणेंच गणलें जातें असें दिसतें. परंतु माझा समज असा आहे कीं, तें केवळ चालकांच्या हालचालींवर अवलंबून असतें. आपल्या समाजाला आज ३८ वर्षें संपून ३९ वें वर्ष लागलें. एवढया मुदतींत शक्य ती कामगिरी या संस्थेकडून झाली. पुढें कमी अगर जास्त होणें हें चालकांवर अवलंबून आहे. जारीनें सामाजहिताचीं कामें हातीं घेऊन केलीं म्हणजे साहजिकच संस्थेचें आयुष्य वाढलें. शेंकडों वर्षेंही संस्था टिकतात.

आपल्या संस्थेसारख्या संस्था पाश्चात्य लोकांचें अनुकरण करून स्थापित झाल्या असें बऱ्याचशा लोकांचें मत आहे. तें कांहीं अंशीं खरें असलें, तरी अशा संस्था निरनिराळ्या रूपानें आपल्यांत पूर्वीं होत्या. फरक इतकाच कीं, अलीकडे या संस्था सुरळीत चालविण्यासाठीं व्यवस्थापक मंडळी नेमून तिच्यामार्फत सर्व व्यवस्था करवून घेण्याचा मार्ग मात्र पाश्चात्यांचा आहे व तो पाहिजे व स्तुत्य आहे.

साधारण १८८० पासूनची या शहरांतील थोडीबहुत मलाही माहिती आहे; त्यावरून आपल्या समाजाबद्दल मी इतकेंच सांगूं शकतों कीं, आमची सारस्वत मंडळी पूर्वीपासूनच एकमेकांसंबंधानें विचारपूस वेळोवेळीं करीत असत. आमची वस्ती त्या वेळीं बहुतेक, लोहार चाळ, लैन, जांभूळवाडी, ठाकूरद्वार रस्ता, मुगभाट, कांदेवाडी, व तुळक गिरगांवांत असे. लोहारचाळ, जांभूळवाडी या ठिकाणीं कोंकणांतील बरीचशी मंडळी असे. बहुतेक दर रविवारीं मंडळी एकमेकांच्या घरीं जात-येत असत; कोणाच्या घरीं कोणी आजारी वगैरे असला, तर त्याची चौकशी करणें, अंगमेहनत करणें वगैरे कामें मंडळी आस्थेनें करीत असत. त्यांत आपलेपणा वाटून मनाला समाधान वाटत असे. शिवाय एक तऱ्हेचा धीर वाटत असे. बहुतेक दर रविवारीं नेमकी मंडळी एकमेकांच्या घरीं जाऊन पत्ते वगैरे खेळत असत. त्यांत बहुतेक सर्व दिवस जात असे. खाण्यासाठीं चणे, कुरमुरे वगैरे आणून गमतीनें वेळ घालवीत असत. त्याचेंच मोठया प्रमाणावर रूपांतर सध्यांचे समाज आहेत. त्या वेळीं चहा नव्हता. त्याची सुरवात सुमारें १८८३ पासून झाली. तेव्हांही पहिल्यानें तो आठ दिवसांनीं एकदा गमतीखातर घेत असत. असो.

कांदेवाडींत त्या वेळीं बहुतेक बारघरे व त्यांचे नातलग राहत असत. पूर्वीं इकडे आलेल्यांस बारघरे ही संज्ञा होती व नंतर कोंकणांतून आलेल्या मंडळीस " नरवाण " असें म्हणत असत. कांदेवाडीकरांनीं आपणांसाठीं ( आपणांसाठीं म्हणण्याचें कारण त्यांना इतर कोंकणी मंडळीनें जास्त प्रमाणावर येऊं नये असें वाटे ) जवळच एक ' समूह ' स्थापन केला; त्यांत आम्हीं चौघेपांच असामी कोंकणांतील होतों. मी ग्रंथालयाचाच उपयोग करून घेत असें. मोकळेपणें बोलण्यास आमच्याबरोबर फारशी मंडळी नव्हती. पुढें बऱ्याच वर्षांनीं देवस्थानांबद्दल तंटे उपस्थित झाले. कोंकणांतील सारस्वतांचा देवळांवर कोणत्याच प्रकारचा हक्क नाहीं, असें

त्या वेळच्या इकडील बऱ्याच मुंबईकरांचें मत होतें. शेवटीं ही बाब हायकोर्टात जाऊन त्याचा इष्ट तोच निकाल झाला. ह्याच वेळीं कै. विनायक आबा माखरदांडे (नारिंग्रेकर) व कै. मोरोबा काका सबनीस यांच्या मनांत आपला समाज असावा असें आलें. ती गोष्ट सर्वांना पसंत पडली व सन १८९६ सालांतील वर्षप्रतिपदेच्या दिवशीं सुमुहूर्तानें कै. तात्यासाहेब पागनीस यांच्या अध्यक्षतेखालीं या संस्थेची स्थापना झाली. नांव मुक्रर केलें, परंतु पाटीवर "श्री" लिहिल्यामुळें कित्येक सभासदांस मूळच्या अक्षरांपेक्षां एक जास्त अक्षर असलेलें पसंत पडलें नाहीं व तेवढयावरूनच सुमारें २५ सभासदांनीं राजिनामा दिला. असो. संस्थेची भरभराट होत चालली. एके ठिकाणीं जमण्याचा योग आल्यामुळें निरनिराळ्या विचारांचें एकीकरण होऊं लागलें व त्याच्या योगानें ज्ञातीमध्यें बरीचशी सुधारणा होऊं लागली.

सुमारें वीस वर्षांनीं म्हणजे १९१६ मध्यें व्यवस्थापक मंडळीला वाटलें कीं, यापुढें समाजासंबंधानें इतरत्र माहिती पसरावी व त्या हेतूनें आम्ही पहिल्यानेंच पूर्वीची जी माहिती होती ती घेऊन अहवाल छापला. त्याच्यानंतर बहुतेक तो क्रम वार्षिक झाला. सन १९२० मध्यें ज्ञातींतील एका कुटुंबावर भयंकर प्रसंग गुदरल्यामुळें, उपजीविकेची कांहीं तरी व्यवस्था लागावी म्हणून कांहीं मंडळीच्या सूचनेवरून समाजानें सभा भरवून "दीनवत्सल संघ" नांवाची संस्था स्थापन केली. बऱ्याचशा गरीब व अनाथ बंधुभगिनींना थोडथोडी मदत होऊं लागली. संस्था दिवसेंदिवस वाढूं लागली व आज त्याचा मोठा वृक्ष झालेला आपण पाहतच आहांत. यापैकीं थोडेंसें काम पूर्वी समाज आपल्या अल्प शक्तीप्रमाणें करीत असे. वसुलीपैकीं $\frac{1}{2}$ या कामीं लावीत असे; परंतु त्यापासून फारशी मदत होत नसे. दीनवत्सल संघ स्थापन झाल्यानंतर समाजानें हीं कामें त्याच्याकडे सोंपविलीं.

समाजाचीं ध्येयें बऱ्याचशा प्रमाणावर जरी अमलांत येत होतीं, तरी आपल्या या मुंबई शहरांत ज्ञातीकडून जशीं मोठ्या प्रमाणावर कामें झालीं पाहिजे होतीं तशीं होईनात व अद्यापपर्यंत जोमाचा रंगही दिसत नाहीं. आपणांस माहित आहेच कीं, आम्ही बहुतेक लोक मध्यमस्थितींतील आहोंत. द्रव्याचें बळ आपल्यापाशीं हवें तसें नाहीं व तें बाहेरून मिळण्याची फारशी आशा दिसत नाहीं. तथापि अनुभवानें ज्ञातीसाठीं उपयुक्त कामें करण्याकडे प्रवृत्ति असल्यास आज ना उद्यां केव्हां तरी आपल्याकडुन कायमची व्यवस्था होईल अशी आशा आहे. समाजांत आम्हीं जमल्यावर केवळ पत्ते वगैरे खेळून व चहापान करूनच वेळ घालवावा हा उद्देश नाहीं. करमणूक ही पाहिजेच, परंतु एके ठिकाणीं जमण्याचा खरा उद्देश म्हणजे आपणांस सध्या कसली गरज आहे व ती भागविण्यासाठीं काय केलें पाहिजे याचा विचार सारखा करीत राहिलें पाहिजे. समाजाकडून बरीचशीं उपयुक्त कामें झालीं आहेत, हें मी कबूल करतों. परंतु एवढयावरच स्तब्ध बसणें मला योग्य वाटत नाहीं. पुष्कळ वेळ असें आढळून आलें आहे कीं, समाजांत कोण येतो, कोण नाहीं याचीही जाणीव सभासदांना नसते. करितां होतां होईल तों एकमेकांच्या ओळखी होण्याकडे प्रवृत्ति असावी. त्यामुळें पुष्कळसे फायदे होतात. थोडक्याशा वेतनांत समाधान मानून पत्ते वगैरे खेळण्यांत रविवार, सुटीचे दिवस घालविण्यानें विशेषसा फायदा होत नाहीं. महत्त्वाकांक्षा असल्यावांचून पाऊल पुढें पडत नाहीं. मी हें बोलतों तें स्वानुभवावरून आहे. दुर्दैवानें माझ्या १७ व्या वर्षी कुटुंबाचा सर्व भार माझ्यावर पडल्यामुळें माझें शिक्षण पुढें झालें नाहीं. मला त्याबद्दल अति वाईट वाटत असे; परंतु इलाज नव्हता. कुटुंबाचें संरक्षण करणें हेंच आपलें मुख्य कर्तव्य असें त्या वेळीं आम्हांस वाटत असे. वडिलांना जेणेंकरून सुख होईल–मग त्यांत स्वतःला स्वार्थत्याग करावा लागला तरी हरकत नाहीं, अशी त्या वेळीं आमची भावना होती. आपणांस कदाचित् आश्चर्य वाटेल, परंतु आम्हांस त्या वेळीं जें गृहशिक्षण मिळत होतें त्याचा निदान आज तरी मला फायदा होतो आहे, असें म्हणावें लागत आहे. रात्रीचीं नाटकें न पाहाणें, विडी, तंबाकू न ओढणें, विनाकारण पत्ते वगैरे खेळण्यांत वेळ न घालविणें याबद्दल त्या वेळीं वडिलांचा फार कटाक्ष होता. त्याचप्रमाणें कपडयांलत्त्यांबद्दल. स्वच्छ व जेवढे पाहिजेत तेवढेच कपडे असावयाचे.

समाजाची जाणीव फारच थोड्यांना असते; परंतु ती करून घेतली पाहिजे. आज आपल्या समाजाला ३८ वर्षें पुरीं झालीं. इतक्या अवधींत "समाजगृह" मालकीचें असूं नये, ही खरोखरच शोचनीय गोष्ट होय. जरा बाहेर नजर फेंकली असता आपणांस दिसून येईल कीं, इतर ज्ञातींत कसकशा सोई करून ठेविल्या आहेत. कोंकणस्थ ब्राह्मणांतच पाहा. त्यांची ती सभा, सूतिकागृह वगैरे त्या ज्ञातींतील गृहस्थांस किती उपयोगीं पडतात. आतांच सांगितल्याप्रमाणें आम्ही बहुतेक मधल्या स्थितींतील आहोंत. आमच्याकडे द्रव्यबळ नाहीं. परंतु असेच जर आम्ही स्वस्थ बसलों तर कधींच कामें होणार नाहींत. अलीकडे ज्या सर्व संस्था स्थापन झाल्या आहेत, त्या मधल्या स्थितींतील लोकांच्याच मेहनतीनें झाल्या आहेत. तेव्हां आपण मनांत घेतल्यास "गृह" बांधतां येणार नाहीं, असें मला वाटत नाहीं. आस्थापूर्वक कामें हातीं घेतल्यास तीं पुरीं करण्याकडे नेहमीं लक्ष लागतें. तेव्हां आतांपासून प्रत्येक सभासदानें मनावर घेतल्यास त्यांना हें काम पुरें करण्यास विलंब लागणार नाहीं, अशी माझी अल्प समजूत आहे.

सन १९२७ सालीं मीं कराचीला गेलों, त्या वेळीं आमचा तेथील समाज-"दाक्षिणात्य गौड सारस्वत ब्राह्मण समाज" जरी १५ वर्षें अस्तित्वांत होता, तरी तो बहुतेक बाल्यावस्थेंतच होता. ज्ञातींतील गृहस्थांमध्यें समाजासंबंधानें जागृति उत्पन्न झाल्याबरोबर थोडक्याच काळांत समाजाची ऊर्जितावस्था झाली. स्त्रियांना सभासद करण्यांत आलें. व्यवस्थापकमंडळींत त्यांना घेण्यांत आलें. व्याख्यानें, पुराणें वगैरे सभासदांकडूनच करविण्यांत आलीं. वार्षिक संमेलनें नियमित होऊं लागलीं. त्यांत स्त्रिया प्रामुख्यानें कामें करीत असत. कलाकुसरीच्या कामांचीं प्रदर्शनें होऊं लागलीं; चेंडूफळी वगैरे मैदानांतील खेळ सुरू केले. ग्रंथसंग्रहालयाची स्थापना केली. ज्ञातींतील थोर पुरुषांच्या पुण्यतिथि साजऱ्या करण्यांत येतात. शिवाय आनंदाची गोष्ट ही कीं, त्या लहानशा समाजांत सुद्धां स्वतःचें गृह असावें ही जाणीव आली व त्या दृष्टीनें खटपट सुरू होऊन कांहीं रकमा जमा झाल्या. लवकरच जागा वगैरे पाहून इमारतीला सुरवात होईल अशी आशा आहे. हें सर्व फल एकोप्याचें. आपण मनावर घेतल्यास काय होणार नाहीं ! कितीसा वेळ लागणार ! परंतु मीं आतांच सांगितल्याप्रमाणें हें सर्व करण्यास समाजाला जाणीव पाहिजे.

गाडीचें एक चाक नबळें असलें, तर ती गाडी नीट चालत नाहीं, हा आपला अनुभव आहेच. समाज, पुरुष व स्त्रिया यांचा आहे. स्त्रियांना सभासद करण्यापासून पुष्कळ फायदे असतात. सभासदांस बरेंचसें चांगलें वळण लागतें. मार्मिक दृष्टीनें पाहिलें असतां आपणांस दिसून येईल कीं, स्त्रियांच्या स्वाभाविक गुणांमुळें समाजांत फारच चांगले परिणाम होत असतात. पुरुषांच्या उच्छृंखलपणावर ताबा बसतो. योग्य वळण लागतें.

मी आपल्यापुढें जें वेडेंवांकडें बोललों त्यांत आपणांस उपदेश करावा अगर मी म्हणतों त्याचप्रमाणें करावें असा माझ्या म्हणण्याचा बिलकुल उद्देश नाहीं. मला वेळेवर जें कांहीं सुचलें तें आपल्यापुढें मांडलें आहे. प्रत्येकाला परमेश्वरानें सदसद्विवेकबुद्धि दिली आहे, तिचा योग्य उपयोग केल्यास स्वतःस व पर्यायानें समाजास फायदेशीर होणार आहे. "

× × ×



# कै. वामनराव केरकर

आपल्या समाजांतील एक वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध व ज्ञातिसेवातत्पर सुप्रसिद्ध पुढारी श्री. वामनराव रामचंद्र केरकर, बी. ए., एलएल्. बी., अॅडव्होकेट यांस ता. १९ आगस्ट रोजीं त्यांच्या जन्मग्रामीं केरी येथें देवाज्ञा झाली हें कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें. प्रकृति सुधारण्यासाठीं म्हणून मुंबई सोडून ६।५ महिन्यांपूर्वी ते केरी येथें आपल्या गांवीं गेले होते. मुंबईतून जातांना त्यांच्या मित्रांनीं व चाहत्यांनीं एक छोटासा समारंभ येथील सारस्वत ब्राह्मणसमाजांत करून त्यांना प्रेमाचा निरोप दिला होता, व त्या वेळीं त्यांना दीर्घायुरारोग्य चिंतून पुनः ते मुंबईला येवोत व त्यांच्या प्रेमळ सहवासाचा लाभ पुनः लाभो अशी इच्छा प्रकट केली होती. पण ईश्वरी इच्छा निराळीच होती. केरी येथें गेल्यावर आबासाहेब यांनीं औषधोपचार सुरू केले होते व त्यांना थोडा आरामही वाटूं लागला होता. पण अकस्मात् आजारानें उचल खाल्ली व त्यानंतर दोनतीन दिवसांतच त्यांचें देहावसान झालें.

आबासाहेबांच्या कर्तबगारीचा सर्व काळ मुंबईतच गेला. मुंबईतील जुन्या वकिलांपैकीं ते एक होते. वकिलीचा धंदा करीत असतांना स्वज्ञाति सेवाही त्यांनीं अखंड चालविली होती. येथील सारस्वत ब्राह्मण समाज व सारस्वत दीनवत्सल संघ यांचे ते एक आधारस्तंभ होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्वज्ञातींतील कोणी इसम त्यांच्याकडे कांहीं मदत मागण्यास गेला, तर हस्तेंपरहस्तें त्याला शक्य तें साहाय्य करण्यास ते नेहमीं तत्पर असत. त्यांच्या उपकारांच्या ऋणानें बद्ध झालेलीं स्वज्ञातींत व स्वज्ञातीबाहेरही कैक माणसें आढळतील. मुंबईतील स्वज्ञातीच्या देवालयांचे ते कैक वर्षे ट्रस्टी होते.

आबासाहेबांची विद्याभिलाषा स्पृहणीय होती. त्यांचें वाचन दांडगें होतें व अखेरपर्यंत तें चालू होतें. तत्त्वज्ञान, इतिहास व धर्म हे त्यांचे विशेष आवडीचे विषय होते. या विषयांवरील निवडक ग्रंथांचा संग्रह त्यांनीं केला होता. ते थिऑसफिस्ट असून थिऑसफीवरील वाङ्मयाचा त्यांनीं खोल दृष्टीनें विचार केला होता. मुंबईतील प्रमुख थिऑसफिस्टांत त्यांची गणना होत असे. येथील थिऑसफिकल सोसायटीनें काढलेल्या धर्मशिक्षणाच्या वर्गांत कित्येक वर्षे नियमितपणें जाऊन ते शिक्षण देत असत. थिऑसफीसंबंधाच्या पुस्तकांचा त्यांनीं बहुमोल संग्रह केला होता. हा आपला ग्रंथसंग्रह मुंबई सोडून जातांना त्यांनीं येथील रॉयल एशियाटिक सोसायटीस अर्पण केला.

आबासाहेबांचा जन्म गोमंतकांतील इतिहासप्रसिद्ध केरकर घराण्यांत झाला. या घराण्यांत होऊन गेलेल्या जिवबादादा, नारायणराव इत्यादि थोर पुरुषांप्रमाणें आबासाहेबांनींही आपल्या उदात्त चरित्रानें व चारित्र्यानें स्वकुलाची कीर्ति वाढविली. अत्यंत निगर्वी व प्रेमळ स्वभावानें त्यांनीं असंख्य मित्रपरिवार आपल्याभोंवतीं गोळा केला. हा लहान, हा थोर असा भेदभाव त्यांच्यापाशीं नसे. गरीबश्रीमंतांशीं ते सारख्याच प्रेमानें वागत आणि लहानथोरांत ते सारख्याच प्रेमानें मिसळत. त्यांच्यासारखीं कोमल अंतःकरणाचीं माणसें थोडींच आढळतील. उच्च विचार आणि अत्यंत साधी राहणी यांचें आबासाहेब हे एक अनुकरणीय उदाहरण होतें.

आबासाहेबांच्या मृत्यूनें सारस्वत ज्ञातीची फार मोठी हानि झाली आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिर शांति देवो !

# कै. अनंतराव मोरमकर

श्रीलक्ष्मीनारायण छापखान्याचे मालक, 'विविध-ज्ञानविस्तार' मासिक पुस्तकाचे संपादक, व चालक आणि 'विविध वृत्त' आणि 'विहार' या पत्रांचे संस्थापक रा. रा. अनंतराव आत्माराम मोरमकर यांस ता ५ सप्टेंबर रोजीं देवाज्ञा झाली हें कळविण्यास आम्हांस अत्यंत वाईट वाटतें.

ता. २ सप्टेंबर रोजीं रविवारीं सकाळीं नेहमींप्रमाणें ते छापखान्यांत आले होते. त्याच दिवशीं रात्रीं, त्यांना अलीकडे दोनतीन वर्षे जडलेला मधुमेहाचा विकार बळावला. डॉ. गोपाळराव देशमुखांसारख्या नामांकित व कुशल भिषग्वरांच्या शिकस्तीच्या प्रयत्नांसही दाद न देतां त्या दुष्ट रोगानें, अवघे सत्तर तासही पुरे होतात न होतात तोंच, बुधवारीं सकाळीं ११ वाजतां अनंतरावांचा बळी घेतला ! त्यांचें निधन इतकें आकस्मिक झालें, कीं हें दुःखद वृत्त ऐकून त्यांच्या आतसुहृदांना व मित्रांना धक्काच बसल्यावांचून राहिला नाहीं. अनंतरावांची प्रकृति मूळची सशक्त, पण मधुमेहाचा विकार जडल्यापासून ती थोडथोडी खंगतच चालली होती. गेल्या दोन वर्षांत या विकृतीवर त्यांनीं शक्य ते सर्व उपाय केले. मानसिक धैर्य जबर असल्यामुळें रोगाशीं झगडण्याचा त्यांनीं शेवटपर्यंत प्रयत्न केला; पण दैवाच्या मनांत त्यांच्या प्रयत्नांना यश येऊं द्यावयाचें नव्हतें, असेंच म्हटलें पाहिजे. एरवीं जात्याच निकोपी प्रकृतीचा व पूर्णपणें निर्व्यसनी असलेला गृहस्थ अशा एका सर्वसाधारण रोगाच्या आहारीं जातो, डॉ. तिरोडकर, डॉ. देशमुख यांसारख्या विख्यात डॉक्टरांचे उपचार फलदायी होऊं शकत नाहींत, आणि अगदीं अनपेक्षित वेळीं अंतसमय येतो, हें कसें शक्य आहे ! अनंतरावांचें वय निधनसमयीं ४९ वर्षांचें होतें.

अनंतरावांचा जन्म सावंतवाडी येथें झाला. त्यांचें बालपण सावंतवाडी येथें गेलें व आरंभींचा विद्याभ्यासही तेथेंच झाला. पुढें ते आपले चुलते रावसाहेब रामकृष्णपंत मोरमकर यांजकडे मुंबईस राहावयास आले. त्या वेळेपासून रावसाहेब रामकृष्णपंत अनंतरावांकडून 'विविधज्ञानविस्तारा'चें थोडेंफार काम करून घेऊं लागले. रावसाहेबांच्या निधनानंतर 'विस्तारा'च्या चालकत्वाची धुरा अनंतरावांनीं आपल्या शिरावर घेतली व त्याचें अत्यंत परिश्रमपूर्वक त्यांनीं संगोपन केलें. अनंतराव मुंबईस आल्यानंतर रावसाहेबांच्या कांहीं स्नेह्यांनीं श्रीलक्ष्मीनारायण छापखान्याची स्थापना केली होती. हा छापखाना त्या वेळीं अगदींच लहान होता. अनंतराव या छापखान्यांत काम पाहूं लागले व पुढें त्याचे मूळ मालक निवृत्त झाल्यावर अनंतरावांनीं हा छापखाना विकत घेतला व तो ते चालवूं लागले. आरंभीं अगदीं लहानशा असलेल्या श्रीलक्ष्मीनारायण छापखान्याला आज मुंबईतील एका नामांकित मुद्रणालयाचें स्वरूप येण्यास अनंतरावांचे दीर्घ व चिकाटीचे परिश्रम कारणीभूत झाले आहेत. आपल्या छापखान्याची अगदीं आधुनिक पद्धतीवर सुधारणा करून तें एक आदर्श मुद्रणालय बनवावें अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती.

'विविधज्ञानविस्तारा'चें संगोपन त्यांनीं किती झीज सोसून केलें, याची कल्पना ज्यांना महाराष्ट्रांतील या ज्येष्ठ व श्रेष्ठ मासिकपुस्तकाच्या अंतस्थ आर्थिक स्थितीची माहिती असेल, त्यांनाच होईल. या मासिक पुस्तकाचा श्रेष्ठ दर्जा व परंपरा कायम राखण्यासाठीं त्यांनीं जशी सालोसाल सोसाव्या लागणाऱ्या नुकसानीची पर्वा केली नाहीं, तशीच कोणाच्या रागरोषाचीही कधीं पर्वा केली नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, मराठी भाषेच्या या भूषणभूत संस्थेचें त्यांनीं अपत्यवत् पालन केलें.

दहा वर्षांपूर्वी, मनोरंजन करणारें व विविध प्रकारची माहिती देणारें एक उच्च दर्जाचें मराठी साप्ताहिक पत्र काढावें, अशी कल्पना अनंतरावांच्या मनांत आली व या कल्पनेस, यत्किंचितही आर्थिक पाठबळ नसतां अल्पावधींत त्यांनीं मूर्तस्वरूप दिलें. या साप्ताहिकाच्या जन्मासंबंधानें लिहितांना अलीकडेच एका लेखकानें "विविधज्ञानविस्तारांत ज्या गोष्टींची चर्चा करतां येत नाहीं, तशा प्रकारची चर्चा करण्याची हौस भागवून घेण्याकरितां विविध वृत्त काढलें," अशा आशयाचे उद्गार काढले आहेत, ते अत्यंत कुत्सित व निखालस खोटे आहेत असें येथें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. असो. विविध वृत्ताचा जन्म होतांच श्री. चिंतामणराव वैद्य, रा. ब. पाध्येप्रभृति

विद्वानांनीं या नवीन साप्ताहिकाचा प्रेमादरपूर्वक गौरव केला. या साप्ताहिकाला उत्तरोत्तर वाढता लोकाश्रय मिळत जाऊन आज तें मराठींतील प्रमुख पत्र झालें आहे आणि त्याचा प्रसार या देशांत व परदेशांत मराठी भाषा बोलणारे लोक जेथें जेथें आहेत, त्या त्या ठिकाणीं झाला आहे. या पत्राच्या संगोपनासाठीं व संवर्धनासाठीं अनंतराव मोरमकर आणि रामभाऊ तटणीस यांनीं केलेल्या परिश्रमांची, दाखविलेल्या धडाडीची व बाणेदारपणाची माहिती कळल्यावर त्यांचें कोणीही सादर कौतुक केल्याशिवाय राहणार नाहीं.

याशिवाय मातृभाषेच्या सेवेचे अनंतरावांनीं दुसरेही अनेक प्रयत्न केले. हरिभाऊ आपटे यांच्या 'करमणुकी'च्या धर्तीवर उच्च दर्जाचें मनोरंजन करणारें साप्ताहिक काढून 'करमणुकी'ची उणीव भरून काढावी या हेतूनें 'विहार' पत्र त्यांनीं काढलें. कांहीं वर्षांपूर्वी याच हेतूनें त्यांनीं 'विविधमाला' सुरू केली होती, आणि आर्थिक फायद्याकडे लक्ष न देतां त्यांनीं ती कांहीं वर्षें चालविली.

अनंतरावांचा स्वभाव अत्यंत निगर्वी आणि प्रेमळ होता. त्यांचा मित्रपरिवार मोठा होता आणि आपल्या मित्रांसाठीं झीज सोसण्यास ते मागेंपुढें पाहत नसत. श्रीलक्ष्मीनारायण छापखान्यांत ते काम पाहूं लागल्यापासून छापखाना हेंच त्यांचें घर झालें होतें,असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. या छापखान्याचें व आपल्या मासिक पुस्तकांचें व पत्रांचें संगोपन करण्यापुढें त्यांनीं आपल्या प्रकृतीकडेही पाहिलें नाहीं, कधीं विश्रांतिही घेतली नाहीं. आपल्या कारखान्यांतील सर्व माणसांना ते प्रेमानें वागवीत आणि लहानमोठा हा भेद त्यांच्याकडे केव्हांही नसे.

त्यांच्या निधनानें गाजावाजा न करतां आपल्या मातृभाषेची एकनिष्ठपणें सेवा करणारा एक उच्च दर्जाचा सेवक नाहींसा झाला आहे. त्यांच्या कुटुंबियांवर व त्यांचें अपत्यनिर्विशेष प्रेम असलेले त्यांचे भाचे रा. रामभाऊ तटणीस यांजवर त्यांच्या आकस्मिक निधनानें दारुण आघात झाला आहे. त्यांच्या मनाचें सांत्वन करण्यास एक परमेश्वरच समर्थ आहे. त्यांच्या दुःखांत अनंतरावांचा मित्रपरिवार समभागी आहे. अनंतरावांनीं स्थापन केलेल्या व चालविलेल्या संस्था पुढें चालविण्याची व अनंतरावांचे मनोरथ पूर्ण करण्याची जबाबदारी आतां रा. रामभाऊ तटणीस व अनंतरावांचे एकुलते एक चिरंजीव रा. रघुनाथराव मोरमकर यांजवर पडलेली आहे.ही जबाबदारी ते उत्तम प्रकारें पार पाडतील असा आम्हांस पूर्ण भरंवसा आहे. परमेश्वर या कार्यांत त्यांना पूर्ण साहाय्य करो.


बाई यमुनाबाई एल्. नायर हॉस्पिटलाचे खास नेमलेले ऑप्टिशियन्स

**भांडारे आणि कंपनी, चष्मे बनविणार**

लंडन आणि ऑक्स्फर्ड येथील डोळ्यांच्या इस्पितळांतून अनुभव घेऊन आलेल्या क्वालिफाइड सर्जनकडून शास्त्रशुद्ध पद्धतीनें डोळे काळजीपूर्वक फुकट तपासून चष्मा दिला जातो; तसेंच डोळ्यांच्या सर्व विकाराची पूर्ण चिकित्सा करून योग्य तो इलाज केला जातो.

आम्हीं सर्व तऱ्हेच्या रोल्ड गोल्ड, इमिटेशन टारटॉइज शेल व फुल-व्ह्यु फ्रेमचा भरपूर स्टॉक ठेवतों. क्रीसस पंकट्ल, अंब्रल, क्रुक्स वगैरे उत्तम, उंची व डोळ्यांना थंडावा देणाऱ्या अशाच लेन्सिस वापरण्यांत येतात.

डोळ्यांस लागणारीं सर्व औषधें आमच्याकडे मिळतात, व नुकत्याच सुरवात झालेल्या मोतीबिंदुवर आमचा इलाज केल्यास, पुढें शस्त्रक्रियेची जरूरी राहत नाहीं. इस्पितळांतून चष्म्याचे नंबर आणणाऱ्यास खास किफायत भाव.

पत्ता—**स्टोन हाउस,** २१० चर्नीरोड, प्रार्थना समाजनजीक, गिरगांव, **मुंबई**

२०७

# ज्ञातिवृत्त

## संस्थांचा समाचार

**(१) सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीच्या** व्यवस्थापक मंडळानें ज्ञातींतील गरीब व होतकरू मुलांमुलींच्या विद्यार्जनासाठीं १९३४–३५ सालासाठीं रु. १,१६३–०–० च्या १६६ मासिक शिष्यवृत्त्या परतफेडीच्या कराराच्या नुकत्याच मंजूर केल्या असून त्याचें वर्गीकरण ठोकळ मानानें खालीलप्रमाणें आहे. ह्यांशिवाय आणखी कांहीं अर्जांचा विचार अद्याप व्हावयाचा आहेः—

(१) विश्वविद्यालय-शिक्षण–३५ शिष्यवृत्त्या ३५२ रु.च्या, दरमहा; (२) औद्योगिक शिक्षण—२१ शिष्यवृत्त्या, २२८ रु. च्या; दरमहा; (३) दुय्यम शिक्षण—८६ शिष्यवृत्त्या ३९० रु. च्या, दरमहा; (४) प्राथमिक शिक्षण— १० शिष्यवृत्त्या ३० रु. च्या, दरमहा; (५) गतभर्तृकांचें शिक्षण—१४ शिष्यवृत्त्या १६३ रु. च्या, दरमहा.

**(२) दाभोळकर स्कॉलर्शिप्स ॲंड व्हायसरी बोर्डः**—या संस्थेनें ता. ३१ मार्च १९३५ अखेरपर्यंतच्या वर्षासाठीं रु. ५७९ च्या ७४ शिष्यवृत्त्या मंजूर केल्या असून त्यांचा तपशील येणेंप्रमाणें:—स्त्री-शिक्षण–१६ शिष्यवृत्त्या १२५ रु. च्या दरमहा; विश्वविद्यालयाचें शिक्षण—विद्यार्थ्यांसाठीं—३१ शिष्यवृत्त्या २८४ रु. च्या दरमहा; धंदेशिक्षण—८ शिष्यवृत्त्या ८० रु. च्या दरमहा; दुय्यम शिक्षण—१९ शिष्यवृत्त्या ८० रु. च्या दरमहा.

**(३) मं. वि. राजाध्यक्ष स्कॉलर्शिप्स व चॅरिटी फंड**–या फंडांतून ता. ३१ मे १९३५ रोजीं पुऱ्या होणाऱ्या वर्षासाठीं पुढीलप्रमाणें दरमहा १९२ रु. च्या ३० शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या आहेत; उच्च शिक्षण १४ शिष्यवृत्त्या ११२ रु. च्या दरमहा. धंदेशिक्षण—३ शिष्यवृत्त्या २४ रु. च्या दरमहा; दुय्यम शिक्षण—१२ शिष्यवृत्त्या ४८ रु. च्या दरमहा; परिचारिका-शिक्षण–एक शिष्यवृत्ति ८ रु. ची दरमहा.

**(४) मालवणची कन्याशाळा**–मालवण येथील सुप्रसिद्ध व लोकप्रिय पुढारी रा. आबासाहेब देसाई यांच्या अविश्रांत श्रमांचें दृश्य फल म्हणजे मालवणची कन्याशाळा आहे. ही शाळा हिंगणे–युनिव्हर्सिटीला जोडलेली असून येथें मॅट्रिकपर्यंत शिक्षणाची सोय विनामूल्य ठेवली आहे. शिवाय मराठी व्हर्नाक्युलर फायनलचीही या ठिकाणीं सोय असून बऱ्याच मुली शिक्षण घेत आहेत. यंदाचे या दोन्हीं परीक्षांचे रिझल्ट फारच चांगले झाले

सबंध कोंकण भागांत मुलींचें स्वतंत्र असें हायस्कूल एवढें एकच आहे. या शाळेच्या हेडमिस्ट्रेस कु. गंगूबाई देसाई, बी. ए. ह्या उत्साही व प्रेमळ असल्यानें अल्पावधींत शाळेची बरीच भरभराट झालेली आहे. याच शाळेच्या वतीनें मालवण-महिला-समाज सहा महिन्यांपूर्वी स्थापन केला असून या समाजांत गांवांतल्या सुशिक्षित महिलांनीं भाग घेतला आहे, ही फार आनंदाची गोष्ट आहे. या समाजाचें एक कार्यकारी मंडळ असून मेंबर होण्याकरितां मूल्य कांहींच ठेवलेलें नाहीं. समाजांत शिवणकाम, हरतऱ्हेचें विणकाम, व इंग्रजी शिकविण्यांत येतें. नुकत्याच १ महिन्यापूर्वी येथें उघडलेल्या प्रदर्शनांत समाजानें हस्तकौशल्याच्या विणकामाचा वगैरे एक भाग ठेवला होता. समाजाचें पहिलें पारितोषिक ताराबाई मोरे यांना त्यांच्या रेशमाच्या कामाबद्दल दिलें. समाजाचें ध्येय स्त्रियांत जागृति व स्त्रीसंघटन करणें हें असून शक्य तितकी हरतऱ्हेची मदत मागसलेल्या भगिनीवर्गाला प्रत्येक सभासदानें करावी, अशी अपेक्षा आहे.

दर महिन्यांतून दोन वेळां समाजांत सुविचारी व्यक्तींचीं भाषणें निरनिराळ्या उपयुक्त विषयांवर होतात. शिवाय सार्वत्रिक हळदकुंकूं वगैरे समारंभही समाजांत केले जातात. स्त्रियांकरितां एक महिला-लायब्ररी विनामूल्य ठेवली असून लहान प्रमाणांत वाचनालयाचीही सोय केली आहे.

**(५) सारस्वत को ऑपरेटिव्ह बँकः**—या बँकेची वार्षिक साधारण सभा शनिवार ता. ३० जून रोजीं ५॥ वाजतां श्रीयुत बळवंतराव वाघ यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. अहवाल व व्यवस्थापक मंडळानें सुचविलेली नफावांटणी सर्वानुमतें मंजूर झाली. व्यवस्थापक मंडळाच्या आभारप्रदर्शक ठरावाला उत्तर देतांना श्री. वामनराव वर्दे यांनीं सांगितलें कीं, व्य. मं. कडून जी थोडीफार कामगिरी झाली, तिचें सर्व श्रेय सभासद-मंडळालाच आहे. सभासदांची व ज्ञातीची अशीच सहानुभूति व सहकारिता मिळेल, तर व्य. मं.ला अधिक जबाबदारीचीं कामें अंगिकारण्यास उत्साह वाटेल. बँक आपली आहे, ही भावना ठेवून आपण निवडून दिलेल्या व्य. मंडळावर दृढ विश्वास ठेविल्यास संस्थेची प्रगति दिवसें दिवस अधिक झपाट्यानें होऊन आपली बँक सहकारी क्षेत्रांत एक नमुनेदार बँक होईल याविषयीं मला शंका वाटत नाहीं. अशा आशयाचें भाषण होऊन अध्यक्षांचे आभार मानल्यावर सभा बरखास्त झाली. त्यानंतर नेमलेल्या मंडळीचें संमेलन झालें व अल्पोपहार झाला. सुमारें ७५ सभासद हजर होते. पुढील वर्षासाठीं खालील व्यवस्थापक मंडळ निवडण्यांत आलें. अध्यक्ष श्री. वामन पुंडलिक, वर्दे, बी. कॉम्; उपाध्यक्ष श्री. श्रीपाद महादेव वर्दे, बी. ए., एल्एल्. बी., ऑनररी सेक्रेटरी श्री. वासुदेव घनश्याम रेडकर; ऑनररी ट्रेझरर श्री. जयवंत पांडुरंग वेलिंगकर; सभासद श्री. विनायक मंगेश रांगणेकर, श्री. बळवंत विठ्ठल वाघ, बी. ई.; श्री. शांताराम विनायक केंकरे, श्री. मंजुनाथ मंगेश कोप्पीकर, एम्. ए. बी. एस्. सी; श्री. रंगनाथ शिवराम गोसावी, बी. ए., एल्एल्. बी., श्री. नीलकंठ त्रिंबक देसाई, श्री. सदाशिव विठ्ठल राजाध्यक्ष, जी. डी. ए., श्री. विठ्ठल केशव देसाई.

**( ६ ) गौड-सारस्वत ब्राह्मण कोऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लि. मुंबईः—**

ह्या सोसायटीची चवदावी वार्षिक साधारण सभा ता. २२ जुलै १९३४ रोजीं संध्याकाळीं ४ वाजतां लक्ष्मीबाग, भटवाडी, येथें श्री. धों. रा. मणेरीकर, बी. ए., एलएल. बी. ॲडव्होकेट, हायकोर्ट मुंबई, यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. त्या वेळीं सोसायटीच्या व्य. मं. चे अध्यक्ष श्री. शि. ना. रेगे यांनीं गेल्या वर्षाच्या कामकाजाची हकीकत सांगितली. नेक नामदार गव्हर्नरसाहेब व रजिस्ट्रार पंजाबीसाहेब यांची आपण भेट घेऊन, सोसायटीस द्यावें लागणारें व्याज व भरावयाचे हप्ते यांबद्दल कांहीं सवलती मागितल्या होत्या. त्याचा सहानुभूतिपूर्वक विचार होऊन लवकरच त्या मिळाल्यास व्य. मंडळ येत्या वर्षी डिव्हिडंड देण्यास समर्थ होईल अशी आशा व्यक्त केली, आणि १४ वा वार्षिक अहवाल हिशोबाच्या तक्त्यासह मंजूर व्हावा असा ठराव मांडला व तो सर्वानुमतें पास झाला.

येत्या वर्षासाठीं श्री. शि. ना. रेगे,—अध्यक्ष, श्री. नि. वि. नाबर, चिटणीस, श्री. श्री. द. तेंडोलकर मदत-चिटणीस, श्री. लक्ष्मीकांत शां. दाभोळकर, श्री. ब. वि. वाघ, श्री. बा. ना. रेगे, श्री. बा. सा. आकेरकर श्री. बा. ज. कुळकर्णी, श्री. डी. के. रेडकर, श्री. अ. श्री. गोळे, श्री. व्ही. एन. नाडकर्णी, भाटणें श्री. स. भि. खानोलकर असें व्यवस्थापक मंडळ निवडण्यांत आलें. श्री. ज. पु. नेरुरकर व मा. स. नाडकर्णी यांची हिशोबतपासनीस म्हणून नेमणूक करण्यांत आली.

यानंतर अध्यक्ष श्री. मणेरीकर यांचें नवविचार परिप्लुत असें पुढील आशयाचें भाषण झालें. ते म्हणाले:

गेल्या महायुद्धाच्या धमधुमीच्या काळानंतर मुंबईत घरभाडें कमालीचें वाढल्यामुळें स्वज्ञातींतील मध्यम व गरीब लोकांची राहण्याच्या बाबतींत होणारी गैरसोय दूर व्हावी ह्या हेतूनें आपली ही सोसायटी स्थापन झाली. कै. बाबासाहेब दाभोळकर यांनीं आपल्या पत्नीच्या नांवें मोठी देणगी देऊन व बरेच शेअर्स खरेदी करून ह्या सोसायटीस फारच मदत केली. परंतु सोसायटीच्या इमारतींचें बांधकाम महायुद्धाच्या काळीं झाल्यामुळें त्यांची बांधणी थोडीफार महागाईची झाली व भाड्याचे दर त्या मानानें ठेवावे लागले. तथापि अहवालाच्या सालीं व्य. मं. नें दूरदृष्टि ठेवून दरांत छाटाछाट केली हें समंजसपणाचें होय.

सन १९३१ सालीं इं. ट्रस्टकडे सोसायटीला चार प्लॉटस पैशाच्या अभावामुळें परत करावे लागले व त्यामुळें पूर्वी भरलेल्या भुईभाड्याच्या रकमेचा निष्कारण खाट बसला. सध्या सोसायटीच्या मालकीच्या इमारतींच्या मध्यभागीं पाया भरून झाला आहे, अशी जागा

पडून आहे. ह्या जागीं उभारल्या जाणाऱ्या इमारतीला क. नामदार नारायणराव दाभोलकर यांची पुण्यस्मृति वृद्धिंगत व्हावी ह्या हेतूनें त्यांचें नांव देण्याचें ठरविलें होतें. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, ह्या सोसायटीच्या कार्याप्रीत्यर्थ आपलें तनमनधन वेंचणाऱ्या परोपकारी पुरुषाच्या—कै. श्री. बाबासाहेब दाभोलकर यांच्या प्रसिद्ध वडिलांच्या नांवें बांधल्या जाणाऱ्या इमारतीसाठीं पशाचा तुटवडा पडावा ! श्री. बाबाहेबाचें सन १९३० सालीं अकालीं निधन झालें नसतें, तर एव्हां ही सुंदर इमारत सर्व सोयींनीं युक्त अशी आम्हांस पाहावयास खात्रीनें मिळाली असती. दोन वर्षांपूर्वी व्य. मं. नें ह्या इमारतीसाठीं स्वज्ञातीय श्रीमंत गृहस्थांकडे माफक व्याजानें रक्कम देण्याकरितां जाहीर विनंती केली होती, परंतु त्याकडे त्यांचें जावें तसें लक्ष गेलें नाहीं, ही निराशेची गोष्ट होय. ही इमारत लवकर न बांधल्यास ती जागा कराराप्रमाणें इं. ट्रस्टकडे परत गेल्याशिवाय राहणार नाहीं. सध्या सर्व वस्तु स्वस्त झाल्या आहेत. अशा संधीचा फायदा घेऊन हें काम पुरें होईल अशी मला आशा आहे. व्य. मं.नें मेहनती कर्तबगार, गृहस्थांची एक कमिटी ह्या इमारतीच्या बांधणीचें काम कसें पार पाडतां येईल हें पाहण्यासाठीं नेमावी अशी माझी सुचना आहे.

दुसरी एक गोष्ट मला नमूद करावीशी वाटते ती ही कीं, कै.श्री.बाबासाहेब दाभोळकर यांनीं आपल्या सोसायटीच्या जन्मापासून तिच्यासाठीं जिवापाड मेहनत घेतली व निरपेक्ष मदत केली, ह्या गोष्टीकडे लक्ष देऊन त्यांच्या घराण्यांतील एक तरी माणूस प्रतिवर्षी ह्या सोसायटीच्या व्य. मंडळांत निवडला जावा ह्या माझ्या सूचनेचा जरूर तो विचार होऊन त्यास मूर्तस्वरूप येईल असा मला भरंवसा आहे.

जुन्या व्य. मं. नें सोसायटीचें काम काटकसरीनें पार पाडण्याचें ठेवलेलें धोरण प्रशंसनीय आहे व नवीन व्य. मं.नें तें तसेंच पुढें चालवावें.

अशा आशयाचें अध्यक्षांचें भाषण झालें. नंतर त्यांचे आभार मानल्यावर सभेचें काम पुरें झालें.

या संस्थेचा १४ वा वार्षिक रिपोर्ट नुक्ताच प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून या संस्थेचे ४७१ सभासद असून त्यांमध्यें २,६२९ भाग खपले आहेत व त्यांवर १,२२१७५ रु.वसूल झाले आहेत,असें दिसून येतें. या संस्थेच्या ताब्यांत असलेल्या २३५ खोल्यांपैकीं २१४ भाड्यानें गेल्या, यामुळें गतवर्षी रिकाम्या खोल्या ४१ असतां रिपोर्टाच्या सालीं फक्त २९ च रिकाम्या राहिल्या.

सभासद नसलेल्या भाडेकऱ्यांवर पूर्वी भाड्याचा आकार बराच असे; तो कमी केल्यामुळें व डिपॉझिट ठेवणारांस आणखीही सवलत दिल्यामुळें एकंदरींत संस्थेचा फायदाच झालेला दिसून येतो. भाडेंवसुली गेल्या वर्षी ३७,६८३ रु. होती, तर रिपोर्टाच्या सालीं ती रु. ४०,०४६ होती. सरकारच्या सुमारें २१॥ हजार रुपये देण्यापैकीं सुमारें १३॥ हजार रुपये देणें फेडणें शक्य झालें. शिवाय किरकोळ देणें १०-हजार रुपये फेडण्यांत आलें.

सरकारच्या हप्त्याची पुरी फेड न झाल्यामुळें खुलासा विचारण्यांत आला आहे, व पुरी वसूल करण्याची धमकी आलेली आहे असें रिपोर्टावरून दिसतें. कोऑपरेटिव्ह संस्थांचें बीं सरकारनें पेरलें. हिंदुस्थानच्या सर्वसाधारण परिस्थितींत तें किती यशस्वी होऊं शकेल, हें ठरविण्यासाठीं लोकही आपला वेळ मोडून पुढें आले; सरकारनेंही एक खातें नेमून त्याकरवीं लोकांना मार्ग दाखविण्याची, लोकांनीं निर्माण केलेल्या संस्थांवर देखरेख ठेवण्याची, कायद्यानें त्यांस कांहीं सवलती मिळण्याची वगैरे व्यवस्था केली; एथपर्यंत सर्व ठीक आहे; अजूनही कोऑपरेटिव्ह तत्त्व हें हिंदुस्थानांत तरी प्रयोगाच्या स्थितींत आहे. कोणत्या तऱ्हेच्या कोऑपरेटिव्ह संस्था कोणत्या कारणास्तव भरभराटतात, अगर डबघाईस येतात हें शोधून काढणें तत्त्वशोधनाच्या दृष्टीनें सरकारचें काम आहे. संस्थांच्या चालक-कमिट्यांकडून प्रामाणिकपणें शिकस्तीचे प्रयत्न होत असूनही जर संस्थेचें पाऊल मागें पडूं लागलें, तर सहानुभूतिपूर्वक त्या संस्थेच्या अडचणींचा विचार करून तिला नाशापासून वांचविणें व यशस्वी संस्थांत तिला दाखल करून घेणें या आपल्या जबाबदारीची जाणीव न बाळगतां, केवळ मारवाडी बाण्यानें एखाद्या खासगी व्यक्तीकडून कर्ज वसूल करण्याचा हा प्रश्न आहे अशी वृत्ति दाखविणें सरकारास अनुचित आहे. नोकरी-

धंद्याची खालावलेली सांपत्तिक स्थिति, शेंकडों घरांच्या उठावामुळें भाडें कमी करूनही खोल्या खपविण्याची निरनिराळ्या मालकांमध्यें चाललेली निकराची चढाओढ, वाटेल त्या उपायांनीं खर्चांत काटकसर करण्याची सामान्य जनतेची प्रवृत्ति, या प्रतिकूल गोष्टींवर कमिटीचा कसा ताबा चालणार ? या गोष्टींचा सरकारकडून सहानुभूतिपूर्वक विचार व्हावयास नको काय ? कमिटीची मागणीही **माफक** आहे. सरकारी कर्जावर शेंकडा ६ च्या ऐवजीं ५ टक्के व्याज आकारण्यांत यावें व परतफेडीस ४० च्या ऐवजीं ५० वर्षांची मुदत मिळावी, एवढीच सवलत कमिटीनें मागितली आहे. यांत सरकारवर असह्य आपत्ति ती काय कोसळली ? २॥ टक्यांनीं सरकारच्या पायांशीं पैशांची रास पडत आहे. तेव्हां सोसायटीला दिलेल्या कर्जावर पांच टक्के आकारले तरी सुद्धा भरपूर फायदा सरकारास उरतो. सोसायटीच्या इमारती तारणादाखल सरकारकडे रुजू आहेतच. दहा वर्षें मुदत वाढविल्यानें सोसायटीचें नुकसान असून उलट सरकारचाच त्यांत फायदा आहे. सभासदांनीं शेंकडों रुपये या संस्थेच्या इमारतीसाठीं खर्च केलेले असून, डिव्हिडंडच्या रूपानें त्यांस एक पैचाही फायदा मिळत नाहीं; तथापि संस्थेकडून अव्यवस्थित खर्च होत नाहीं हें जाणून ते स्तब्ध आहेत. मग सरकार, इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट, म्युनिसिपालिटी, इलेक्ट्रिक सप्लाय अँन्ड ट्रॅम्वे कंपनी यांनीं अशा संस्थांना अडचणीच्या वेळीं सवलती देऊन, त्यांस जिवंत राखणें हें त्यांचें कर्तव्य नाहीं काय ? यांनीं आणि कोऑपरेटिव्ह सोसायट्यांनीं एकमेकांशीं 'कोऑपरेशन्' करण्याचाच हा प्रश्न आहे व तो दुगाण्या न झाडतां सहानुभूतीनेंच सोडविला पाहिजे, त्यांत सर्वांचेंच हित आहे, हें विसरून चालतां कामा नये.

संस्थेचे अध्यक्ष रा. रा. शिवराम नारायण रेगे हे असून चिटणीस रा. रा. नीलकंठ विसाजी नावर हे आहेत.

**(७) संयुक्त गौड सारस्वत सभा, मद्रास:—** या संस्थेचा १९३३ सालच्या कामाचा रिपोर्ट आमच्या हातीं आला आहे, त्यावरून पुढील माहिती कळून येते:—

इतर संस्थाप्रमाणें याही संस्थेस नोकरी-धंद्याच्या अभावामुळें वाढत्या बेकारीचा परिणाम भोगावा लागला; सभासदांकडून देणग्या कमी आल्या; विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या परतफेडींत तूट येऊं लागली. तथापि कमिटीनें निराश न होतां नेटानें काम करून संस्थेची उपयुक्तता कायम ठेवली. संस्थेचे १३ पेट्रन्स्, ६६ तहाहयात सभासद व २५४ सामान्य सभासद आहेत.

नवीन पदवीधरांचें अभिनंदन करण्यासाठीं एक समारंभ करण्यांत आला. रा. रा. एम्. पांडुरंग किणी, रिटायर्ड डे. कलेक्टर, हे विद्यार्थ्यांस उपदेश करतांना म्हणाले, "साधी राहणी, थोर विचारसरणी आणि भोंवतालच्या पीडित अंतःकरणांस सेवावृत्तीनें सुखविणें यावर डिग्रीइतकेंच जन्माचें साफल्य अवलंबून आहे."

या संस्थेकडे मदतीसाठीं ७७ विद्यार्थ्यांकडून अर्ज आले; पैकीं ४२ विद्यार्थ्यांना सालिना ७५ पासून १०० रुपयेपर्यंतच्या शिष्यवृत्ति देण्यांत आल्या. अलीकडे १४ वर्षें ही संस्था अशी मदत देत आली आहे व तिनें आजपर्यंत १८३ विद्यार्थ्यांवर सुमारें ३४००० रु. खर्च केले. यांपैकीं ९५ उद्योगधंद्यास लागले असूनही त्यांकडून फक्त रु. ७५०० परत आलेले आहेत. इकडच्या "सारस्वत विद्यार्थी–साहाय्यक मंडळी"प्रमाणें या संस्थेचा या बाबतींत निराशाजनक अनुभव आहे. विनंतिपत्रें, कायदेशीर नोटिशी इत्यादि इलाज योजूनही विद्यार्थी दाद देत नाहींत असें पाहून कोर्टांत खेंचण्याची धमकी देण्याचा कमिटीला प्रसंग यावा ही खरोखरच खेदाची गोष्ट होय. परतफेडीवर आपल्या मागून येणाऱ्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम बराचसा अवलंबून असतो हें या काळजीमुक्त झालेल्या माजी विद्यार्थ्यांच्या ध्यानांत यावयास नको काय ? शिवाय परत करण्याच्या अटीवर घेतलेली आर्थिक मदत म्हणजे तें कर्जच होय. तें परत करण्यामध्यें दाखविलेली तत्परता अगर शैथिल्य हें त्या त्या व्यक्तीच्या **नीतिमत्तेचा** पारा दर्शविणारें थर्मामिटरच ठरतें."

डॉ. यू. वेंकटराय, M. B. B. S. यांनीं लंडनची 'ॲनॅटोमी' या विषयांतील Ph. D. ही डिग्री संपादिली व रा. रा. ए. संजीवराय, B. Sc., यांनीं लीड्स्-युनिव्हर्सिटींत टेक्स्टाइल केमिस्ट्रीचा अभ्यास पुरा केला, म्हणून संस्थेनें समारंभ करून त्यांचें अभिनंदन केलें.

त्याचप्रमाणें रा.रा.व्ही. पी. राव, I. C. S. संस्थेचे एक तहाहयात सभासद, यांची मद्रास हायकोर्टाच्या जज्जाच्या जागीं नेमणूक झाल्याबद्दल एक भोजन-समारंभ घडवून आणून त्यांचा सन्मान करण्यांत आला.

संस्थेच्या कालवश झालेल्या सभासदांत दिवाणबहादूर एन्. सुब्बाराव यांचें नांव प्रामुख्यानें दिसतें. मंगलोर म्युनिसिपालिटीचे व साउथ कॅनरा डिस्ट्रिक्ट बोर्ड व एज्युकेशन कौन्सिलचे ते अध्यक्ष होते; मद्रास कायदेकौन्सिलचे ते सभासद होते. ते सामाजिक चळवळींत व विशेषेंकरून मागसलेल्यांच्या उन्नत्यर्थ फार झटत असत. सभेला त्यांच्या साहाय्याचा लाभ मिळत असे हें लिहिणें नकोच. सभेच्या संस्थापकांपैकीं एक रा. रा. पी. डब्ल्यू. कामत हेही कालवश झाले. सभेच्या चालू ऊर्जितावस्थेस गेल्या २२ वर्षांतील यांचे परिश्रम कारणीभूत झाले होते.

या संस्थेचे मुंबईस परिचित असलेले रा. रा. केशव नारायण कोटणीस, हे अध्यक्ष, रा. रा. एन्. रामराव, I. C. S. हे उपाध्यक्ष, रा. ब. डॉ. एम्. केशव पै, O. B. E., M. D. हे सेक्रेटरी, आणि ट्रेझरर, रा. रा. के. गोपाळराव, B. A. हे जॉइंट सेक्रेटरी, व रा. रा. आर्. अनंत पै, B. A. हे ॲसिस्टंट सेक्रेटरी आहेत.

संयुक्ततेच्या तत्त्वाचा फैलाव करण्यासाठीं ज्या संस्था वीस वर्षांपूर्वींच्या चळवळींत जन्मास आल्या, त्यांत "महाराष्ट्र सारस्वता"चा समावेश होतो. वरील सभा, ही त्या चळवळीचें दुसरें जीवंत व जोमदार अपत्य; आपलें स्वीकृत कार्य अविरत चालवीत असलेलें पाहून आम्हांस आनंद होत आहे. या भावंडाचें आम्ही अक्षय्य यशश्चिंतन करतों.

× × ×

**(८) दा. गौ. सारस्वत ब्राह्मण समाजाच्या** रविवार ता. ८ रोजीं भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेंत १९३४-३५ सालाकरितां खालील सभासद कार्यकारी मंडळाकरितां निवडण्यांत आले.

**अध्यक्ष**--रावसाहेब ज. वा. मुजुमदार, बी. ए.

**उपाध्यक्ष**--रा. वि. ना. सुखठणकर

**सभासद**--रा. अच्युतराव कामत ( खजिनदार निवासनिधि )

रा. वासुदेव द. रांगणेकर ( कार्यवाह आणि खजिनदार )

रा. विश्वंभरराव पालेकर

**नियोजित सभासद**--रा. रामचंद्र पी. सामंत

श्री. सौ. सुलोचनाबाई वा. रांगणेकर ( कार्यवाहिनी स्त्री-विभाग )

**हिशेब तपासनीस**--रा. बी. पी. बालिगा.

**( ९ ) सारस्वत ब्राह्मण समाज, मुंबई**

( १ ) रविवार ता. १८ फेब्रुवारी १९३४ रोजीं सायंकाळीं श्री. श्री. म. वर्दे, B. A., LL. B., यांच्या अध्यक्षतेखालीं जिवबादादा केरकर यांची पुण्यतिथि साजरी करण्यांत आली; त्या वेळीं श्री. गणपत रामचंद्र नाईक, B. A., LL. B., यांचें जिवबादादा यांचें कार्य यावर व्याख्यान झाले व व्याख्यान पुरें करण्यापूर्वीं यांनीं आपण स्वतः जिवबादादांवर केलेला पोवाडा गाऊन दाखविला.

( २ ) बुधवार ता. २८ फेब्रुवारी १९३४ रोजीं रात्रीं होळीनिमित्त समाजगृहामध्यें कांहीं करमणुकीचे खेळ झाले.

( ३ ) शुक्रवार ता. १६ मार्च १९३४ रोजीं ( चैत्र शु. प्रतिपदा १८५६ ) समाजाचा वर्धापन दिन श्री. स. सी. नाईक, B. A., L. C. E., B. S. D. ( Edb ) यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. त्या वेळीं श्री. शिवराम नारायण रेगे, समाजाचे जुन्यापैकीं सभासद यांचें व्याख्यान झालें. समाज कसा स्थापला गेला, समाजाचें ध्येय व कार्य व समाज कोणत्या तऱ्हेनें पुढें आला पाहिजे, वगैरेवर त्यांनीं व्याख्यानांत चार शब्द सांगितले व व्याख्यान पुरें करण्यापूर्वीं समाजाचें स्वतःचें गृह असावें अशी इच्छा प्रगट केली. नंतर ईशस्तवन झाल्यावर अल्पोपहार होऊन या संमेलनाचा कार्यक्रम पुरा झाला.

( ४ ) शनिवार, रविवार ता. १७।१८ मार्च १९३४ रोजीं समाजाच्या सभासदांचें, श्री. भा. रा. मंत्री यांच्या मालाड येथील बंगल्यांत संमेलन झालें. या संमेलनांत आपले स्वज्ञातीय श्री. डी. ए. कामत सुप्रसिद्ध नकलाकार, यांनीं आपल्या नकला करून दाखविल्या. श्री. कामत हे चांगलेच नकलाकार असून त्यांच्या नकलांत नावीन्य आहे.

( ५ ) शनिवार ता. २४ मार्च १९३४ रोजीं ( रामनवमी ) समाजगृहांत सोहिरोबानाथ आंबये यांच्या पुण्यतिथिप्रीत्यर्थ ह. प. वे. सं. करंडे बुवा यांचें हरिकिर्तन झालें.

( ६ ) शुक्रवार ता. ६ एप्रिल १९३४ रोजीं सा. ४-३० ते ६-३० स्त्रियांसाठीं समाजगृहांत वासंती हळदीकुंकवाचा समारंभ झाला. अशा मंगल प्रसंगीं स्वज्ञातीय भगिनींनीं समाजाचे सभासद होण्याची कार्यकारी मंडळास इच्छा असते. तरी त्यांना सभासद होण्याची विनंती केल्यास तो व्यर्थ जाणार नाहीं अशी आशा आहे.

( ७ ) **श्री. वा. रा. केरकर, श्री. दिनकर स. वर्दे व श्री. अनंतराव मोरमकर यांच्या शोकजनक मृत्युनिमित्त दुःखप्रदर्शक सभा**– येथील सा. ब्रा. समाज, सा. दीनवत्सल संघ व सा. को. बँ. सोसायटी या संस्थांतर्फे ही दुःखप्रदर्शक सभा रविवार ता. ९ सप्टेंबर रोजीं सायंकाळीं ५ वाजतां सा. ब्रा. समाजगृहांत भरली होती. अध्यक्षस्थानीं श्री. बाजी वि. नेरूरकर, B.A.L.L.B.वकील यांची योजना करण्यांत आली होती. सभेस श्री. नीलकंठ आ. शिवेश्वरकर, वकील, श्री. मणेरीकर वकील, डॉ. केरकर,श्री. शंकरराव वर्दे, श्री. भि. सी. सबनीस, वकील, श्री. अनंतराव साखरदांडे, श्री. ग. वि. लाड, श्री. शि. ना. रेगे, इ. बरीच मंडळी हजर होती. अध्यक्षांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत श्री. वामनराव केरकर यांची साधी राहणी व दीर्घ विद्याव्यासंग याचा उल्लेख करून सा. बा. समाज संघ या संस्थांच्या उन्नतीस ते बरेच कारणीभूत झाल्याचें सांगितलें. त्याच दिवशीं सकाळीं घडलेल्या श्री. दिनकरराव वर्दे वकील यांच्या मृत्यूबद्दल दुःख प्रदर्शित करतांना ते म्हणाले कीं, वर्दे यांचा दीर्घ विद्याव्यासंग व ज्ञातिविषयक कामगिरी सर्वांगीण होती. सं. गौ. सा. ब्रा. परिषद, सा. वि. स. मंडळी, दाभोळकर स्कॉलरशिप बोर्ड यांच्या कार्यकारी मंडळांत त्यांनीं काम करून ज्ञातीची उत्कृष्ट सेवा बजाविली आहे. अशा या प्रमुख व्यक्तींच्या निधनानें ज्ञातीचें बरेंच नुकसान झालें आहे. यानंतर श्री. भिकाजी सी. सबनीस यांनीं दुःखप्रदर्शक ठराव वाचून दाखविला. त्यावर श्री. शंकराव वर्दे, श्री. ग. वि. लाड, व श्री. शि. ना. रेगे यांचीं अनुमोदनात्मक भाषणें झालीं.अवघ्या एका महिन्याच्या आंत घडून आलेल्या केरकर, वर्दे व मोरमकर या त्रिवर्गांच्या शोकजनक मृत्यूबद्दल दुःख प्रदर्शित करून त्यांच्या निरनिराळ्या क्षेत्रांतील कामगिरीचें श्री. शंकरराव वर्दे यांनीं वर्णन करून शोकप्रदर्शन केलें. श्री. ग. वि. लाड यांनीं समाज व संघ यांच्या संस्थापन कालापासून या दोन संस्थांत श्री. केरकरांची कामगिरी किती बहुमोल होती हें दाखवून, रा. वर्दे यांच्या सं. गौ. सा. ब्रा. परिषदेंतील कार्याचें महत्त्व व वक्ता व लेखक या नात्यानें ज्ञातींत त्यांचें स्थान किती उच्च दर्जाचें होतें तें दाखविलें. महाराष्ट्रांत प्रमुख गणल्या गेलेल्या विविध वृत्ताला आजचा उच्च दर्जा प्राप्त होण्यास ज्यांचे परिश्रम कारणीभूत झाले आहेत, त्यांत श्री लक्ष्मीनारायण छापखान्याचे मालक रा. अनंतराव मोरमकर यांचा किती महत्त्वाचा भाग होता हें सांगून या तिघांच्याही मृत्यूनें निरनिराळ्या बाजूनें समाजाचें नुकसान झाल्याबद्दल दुःख प्रदर्शित करून त्यांच्या कुटुंबीयांवर आलेल्या आपत्तीबद्दल समाज त्याचा भागीदार असल्याचें सांगितलें. श्री. शि. ना. रेगे यांच्या अनुमोदनात्मक भाषणानंतर वरील त्रिवर्गांच्या मृत्यूबद्दलचा दुःखवटयाचा ठराव सर्वांनीं उभें राहून करण्यांत आला व तो त्यांच्या कुटुंबियांकडे अध्यक्षांच्या सहीनें पाठविण्याचें ठरल्यावर सभा बरखास्त झाली.

# अभिनंदन

जन्तुशास्त्र ( Biology ) वरील ज्ञानांत बरीच भर टाकल्याबद्दल सुप्रसिद्ध **डॉ. आर्. राव** यांना एशिॲटिक सोसायटी ऑफ बेंगॉल या संस्थेनें १९३४ सालचें " बक्ले मेमोरिअल " अर्पण केलें आहे. यापूर्वी डी. एस्‌सी. ही पदवी अशाच त्यांच्या कर्तबगारीबद्दल त्यांच्याकडे लंडनकडून चालत आलेली होती. मिळालेल्या या सन्मानाबद्दल डॉ. राव यांचें आम्हीं मनःपूर्वक अभिनंदन करितों.

× × ×

धारवाड येथील व्हिक्टोरिया हायस्कूलचे व्हाइस-प्रिन्सिपॉल रा. रा. **एस्. के. पंजीकर**, बी.ए., यांनीं आपल्या चिरंजीवांच्या मौंजीबंधनप्रसंगीं " मिसेस अंबाबाई पंजीकर विद्यानिधि" या नांवाचा एक स्मारक-फंड सुमारें ४०००० रु. खर्चून स्थापिला आहे. त्यांतून चित्रापूर मठानुयायी सारस्वतांना कांहीं शिष्यवृत्त्या व पारितोषिकें, हरिजन विद्यार्थ्यांसाठीं कांहीं पारितोषिकें, पंजीकर कुटुंबांतील विद्यार्थ्यांसाठीं कांहीं शिष्यवृत्त्या व जात, धर्म वगैरे न पाहतां द्यावयाच्या कांहीं शिष्यवृत्त्या आंखलेल्या आहेत; या औदार्याबद्दल रा. रा. पंजीकर यांस आम्ही धन्यवाद देतों.

\+ + +

रा. रा. **एस्. व्ही. शिवेश्वरकर** हे यंदा केंब्रिज येथें झालेली मॅथॅमॅटिकल ट्रायपॉस परीक्षा उत्तीर्ण झाले असून त्यांत त्यांना " बी स्टार " होण्याचा असामान्य मान मिळाला आहे. रा. शिवेश्वरकर १९३२ सालीं मुंबई युनिव्हर्सिटीची बी. एस्‌सी. परीक्षा पास होऊन त्यांत त्यांनीं आजपर्यंत कोणीही मिळविलेले नव्हते इतके मार्क म्हणजे शेंकडा ९८ मार्क मिळविले होते, ही गोष्टही पुष्कळांच्या स्मरणांत असेलच. जुलै महिनाअखेर होणाऱ्या इंग्लंड-मधील " इंडियन सिव्हिल सर्व्हिस " परीक्षेसही ते बसणार आहेत. त्यांना सदर परीक्षेंतही असेंच सुयश मिळो असें आम्ही इच्छितों.

\+ + +

रा. रा. **पी. एस्. रेगे**, बी. ए. ( रा. रा. शिवराम नारायण रेगे यांचे द्वितीय चिरंजीव ) हे लंडन-युनिव्हर्सिटीची बी. एस्‌सी. ( इकॉनॉमिक्स ) परीक्षा नुक्तीच उत्तीर्ण झाले याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करितों. सदर परीक्षेंत त्यांचा पहिला वर्ग अगदीं थोड्या मार्कांनीं चुकला ही दुर्दैवाची गोष्ट होय. रा. रेगे हे येथें एल्फिन्स्टन कॉलेजांत स्कॉलर असून १९३१ मध्यें बी. ए. परीक्षा उत्तीर्ण होऊन ते विलायतेस गेले. तेथें लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स-मध्यें दाखल होऊन, त्यांनीं पुढील अभ्यास केला. त्यांचा विद्याव्यासंग चांगला असून लंडन येथील वृत्तपत्रांत हिंदुस्थानसंबंधीं अर्थशास्त्र अगर इतर प्रचलित विषयांवर ते मधून मधून लिहीत असतात. रा. रेगे विलायतेस यंदा झालेल्या इंडियन सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेस बसले असून तिचा निकाल ता. २० सप्टेंबरच्या सुमारास आहे. त्या परीक्षेंतही त्यांना यश मिळून पुढील अंकांत अभिनंदन करण्याची पुन्हा संधि मिळावी असें आम्ही इच्छितों.

× × ×

रा. रा. **डी. एन्. कौशिक**, बी.एस्‌सी. ( रा. रा. नरसिंग शेषगिरी कौशिक, बी. ए., जे. पी. यांचे चिरंजीव ) हे मँचेस्टर–युनिव्हर्सिटीची बी. एस्‌सी. ( इलेक्ट्रिकल इंजीनिअरिंगची ) परीक्षा पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले आहेत हें नमूद करण्यास आम्हांस आनंद वाटतो.

\+ + +

## मुंबई-मॅट्रिक्युलेशन परीक्षा १९३४

### वरच्या नंबरास आलेले विद्यार्थी

रमाकांत महेश्वर मुजुमदार...६७५ पैकीं ५०८ मार्क. ( हे सदरहु परीक्षेस इलाख्यांतून बसलेल्या १८४३७ उमेदवारांत **पहिले** आले असून, त्यांना " बाई सीताबाई आर्. नाईक स्कॉलर्शिप " व " धी कामा स्कॉलर्शिप " हीं विश्वविद्यालयाचीं पारितोषिकें मिळालीं. )

अनंत गणेश राजाध्यक्ष... ६७५ पैकीं ५०२ मार्क. ( यांना " दिनानाथ मानकर गोल्ड मेडल " मिळालें. )

वामन शशिधर घारसे...६७५ पैकीं ४८३ मार्क
रघुनाथ धोंडोपंत तेंडुलकर...,, ,, ४८३ ,,
बाजीराव अनंत नाबर...,, ,, ४७७ ,,
(यांना " नरहर रावजी बेडेकर प्राइझ " मिळालें.)
प्रभाकर शांताराम कसबेकर...६७५ ,, ४७७ ,,
अण्णा बळवंत पावसे...,, ,, ,, ४६३ ,,
अच्युत द्वारकानाथ रांगणेकर ,, ,, ४५६ ,,
सीताकांत मुकुंद संझगिरी... ,, ,, ४५५ ,,
प्रभाकर मंगेश शिराळी... ,, ,, ४४९ ,,
महाबळेश्वर विनायक संझगिरी... ,, ,, ४४८ ,,
दिनकर विश्वनाथ देशपांडे... ,, ,, ४४५ ,,
जगन्नाथ आत्माराम नाडकर्णी... ,, ,, ४४५ ,,
दिनकर शांताराम सुखठणकर... ,, ,, ४४३ ,,
अनंत दत्तात्रय माविनकुर्वे... ,, ,, ४४३ ,,
सदानंद गोपाळ वर्टी... ,, ,, ४३७ ,,

## इतर परीक्षांचे निकाल

—यंदा झालेल्या गव्हर्मेंट कमर्शियल डिप्लोमा एक्झॅमिनेशमध्यें रा. मधुकर सीताराम कीर हे एकच विद्यार्थी पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले.

—कुमारी कुमुद कृष्णराव महाले, या एल्. सी. पी. एस्. परीक्षेंत उत्तीर्ण झाल्या.

### सारस्वत ब्राह्मण समाज, मुंबई, डॉ. भाऊ दाजी पारितोषिकें

डॉ. भाऊ दाजी फंडामार्फत मागविलेल्या निबंधाच्या बक्षिसांचा निकाल खालीलप्रमाणें लावण्यांत आला आहे.

स्पर्धा नं. ( १ ):—श्री. मंगेश दत्ताराम नाबर, एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई, पहिलें बक्षिस रु. ४०.

स्पर्धा नं. ( २ ):— (१) कु. सरस्वती रामचंद्र तिनैकर, महिला विद्यालय, बेळगांव, पहिलें बक्षिस रु. १५.

(२) कु. अनसूया ना. गुणाजी, पुणें; दुसरें बक्षिस रु. १०.

**सा.वि.सा.मंडळीचीं पारितोषिकें**—सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीकडे व्यवस्थेसाठीं असलेलीं गुणवर्चस्वाचीं बक्षिसें यंदा पुढीलप्रमाणें देण्यांत आलीं आहेत:—

(१) वि. बा. कोरगांवकर पारितोषिक—कुमारी वत्सला विठ्ठलराव मुंडकूर.

(२) राधाबाई आत्माराम बापु दळवी पारितोषिक-कुमारी चंपा यशवंतराव गुणाजी.

(३) मं. वि. राजाध्यक्ष पारितोषिक—कुमार रमाकांत महेश्वर मुझुमदार.

# नेमणुका

—रा.रा. गणपतराव सखाराम राजाध्यक्ष, एम्.ए. ( कँटब. ) बार-अॅट-लॉ, आय्. सी. एस्. यांना ता. २८ एप्रिल १९३४ पासून ६ महिने सेक्रेटरी टु गव्हर्मेंट, लीगल डिपार्टमेंट व रिमेंमब्रन्सर ऑफ लीगल अफेअर्स नेमिलें आहे.

—रा. रा. राजाराम श्रीपाद बावडेकर, बी. ए. (बॉम्बे व कँटब.), आय्. सी. एस्. यांना मुंबई-हायकोर्टाच्या ॲपिलेट साइडचे रजिस्ट्रार नेमिलें आहे.

—रा. रा. यशवंत नारायण सुखठणकर, बी. ए., एल्एल्. बी. (कॅन्टब.) बार-अॅट-लॉ, आय्. सी. एस्. यांची लंडन येथील डेप्युटी ट्रेड कमिशनर फॉर इंडिया या जागीं नेमणूक झाली आहे.

—हिंदुस्थानांतील निरनिराळ्या मेडिकल कॉलेजांतील शिक्षणक्रम व क्रमिक पुस्तकें,त्याचप्रमाणें एकंदर शिक्षणाचा कोर्स,यांची संपूर्ण चौकशी करून सुधारणा सुचविण्यासाठीं तीन प्रमुख डॉक्टरांचें एक मेडिकल इन्स्पेक्टोरेट नुक्तेंच नेमण्यांत आलें असून, त्यांत मुंबईचे सुप्रसिद्ध डॉ. रघुनाथ साबाजीराव तिरोडकर, एम्. डी. ( लंडन ), ॲसोसिएट प्रोफेसर ऑफ मेडिसिन, ग्रँट मेडिकल कॉलेज यांची निवड झाली आहे.

—रा.रा. डी.व्ही. येन्नेमडी, बी.ए., एल्एल् बी. यांना भडोच व पंचमहाल जिल्ह्यांचे तात्पुरते डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज नेमिलें आहे.

—रा. रा. यशवंत नीळकंठ नाडकर्णी, बी. ए., एल् एल्. बी., ॲड्व्होकेट, ओ. एस्, यांना मुंबई येथें तात्पुरते प्रेसिडेन्सी मॅजिस्टेट नेमिलें आहे.

—रा. रा. रामचंद्र महादेव भिसे, बी. ए , एल्-एल्. बी. यांना भडोच व पंचमहाल जिल्ह्याचे ॲसिस्टंट जज्ज व सेशन्स जज्ज नेमिलें आहे.

—डॉ. आर्. व्ही. शिवेश्वरकर, एम्. बी., बी. एस्., डी. पीएच्., डी. टी. एम्. यांची अहमदाबाद येथें नॉर्दर्न रजिस्ट्रेशन डिस्टिक्टचे असिस्टंट डायरेक्टर आफ पब्लिक हेल्थ म्हणून नेमणूक झाली आहे.

—डॉ. व्ही. आर. संझगिरी, एम्.बी.,बी. एस्., एल्. आर्. सी. पी., एम्. आर्. सी. एस्., एफ्. सी. पी. एस्. यांना मुंबई येथें गोकुळदास तेजपाळ हॉस्पिटलमध्यें आणखी पांच वर्षे ऑनररी सर्जन नेमिलें आहे.

—रा. रा. ए. आर. कागल यांना अहमदाबाद येथें तात्पुरतें इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज नेमिलें आहे.

—रा. रा. एस्. एम्. कायक्रिणी, बी. ए., एल्-एल्. बी. यांना बेळगांवचे ऑफिशिएटिंग डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज नेमिलें आहे.

—रा. रा. भास्कर नामदेव आडारकर, बी. ए. (बॉम्बे व केंब्रिज) यांना मुंबई येथें बँक ऑफ इंडियामध्यें ऑफिसरांच्या स्पेशल ग्रेडमध्यें ता. १ एप्रिल १९३४ पासून ॲसिस्टंट अकाउंटट नेमण्यांत आलें आहे.

—रा. रा. आनंदराव शेषगिरी मुंडकूर, बी. ए., (मद्रास ) यांस रत्नागिरीचे डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर नेमण्यांत आलें आहे.

—डॉ. कुमारी सुमती मंगेश तेलंग, एम्. डी. यांना सहा महिन्यांसाठीं कामा व ऑल्ब्लेस हॉस्पिटलचें मुख्य मेडिकल ऑफिसर नेमिलें आहे.

—रा. रा. रामचंद्र बाळकृष्ण हेगडे, बी. ए., एस्. टी. सी. डी. यांना ता. १ ऑक्टोबरपासून रत्नागिरी हायस्कूलचे हेडमास्तर नेमिलें आहे.

—रा. रा. शंकर धोंडदेव मणेरीकर, बी. ए. ( बॉम्बे व केंब्रिज ) रँगलर, यांना प्रो. काशीनाथ रामचंद्र गुंजीकर यांच्या गैरहजेरींत रॉयल इन्स्टिटयूट ऑफ सायन्समध्यें गणित विषयाचे तात्पुरते अध्यापक नेमिलें आहे.

—डॉ. आर्. व्ही. शिवेश्वरकर, एम्. बी., बी. एस्. ( बॉम्बे ), डी. पी. एच्., डी. टी. एम्. ( लिव्हरपूल ) यांची अहमदाबाद येथें नॉर्दर्न रजिस्ट्रेशन डिस्ट्रिक्टवर असिस्टंट डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थ म्हणून बदली करण्यात आली आहे.

—रा. रा. मंगेश वासुदेव नाबर, बी. ए. यांना पश्चिम खानदेश जिल्ह्याचे डेप्युटी सुपरिंटेंडंट ऑफ पोलिस नेमिलें आहे.

—रा.रा. गणपतराव सखाराम राजाध्यक्ष, एम्.ए. ( केंब्रिज ), बार-ॲट-लॉ, आय्. सी. एस्., जे. पी., यांस मुंबई कायदे कौन्सिलचे सभासद नेमिलें आहे.

—मेजर ए. वाय्. दाभोळकर, आय्. एम्. एस्. यांना मुंबई–कायदे–कौन्सिलचे जादा सभासद नेमिलें आहे.

—रा. रा. अनंत रघुनाथ प्रभू यांची विजापूर प्रिझनचे व्हिजिटर म्हणून पुढील तीन वर्षांसाठीं नेमणूक झाली आहे.

—डॉ. पी. एम्. वागळे, एम्. बी., बी. एस्., डी. पी. एच्., डी. टी. एम्., डी. बी. यांना मेडिकल रिचर्स डिपार्टमेंटमध्यें घेण्यांत आलें असून त्यांना मुंबईच्या हाफकिन इन्स्टिटयूटमध्यें ॲसिस्टंट डायरेक्टर नेमिलें आहे.

—रा. रा. बाळकृष्ण गणेश मुर्डेश्वर, बी. ए., एलूएल्. बी., ॲडव्होकेट, हायकोर्ट, यांना न्यायखात्यांत घेतलें असून त्यांची अहमदनगर जिल्ह्यांतील कोपरगांव येथें सेकंड क्लास सबॉर्डिनेट जज्ज म्हणून नेमणूक झाली आहे.

—रा. रा. अनंतराव वासुदेव सबनीस, बी. ए., जे. पी., रा. रा. जिवाजी कृष्ण परुळकर, एफ्. सी. आर. ए., जे. पी. व लेफ्टनंट कर्नल आर. राव, ओ.बी.ई., एम्.डी. ( लंडन ), डी.एस्सी. ( लंडन ), एफ्. सी. पी. एस्. ( बॉम्बे ) यांना ऑनररी प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट नेमण्यांत आलें आहे.

—रा. रा. वसंत शांताराम दाभोळकर, बी. ए., एल्एल्. बी., रा. रा. गोपाळ केशव कामत, बी. ए., एल्एल्. बी. व रा. रा. बाळकृष्ण माणिकराव मुळगांवकर, बी. ए., एल्एल्. बी. यांना मुंबई हायकोर्टांत ॲडव्होकेट म्हणून दाखल करण्यांत आलें आहे.

—रा. रा. आनंद दुर्गाराव तेलंग, बी. ई., एस्. ई., असिस्टंट एंजीनिअर, पी. डब्लू. डी. यांची बेळगांव येथें बदली करण्यांत आली आहे.



## न्यू डायमंड इलेक्ट्रिक वर्क्स

**इलेक्ट्रिक इंजीनियर्स, लायसेन्स्ड् कॉन्ट्रॅक्टर्स आणि जनरल मर्चंट्स,**
१४१, गिरगांव, मुंबई नं. ४ ( मॅजेस्टिक सिनेमासमोर ) प्रोप्रायटरः—**बी. पी. नाडकर्णी**

**आश्रयदात्यांस विनंतीः—**

आपल्या येथें इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशन्सचीं कामें उत्तम, सुबक व मनपसंतीनुसार बंगले, घरें, चाळी तसेंच वर्कशॉप्स् किंवा बाहेरगांवीं सिनेमाचीं कामें उत्तम प्रकारें केली जातील.

इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशन करण्यापूर्वी आमचा खास सल्ला घ्या.




**एव्हर रेडी पॉकेट**

**टॉर्चिस्**

**जर्मन डेमन बॅटरीज्**

**टॉर्चिस् मिळतील**

किंवा वरील पत्त्यावर पत्रव्यवहार करा. म्हणजे **स्वस्त तितकें महाग**
हलक्यासलक्या मालास भुलून न जातां आमच्याकडील स्वस्त, सुबक व टिकाऊ व " इलेक्ट्रिक कंझम्शनास" कमी असे "स्टोन" ट्रेडमार्कचे दिवे वापरून खात्री करा. एकदम घेणारास विशेष सवलत.
**ता. क.**:—आमच्या येथें शुभप्रसंगीं टेंपररी इल्युमिनेशनचीं कामें मनपसंतीनुसार करण्यांत येतील.

# सभा, सम्मेलनें वगैरे

—कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण फॉरिन अँन्ड एज्युकेशन फंडाच्या विद्यमानें नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मणांच्या मॅट्रिक्युलेशन-प्राइझ-फंडाचा बक्षिस समारंभ ता. ८ जुलै १९३४ रोजीं फ्रेंच पुलावरील ब्लॅव्हॅटस्की लॉजमध्यें रा. रा. शिवराव विठ्ठलराव पालेकर, बी. ए., एल्एल्. बी, यांच्या अध्यक्षतेखालीं झाला.

—मराठा प्रॉव्हिडेंट फंड, लिमिटेड तर्फे श्रीशिवाजी विद्याप्रसारक फंडाचा २९ वा वार्षिक बक्षिससमारंभ सी. पी. टॅन्क नजिक हिराबाग हॉलमध्यें रा. रा. जिवाजी कृष्ण परूळकर, एफ्. सी. आर्. ए., जे.पी. यांच्या अध्यक्षतेखालीं ता. २२ जुलै १९३४ रोजीं साजरा करण्यांत आला.

—गौड सारस्वत ब्राह्मण को-आपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड, या संस्थेची १४ वी वार्षिक साधारण सभा, न्यू भटवाडी रोडवरील 'लक्ष्मीबाग' मध्यें रा. रा. धोंडोपंत रामचंद्र मणेरीकर, बी. ए., एल्एल्. बी., ॲडव्होकेट, हायकोर्ट, यांच्या अध्यक्षतेखालीं भरून, अहवाल व हिशेब मंजूर करणें, नवीन वर्षासाठीं व्यवस्थापक मंडळ व हिशेबतपासनीस नेमणें वगैरे कामें करण्यांत आलीं.

—धी इंडिअन लिटररी ॲसोशिएशन तर्फे मदन हाउस, कांदेवाडी येथें रा. रा. रामराव अ. कानत्रिंदे यांचें "कै. न्यायमूर्ति तेलंग यांची वाङ्मयसेवा" या विषयावर ता. २२ जुलै १९३४ रोजीं व्याख्यान झालें.

—रा. ब. स. वि. राजाध्यक्ष गौ. सा. ब्रा. फॉरिन एज्युकेशन सोसायटीची १० वी वार्षिक साधारण सभा रा. रा. सीताराम सुंदरराव पाटकर, बी. ए., एल्एल्. बी., जे. पी., रिटायर्ड जज्ज, हायकोर्ट, यांच्या अध्यक्षतेखालीं ता. १९ ऑगस्ट १९३४ रोजीं चौपाटीनजिक 'आनंदकानन' येथें भरून मामुली कामें झालीं.

—न्यू सारस्वत युनियनचा २१ वा वाढदिवस व सम्मेलन, रविवार ता. १९ ऑगस्ट १९३४ रोजीं मराठा हायस्कूलच्या जागेंत साजरें करण्यांत आलें. त्या प्रसंगीं सॉलिसिटर वासुदेवराव दिवेकर यांचें गायन व रा. भास्करराव पै यांचें पेटीवादन झालें.

—सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळाच्या व्यवस्थापक मंडळातर्फे रा. रा. शंकरराव पुंडलिक वर्दे, बी. ए., एल्एल्. बी. यांच्या अध्यक्षतेखालीं सारस्वत ब्राह्मण समाजगृहांत एक खासगी समारंभ होऊन संस्थेचे एक चिटणीस रा. रा. ग. ह. जांबोटकर, एम्.ए. बी.टी. हे उच्च शिक्षणासाठीं विलायतेस जात असल्यामुळें, त्यांना प्रेमाचा निरोप देण्यांत आला. त्या वेळीं अध्यक्षांशिवाय रा. रा. सदानंद लक्ष्मण कापडी, बी. एस्सी., रा. रा. भिकाजी सीताराम सबनीस, बी. ए. एल्एल्. बी., व प्रि. वसंतराव रामचंद्र नेरूरकर, एम्. ए. एस्. टी.सी., टी. डी, एम्. आर्. एस्. टी. यांचीं समयोचित भाषणें झालीं. उत्तरादाखल रा. रा. जांबोटकर यांचें आभारप्रदर्शक भाषण झालें.

### सांगली-दरबार व सारस्वत ब्राह्मण

शहापूर येथें ता. २१-७-१९३४ रोजीं श्रीमारुतीच्या देवालयांत श्री. बा. ना. कित्तूर यांच्या अध्यक्षतेखालीं, तेथील समस्त सारस्वत ब्राह्मण मंडळीची सभा झाली. त्या वेळीं खालील ठराव सर्वानुमतें पास करण्यांत आले.

**ठराव नं. १**

(अ) शहापूर येथील समस्त सारस्वत ब्राह्मण-समाजाच्या या सभेस सांगली संस्थानच्या ता. १६-७-३४ च्या जादा गॅझेटमध्यें प्रेसनोट या सदराखालीं पहिल्या पॅरिग्राफमध्यें "शहापूर येथें ता. २४ जून १९३४ रोजीं रात्रीं मुसलमान लोक आणि सारस्वत समाज यांचेमध्यें तंटा जाहला" वगैरे मजकूर जो प्रसिद्ध झाला आहे, त्यानें संस्थानांत व इतरत्र सारस्वत समाजाविषयीं गैरसमज उत्पन्न झाला आहे व आणखी होण्याचा संभव आहे, असें वाटत

आहे. वरील मजकुरामुळें शहापूर येथील अखिल सारस्वत ब्राह्मणसमाजास फार दुःख होत आहे.

( ब ) सदर रात्रीं काढिलेल्या दिंडीमध्यें शहापूर येथील प्रत्येक समाजाचा भरणा होता ही गोष्ट संस्थानच्या जबाबदार अधिकाऱ्यांस पूर्णपणें अवगत असतां वरील मजकूर प्रसिद्ध केला जावा ही अत्यंत खेदजनक व उद्वेगकारक गोष्ट आहे.

( क ) तरी वरील मजकुराविषयीं श्रीमंत सरकारनीं जादा गॅझेट काढून योग्य ती दुरुस्ती करावी अशी या सभेची श्रीमंत सरकारांस नम्र विनंती आहे.

**ठराव नं. २**

( अ ) शहापूर येथील अखिल सारस्वत समाजाच्या या सभेस, ता. १६-७-३४ रोजीं सांगली गॅझेटमध्यें मिरवणुकी व इतर जमाव यांच्या नियमनाकरितां आणि निर्बंधांकरितां म्हणून जे नियम प्रसिद्ध करण्यांत आले आहेत, ते शहापूरच्या प्रजाजनांच्या न्याय्य हक्कांवर गदा आणणारे आहेत, आणि ते परंपरागत वहिवाटीविरुद्ध आहेत, असें वाटत आहे.

( ब ) तरी सदर नियम, प्रजाजनांच्या न्याय्य हक्कास व वहिवाटीस मान देऊन, श्रीमंत सरकारनीं लवकरच रद्द करावेत अशी या सभेची श्रीमंतसरकारांस नम्र विनंती आहे.

**ठराव नं. ३**

वरील ठराव श्रीमंत सरकारकडे आणि जबाबदार अधिकाऱ्यांकडे पाठविण्याचा अधिकार या सभेनें या सभेच्या अध्यक्षांस दिला आहे.

---


# कामत आणि कंपनी.

## दोन हत्तीजवळ, गिरगांव बॅकरोड

---

आमचे दुकानीं नित्य लागणारीं सर्व तऱ्हेचीं धान्यें, नारळ, चहा, साखर, लोणी, तूप, सर्व प्रकारचें सामान, हिंग, केशर, सर्व तऱ्हेचे साबण वगैरे माल मार्केटभावानें घरीं पोंचविण्याची व्यवस्था केली आहे. मालाच्या चांगुलपणाविषयीं गिऱ्हाइकांनीं एकवार खात्री करून घ्यावी.

PHONE NO. 42476.

# कै. दिनकरराव वर्दे

ता. ९ सप्टेंबर रोजीं सकाळीं ७ वाजतां रा. दिनकरराव सखाराम वर्दे, अॅडव्होकेट यांचें एकाएकीं हृदयक्रिया बंद पडून निधन झालें ही शोचनीय बातमी कळविण्यास आम्हांस फार दुःख वाटतें. जुन्या पिढींतील एक वाङ्मयभक्त व लेखक अशी त्यांची प्रसिद्धि होती. कै. दिनकरराव वर्दे यांचा शिक्षणक्रम येथील एल्फिन्स्टन हायस्कूल व एल्फिन्स्टन कॉलेज या शिक्षणसंस्थांत झाला व इ. स. १८८९ मध्यें ते बी. ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर दापोली येथें रे. गॅडने यांच्या मिशन हायस्कुलांत ते हेडमास्तर होते. सार्वजनिक सभेच्या वतीनें शेतकऱ्यांसाठीं चाललेल्या कार्यांत व तेथील सार्वजनिक कार्यांतही त्यांनीं बराच प्रामुख्यानें भाग घेतला. आपल्या विद्यार्थीवर्गास ते फारच प्रिय असत. इ. स. १९०० नंतर ते मुंबईस आले. प्रथम येथील युरोपियन स्कॉटिश हायस्कुलमध्यें शिक्षकाचें काम करून नंतर येथील अंजुमान–इ–इस्लामच्या शाळेंत त्यांना फर्स्ट असिस्टंट नेमण्यांत आलें. तेथें त्यांनीं सुमारें ९ वर्षें काम केलें. तेथेंही विद्यार्थीवर्गांत आणि अंजुमानच्या पुढाऱ्यांत त्यांच्याविषयीं फार आदर आणि प्रेम असे. पुणें येथें भरलेल्या एज्युकेशनल कॉन्फरन्समध्यें त्यांना अंजुमानचे प्रतिनिधि म्हणून पाठविलें असतां, मुंबईंतील एका मुसलमानी प्रमुख संस्थेनें एका हिंदु गृहस्थाला आपला प्रतिनिधि म्हणून नेमलेलें पाहून परिषदेंतील इतर अनेक प्रतिनिधींना अचंबा वाटला! त्यांनीं आपल्या संस्थेच्या वतीनें चोख कामगिरी केल्याबद्दल संस्थेनेंही त्यांची प्रशंसा केली. कै. दिनकरराव वर्दे हे मुंबईस आल्यानंतर आपल्या सार्वजनिक कार्यांतील उत्साहानुरूप येथील सार्वजनिक कार्यांत साहजिकच पडले. 'इंदुप्रकाश'पत्र १९०४ च्या अखेरीस दैनिक झालें. तें इंग्रजी–मराठी या दोन भाषांत त्या वेळीं निघत असे. प्रि. (हल्लीं रावबहादुर) दा. ग. पाध्ये हे मुख्य संपादक असून शेट दा. सा. यंदे छापखान्याची वगैरे व्यवस्था पाहात. कै. रामचंद्र कृष्ण नूलकर व रा. पु. गो. काणेकर हे संपादकवर्गांत होते व ते उभयतां दिनकररावांचे स्नेही होते. त्याचप्रमाणें त्यांचे जुने दोस्त कै. दादा गोगटे हेही मधूनमधून इंदुप्रकाशांत लिहीत असत. दिनकरराव मधून मधून अग्रलेख लिहीत. रूसोजपानी युद्धावरील बहुतेक सर्व लेख दिनकररावांचेच होते. पोर्ट आर्थर पडल्यानंतर तीन चार लेख लिहून टोगो व नेल्सन यांची तुलना दिनकररावांनीं केली ती मोठी मार्मिक होती व त्या लेखांची त्या वेळीं फार प्रशंसा झाली. राजकारण व शिक्षण या विषयांवरही ते अग्रलेख लिहीत. त्यांचीं राजकीय मतें पूर्णपणें राष्ट्रीय होतीं व ब्रिटिश साम्राज्यशाही धोरणाविरुद्ध इंदुप्रकाशच्या अग्रलेखांतून **'साम्राज्यमद'** या मथळ्याखालीं लिहिलेली लेखमाला अद्याप अनेकांच्या स्मरणांत असेल. Imperialism या इंग्रजी शब्दाला 'साम्राज्यमद' हा प्रतिशब्द त्यांनींच दिला.

कै. दिनकरराव वर्दे मुंबईस आल्यापासून कै. काशीनाथपंत मित्रांचा व त्यांचा स्नेह जडला आणि कै. मित्रांच्या मनोरंजनाचे ते एक प्रमुख लेखक झाले. त्यांनीं लिहिलेलीं 'ऐतिहासिक स्त्रियां'चीं चरित्रें प्रथम मनोरंजनांतून व पुढें पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालीं व मुंबई-युनिव्हर्सिटींतून तें पुस्तक मराठीच्या विषयासही नेमण्यांत आलें. 'सारस्वत विद्यार्थी सहायक मंडळीं'ची स्थापना कै. काशीनाथपंत मित्र कै. गोविंद मल्लिनाथ ठेंगे, वगैरे ज्या स्नेही मंडळीनें केली, त्यांत कै. दिनकरराव वर्दे हे होते. या मंडळीच्या सुरवातीच्या काळांत पुरस्कर्त्या गृहस्थांनीं अत्यंत निरलस व निःस्पृह कार्य केल्यामुळेंच ती संस्था आजच्या वैभवास पोंचली आहे. विद्यार्थ्यांविषयीं त्यांची आस्था आणि कळकळ जाणून कै. बाबासाहेब दाभोळकर यांनीं केलेल्या दाभोळकर ट्रस्टचे त्यांना पहिले सेक्रेटरी नेमल्यांत आलें व त्यांनीं तें काम कांहीं वर्षें आस्थेनें व उत्साहानें केलें.

समकालीन विद्वानांत कै. दिनकरराव वर्दे यांचे कै. ना. गोखले, कै. हरिभाऊ आपटे, कै. रा. सा. मोरमकर, आर्यभूषण छापखान्याचे मालक रा. हरिभाऊ गोखले, रा. गोपाळराव देवधर, रा. माधवराव बोडस वगैरे अनेक स्नेही होते आणि त्यांच्याविषयीं त्या सर्व स्नेह्यांना फार आदर आणि प्रेम वाटत असे. कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या 'वीरतनय' नाटकावर सुरवातीस झालेल्या कित्येक टीकांना दिनकररावांनीं वृत्तपत्रांतून दिलेल्या उत्तरांची कै. श्रीपादकृष्णांना अद्याप आठवण होती. सुमारें तीन वर्षांपूर्वी कै. कोल्हटकर विविध वृत्ताच्या कचेरींत आले असतां, दिनकरराव वर्दे येथें जवळच राहतात असें त्यांना समजलें व दिनकररावांचे चुलतबंधु रा. श्रीपादराव वर्दे यांजकडून त्यांनीं त्यांना मुद्दाम बोलावून आणविलें. अनेक वर्षांनंतर भेटलेल्या त्या दोघां मित्रांची भेट त्या वेळीं तेथें असलेल्यांना चिरस्मरणीय झाली आहे. कै. काशीनाथपंत मित्रांनीं आपल्या मृत्युपत्रांत दिनकररावांना आपले एक ट्रस्टी नेमलें होतें. अगदीं अलीकडे मनोरंजन बिकट परिस्थितींत आलें असतां त्याला साहाय्य करण्याची एक योजना तयार करण्यांत आली; ती करण्यांत कै. दिनकररावांनीं पुष्कळच मेहनत घेतली व प्रकृति अस्वस्थ असतांही आपले जोडीदार ट्रस्टी कै. बाळ यांना भेटण्यासाठीं त्यांनीं पुण्यास खेप केली.

कै. दिनकररावांच्या अंगीं जबर चिकाटी आणि उत्साह होता. बी. ए. झाल्यावर एल्एल्. बी.ची परीक्षा देऊन वकिलीचा स्वतंत्र धंदा करावयाचा ही त्यांची पहिल्यापासून मनीषा होती. परंतु प्रपंचाचा बोजा, वाङ्मयकार्य आणि सार्वजनिक कर्तव्यें यामुळें परीक्षा उत्तीर्ण होण्यास पाहिजे तशी अभ्यासाची तयारी त्यांजकडून होत नसे. दापोलीच्या शाळेंतून रजा घेऊन यावें व मुंबईस मंगळदास लॉजमध्यें मुद्दाम अभ्यासासाठीं खोली घेऊन राहावें; परंतु अभ्यासापेक्षां स्नेहीमंडळीशीं नाना प्रकारच्या विषयांवर चर्चा करण्यांत वेळ जाऊन परीक्षेंत अपयश यावें. पुढें मुंबईस आल्यावरही तोच तऱ्हा. मॅट्रिकपासून बी. ए. पर्यंत त्यांना परीक्षेंत कधींही अपयश आलें नव्हतें. कॉलेजमध्यें ते स्कॉलर असत. मॅट्रिकच्या परीक्षेंत कै. शिवराम महादेव परांजपे हे संस्कृतमध्यें पहिल्या नंबरास आले, त्या वर्षीं व संस्कृतमध्यें दुसऱ्या नंबरास कै. दिनकरराव आणि दुसरे एक विद्यार्थी यांना सारखेच मार्क पडले होते; तेव्हां परीक्षकांनीं पेपर पुनः तपासले व कै. दिनकररावांना दोन मार्क कमी पडल्यामुळें शंकरशेट स्कॉलरशिप मिळाली नाहीं. परंतु एलएल. बी. च्या परीक्षेंत सातआठ वेळां आलेल्या अपयशानें निरुत्साह न होतां इ. स. १९०९ सालीं म्हणजे बी. ए. झाल्यानंतर वीस वर्षांनीं आणि वयाची चाळिशी उलटून गेल्यावर ते एलएल बी. झाले. अनेक तरुण व नव्या दमाच्या वकिलांशीं आपणास उतार वयांत स्पर्धा करावयाची आहे, या कित्येक स्नेह्यांनीं घातलेल्या भीतीस न जुमानतां त्यांनीं वकिलीच्या धंद्यास सुरवात केली. वकिलीच्या धंद्यास सुरवात केल्यापासून त्यासाठीं त्यांचा फार वेळ जाऊं लागला आणि इतर सार्वजनिक कार्यांपासून त्यांना हळूहळू निवृत्त व्हावें लागलें. त्यापूर्वीं सुमारें तीन चार वर्षांपासून त्यांच्या राजकीय मतांत क्रांति होऊं लागली होती. पूर्वीं इंदुप्रकाशांत त्यांनीं नेमस्त मतांचा जोरानें पुरस्कार केला होता. मनोरंजनांत 'प्रासंगिक विचार' या सदराखालीं नेमस्त पक्षाच्या राजकीय मतांचा पुरस्कार ते करीत असत. मनोरंजनांत 'राजकारणा'चे लेख कै. काशीनाथपंत मित्रांनीं येऊं दिले याचें कित्येकांना त्या वेळीं आश्चर्य वाटलें. स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीस त्या वेळीं जोर आला असून अशा लेखांकडे सरकारी अधिकाऱ्यांची करडी नजर असे. परंतु राष्ट्रीय बाणा न सोडतां कायद्याच्या कक्षेंत न येणारे लेख दिनकररावच लिहूं शकतील असा कै. मित्रांना पूर्ण विश्वास होता. पुढें कार्यव्यापृतीमुळें दिनकररावांनीं तें लेखन सोडल्यावर कै. मित्रांनीं तें तितक्याच विश्वासानें रा. पु. गो. काणेकर (शारदाश्रमवासी) यांजकडे सोंपविलें व त्यांनाही पुढें लिहिण्यास फुरसत मिळेना तेव्हां तें बंद झालें. इतिहास हा दिनकररावांचा फार आवडता विषय होता आणि प्रसंगीं ऐतिहासिक विषयांवर ते मार्मिक लेख लिहीत असत.

सुरतेच्या कांग्रेसनंतर कै. दिनकररावांच्या राज-

कीय मतांत फरक पडूं लागला. कै. टिळकांना सहा वर्षें काळेपाण्याची शिक्षा झाली, तो खटला चालवीत असतां लोकमान्यांची बुद्धिमत्ता पाहून त्यांच्या ठायीं असलेला आदर फारच वाढला. वकिली दृष्टीनें टिळकांच्या बचावाच्या भाषणांत 'अमुक चुका आहेत, तमुक दोष आहेत' असे उद्गार कांहीं जणांकडून निघालेले ऐकून ते एकदा म्हणाले कीं, "हा पुरुष स्वतःच्या कोर्टीत बचाव करीत नाहीं; तर हिंदिस्तानच्या दुर्दशेची कैफियत जगापुढें वाचीत आहे; हिंदी पुढाऱ्यांच्या विकट परिस्थितीचा पाढा सुधारलेल्या राष्ट्रांना सांगत आहे, हें यांना कसें कळत नाहीं!" कै. टिळकांना शिक्षा झाल्या दिवसापासून त्यांचीं राजकीय मतें स्पष्टपणें जहाल बनत चाललीं. म गांधींच्या प्रत्येक मताला व कृतीला त्यांची पूर्ण मान्यता असे आणि "स्वातंत्र्याचा ठराव केल्यानें आतां आमचे परदेशांत असलेले हिंदी बांधव मान वर करून व छाती पुढें काढून चालूं लागतील;" या जवाहिरलाल नेहरूंच्या भाषणानें तर त्यांचें हृदय अभिमानानें उचंबळून आलें होतें.


मुसलमान समाजाशीं त्यांचा फार संबंध आला व त्या समाजांत त्यांना अनेक स्नेही लाभले. अंजुमान-इ-इस्लाम शाळेंत असतां म. न्या. बद्रुद्दीन तय्यबजी यांचा त्यांजवर फार लोभ जडला होता. शिक्षणपरिषदेस प्रतिनिधि पाठविण्यापूर्वी कै. दिनकरराव यांनीं अंजुमानच्या वतीनें लिहिलेलें एक शिक्षणविषयक मेमोरियल त्यांच्या पाहण्यांत आलें, त्यावरून त्या परिषदेस वर्दे यांना आपले प्रतिनिधि म्हणून पाठवा, नाहीं तर मलाच गेलें पाहिजे असें त्यांनीं आग्रहानें सांगून अखेर वर्दे यांनाच पाठविण्याचा ठराव केला. कार्पोरेटर मि. डिमटिमकर हे कै. दिनकररावांचे एक निकट स्नेही होते. श्रीवर्धन येथील काजी अब्दुल्ला काजी फकीर महंमद हे एक खानदानी घराण्यांतील मुसलमान गृहस्थ त्यांचे सुरवातीचे एक अशील असून पुढें त्यांचे परम स्नेही झाले, व मुंबईस आल्यावेळीं एखाद्या निकट आप्तासारखे त्यांच्या घरांत राहत असत. जंजिरा संस्थानांत त्यांचे अनेक मुसलमान स्नेही होते व माजी नबाबांच्या एका चुलत बंधूच्या घराण्याचा नष्ट झालेला गादीवरील वारसा हक्क कै. वर्दे यांनीं सिमल्यापर्यंत जाऊन व खटपट करून परत मिळवून दिला. श्रीवर्धन येथें कांहीं वर्षांपूर्वी झालेल्या हिंदुमुसलमानांमधील लढ्यांत तेथील मुसलमान समाजाकडून त्यांना अत्यंत विश्वासानें सल्ला विचारण्यांत येत असे व तेही खुल्या दिलानें त्यांचें काम करीत. या सर्व कामांत वकील व अशील यांना त्यापेक्षांही स्नेह्यांच्या कळकळीनें त्यांनीं कामें केलीं; त्यांत धंदेवाईक आर्थिक दृष्टि ठेवली नव्हती. त्यांनीं वकीलीचें काम चोवीस वर्षें केलें व त्यांनीं स्वीकारलेल्या धंद्यांत त्यांना यशही आलें. परंतु कुटुंबाचा व्याप आणि अलीकडील चार वर्षांतील मंदाई यांमुळें त्यांची सांपत्तिक स्थिति समाधानकारक राहिली नाहीं. कै. नामदार गोखले यांनीं एकदा 'तुम्ही आमच्या सोसायटींत येतां का?' असें विचारलें असतां, "अगोदर माझ्यावरील कौटुंबिक जबाबदारी थोडीशी हलकी होऊं द्या! त्यांची कांहीं तरी व्यवस्था झाल्यावर मी आपणांस येऊन मिळेन," असें त्यांनीं उत्तर दिलें. त्यावरून "एकदा या चक्रव्यूहांत पडल्यावर मोकळें होण्याची अपेक्षाच करावयास नको!" असें ना. गोखले यांनीं त्यांस सांगितलें. त्याचें आपणांस दिवसेंदिवस प्रत्यंतर येतें, असें ते वारंवार म्हणत. त्यांचा हा अनुभव देशसेवेची इच्छा धरणाऱ्या अनेक तरुणांनीं लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

प्रपंचाच्या अडचणींनीं घेरलें असतांही त्यांची सार्वजनिक कार्याची हौस आणि उत्साह कायमच होता. बहुतेक संस्थांचा त्यांनीं प्रत्यक्ष संबंध गेल्या दहापंधरा वर्षांत सोडून दिला होता. परंतु कोठेंही व्याख्यान देण्यास अगर लेख लिहिण्यास सांगितलें असतां ते सहसा नकार देत नसत. रा. खोत यांच्या 'रणगर्जना' या साप्ताहिकाचे अग्रलेख कित्येक महिने लिहून तें साप्ताहिक नामशेष होण्याच्या बेतांत आलें असतां त्यास पुनः कांहीं काल दिनकररावांनीं नवजीवन दिलें. क्रॉनिकलचे मि. ब्रेलवी हे त्यांचे शिष्य होते. कै. दिनकररावांच्या इंग्रजी लेखनशैलीविषयीं फार आदर वाटत असल्यामुळें मि. ब्रेलवी यांनीं त्यांना अतिशय आग्रह करून गेल्या चार वर्षांत त्यांच्याकडून

कित्येक लेख बॉंबे क्रॉनिकलसाठीं लिहून घेतले. त्यांतील कांहीं A Nationalist या नांवानें गेल्या सालांतच प्रसिद्ध झाले आहेत.

महाराष्ट्र सारस्वतांत त्यांची लेखमाला दोन वर्षांपूर्वीं आली आहे. सारस्वत विद्यार्थीसहायक मंडळीप्रमाणेंच सारस्वत ब्राह्मण समाज या संस्थेशीं त्यांचा फार निकट संबंध होता. महाराष्ट्राबाहेरील सारस्वतांना या समाजाचे सभासद म्हणून स्वीकारण्याचा प्रश्न इ. स. १९१६ सालाच्या सुमारास प्रथम उद्भवला त्या वेळीं समाजाचें सभासदत्व जास्त व्यापक व्हावें म्हणून प्रयत्न करण्यास त्यांनीं पुष्कळच साहाय्य केलें. परंतु समाज महाराष्ट्रीय सारस्वतांचाच असावा असा अखेर निर्णय झाला. बेळगांव येथील संयुक्त परिषदेच्या कार्यांत त्यांनीं आरंभापासून मेहनतीनें कार्य केलें व त्या परिषदेचा रिपोर्ट लिहिण्याची कामगिरी त्यांजकडेच सोपविण्यांत आली व ती त्यांनीं पुरी केली.

गेल्या तीन वर्षांत त्यांची प्रकृति कांहींशी खालावली होती, परंतु जर्मनींतून वैद्यकीय शिक्षण घेऊन आलेले डॉ. गोविंदराव केशव देशपांडे, एम्. डी. (बर्लिन) यांच्या औषधोपचारांमुळें वार्धक्यसहज विकारांची तीव्रता त्यांना बाधली नाहीं. वरील हे आपल्या वडिलांचे एक स्नेही असें जाणून डॉ. देशपांडे हे त्यांना अतिशय काळजीपूर्वक उपचार करीत असत. निधनापूर्वीं आठ दिवस कै. दिनकररावांच्या पोटांत तीव्र वेदना होत, परंतु दोन दिवसांतच तो विकार बरा होऊन त्यांची प्रकृति ताळ्यावर आली व चारपांच दिवस त्यांना साफ बरें वाटलें. रविवारीं सकाळीं ते नित्याप्रमाणें उठून नेहमींप्रमाणेंच वावरूं लागले असतां एकाएकीं हृदयक्रिया बंद पडून त्यांचें निधन झालें. इतक्या उतार वयांतही तरुणांच्या उत्साहानें कार्य करीत असतांच त्यांची इहयात्रा संपली. त्यांच्यामागें त्यांचे दोघे पुत्र, चार कन्या व पत्नी इतर आप्त आज दुःखित आहेत. काळाचा घाला पडून अवचित येणाऱ्या या दुःखप्रसंगांत आम्ही व कै. दिनकररावांचे सर्व स्नेही समविभागी आहों, हें सांगण्यापलीकडे त्या सर्वांचें सांत्वन करण्याचा उपाय आमच्या हातीं नाहीं.






वर्ष १३ वें विजयादशमी १९३४ अंक ८

हिज मास्टर्स व्हॉइस, ओडियन, कोलंबिया व ट्वीन वगैरे कंपन्यांचे

**नवीन कोरे रेकॉर्डस् व ग्रामोफोन मशीन्स**

**गिरगांवांत मिळण्याचें एकच ठिकाण.**

ॲथोराईज्ड एजंटस्—


# जी. जे. घैसास आणि कंपनी,

**रामचंद्र बिल्डिंग, गिरगांव ट्राम टर्मिनस, मुंबई**

**फोन नं. २४१४१**

Printed by R. K. Tatnis, at Shree Laxmi Narayan Press, 364 Thakurdwar, Bombay No. 2 and Published by S. L. Kapadi for the Maharashtra Saraswat Mandal, at the Saraswat Brahman Samaj, Girgaum, Bombay 4

Editor:-S. M. Varde, B. A., LL. B.




स र्व त्र मि ळ तो

# धी इंडिया प्रॉव्हिडंट कंपनी लिमिटेड

**( कलकत्ता )**

**स्थापना १९१०] लाईफ फंड आठ लक्ष रुपयांवर [ सरकारी सिक्युरिटी**

कलकत्ता येथील सुप्रसिद्ध इंडियन इन्शुअरन्स जर्नल लिहितें, " हिंदुस्थानांतील विमाकंपन्यांत ज्याप्रमाणें ओरियंटल ही सर्वांत श्रेष्ठ व उच्च दर्जाची गणली जाते, त्याचप्रमाणें प्रॉव्हिडंट कंपन्यांत सदर्हू एकच कंपनी गणली जाते." हींत १८ ते ५० वयाच्या स्त्रीपुरुषांस वैद्यकीय तपासणीशिवाय दरमहा सहा आण्यांपासून दोन रुपयेपर्यंत हप्ता भरून १०० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंतची विम्याची पॉलिसी घेतां येते. तरी गरजूंनीं ह्याच कंपनींत आपला विमा उतरून आपला फायदा करून घ्यावा.

**गांवोगांव भरपूर एजंट्स पाहिजेत. लिहा अगर समक्ष भेटाः—**

भेटण्याची जागा व वेळः—
**घाटकोपरवाला बिल्डिंग, मगभाट, गिरगांव.** कोणत्याही दिवशीं सायंकाळीं ६ ते १० ( स्टँ. टा.)

**आर. एम्. दिवाडकर आणि कंपनी,**
मुंबई इलाख्याचे मुख्य एजंट्स,
**माझगांव, मुंबई नं १०.**

॥ श्री ॥

# महाराष्ट्र सारस्वत

द्वैमासिक

वर्ष १३ वें — सप्टेंबर-आक्टोबर १९३४ — अंक ५ वा

## संपादकीय

विजयादशमीस महाराष्ट्र सारस्वताचा एक खास अंक काढावा अशी आमची फार मनीषा होती. परंतु तसा योग या सालीं जुळून आला नाहीं. खास अंकासाठीं आम्हीं ज्या प्रकारचे लेख मागविले होते, तशा प्रकारचा एकही लेख आमच्याकडे आलेला नाहीं, हें पाहिलें म्हणजे मनास फार खेद वाटतो. महाराष्ट्र सारस्वतास उपयोगी असे लेख म्हणजे सामाजिक, औद्योगिक किंवा आर्थिक स्वरूपाचे, अथवा ज्ञातीच्या इतिहासांत भर टाकणारे असावे अशी अपेक्षा असते; अशा विषयांसंबंधीं लिहिणाऱ्या लेखकांची आमच्या समाजांत वाण नाहीं.परंतु महाराष्ट्र सारस्वतासारख्या एका ज्ञातीपुरत्याच मर्यादित प्रसिद्धीच्या द्वैमासिकांतील लिखाणाला भरपूर प्रसिद्धि मिळत नाहीं म्हणून अनेक कसलेले लेखक आपले लेख या मासिकांत देऊं इच्छित नाहींत. नवीन आणि होतकरू लेखकांना ज्या विषयावर लिहावेसें वाटतें, ते विषय बहुशः या द्वैमासिकाच्या कक्षेबाहेरचे, जास्त व्यापक स्वरूपाचे असतात. तशांत त्या लेखांना इतरत्र प्रसिद्धी मिळत नसली, तरच ते या मासिकाकडे पाठविण्यांत येतात असें आढळून येतें. अशा परिस्थितींत या मासिकाचें संपादनकार्य उत्साहवर्धक नाहीं असें मोठया खेदानें म्हणावें लागतें.

× × ×

महाराष्ट्र सारस्वताचा नियमितपणा जरी अगदीं तारखेवर ठेवतां आला नाहीं, तरी गेल्या अंकाच्या वेळीं आलेले अनपेक्षित शोककारक प्रसंग व त्यांमुळें झालेला विलंब खेरीज केल्यास प्रत्येक अंक त्याच दुमाहींत प्रसिद्ध झाला आहे.इतक्या नियमितपणाच्या मानानें वर्गणीदारांकडून आम्हांस मिळत असलेलें उत्तेजनही यथायोग आहे. या द्वैमासिकाची आर्थिक परिस्थिति असमाधानकारक आहे, असें म्हणतां येणार नाहीं. तितक्याच प्रमाणांत जर लेखनसाह्य मिळेल तर महाराष्ट्रसारस्वताच्या बाबतींत कोणालाही कसलीही तक्रार करण्यास जागा राहणार नाहीं,

× × ×

लेखकांच्या श्रमांचा मोबदला देतां यावा इतकी महाराष्ट्र सारस्वताची सांपत्तिक सुस्थिति अद्याप नाहीं. या द्वैमासिकाचें सर्व कार्य कार्यकर्त्यांच्या निरपेक्ष मेहनतीवरच अद्याप चाललें आहे. मुद्रण आणि टपाल यांच्या खर्चापलीकडे दुसरा कोणताही खर्च होत

नाहीं. तथापि लेखकांना मोबदला देतां आल्याखेरीज चांगल्या प्रकारचे लेख मिळणार नाहींत, अशी सूचना आमच्या कित्येक हितचिंतकांकडून होत असते. मराठी भाषेचा आजवरचा इतिहास पाहिल्यास या छोटेखानी द्वैमासिक पुस्तकाकडून मोबदल्याची अपेक्षा करणें फारसें शक्य नाहीं. तशांत ज्ञातिहितार्थ चालविलेल्या नियतकालिकाला मोबदल्याची इच्छा न धरतां स्वयंस्फूर्तीनें लिहिलेले ज्ञातिहितासंबंधाचे लेख स्वज्ञातीय लेखकांकडून तरी मिळावयास पाहिजेत. तथापि लेखकांना उत्तेजनार्थ थोडाबहुत मोबदला देण्यास या द्वैमासिकाच्या चालक वर्गाची खुषी असली, तरी त्यांना तशी अनुकूलता नाहीं. कोणी धनिकांनीं महाराष्ट्र सारस्वताला तसें सामर्थ्य दिलें, तर लेखकवर्गास द्रव्यद्वारा उत्तेजन देण्यास आम्हांला आनंद वाटेल. महाराष्ट्र सारस्वतांत देण्यासारख्या विषयांवर चारसहा पृष्ठांचे लेख किंवा तशा लेखांची माला लिहिण्याची चढाओढ लावून सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या लेखास बक्षीस देण्यांत यावें अशी एक सूचना आमच्याकडे आलेली आहे, ती सूचना आम्हांस ग्राह्य आहे. परंतु असें बक्षिस महाराष्ट्र सारस्वताच्या द्वारा देण्यास कोणी तरी स्वज्ञातीचा अभिमानी असा दानशूर तयार झाल्याखेरीज ती सूचना अमलांत आणणें आमच्या आटोक्याबाहेर आहे, म्हणून ती सूचनाच आम्ही आमच्या वाचकवर्गापुढें ठेवीत आहों. ती वाचल्यानें स्फूर्ति होऊन तसा उपक्रम कोणी केल्यास आमच्या लेखकवर्गाकडून या द्वैमासिकाची होत असलेली आबाळ कमी होण्याचा संभव आहे.

× × ×

पुढचा अंक निघाल्यावर महाराष्ट्र सारस्वताचें हें वर्ष पुरें होईल. तरी चालू वर्षाची वर्गणी ज्यांनीं अद्याप दिलेली नाहीं, त्या वर्गणीदारांनीं ती लौकर पाठवावी अशी विनंती आहे.

---


बाई यमुनाबाई एल्. नायर हॉस्पिटलाचे खास नेमलेले ऑप्टिशियन्स

**भांडारे आणि कंपनी, चष्मे बनविणार**

लंडन आणि ऑक्स्फर्ड येथील डोळ्यांच्या इस्पितळांतून अनुभव घेऊन आलेल्या क्वालिफाइड सर्जनकडून शास्त्रशुद्ध पद्धतीनें डोळे काळजीपूर्वक फुकट तपासून चष्मा दिला जातो; तसेंच डोळ्यांच्या सर्व विकारांची पूर्ण चिकित्सा करून योग्य तो इलाज केला जातो.

आम्ही सर्व तऱ्हेच्या रोल्ड गोल्ड, इमिटेशन टारटॉइज शेल व फुल-व्यु फ्रेमचा भरपूर स्टॉक ठेवतों. झीसस पंकटल, अंब्रल, क्रुक्स वगैरे उत्तम, उंची व डोळ्यांना थंडावा देणाऱ्या अशाच लेन्सिस वापरण्यांत येतात.

डोळ्यांस लागणारीं सर्व औषधें आमच्याकडे मिळतात, व नुकत्याच सुरवात झालेल्या मोतीबिंदुवर आमचा इलाज केल्यास, पुढें शस्त्रक्रियेची जरूरी राहत नाहीं. इस्पितळांतून चष्म्याचे नंबर आणणाऱ्यास खास किफायत भाव.

पत्ता— **स्टोन हाउस**, २१० चर्नीरोड, प्रार्थना समाजनजीक, गिरगांव, **मुंबई**

२८%

# घरचा अहेर.

( लेः— मिठाचा खडा )

## पराणी पाहिजे

जुन्या नाटकांतील प्रधानजी " जिकडे तिकडे आबादीआबाद आहे, " असा पुकारा करीत असे. आमच्या सारस्वत समाजराज्यांत महाराष्ट्र सारस्वत द्वैमासिक तेंच काम करीत आहे. देवाच्या सृष्टींतसुद्धां दोष असतो, पण आमच्या सारस्वत संस्थांची कामगिरी निर्दोष आहे, असा आभास या द्वैमासिकाच्या ज्ञातिवृत्तामुळें होतो. या स्तुतीच्या गोळ्या संस्थांना चारून त्यांना कैफाची गुंगी आली, तर ती आमच्या जातीला किती भोंवेल हें कुणाच्याच ध्यानांत कसें येत नाहीं ! मी स्पष्टच विचारतों कीं, महाराष्ट्र सारस्वताचे हल्लींचे संपादक रा. वर्दे यांची ती पूर्वीची कांटेकोर नजर गेली कुठें ? महाराष्ट्र सारस्वताच्या संपादनांत त्यांच्याकडून हलगर्जीपणा होतो,तो खपून जावा म्हणून तर ते डोळेझांक करीत नसतील ? तेरी मेरी चूप, हा न्याय सार्वजनिक कामांत बराच फावतो ! आमच्या मुंबईंतल्या सारस्वत संस्थांची वाढ लवकर झाली याचा मलाचसा काय, पण कोणालाही अभिमान वाटेल. पण गेल्या दहा वर्षांत ती वाढ खुंटून संस्थांचें पाऊल जेथल्या तेथें थबकलें आहे. माझ्यासारख्यानें आरामखुर्चीत पडून विडी फुंकतां फुंकतां पराणी टोंचली नाहीं तर या संस्थांचे पांढरे हत्ती बनतील आणि केवळ शोभेसाठीं त्यांना पोसण्याची पाळी कांहीं वर्षांनीं येईल. मी हें डाव्या हाताचें काम करीत आहे असें कोणी म्हणेल; पण समाजसंरक्षणासाठीं धनुष्य सज्ज झालें असतां डाव्या हाताला पुढें व्हावें लागतें; आमच्या जातिसमाजाचे उजवे हात त्याच्या कानापर्यंत मागें खेंचले जाऊन विधायक कामगिरीच्या बाणांना माझ्या आधारानें चोदना देतीलच. आरामखुर्चीवर पडून विडीच्या धुराबरोबर सहल करतां करतां मुंबईंतील निरनिराळया सारस्वत संस्थांच्या कामांत दिसलेल्या चुका स्पष्टपणें मला दाखवायच्या आहेत. हा घरचा अहेर स्वीकारण्याची जर तयारी नसेल तर आमच्या संस्थाचालकांनीं उद्यां परक्यांकडून कानपिचक्या घेण्यास तयार झालें पाहिजे. त्या वेळीं कान उपटले जायचे ते जाऊन संस्था तरी कितपत शाबूद राहातील, ह्याची शंका आहेच.

## पहिला मुजरा

'नाऱ्या बोल ! खुशाल बोल ! ' म्हणून दिलेल्या सरपरवानगीचा उपयोग केला नाहीं, तर माझें मन मला खाईल. यासाठीं महाराष्ट्र सारस्वतापासूनच मी सुरवात करतों. नवीन योजना झाल्यापासून या द्वैमासिकाचे अंक चुकतमाकत नियमितपणें निघतात. मधूनमधून एखाद्या लेखांत कोठेंतरी एकादी चमकही झळकते. पण या द्वैमासिकाचें काम अत्यंत निष्काळजीनें आणि हलगर्जीपणानें केलें जातें. मागें कै. सर वसंतराव दाभोळकरांच्या नांवांतच चूक झाली होती. प्रुफें तपासण्यांत बिलकुल गफलत असते, मजकूर देण्याची संपादकीय कामगिरीही तितक्याच बेछूटपणें केली जाते; याला मी गेल्याच अंकाचा दाखला देणार आहें. दीनवत्सल संघाची स्थापना १९०८ सालच्या विजयादशमीस ( ५ आक्टोबर रोजीं ) झाली आणि आतांच त्या संस्थेची रौप्यजुबिली —पण तें एक न्यारेंच प्रकरण आहे. म. सारस्वताच्या गेल्या अंकाचे पृष्ठ ४ वर दीनवत्सल संघाची स्थापना झाल्याचें साल १९२० दिलें आहे, तें वाचल्यावर १९३४ सालीं या संस्थेची ज्युबिली कशी साजरी होते, याचें वाचकाला कोडेंच पडलें पाहिजे. याच अंकाच्या १७ व्या पृष्ठावर एकच बातमी त्याच शब्दांत जशीच्या तशी प्रत्येक कालमाच्या अखेरीस एकेकदा अशी दोन वेळां खांद्यास खांदा लावून प्रसिद्ध झाली आहे. उजव्या

बाजूचें प्रतिबिंब डाव्या कालमांत उठलें आहे असेंही म्हणतां येईल ! हाउसिंग सोसायटीची बातमी देतांना १२ व्या पृष्ठावर केलेल्या चुका अगदींच गबाळ आहेत. या सोसायटीला सरकारनें ५ टक्के व्याजानें कर्ज दिलें, तें कमी होऊन चार टक्के व्हावें अशी संस्थेची मागणी आहे. आजचें व्याज ६ टक्के आहे तें ५ टक्के करावें हा जांवईशोध जाहीर करणाऱ्या महाराष्ट्र सारस्वताला सांगावें तरी काय ! आंकड्यांत दोन वेळां चूक करून पुनः त्याच चुकीचा अनुवाद अक्षरीं केला आहे. दस्तैवजांत आंकड्यांचा घोंटाळा होतो, म्हणून अक्षरीं पुनः लिहितात. तें लेखनाचें काम म. सारस्वताकडे दिलें तर आंकडे आणि अक्षरी संख्या एकजुटीनें चुका करीत सुटतील अशी पैज बेलाशक मारावी ! प्रुफें तपासण्याची ही हयगय अगदीं अक्षम्य होय. मुद्रणदोष म्हणून या चुकांचें मार्जन करण्याची खटपट कोणी करूं नये. तशी खटपट करण्याची दुर्बुद्धि कोणाला आठवलीच, तर संपादित मजकूर त्याला खात्रीनें तोंडघशीं पाडील !

पृष्ठ १९ वर 'सांगली दरबार व सारस्वत ब्राह्मण' या सदराखालीं आलेला मजकूर अत्यंत असमाधानकारक आहे. सांगलीच्या 'समस्त सारस्वत ब्राह्मण मंडळीनें मारुतीच्या देवळांत जमून' कांहीं ठराव केले, त्यांत " सांगली संस्थानच्या जादा गॅझेटमधील प्रेसनोटमध्यें आलेल्या ' शहापूर येथें ता. २४ जून १९३४ रोजीं रात्रीं सारस्वत व मुसलमान लोक यांचेमध्यें तंटा जाहला,' वगैरे मजकुरानें सारस्वत समाजाविषयीं गैरसमज उत्पन्न झाला आहे व आणखी होण्याचा संभव आहे," इत्यादि बातमी दिली आहे. ती अगदीं अपुरी, सांगलीबाहेरील सारस्वत समाजाच्या मनांत भीति उत्पन्न करणारी आणि नाना शंका उत्पन्न करणारी आहे. मुसलमान आणि सारस्वत समाज यांचा तंटा आणि तो कशासाठीं ! सांगली गॅझेटमध्यें हा मजकूर कां यावा ! त्यामुळें कोणता गैरसमज उत्पन्न होईल ? असे अनेक प्रश्न वाचकाच्या मनांत येतात. ही अपुरी बातमी देण्याचा हलगर्जीपणा गंभीर स्वरूपाचा आहे. त्या प्रकरणाचा योग्य सविस्तर खुलासा पुढील अंकीं न आल्यास—मी काय करीन तें दिसेलच !

## चेंगट मंडळ

मुंबईचा सारस्वत ब्राह्मण समाज स्वतःला सारस्वतांची मध्यवर्ती जुनाट संस्था समजतो. जुनाट वार्धक्याचा चेंगटपणा हाच जर गुणांचा निकष असेल, तर तो समाजापाशीं भरपूर आहे. दरसाल निवडणुकी आणि रिपोर्ट व्हायचे ते दोन वर्षांनीं करून यंदां एकदा कार्यकारी मंडळानें ऐन सरस्वतीमहोत्सवाच्या वेळीं आपल्या खांद्यावरचें जूं नव्या मॅनेजिंग कमिटीच्या मानेवर ढकललें. वर्षाच्या ऐवजीं दोन वर्षे चिकटून राहण्याचा हा चेंगटपणा खुशाल खपून गेला, पण स्तुतीच्या कैफानें कशी गुंगी येते याचें यावरून निदर्शन होईल. समाजाचा उत्साह गेल्या दोन वर्षांत मंदावला आहे. ४४ सभासद नवीन झाले आणि ६१ कमी झाले, यावरून काढण्याचें गणित मराठी चौथ्या यत्तेच्या येत्या परीक्षेस पडणार आहे. तें वाचकांनीं आपल्या मनाशीं सोडवून पाहावें. संजीवीबाई या सारस्वत कुमारिकेच्या वडिल माणसांनीं स्वतःच्या पोटाची खाई भरण्यासाठीं तिचा देहविक्रय करण्याचा निंद्य घाट घातला असतां, देहाची अशी विटंबना होण्यापेक्षां आत्मघात करणें तिनें पत्करलें. आत्मघाताच्या प्रयत्नासाठीं तिला मॅजिस्ट्रेटपुढें उभें करण्यांत आलें. एखाद्या परधर्मी रेस्क्यू होममध्यें जाऊन स्वधर्माला मुकण्याच्या या प्रसंगांतून तिची सुटका झाली. 'सारस्वत ब्राह्मण समाज' म्हणून एक संस्था आहे अशी माहिती मिळाल्यामुळें मॅजिस्ट्रेट मि. ब्राउन यांनीं संस्थेच्या सभासदांची चौकशी केली व रा. नी. वि. नाबर यांच्या ताब्यांत त्या मुलीला दिलें. लौकरच श्री. कामत या स्वज्ञातीय तरुणानें कु. संजीवनीचे शीलधैर्यादि सद्गुण पाहून

तिच्याशीं विवाह केला व तो विवाहसमारंभ समाजगृहांत साजरा झाला. एका सारस्वत ब्राह्मण कुमारीच्या शीलरक्षणाची ही अभिमानास्पद कथा समाजाच्या रिपोर्टांत अगदींच मेंगरूळपणानें सांगून महिलादिनाच्या हळदीकुंकवाचें मात्र केवढें तरी अवडंबर केलें आहे. सारस्वत ब्राह्मण समाजांत स्त्रियांना सभासद होतां यावें, म्हणून केवढा प्रचंड प्रयत्न झाला! किती आवेशाचीं भाषणें झालीं! नवमतवाद्यांनीं किती अट्टाहास केला! वृद्ध आणि जुन्या मताच्या सभासदांनीं किती थरकांप उडाल्यासारखें दाखविलें! पण या दोन वर्षांच्या अवधींत स्त्रीसभासदांची संख्या एकमेवाद्वितीयम् आहे, याला कारणें कांहींही असोत, पण आपल्या अर्धांगींना किंवा सुनांमुलींना समाजाच्या सभासदत्वाची गरज नाहीं, हें तो खळखळाट उडविणारांना कळत नव्हतें काय!

## रुपेरी मुलामा

सारस्वत दीनवत्सल संघाच्या रौप्यजुबिलीचा समारंभ या विजयादशमीपूर्वी व्हायचा आहे. विजयादशमी हा संघाचा वाढदिवस असून त्या दिवशीं सुटी असते. समाजगृहांत संघाची कचेरी आहे, तेथें विजयादशमीच्या दिवशीं समारंभही होतो. दोन्ही समारंभांना जोडून जुबिली उत्सव साजरा करणें कठीण नाहीं. पहिल्या सरस्वती महोत्सवाचा दसरा असाच दोनतीन समारंभ मिळून केला होता. जागेची अडचण खरी, पण तीही कशीबशी भागवितां येईल. इच्छा पाहिजे, म्हणजे मार्ग मिळतो. पण आपली निराळी टिमकी वाजविण्याची आमच्या संस्थांची हौस कधीं कधीं अनावर होते. त्यास अनुसरून जुबिली समारंभ १० दिवस अलीकडे खेंचून घेण्यांत आला. हा समारंभ इकडून दहा दिवस अलीकडे खेंचला असला, तरी तिकडून एक वर्ष लांबला आहे. संघाच्या नेहमींच्या कामकरी माणसांनीं थोडेंसें मनावर घेतलें असतें, तर सहज हा समारंभ गेल्या सालीं वेळेवर सुरळीत झाला असता. पण जरा भपका करण्याच्या हौसेनें तरतूद केली; ती उलट समारंभ लांबणीवर पडण्यास कारण झाली. या जुबिली–महोत्सवाच्या जादा कार्यक्रमाची झळ दिवाळीच्या भिक्षेस पोंचून दीन दुबळयांना बाधली नाहीं म्हणजे मिळविलें!

## आमचीं देवळें

आमच्या देवळांची कथा पुढें कधीं तरी द्यायचा संकल्प भुलेश्वर–वाळकेश्वरांच्या चरणीं निवेदन करून मी सध्या शेणव्यांच्या ठाकुरद्वारावर मोहीम काढतों. हे देऊळ मध्यवस्तींत आहे. त्याच्या आवतींभोंवतीं वाडीही आहे. पण या देवळाची आणि त्याच्या वाडीची दशा मुंबईकर शेणव्यांना लाजिरवाणी आहे. या देवळाचा ट्रस्ट आहे कीं ती खासगी मत्ता आहे हा प्रश्न सोडला, आणि वादाच्या पायीं पैशाचा चूर करण्याचें टाळलें, तरी आमच्या देवालयफंडांतून किंवा अन्य रीतीनें हें देऊळ सारस्वतांच्या सार्वजनिक मालकीचें करण्याची वेळ खात्रीनें आली आहे. गजबजलेल्या ठाकुरद्वारच्या भरवस्तींत असल्या पडक्या इमारती आणि पडाघर वाडया नामशेष होत आहेत. समोरचीं मंदिरें आणि हें मंदिर यांतील फरक पाहून कोणाही हिंदूचें अंतःकरण पिळवटून निघेल. शेणव्यांच्या वैभवाचें नांव शंभर-सवाशें वर्षें कायम ठेवणाऱ्या या ठाकुरद्वाराची कष्टदशा ऑफिसांत जाणाऱ्या प्रत्येक सारस्वताच्या डोळ्यांसमोर रोज दोनदा तरी दिसत असते. ती पाहूनदेखील तिच्यांत कांहीं सुधारणा करण्याचा प्रयत्न होत नाहीं. इतके आम्ही खमंग झालों आहों! कीं मेषपात्र बनलों आहों! ज्या देवळांचा उपयोग आजच्या वस्तींत आम्हांला फारसा होत नाहीं, त्यांची व्यवस्था ठीक चालली आहे. पण स्वज्ञातीला नेहमीं उपयोगांत येण्यासारखें हें भरवस्तींतलें, नेहमींच्या वाटेवरचें ऐतिहासिक मंदिर असतां त्याच्या जीर्णोद्धाराविषयीं इतकी अनास्था कां!

## निजलेला ज्वालामुखी

संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषद आज अठरा वर्षें झोंपी गेली आहे. हिंदुस्थानांतील सर्व महाराष्ट्रीय गौड सारस्वतांना एकत्र आणणारी ही एकच संस्था चेतना दडवून स्वस्थ पडून रहावी इतकी सारस्वतांची सुस्थिति आहे काय ! शेवटच्या परिषदेचे अध्यक्ष आणि चिटणीस कर्तबगार आणि कार्यक्षम आहेत. परिषदेला पुनः चैतन्य यावें अशी जातिसमाजांत उत्सुकता आहे. पण परिषदेचें पुनरुत्थान मांजराच्या गळ्यांत घांट बांधण्याचा एक प्रश्न होऊन बसला आहे. परिषद पुनः सुरू झाली, तर कांहीं सामाजिक वाद माजतील, कांहीं अडचणीचे प्रश्न निघतील, कांहीं नव्या भानगडी उपस्थित होतील, मधून मधून उसळणारे कांहीं भेदभाव जोराची उसळी खातील—पण अखेरीस सर्व ज्ञातींत चैतन्याचा संचार होऊन फायदाच होईल, हें परिषदेचा आठ वर्षांचा इतिहास सांगेल. संयुक्त परिषद हा एक ज्वालामुखी आहे खरा, पण तो जागा झाला असतां त्याच्यापासून होणाऱ्या त्रासापेक्षां ज्ञातीला लाभ किती तरी पटीनें जास्त होईल ! वृद्धांचा उत्साह या कामांत मंदावला असला, तर नव्या दमाच्या तरुणांनीं हें राष्ट्रकार्य हातीं घेतलें पाहिजे.

---



**इलेक्ट्रिक इंजीनियर्स, लायसेन्स्ड् कॉन्ट्रॅक्टर्स आणि जनरल मर्चंट्स,**

१४१, गिरगांव, मुंबई नं. ४ ( मॅजेस्टिक सिनेमासमोर ) प्रोप्रायटर:—बी. पी. नाडकर्णी

**आश्रयदात्यांस विनंती:—**

आपल्या येथें इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशन्सचीं कामें उत्तम, सुबक व मनपसंतीनुसार बंगले, घरें, चाळी तसेंच वर्कशॉप्स् किंवा बाहेरगांवीं सिनेमाचीं कामें उत्तम प्रकारें केलीं जातील.

इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशन करण्यापूर्वी आमचा खास सल्ला घ्या.




**एव्हर रेडी पॉकेट**

**टॉर्चिस्**

**जर्मन डेमन बॅटरीज्**

**टॉर्चिस् मिळतील**

**स्वस्त तितकें महाग**

किंवा वरील पत्त्यावर पत्रव्यवहार करा. म्हणजे हलक्यासलक्या मालास भुलून न जातां आमच्याकडील स्वस्त, सुबक व टिकाऊ व " इलेक्ट्रिक कन्झम्शनास" कमी असे "स्टोन" ट्रेडमार्कचे दिवे वापरून खात्री करा. एकदम घेणारास विशेष सवलत.

ता. क.:—आमच्या येथें शुभप्रसंगीं टेंपररी इल्युमिनेशनचीं कामें मनपसंतीनुसार करण्यांत येतील.

# हरिजनांस देवद्वार खुलें करण्याचा कायदा



ले०—श्री. एस्. एन्. कानविंदे, बी. ए.

ता. २३ ऑगस्टच्या ॲसेंब्लीच्या बैठकींत वरील कायद्याचें मि. रंगा अय्यर यांनीं पुढें आणलेलें बिल परत मागें घेण्यास त्यांस परवानगी देण्यांत आली.

हा आमचा हिंदूंचा घरगुती प्रश्न. पुढील गोष्ट उदाहरणासाठीं घेतों; एका गृहस्थास चार मुलगे होते. एक व्यापार करीत असे, एक सरकारी नोकरींत मोठया हुद्याच्या जाग्यावर होता, एक तारवें बांधणें, कारखान्याचीं यंत्रें तयार करणें वगैरे धंद्यांत गुंतलेला होता, व एक घराचें कुंपण मोडलें तर दुरुस्त करण्यांत, घर शाकारण्यांत, तें साफसूफ ठेवण्यांत आपल्या वेळाचा उपयोग करीत असे. चौघांचींही लग्नें झालेलीं होतीं. आजुबाजूची तयारी करून देण्यास जरी इतर तिघांच्या बायका तयार असत, तरी दोन्ही वेळां स्वयंपाक करण्याचें, उष्टीं काढण्याचें, पाट उभे करण्याचें, व पत्रावळी बाहेर टाकण्याचें काम कधींही खंड न पडतां या चवथ्या भावाच्या बायकोच्या घांटयासच येत असे. कांहीं वर्षेंपर्यंत तिला ही अपमानास्पद स्थिति आहे, असें वाटलें नाहीं. एक दिवस असा आला कीं, तिनें व तिच्या एका जावेनें बांगडया भरण्याचा वेळ एकच झाला. कांसारानें जावेच्या हातांत उंची बांगडया व हिच्या हातांत खडबडीत टाकाऊ बांगडया चढविल्या. आपण उभयतां कुटुंबाच्या सेवेंत कुळाचा अभिमान बाळगून सारख्या खपत असतां, किंबहुना आपला उपयोग कुटुंबाला कांकणभर जास्तच होत असतां, हा भेदभावाचा प्रकार पाहून तिच्या नेत्रांतून अश्रूंचे दोन कण टपकन् जमिनीवर पडले. कांसार दादासही हें पाहून कळवळा आला व पुढल्या खेपेस आपण झीज सोसून तिला उंची बांगडया चढविण्याचें त्यानें ठरविलें.

हळूहळू या बाईच्या नजरेंत पंक्तिप्रपंचाचे आणखीही प्रकार रोजच्या रोज येत चालले. तिला फार पश्चात्ताप झाला व तिनें नवऱ्यास ते प्रकार कळविले. त्यानें आपल्या बापाच्या कानावर ते घातले. बापासही चालत असलेला प्रकार अन्यायाचा वाटला, परंतु त्याची पत्नी पूर्वीच परलोकवासी झाल्यामुळें त्यास कांहीं करतां येण्यासारखें नव्हतें; तेव्हां या मुलाला अगर त्याच्या बायकोला सहानुभूतीनें उत्तेजित करण्याऐवजीं धाकदपटशावरच वेळ मारून नेण्याचें त्यानें ठरविलें. त्या बाईला कंठ मोकळा करून आपल्या दुःखाचा उमाळा घालविण्यास साधन राहिलें नाहीं. असे कांहीं दिवस लोटले असतां, शेजारच्या घरांत राहणाऱ्या एका वेश्येचें व तिचें कँपाउंडाच्या भिंतीपाशीं संभाषण होण्याचा योग आला. हळूहळू परिचय वाढून फावल्या वेळांत त्या वेश्येच्या घरीं तिचें उठणेंबसणें होऊं लागलें. वेश्या नक्राश्रु ढाळण्यांत पटाईत होती. हिच्या ध्यानांत मात्र तिचा अंतःस्थ हेतु कांहीं काळपर्यंत आलेला नव्हता.

हिचें हें वेश्येच्या घरीं जाणेंयेणें कांहीं प्रसंगानें सासऱ्याच्या कानीं आलें व त्यास मोठा विचार पडला. त्यानें आपल्या चारही मुलांस एकत्र बोलावून त्यांचा विचार घेतला. एक म्हणाला "कसली आली आहे हिची मातबरी! गेली तर काय इकडे ओस पडणार आहे!" बाप म्हणाला, "असें कसें म्हणतोस! तिच्यापरी तिचा घरास उपयोग होत आहे. स्वयंपाकाचें सोडाच, पण परवां तिजोरीच्या खोलीवर दरोडेखोरांचा हल्ला झाला, तेव्हां कोयती घेऊन बिनधोक चोरांच्या अंगावर चालून जाणारी ही व शकुन्तलाबाई अशा दोघीच निघाल्या. नाहीं तर प्राणहानि आणि द्रव्यनाश यांचा केवढा अनर्थ त्या दिवशीं कोसळला असता, याची तुला कांहींच कल्पना होत नाहीं हें कसें!" दुसरा मुलगा म्हणाला, "आपण गांवच्या पाटलास बोलावून त्या वेश्येस तंबी देऊं या व हिचें तिच्याकडे जाणें बंद करून, इतउपर ती तिकडे जाण्यास न धजे असें करूं या." बाप म्हणाला, "हें कांहीं मला शक्य दिसत नाहीं. ती जाणारीच झाली, तर तिला कसा आळा घालतां येईल! ही स्वतः मनाची खंबीर असेल तर केव्हांही फुसलावणीस हार जाणार नाहीं. पण तसें झालें, तरी तिच्या कौटुंबिक उपयुक्त-

तेचा व आम्हांकडून तिला मिळणाऱ्या अन्यायाच्या वागणुकीची सुसंद्धता आमच्या सदसद्विवेकबुद्धीशीं आम्हांस कशी पटवितां येणार ? बरें, ही गेली तर नवऱ्यासही घेऊन जाईल; म्हणजे कुटुंबांत फाटा-फूट होऊन शकलें पडण्यास सुरुवात होईल. याकरितां ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें ज्यास त्यास गौरव मिळाला, तर सर्व नेमलेलीं कामें नियमित होऊन कुटुंबाचें पाऊल झपाट्यानें पुढें पडतें. त्याचा जोमदारपणा वाढतो व भोंवतालच्यांना वचक बसून राहतो. फाटाफुटीच्या गोष्टी ह्या केव्हांही त्याज्य होत, हें मी तुम्हांस लहानपणींच लांकडाच्या जुडीची गोष्ट सांगून शिकविलेलें आहे. शिवाय कष्टाळू माणसाच्या अंगीं काटकपणा जास्त असतो. ज्याचास कंटाळून पाकसिद्धीच्या आपल्या क्षेत्रांत पाय टाकण्यास इतरांस मज्जाव करण्यासाठीं पाकशाळेच्या दारावरच सज्ज होऊन ती उभी राहिल्यास तिला दूर लोटून आंत शिरण्याचें तुमच्या अंगांत सामर्थ्य आहे काय ? परंतु आजपर्यंत तुच्छता दाखविण्याची तुम्हांस पडलेली संवय दूरदर्शित्व, शहाणपणा, सौजन्य, सहानुभूति यांच्या प्रभावाखालीं टाकून देऊन तिला जवळ बसावयास बोलावणें, मनमोकळेपणानें तिच्याशीं बोलणें, तिला समतेनें वागविणें, तिला तिच्या अवघड कामांत हातभार लावणें, इत्यादि वागणुकीच्या प्रकारांचें अवलंबन करण्यासाठीं तुम्हीं आपल्या बायकांस सल्ला दिल्यास, थोड्याच दिवसांनीं तिची योग्यता काय आहे याची तुम्हां-आम्हांस जाणीव होईल. तुम्हां बंधुवर्गांपैकींच एकाची ती बायको असतांना तिच्याच वांट्यास घरांतील कमी दर्जाचीं कामें आम्ही डोळेझांक करून घातलीं व उलट तीं कामें ती मुकाट्यानें करते याबद्दल तुच्छता दर्शवितों यापेक्षां आणखी मुरदाडपणा कोणता राहिला ! उद्यां ती व तिचा नवरा हीं फुटून गेलीं म्हणजे हाच प्रकार बाकी राहिलेल्या तीन भावांत होणार. एवंच फाटाफूट ! फाटाफूट ! हा विचार माझ्या मनांत येऊन मी रात्रंदिवस कष्टी असतों. ती कुलीन घराण्यांतील मुलगी असल्यामुळें कोणाच्या फुसलावणीस बळी पडणार नाहीं, अशी मला खात्री आहे. तरी सुद्धा कुटुंबांतील परस्परांचें जीवित्व हरउपायानें सुखमय करण्यास झटल्यानें एकमेकांची ममता वाढते व तेंच दुःखमय करण्यानें वैरभाव वाढतो; तर मग पुढें काय करावयाचें, हें आपणच ठरवावयास नको काय ? व आपलें कर्तव्य काय हें आपणास स्पष्ट दिसत नाहीं काय ! ”

यापुढें आणखी संभाषण वाढलें नाहीं. ती मुलगी कुलीनच ठरली. वेश्येच्या कावेबाजीचा तिच्यावर परिणाम होऊं शकला नाहीं. हळुहळू तिचें मन घरांतच रिझूं लागलें. कांसारदादांची कांकणें भरण्यासाठीं पुनः खेप झाली, तेव्हां त्यास झीज सोसण्याचा प्रसंगच आला नाहीं. घरांत काम करतांना, फिरावयास जातांना, देवदर्शनास जातांना, समारंभांत बसतां-उठतां यमुना, त्रिवेणी, शकुन्तला, व कालिंदी ह्या एकत्रच दिसावयाच्या. घरांत पूर्वी कधीं न डोकावलेलें वेड फार दिवस न टिकतां मावळलें व आपल्या पोरांची नीट समजूत पडली हें पाहून म्हाताऱ्यालाही समाधान वाटलें. वेश्येचें तोंड आंबट झालें. ज्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना या फाटाफुटीची गुणगुण कळली होती त्यांनीं म्हाताऱ्याचें अभिनंदन केलें. त्याच्या पुरातन कुटुंबावर आलेलें संकट टळलें, म्हणून त्यास धन्यवाद दिले. वैयक्तिक फायद्याच्या मोहास न भुलतां आपल्या कुटुंबाच्या लौकिकास जागा, असा त्यांनीं त्या म्हाताऱ्याच्या मुलांस उपदेश केला.

या गोष्टीनें आमचें हरिजनांशीं वर्तन, सनातनीयांची विचारसरणी, आर्य धर्माचें खरें स्वरूप, परधर्मीयांचे अंतःकरणांतील विचार, चिरस्थाईपणाची व सामर्थ्याची खरी कल्पना, हिंदूंच्या खऱ्या हिताचीं तत्त्वें, हरिजनांचीं व उच्चवर्णीयांचीं कर्तव्यें, सावधपणाची जरूरी, व्यवहारज्ञानाचें महत्त्व, प्रसंगावधान, प्रगल्भ विचारसरणीची जरूरी, आजकालचें वातावरण, इत्यादिकांसंबंधाची कल्पना वाचकांच्या मनावर पटविण्याचा यथामति प्रयत्न केलेला आहे. यांत म्हातारा हा सनातन हिंदुधर्म, सुना ह्या निरनिराळ्या ज्ञाती, त्यांचे नवरे हे त्या त्या जातीचे पुढारी अशा दृष्टीनें या गोष्टीतील पात्रांची सांखळी सोडवीत गेलें, म्हणजे अर्थ विशद होतो. ॲसेंब्लींत झालेल्या निरनिराळ्या वक्त्यांच्या भाषणावरूनही, हरिजनांचा प्रश्न आम्हींच सरकारची, कायद्यांची अगर इतर कोणाचीही मदत

नें घेतां, पण डोळे, डोकें आणि अंतःकरण हीं शांत व जागृत ठेऊन, तांतडीनें सोड-विण्याच्या तयारीस लागलें पाहिजे. ॲसेंब्लींतील चर्चेत हरिजनांचे एक पुढारी श्री. राजा, म्हणाले "We do not want separate temples nor do we wish to become Muslims. We belong to the Hindu society and would fight caste Hindus to the last and secure admission to temples" (आम्हांस शेजारीं शेजारीं निराळीं देवळें नकोत, आम्हांस मुसलमानही व्हावयाचें नाहीं. आम्हीं हिंदु आहोंत व व उच्च वर्णीयांशीं शेवटपर्यंत झगडून एकाच देवळांत देवदर्शन घेण्याचा प्रघात पाडूं.) राजांच्या या हिंदुत्वाच्या अभिमानाबद्दल त्यांचें सकौतुक कृतज्ञतापूर्वक अभिनंदन केलें पाहिजे. असा हिंदुत्वाचा पाया सर्वांस सर्वसाधारण असतां रूढीमुळें अस्पृश्यताविषयक समजुतींची खोल गेलेली पाळेंमुळें आम्हीं आपणच होऊन विवेकाच्या बळावर ढिलीं करून उपटून टाकून दिलीं नाहींत, तर हें काम सरकार किंवा कायदा यांना करावें लागणार! हा शहाणपणानें सोडविण्याचा प्रश्न आहे. हरिजनांचे, सनातनीयांचे व सुधारकांचे पुढारी यांनीं खुल्या दिलानें प्रश्न सोडविण्याच्या निश्चयानें एकत्र जमून तो समाधानकारक रीतीनें सोडवून हिंदु जात ही अजून विवेकापासून भ्रष्ट झालेली नाहीं, हें जगाच्या निदर्शनास आणलें पाहिजे.

"विवेकभ्रष्टांना भवति विनिपातः शतमुखः"

हें नेहमीं ध्यानांत बाळगून हिंदुसमाजाचें एक सामान्य सुद्धां शकल उडून जाऊं देण्यास तो तयार नाहीं, हें आपण कृतीनें दाखविलें नाहीं तर बारभाईच्या आप-सांतील चुरशींखालीं पेशवाई नाश पावल्याचें उदाहरण आपल्यापुढें आहेच.

मराठी ग्रंथ सं


# कामत आणि कंपनी.

## दोन हत्तीजवळ, गिरगांव बॅकरोड

आमचे दुकानीं नित्य लागणारीं सर्व तऱ्हेचीं धान्यें, नारळ, चहा, साखर, लोणी, तूप, सर्व प्रकारचें सामान, हिंग, केशर, सर्व तऱ्हेचे साबण वगैरे माल मार्केटभावानें घरीं पोंचविण्याची व्यवस्था केली आहे. मालाच्या चांगुलपणाविषयीं गिऱ्हाइकांनीं एकवार खात्री करून घ्यावी.

PHONE NO. 42476.

# ज्ञातिवृत्त

**धि रावबहादूर एस्. व्ही. राजाध्यक्ष गौड सारस्वत ब्राह्मण फॉरिन एज्युकेशन सोसायटी, मुंबई**—या संस्थेचा १९३३ सालचा रिपोर्ट आमच्या हातीं आलेला आहे. पेट्रन्स, फेलोज्, लाइफ मेंबर्स, सामान्य सभासद यांजकडून आलेल्या वर्गण्या व देणग्या यांजवर या संस्थेचा फंड उभारलेला असून, त्याची रक्कम आज सुमारें १ लक्ष साडेवीस हजारांपर्यंत गेलेली आहे. तीपैकीं सुमारें पांसष्ट हजार रुपये **श्रीयुत गणपतराव राजाध्यक्ष,** *I. C. S.*, यांनींच आपले वडील, रावबहादूर सखाराम विश्वनाथ राजाध्यक्ष, यांच्या नांवें दिलेले आहेत व या देणगीमुळेंच या संस्थेला प्रस्तुतचें नांव लाभलें आहे. या संस्थेस तूर्त ४ पेट्रन्स, २१ फेलोज, ८९ लाइफ मेंबर्स लाभले आहेत कायम फंडावर वार्षिक व्याज सुमारें सहा हजार रुपये येतें. सामान्य वर्गणीदारही आहेत.

दुसरी प्राप्तीची बाजू म्हणजे विद्यार्थ्यांकडून होणारी परतफेड. ती समाधानकारक रीतीनें वेळच्या वेळीं होत असते ही आनंदाची गोष्ट होय. परदेशाहून परत येणारे विद्यार्थी सुस्थितींत असतात हें एक वरील समाधानकारक स्थितीचें कारण असेल; पण विशेष बुद्धिमत्ता व उच्च मनोवृत्ति हीं कारणें सुद्धां जमेस धरून चाललें पाहिजे.

१९३३ सालीं सोसायटीनें रा. जी, सी. पालेकर, रा. एम्. एन्. हेबळे व डॉ. डी. व्ही. नाडकर्णी हे तीन विद्यार्थी मदतीसाठीं निवडून त्यांस अनुक्रमें ५०००, ३००० व २०७० रुपये मंजूर केले. याशिवाय यापूर्वी संस्थेनें ९ विद्यार्थ्यांस मदत केलेली आहे. केमिस्ट्री ( रसायनशास्त्र ) मायनिंग ( खननशास्त्र ), आय्. सी. एस, गणित, चित्रकला, आंकडेशास्त्र ( एकॉनमिक्स ), शारीशास्त्र ( सर्जरी ), उद्योगशास्त्र ( Technology ) या विषयांत विद्यार्थी प्राविण्य मिळवीत आहेत किंवा मिळवून आलेले आहेत. विशेष प्रामुख्यानें दिसून येणारी कर्तबगारी रा. आर. पी. कामत व रा. एस्. डब्लू. शिवेश्वरकर यांची होय. रा. कामत यांनीं लंडन येथील रॉयल ॲकॅडेमी ऑफ आर्ट्समध्यें हिंदुस्थानच्या दृष्टीनें 'न भूतो' अशा तऱ्हेचा विजय संपादून अत्युच्च पदकें व स्कॉलरशिपा मिळविल्या आहेत. याबद्दल उल्लेख मागील एका अंकांत आलाच आहे. थोडक्यांत लिहावयाचें, म्हणजे वरील ॲकॅडेमी सन १८६५ मध्यें स्थापन झाली, तेव्हांपासून आतांपर्यंत तिच्या सन्मानशिलेवर हिंदी गृहस्थाचें नांव कोरलें जाण्याचा हा **पहिलाच** सुयोग. रा. शिवेश्वरकर हे केंब्रिज येथील मॅथमेट्रिकल ट्रायपॉसमध्यें पास होऊन बी स्टार रँग्लर होण्याचा अत्युच्च मान त्यांनीं मिळविला, हें त्यांनाच नव्हे, तर संस्थेस व ज्ञातीसही भूषणावह आहे.

वरील सर्व विस्तारावरून संस्थेचें काम अभिनंदनीय रीतीनें चाललेलें आहे हें पाहून कोणासही आनंदच होईल. या संस्थेची उपयुक्तता उत्तरोत्तर अधिकाधिक विशद होईल अशी आम्हांस आशा आहे. संस्थेचे अध्यक्ष रा. रा. सीताराम सुन्दरराव पाटकर, बी. ए., एलूएल्. बी. सेवानिवृत्त हायकोर्ट जज्ज व उपाध्यक्ष रा. रा. गणपतराव सखाराम राजाध्यक्ष एम्. ए. ( कॅन्टब् ), बार-ॲट-लॉ, आय्. सी. एस्., जे. पी., एम्. एल्. सी. हे आहेत.

# सारस्वत ब्राह्मण समाज, मुंबई

( १ ) रविवार ता. २४ जून १९३४ रोजीं समाजगृहांत डॉ. भाऊ दाजी लाड पुण्यतिथि श्री. शंकर पुंडलिक वर्दे, B.A.,LL.B. यांच्या अध्यक्षतेखालीं साजरी करण्यांत आली. त्या समयीं श्री. स. ल. कापडी B. SC. यांचें व्याख्यान झालें व तदनंतर डॉ. भाऊ दाजी लाड बक्षिसफंडाचा अहवाल श्री. अ. ग. कमात, सं.चिटणीस यांनीं वाचून दाखविला. त्या वेळीं फंडामार्फत मागविलेल्या बक्षीसांचा निकाल खालीलप्रमाणें जाहीर करण्यांत आला.

**स्पर्धा नं. १:**—श्री. मंगेश द. नाबर, एल्फिन्सटन कॉलेज मुंबई; विषयः—New Currents in Modern Drama & its effects on Marathi Literature

**स्पर्धा नं. २:**—( १ ) कु.सरस्वती रा. तिनैकर, महिला विद्यालय, बेळगांव, विषयः- सन १८१८ पासून मराठी काव्याची उत्क्रांति.

( २ ) कु. अनसूया ना. गुणाजी, पुणें; विषयः— आजच्या तरुण पिढींतील गुणदोष.

नंतर अध्यक्षांच्या हस्तें श्री. नाबर यांना पहिलें बक्षिस रु. ४०चें देण्यांत आलें.

( २ ) सोमवार ता. १३, २०, २७ आगस्ट व ३ सप्टेंबर १९३४ रोजीं रात्रौ श्रावणमासानिमित्त श्री. श्रीपाद महादेव वर्दे, B.A.,LL.B. यांचीं निरनिराळ्या धर्मोवर प्रवचनें झालीं. प्रवचनांचे विषय चांगले असून ऐकण्यासारखे होते. प्रवचनांस इतर ज्ञातींतीलही लोक येत होते.

( ३ ) शनिवार ता. १८ आगस्ट १९३४ रोजीं सालाबादप्रमाणें श्रीसत्यनारायणाची पूजा होऊन कथेनंतर रात्रौ ९-३० वाजतां ह. प. देव यांचें कीर्तन झालें.

( ४ ) शनिवार ता. १ सप्टेंबर १९३४ रोजीं सायंकाळीं समाजगृहांत कै. न्या. का. त्रिं. तेलंग यांची पुण्यतिथि, सारस्वत ब्रा. समाज, गौड सा. ब्रा. मित्रमंडळ, कॅनेरा सा. असोसियशन, न्यू सारस्वत युनियन, सारस्वत ब्रा. सेवासंघ, दादर, सारस्वत हितवर्धक मंडळ, यांच्या विद्यमानें साजरी करण्यांत आली. सदरहू प्रसंगीं श्री. सी. सुं. पाटकर B. A., LL. B., माजी न्यायाधीश, यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. वसंतराव ना. नाईक, M. A. यांचें व्याख्यान झालें.

( ५ ) गुरुवार ता. १३ सप्टेंबर १९३४ रोजीं सायंकाळीं समाजगृहांत कै. डॉ. गो. कृ. भांडारकर यांची पुण्यतिथि श्री. शंकर पुं. वर्दे, B. A., LL. B. यांच्या अध्यक्षतेखालीं साजरी करण्यांत आली. त्या समयीं श्री. केशरीनाथ रा. सुखठणकर, M. A. यांचें व्याख्यान झालें.

( ६ ) रविवार ता. १६ सप्टेंबर १९३४ रोजीं सायंकाळीं श्री. स.सी.नाईक, B.A.,L.C.E.,B.SC. (Edn.),M.I.E. यांच्या अध्यक्षतेखालीं सा. ब्रा. समाजाची वर्षिक सभा भरण्यांत आली होती. त्या वेळीं सन १९३२ व १९३३ सालचा संयुक्त अहवाल पास करण्यांत आला व नंतर खालील निवडून आलेले नवीन अध्यक्ष, व्य. मंडळ, व हिशेबतपासनीस जाहीर करण्यांत आले.

अध्यक्षः—सखाराम सीताराम नाईक B. A., L. C. E., B. SC. (Edn), M.I.E.

**व्य. मंडळः**—

(१) श्री. मि. सी. सबनीस, (२) श्री. नीलकंठ त्रिं. देसाई, (३) श्री. नि. बा. रांगणेकर, (४) श्री. अच्युत ग. कामत, (५) श्री. शांताराम वि. केंकरे, (६) श्री. अ. ना. रेडकर, (७) श्री. बा. ज. पुनाळेकर, (८) श्री. शंकर आ. वागळे, (९) श्री. स. ल. कापडी, (१०) श्री. ज. गो. वैद्य, (हवालदार), (११) श्री. बा. का. कंटक,

हिशेबतपासनीसः—(१) श्री. ज.पां. वेलिंगकर व (२) श्री. ज. पुं. नेरूरकर.

नंतर इतर वार्षिक कामें झाल्यानंतर सभा बरखास्त झाली.

# गेली बघ देवाघरिं ती !

( सारस्वत भगिनीकडून )

" पुस डोळे अश्रुहि हातीं । गेली बघ देवाघरिं ती ! "
ऐकतां बोल हे कानीं । मग बाळ वदे स्फुंदोनी,
" हें असत्य भाषण ऐसें । फसवितां मला कां वदुनी !
सत्याची चाडहि कांहीं । बाळगा जरा तरि स्वमनीं !
सांगोनी कांहींबाहीं,
फसवितां कसे लवलाहीं !
फसणार परी मी नाहीं !
तव बोल जरी ऐकविती । गेली बघ देवाघरिं ती ! १
" ही दृष्टि अंध का झाली । नोळखे मला मम माता !
ह्या इथेंच होती निजली । पाहिली नयनिं मी आतां !
परि असत्य बोलुनि तुम्हीं । खोटाच मला ठरवीतां !
हा असा पसारा येथें !
तो बाळ भुकेला तेथें !
टाकुनि कां जातां येतें ?
ऐकवितां वार्ता भलती । गेली बघ देवाघरिं ती ! २
" देवाला कधिंही जातां । बाळाला पाजिल आई !
घेईल कडेवरि त्याला । दाखवील आधीं गाई !
चिउमाऊ बोलावोनी । समजावुनि, तिटही लावी !
होतां अधि संध्याकाळ,
घेईल कडेवरि बाळ,
एकटी न कधिं जाईल !
मग बोल कसे फसवीती । गेली बघ देवाघरिं ती !
" बटवट कां ही तुमची । अधि निष्ठुर नाहीं आई !
तो बाळ रडतसा तेथें । ठेऊनि ही कसली घाई !
पुसल्याविण आम्हां सर्वा । सांगितल्याविणही कांहीं–
कां म्हणतां, ' दुरच्या गांवीं
तुज टाकुन गेली आई !
नच पुनः कधीं ती येई ! '
भलतेंच असें कां वदती । गेली बघ देवाघरि ती ! ४
" कधि जातां दुरच्या गांवीं तातपाट मांडुनि बोले,
' हा उशिर असे बहु झाला । दुध-भातच जेवा सगळे!
हा शर्ट; इथें ही टोपी । घे नको असे हे चाळे ! '
गाडी मग दारापुढती
येतांच, धरोनी हातीं,
उचलूनि मला बसवी ती !
मग उगाच कां हे म्हणती । गेली बघ देवाघरिं ती ! ५
हृदयातें भेदुनि वचनें । भाबडा चिमुकला जीव
मग दुडदुड धांवत जाई । जिथ वसे जिवाचा भाव !
पुसतसे बोबड्या बोलें । 'कां बाबा...आई...काय?'
पडतां ते वच कानीं,
भेदिलें जिव्हारीं कोणीं !
घेतले नयनही मिटुनी !
परि कानिं बोल ते रिघती । ' गेली बघ देवाघरिं ती!' ६
बोबड्या करुण बोलांनीं । भानावर वृत्ती आली !
मनिं तरंग उठती नाना । परि विचारतंद्री तुटली !
हृदयाशिं बिलगतां बाळ । तिथ स्थिरता त्यानें दिघली !
सद्गदला भरला कंठ !
भरला मग हृदयीं घट्ट !
भरलेच अश्रुनयनांत !
हृदयांत शब्द परि उठती । 'गेली बघ देवाघरिं ती !' ७

# सारस्वत दीनवत्सल संघ

## रौप्यज्युबिलीमहोत्सव

सारस्वत दीनवत्सल संघ या संस्थेचा रौप्यज्युबली-महोत्सव रविवार ता. ७ ऑक्टोबर १९३४ रोजीं दुपारीं स्टॅं. टा. ३॥ वाजतां ब्लॅव्हट्स्की लॉज ( फ्रेंच पूल ) मुंबई येथें श्री. गणपतराव सखाराम राजाध्यक्ष, एम्. ए. (कँटाब), बार.एट.लॉ,आय.सी.एस्.,जे.पी., एम्. एल्. सी. यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. समारंभासाठीं हॉल मोठ्या कुशलतेनें सुशोभित केला होता. प्रवेशद्वारांत दुतर्फा व्हॉलंटियर्सचा गार्ड आफ ऑनर् ठेवण्यांत आला होता. समारंभास सुमारें ८०० पेक्षां जास्त बंधु-भगिनी हजर होत्या. त्यांत श्री. बाजी विष्णु नेरुरकर, बी.ए., एलूएल्. बी., श्री. नीळकंठ आत्माराम शिवेश्वरकर, बी. ए., एल्एल्. बी., श्री. लक्ष्मीकांत शांताराम दाभोळकर; सॉलिसिटर सबनीस; सॉलिसिटर वामनराव शांताराम दाभोळकर, श्री. द. ग. दळवी, एम्. ए., एल्एल्. बी., श्री. बाळकृष्ण माणिकराव मुळगांवकर, बी. ए., एल्एल् बी., श्री. आर. आर. नाबर, बॅरिस्टर रेगे, श्री. मुर्डेश्वर, बी. ए., एल्एल्. बी., डॉ. भांगले, डॉ. आमोणकर, सॉलिसिटर रेगे, डॉ. सौ. मालिनीबाई सुखठणकर,एम्. बी.बी. एस्., जे. पी., श्री. लक्ष्मीबाई नाडकर्णी वगैरे व्यक्ति हजर असलेल्या मंडळींत दिसत होत्या. लहान मुलींच्या ईशस्तुतिपर व स्वागतपर अशा सुस्वर व गोड पद्यांनीं समारंभाच्या कार्यक्रमास सुरवात झाली. नंतर संघाचे अध्यक्ष श्री. भिकाजी सीताराम सबनीस, बी.ए.,एल्-एल्. बी. यांचें स्वागतपर भाषण झालें.त्यांनीं दुसऱ्या संस्थांकडून व हितचिंतकांकडून समारंभाबद्दल आलेले आनंदप्रदर्शक संदेश वाचून दाखविल्यानंतर संस्थेचे चिटणीस श्री. नीलकंठ त्रिंबक देसाई यांनीं संक्षिप्त रिपोर्ट वाचून दाखविला. त्यांत त्यांनीं गौड-सारस्वत ब्राह्मणांतील अनाथ, असहाय्य व असमर्थ अशा लोकांस सहाय्य करावें या हेतूनें ही संस्था १९०८ सालीं दसऱ्याच्या सुमुहूर्तावर स्थापन करण्यांत आली व संघानें गेल्या २५ वर्षांत केलेल्या उच्च कामगिरीचा निर्देश करून पहिल्या वर्षी संघाकडून फक्त रु. ७५ मदतीदाखल देण्यांत आले होते व गेल्या २५ वर्षांत संघाकडून मदतीदाखल ५५०००रुपयांवर खर्च करण्यांत आले, असें सांगितलें. नंतर त्यांनीं संघाचे अनेक सभासद व निरनिराळ्या स्वज्ञातींतील संस्था व त्याचप्रमाणें हितचिंतक सद्गृहस्थ व भगिनी, तसेंच संघाच्या कामास प्रसिद्धि देणारीं मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रें या सर्वांनीं समारंभ यशस्वी करण्यासाठीं निरनिराळ्या रीतींनीं निरपेक्ष मदत केल्याबद्दल संघातर्फे कृतज्ञता व्यक्त केली व संघावर सर्वांची कृपादृष्टि अशीच असावी अशी विनंती केली. नंतर श्री. बाजी विष्णु नेरुरकर, बी. ए., एल्एल्. बी., संघाचे एक ट्रस्टी, यांनीं गेल्या पाव-शतकांत संघाकडून जी ज्ञातीची उच्च दर्जाची सेवा झाली, तिचा उल्लेख करून सध्या मुंबईंतील खालावलेली सांपत्तिक परिस्थिति नसती तर संघाच्या हाकेला योग्य असें आर्थिक प्रत्युत्तर सर्वांकडून खात्रीनें मिळालें असतें असें सांगितलें. नंतर श्री. शंकरराव पुंडलिक वर्दे, बी. ए., एल्एल्. बी. यांनीं गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातींतील दीन लोकांना संघापासून झालेल्या फायद्याचें दिग्दर्शन करून कै. डॉ. शिरवळ-कर यांनीं आपल्या मिळकतीपैकीं पहिले ५०० रुपये संघास दिल्याचें अनुकरणीय उदाहरण सांगून स्वज्ञातीय बंधुभगिनींनीं त्यांचें अनुकरण केल्यास संघाचें कार्य सुकर होण्यास यत्किंचितही विलंब लागणार नाहीं, असें सांगून या परोपकारी संस्थेस सर्वांनीं मदत करावी अशी मोठ्या कळकळीनें विनंती केली.

नंतर डॉ. सौ. मालिनीबाई सुखठणकर यांनीं आपल्या ज्ञातींतील विपद्ग्रस्त भगिनींना संघाकडून कशी बहुमोल मदत होत आहे,हें थोडक्यांत सांगितलें. नंतर श्री. शिवराम नारायण रेगे यांनीं संघासारख्या उपयुक्त संस्थेची स्थापना होण्यास कोणकोणतीं कारणें झालीं, याविषयीं थोडक्यांत माहिती देऊन स्थापनेपासून ते आतांपर्यंत संघाकडून काय कामगिरी

झाली, याचें वर्णन केलें. नंतर श्री. लक्ष्मीबाई नाडकर्णी यांनीं ज्ञातींतील उच्च दर्जापासून ते अगदीं खालच्या दर्जापर्यंतच्या लोकांत आपसांत दळणवळण जास्त असण्याची जरूरी सांगून त्यापासून खालच्या स्थितींतल्या लोकांच्या कष्टप्रद स्थितीची कल्पना वरिष्ठ दर्जाच्या लोकांना पूर्णपणें येईल असें प्रतिपादन केलें. नंतर श्री. गणपतराव विश्वनाथ लाड, ऑर्टिस्ट यांनीं संघास बाल्यावस्थेंत कोणकोणत्या संकटांस तोंड देणें भाग पडलें तें सांगितलें व शिक्षणाच्या प्रश्नापेक्षां उपजीविकेचा प्रश्न आधीं सोडविला पाहिजे, असें प्रतिपादन केलें. नंतर श्री. सदानंद लक्ष्मण कापडी, बी. एस्सी. यांनीं संघाबद्दल जे निरनिराळे आक्षेप घेण्यांत येतात, त्यांना समर्पक उत्तरें देऊन स्वज्ञातींतील भगिनींना संघाच्या कार्यांत विशेष लक्ष घालून आपल्या धार्मिक प्रवृत्तीला जागृती देण्याची विनंती केली. नंतर समारंभाचे अध्यक्ष श्री. राजाध्यक्ष यांचें मननीय भाषण झालें. त्यांनीं आपल्या भाषणांत संघाच्या प्रगतीची प्रशंसा करून संघास सध्याची स्थिति प्राप्त होण्यास ज्या कार्यकर्त्यांचे व ज्या उदारमनस्क दात्यांचे हातभार लागले आहेत, त्यांचे आभार मानले व सध्याच्या चालू असलेल्या आर्थिक परिस्थितीमुळें, तसेंच एकत्र कुटुंबपद्धति हळूहळू नामशेष होत चालल्यामुळें अशा प्रसंगीं संघासारखी संस्था किती जरुरीची व उपयोगी आहे हें थोडक्यांत सांगून अपुऱ्या द्रव्यबळामुळें सत्पात्र अशा कित्येक अर्जदारांना नाइलाजामुळें मदत नाकारणें भाग पडतें असें सांगितलें.संघ ही एक ज्ञातिहिततत्पर संस्था आहे, असें कदाचित् कोणी म्हणेल; परंतु अशा प्रकारचा आरोप आपल्या संघास लागू नसून संघ ही ज्ञातीच्या स्वावलंबनाचें एक उदाहरण आहे व दुसऱ्या ज्ञातींच्या हितसंबंधांच्या आड अशी संस्था कधींही येत नाहीं, याविषयीं मोठें खुलासेवार प्रतिपादन केलें. संघास पुरेसें द्रव्यबळ मिळाल्यास पुष्कळ ठिकाणीं शाखा उघडून याहीपेक्षां जास्त ज्ञातीची सेवा करण्यास संधि मिळेल असें सांगून सर्व लोकांस संघाच्या कार्यास शक्य तों हातभार लावण्यास विनंती करून आपलें भाषण पुरें केलें.

नंतर श्री. शंकरराव पुंडलिक वर्दे यांनीं संघास नवीन देणग्या देणारांचीं नावें वाचून दाखविलीं व ज्युबिली समारंभनिमित्तानें संघास ३००० रुपयांच्या देणग्या, २ पेट्रन, ७४ तहाहयात सभासद मिळून एकंदर रु. ११७००च्या देणग्या मिळाल्याचें सांगितलें. तसेंच श्री. विष्णु जनार्दन शिरोळकर यांच्या व्यवस्थापत्राप्रमाणें संघास सुमारें १४००० रुपये या आठवड्यांत मिळतील व यामुळें संघाचा कायम निधि **एक लक्ष** रुपये झाल्याचें जाहीर केलें.

नंतर श्री. ग. प. मुर्डेश्वर यांनीं अध्यक्षांचे आभार मानून मुलींच्या सुस्वर गायनामध्यें अध्यक्षांना पुष्पहार अर्पण केले. आभारगीत व राष्ट्रगीत झाल्यावर महोत्सवाच्या आनंददायक समारंभाचें काम संपलें. नंतर उपाहार व चहापान होऊन, मंडळी मोठ्या उल्हसित मनानें आपापल्या घरीं गेली.

# शोचनीय निधन

**कै. विनायक दत्तात्रय कामत,** बी. ए., एल्एल्. बी., ॲडव्होकेट, यांचें निधन गुरुवार ता. ४ आक्टोबर रोजीं परळ, मुंबई येथें झालें. कै. कामत यांचा जन्म वेंगुर्लें येथें एका खानदानीच्या कुळांत झाला. इ. स. १९०७ सालीं त्यांनीं वकिलीच्या धंद्यास सुरुवात केली. लवकरच ते एक हुशार वकील म्हणून प्रसिद्धीस आले. त्यांचा स्वभाव मनमिळाऊ व प्रेमळ असून त्यांची वृत्ति सदैव आनंदी असे. त्यांना वङ्मयाची फार आवड असे. त्यांच्या निधनामुळें त्यांचा एकुलता मुलगा व अनेक मित्रमंडळी शोकार्त झाली आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो.

# मुंबईत संस्थांसाठीं इमला

सारस्वत ब्राह्मणांच्या अनेक संस्था आज मुंबईत असून हिंदुस्थानभर विखुरलेल्या महाराष्ट्र सारस्वत ब्राह्मणांना या संस्थांचा उपयोग होत आहे. **सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी** आणि **सारस्वत दीनवत्सल संघ** यांचा सर्व समाजाला कसा व किती उपयोग होत आहे तें सांगावयास नकोच. याशिवाय **सारस्वत कोऑपरेटिव बँक, महाराष्ट्र सारस्वत-द्वैमासिक**, आणि **सारस्वत ब्राह्मण समाज** या सर्व संस्थांच्या कचेऱ्या आज एकत्र असून या समवायामुळें किती तरी प्रकारच्या सोई झाल्या आहेत. निरनिराळ्या संस्थांचे सभासद, त्यांच्या कार्यकारी मंडळांतील कार्यकर्ते, त्यांची कळकळीनें विचारपूस करणारे हितचिंतक अशा अनेक माणसांच्या गांठी घडून येणें सोईस्कर होतें. निरनिराळ्या संस्थांना एकमेकांच्या कार्याची माहिती आपोआप कळते. कर्तबगार अशा माणसांना अनेक संस्थांतून प्रत्यहीं काम करणें सोपें होतें. प्रत्येक संस्थेच्या महत्त्वाच्या कार्यांत इतर संस्थांची मदत सहजच मिळते. निरनिराळ्या संस्थांना आपापले महत्त्वाचे समारंभ एकमेकांच्या आड न येतां साजरे करतां येतात. निरनिराळ्या संस्थांच्या नजीक असण्याचा अशा रीतीनें ज्ञातिसमाजाला उपयोग होतो.

या निरनिराळ्या संस्थांकडून दरसाल सुमारें बाराशें रुपये भाड्यादाखल खर्च करावे लागतात. उदार माणसांनीं स्वकीय समाजाच्या उपयोगासाठीं केलेल्या आर्थिक सहाय्यांतून ही रक्कम खर्च होते. स्वज्ञातीच्या सार्वजनिक मालकीची इमारत असल्यास हा खर्च हल्लींप्रमाणें व्यर्थ न जातां अन्य प्रकारें आपल्यासच उपयोगी पडेल.

सार्वजनिक संस्थांना उपयोगी पडावी अशी स्वज्ञातीच्या मालकीची मुंबईत इमारत असावी यासाठीं सारस्वत ब्राह्मण समाजाची धडपड गेल्या चार-सहा वर्षांत एकसारखी चालू आहे. परंतु हल्लींच्या मंदावलेल्या आर्थिक परिस्थितींत समाजाच्या प्रयत्नांस म्हणण्यासारखें यश आलेलें नाहीं.

मुंबईसारख्या शहरांत हक्काची इमारत असल्याखेरीज कोणतीही संस्था चिरस्थायी होईल अशी शाश्वति नाहीं. तशांत सुदैवानें अनेक संस्थांच्या कचेऱ्या एकत्र असण्याचा जो योग गेल्या कांहीं वर्षांत लाभला आहे, तो अशा इमारतीच्या अभावीं कायम राहील असा संभव नाहीं.

समाज आणि बँक या संस्थांचे व्यवसाय अशा प्रकारचे आहेत कीं, त्यांच्यासाठीं जागेची नेहमीं आवश्यकता असते. अर्थात सारस्वत ब्राह्मण समाज या संस्थेला अशा इमारतीची जास्त चुटपुट लागून




शतावरी कॉर्डियल

REGD.

THE BEST UTERINE TONIC

स्था:—डॉ. कुळकर्णीज लेबोरेटरी मुंबई नं. १९

त्या संस्थेनें इमारत मिळविण्याच्या प्रयत्नांस सुरवात करावी हें साहजिक आहे. परंतु हें कार्य केवळ सारस्वत ब्राह्मण समाजाचें आहे असें न मानतां इतर संस्थांनींही त्या कार्यासाठीं हातभार लावण्याची शक्य तितकी खटपट केली पाहिजे. आमच्या देवळांच्या ट्रस्टींनीं मनावर घेतलें तर निरनिराळ्या संस्थांसाठीं हलक्या भाड्यानें गिरगांवसारख्या मध्यवस्तींत सारस्वतांच्या सार्वजनिक मालकीचा इमला हातोहात तयार होईल. परंतु या कार्यांतील अडचणींचाच बाऊ करण्याकडे ट्रस्टींचा आजवर कल असून त्यांची या बाबतींतील मनोभावना बदलण्याची शक्यता अद्याप दिसून येत नाहीं. अशा परिस्थितींत समाजानें चालविलेल्या खटपटीलाच मुंबईंतील व मुंबईबाहेरील स्वज्ञातियांनीं सढळ हातानें मदत केली पाहिजे. इमारत बांधण्यासारखें काम मुख्यतः स्वकीयांपैकीं धनिक आणि संपन्न यांचें होय. मुख्य मदार त्यांच्या सक्रिय सहानुभूतीवर आहे, हें केव्हांही खरें आहे. तथापि मध्यम वर्गातील माणसांनाही या कार्याला यथाशक्ति महत्त्वाचा हातभार लावतां येतो; व त्यांच्या मदतीचा उपयोग पुष्कळच होतो हें गेल्या पंधरा वर्षांतील निरनिराळ्या फंडांच्या इतिहासाकडे पाहिल्यास दिसून येईल. आज सुमारें चाळीस वर्षें स्वज्ञातींत कार्य करणाऱ्या संस्थेकडून जमविल्या जाणाऱ्या फंडाचा उपयोग यथायोग्यच होईल, हें उघड दिसतें. म्हणून सारस्वत ब्राह्मण समाजाच्या वतीनें करण्यांत येत असलेल्या विनंतीला सर्व ज्ञातिगृहस्थांनीं उदार हस्तें मान्यता द्यावी असें आम्हीही आग्रहानें सांगतों.





कै. श्री. वामनराव रा. केरकर



कै. श्री. दिनकरराव स. वर्दे



कै. श्री. अनंतराव आ. मोरमकर



कै. श्री. विनायकराव दा. कामत

# प्रातःसंध्या !

बालार्काची शोभा पसरे सभोंवार भूवरी !
संपली प्रिये पहा शर्वरी !
गवाक्षांतुनी किरण फांकले रुचिर कपोलावरी !
रवी कां स्थिर निज आसन करी ?
चित्र मनोहर कल्पुनि त्यातें गोड रंग अति भरी !
तयाची जादुगारि ही खरी !
कां सखे अहा हें स्मित वदनीं गोडसें ?
भावना उसळुनी करित मला गे पिसें !
हृत्फलकावरि कोरलें चित्र मधुरसें !
मोद मनीं दाटला ? कां सखी स्वप्नसुखीं रंगली ?
कां गडे कुंदकळी विकसली ?
प्रबल नरातें मोहविण्याला वाटे स्त्री जन्मली !
कुणीं तिज अबला संबोधिली ?

—नीरा.

# मिश्रविवाह

लेखक:—'संजीवक'

संपादकीय वृत्तांत लिहिल्याप्रमाणें सारस्वत लेखकांची 'महाराष्ट्र सारस्वता'बद्दलची इयगय, किंचित् मिश्रविवाहासारख्या महत्त्वाच्या प्रश्नांची विषयसंबद्ध भानगड (Controversy) आणि कांहींसा न रुचणारा मतभेद इत्यादि कारणांच्या पोटीं ह्या लेखाचा जन्म झालेला आहे.

हातीं घेतलेला प्रश्नच असा आहे कीं, त्याची व्याप्ति खात्रीनें बरीचशी बऱ्याचशा समाजाच्या बाहेर जाऊं शकते. अर्थात् अशा वाग्युद्धाच्या बुडाशीं काय आहे, हें कोणीही पाहिलें नाहीं. प्रस्तावना करतानां श्री. वर्दे यांनीं त्याचा ओझरता उल्लेख केलेला आहे. राष्ट्रहिताच्या दृष्टीनें पाहिला, तर मिश्रविवाह हा निर्विवादित जरुरीचा आहे आणि त्याच्याचसाठीं त्या प्रथेचा जन्म झाला आहे. मग जातिहिताचा प्रश्न राहिला कुठें? आपलें अंतिम ध्येय काय? तुम्ही म्हणाल, आपापल्या समाजाची उन्नति केली म्हणजे मग राष्ट्रीय कार्याचा बोजा कसला? बरोबर आहे; पण अशा उपयोगी उपायांना खो घालण्यांत आला, तर तो समाजोन्नतीस पोषक कसा होणार?

बरें! पण आपण आतां तो ज्ञातिहिताच्या दृष्टीनें इष्टानिष्ट आहे किंवा काय तें पाहूं. ज्ञातिहिताचा अगोदर अर्थ काय? ज्ञातिहित--जातिविस्तार, सुसंस्कृतता आणि ज्ञातिहितबलवर्धक कार्यें असा त्यांत समावेश होईल. स्वज्ञातींतील तरुणांनीं परजातींतल्या तरुणींशीं लग्नें केलीं, तर त्यांत आपल्या ज्ञातिहिताचा विशेष तोटा झाला असें मला वाटत नाहीं. उगाच कांहीं लडबड्या लोकांच्या वाक्पांडित्यामुळें ते गाजले आणि पुनः सामसूम. पण स्वज्ञातींतील तरुणींची परज्ञातींतील तरुणांशीं लग्नें झालीं, म्हणजे मग ज्ञातिहिताला जरा कां, बराचसा धक्का पोंचतो. अर्थात् सारस्वत तरुणी ज्याबरोबर लग्न करतात, त्याचा धर्म स्वीकारावा लागून अखिल सारस्वत ज्ञाति त्यांनाच नव्हे, तर त्यांच्या बऱ्याचशा भावी संततीला मुकत असते, आणि अशा रीतीनें ज्ञातिविस्तार बराचसा खुडत असतो. (माझे मित्र संततिनियमनाचा प्रश्न विचारांत घेतील असें वाटत नाहीं.) तेव्हां खरोखर ज्ञातीचें हित पाहावयाचें झालें, तर आपल्या जातींतील तरुणींना स्वज्ञातीच्या तरुणांशीं लग्न लावून देण्याची 'सोय' करणें आवश्यक आहे. 'सोय' हा शब्द मी मुद्दाम वापरतों. कारण श्री. वर्दे यानीं त्याला आपल्या ज्ञातींतील तरुणतरुणींना आपल्या पालकाच्या देखरेखीखालीं परिचय करुन देण्याची तोड सुचविलेली आहे. ते म्हणतात, "मुंबईसारख्या शहरांतील कॉलेजांत जाणाऱ्या मुलींची समवयस्क अशा अन्य जातीच्या सहाध्यायी मुलींशी मैत्री जडते. त्या मुलीचे भाऊ, आप्त, स्नेही यांच्याशीं त्यांचाही परिचय जडतो." हें जरासें एकपक्षीय असल्यामुळें स्पष्टीकरण करावेंसें वाटतें. पहिल्या प्रथम कॉलेजांत जाणाऱ्या सारस्वत कुमारिकेला आपल्या जातीपेक्षां अन्य जातींतल्याच जास्त कुमारिका मैत्रिणी मिळूं शकतात हें आश्चर्य आहे. सध्याची स्थिति पाहतां श्री. वर्दे तेथें स्वमतौघाबरोबर वाहिले गेल्याचा भास होत आहे. अर्थात् आपल्या जातींतील कुमारिकेला आपल्याही मैत्रिणी मिळूं शकतात. पण समजा, तशी स्थिति नसली, तर आपल्या अन्य जातींतील मैत्रिणींच्या नातेवाइकांशीं परिचय करणारी सारस्वत कुमारिका खुद्द कॉलेजांत असणाऱ्या आपल्या सहाध्यायांशीं आणि इतरत्र संबंध येणाऱ्या तरुणांशीं मैत्री केल्याशिवाय राहील काय? आणि जरी दुसऱ्या एखाद्या जात्यन्य तरुणाबरोबर एखाद्या तरुणीनें विवाह केला, तरी तो क्षम्य ठरेल व समाजानेंही त्यांत लक्ष देण्याची गरज नाहीं. कारण, विवाह ही सुसंस्कृत, स्वतंत्र व स्वयंप्रेरित स्त्रीची व्यक्तीविषयक खासगी बाब आहे. आणि त्याला अडथळा करणें-शक्यतेच्या

बाहेर आहे. ज्ञातिहित पाहातांना ' शक्य ' तेवढेंच पाहावयाला पाहिजे.

श्री. वर्दे यांचें 'वडील माणसांच्या नजरेखालीं' सारस्वत तरुणतरुणींचा परिचय व्हावा असें मत आहे. 'नजरेखालीं' याचा अर्थ काय ? त्यांचें म्हणणें असें असेल कीं, त्यांचे व्यवहार त्यांच्या कानावर पडावे. असें जरी असलें, तरी खुद्द त्या तरुणतरुणी आपापल्या वडिलांच्या कानांवर आपापले व्यवहार घालतील हें सिद्ध होत नाहीं आणि घातले, तरी ते त्याला विचारपूर्वक संमति देतील असें नाहीं, आणि त्याचा परिणाम एकमेकांचीं मनें कलुषित होतील. अर्थात् ती बातमी 'वाऱ्यावरची' म्हणून त्यांच्या कानावर आदळणार झालें! तर मग जेव्हां त्या सारस्वत तरुणी अन्यजातींतल्या पुरुषांशीं संबंध ठेवणार तेव्हां ती बातमी त्यांना लागणें शक्य नाहीं का ? —कारण 'चांगल्या बातमीपेक्षां वाईटालाच लवकर पाय फुटतात ! '

वरील सर्व कारणें जरी सारस्वत तरुण तरुणींना एकत्र मिसळण्याची संधि देण्याकडे पोंहचत असलीं, तरी पुढें जाणाऱ्याचे पाय मागें खेचण्याची वृत्ति असलेल्या कित्येक '( अ ) विचारी टीकाकारां'चे उपद्व्याप ह्या शुभकार्याला अपशकुन करीत असतात. तेव्हां निरनिराळ्या सभांतून अगर समारंभांतून तरुण-तरुणींना एकत्र येऊं देण्याचा तोडगा सुचविण्यापेक्षां आपले कांहीं 'सारस्वत बब्रू' ह्यावर उपरोधिकपणें पाहण्याची दृष्टि टाकून देतील तर बरेंचसें कार्य होणार आहे.

हुंडा घेण्याचा परिणाम म्हणजेच मिश्रविवाह, असेंही कित्येकांनीं प्रतिपादिलेलें आहे. हुंड्याच्या चालीसंबंधानें लिहितांना श्री. तेलंग म्हणतात, ' कित्येकांवर तिनें उपकार केलेले आहेत' हो ! तिनें उपकार केलेले आहेत, पण ती ज्ञातीची सुसंस्कृतता दडपून ठेवण्याचे ! कारण समजा, हुंडा देण्याची एखाद्या सारस्वत बापाला ऐपत नसली तर साहजिकच तो कर्ज काढून तो मुलीला 'उजवण्याचा' प्रयत्न करतो. पण तें कसाबाच्या करणीसारखें नाहीं काय ? त्याला तें कर्जच काढावयाचें असेल, तर तें खुशाल त्यानें काढावें, आणि मुलीच्या हुंड्याऐवजीं मात्र तिला सुशिक्षित व सुसंस्कृत बनवावें. मुलगी आपल्या घरीं अविवाहित राहिली, म्हणून त्यांत काय दूषण आहे काय ? आपले लोक तिच्या पालनपोषणाचा खर्च पडणार म्हणून नव्हे, तर ती घरीं राहून अनीतिकडे खेंचली जाईल म्हणूनच चिंतामग्न होत्साते दुःखार्णीत होरपळत असतात. पण खरोखरच जर ती शिकविली गेली, तर आपोआपच तिच्या वाढत्या व्यापांत तरुणांचा तिच्याशीं जास्त संबंध येऊन लग्नाला अधिक सुलभता येईल आणि समाजांतील सुसंस्कृततेचें प्रमाण खात्रीनें वाढेल.

स्त्रीपुरुषांच्या होऊं घातलेल्या ह्या एकीकरणाच्या मूळांतच अगोदर काय गोष्ट आहे हें आपण आतां पाहूं. अर्थात् तें पाहतांना आपण "सध्यांचे तरुण स्त्रीपुरुष' धरूं. शाळेंत अगर कॉलेजांत आहे काय ? तेथें सहशिक्षण आहे, सहसंभाषण आहे, सर्व कांहीं आहे. पण ते स्त्री आणि पुरुष ह्या जणूं कांहीं दोन भन्न भिन्न ज्ञातींचे आहेत आणि त्या प्रत्येकानें आपापल्या जातीव्रीदाला एकनिष्ठ राहिलें पाहिजे, ह्या रीतीनें तेथें वागत असतात, ( हें फक्त सारस्वतांपुरतें नसून सर्वसाधारण रीत्या ) म्हणजे लिंगभिन्नत्वाच्या (Sex difference ) च्या दोन बाजू त्या त्या बाजूच्या योध्यांकडून लढविल्या जात नाहींत काय ? म्हणून हा सहशिक्षणाच्या मूलतत्त्वावर 'मुले कुठारः' घाव बसून सध्यांच्या विकृत स्वरूपानें, वस्तुस्थिती सुधारणेसाठीं टाहो फोडीत आहे. तर हे प्रकार शक्य तेवढे कमी करण्यासाठीं वाङ्मयिक चर्चा बरीचशी उपयोगीं पडेल यांत शंका नाहीं. प्रस्तुतसारख्या वाङ्मयवादामुळें बऱ्याचशा चुका सुधारल्या जातील असें वाटतें म्हणून ' महाराष्ट्रसारस्वत' ह्याहीपेक्षां ह्या व इतर ज्ञातिजिव्हाळ्याच्या प्रश्नांस जोरानें चालना देऊन ज्ञातीचें व पर्यायानें देशाचें हित साधण्याचे श्रेय घेईल अशी आशा बाळगतों.

# कचकर्तन

( लेखक:—कु. **नीरा मोडकर**, बी. ए., बी. टी. )

मनुष्यस्वभावाचें यथार्थ चित्र रेखाटणारा म्हणून शेक्स्पिअरची ख्याति आहे. त्यानें म्हटलें "Frailty thy name is woman."स्त्री ही चंचल आहे!विलायती शेक्स्पिअरला हिंदुस्थानांत मनू भेटला.मनूही त्याच मताचा असल्यामुळें कडक नियमांचीं बंधनें त्यानें सर्व स्त्रियांवरच लादलीं. अशा महाजनांच्या पावलांवर पाऊल टाकून इतरे जन गेले नाहींत, तरच नवल! जो उठला तो स्त्रीजातीला चंचल म्हणायला तयार! कारण काय, तर तिला बदल करण्याची हौस वाटते म्हणून! चंचलपणाचा आरोप स्त्रीजातीवर तेवढा करणें योग्य कीं अयोग्य हें पाहतें कोण? या जगांत चंचल नाहीं असें काय आहे? स्थित्यंतर होत जाणें हा सृष्टीचा धर्म आहे. मनुष्याची उत्पत्ती माकडापासून आहे असें म्हणतात. ह्या स्थित्यंतराच्या अभावीं मनुष्याच्या ऐवजीं सर्व माकडेंच माकडें दिसलीं असतीं. अशी ही अचल माकडसृष्टि मोठी अजब वाटून देवांनींही स्वत:ची तारीफ केली असती काय? खाद्यपेयांमध्यें सुद्धा फरक होत गेलाच पाहिजे. एकाच तऱ्हेचें अन्न मनुष्य रोज खाऊं लागला, तर तें बाधल्याशिवाय राहणार नाहीं, निदान त्याचा वीट तरी येईल.

चंचलपणा म्हणजेच फरक, बदल, स्थित्यंतर! थोडक्यांत सांगायचें म्हणजे नावीन्य आणि नावीन्य हें सर्व सुधारणेचें मर्म! अंधानुकरण करून जुन्याला चिकटून बसलें तर प्रगतीचें मूळच खुंटलें. मुलाची अर्भकावस्था तशीच अचल राहिली, तर बाल्य, तारुण्य व वृद्धावस्था हें स्थित्यंतर न होतां प्रत्येकाला पाळण्यांतूनच स्मशानाचा प्रवास करावा लागता! नुकत्याच जन्मलेल्या कोवळ्या अर्भकाला प्रेमानें गोंजारणारी त्याची आई 'माझा छबडा रांगेल केव्हां? बोबडे बोल ऐकवील केव्हां? चालण्याची लाडकी ऐट दाखवील केव्हां?' म्हणून उत्कंठित झालेली असते. ती आपला बाळ चंचल व्हावा म्हणून काय? वयपरत्वें येणारा देहाचा व मनाचा चंचलपणा आवश्यक नाहीं असें कोण म्हणेल?

विकास हा चराचरसृष्टीचा आत्मा आहे. तो नसेल तर सृष्टीचें सर्व सौंदर्य लोपलेंच म्हणून समजावें! सूर्य अचल नाहीं; पृथ्वी स्थिर नाहीं; तारे देखील गरगर गिरक्या घेतात; 'सर्वच चंचल' असें खगोलवेत्ते सांगतात. कळींतून फुलांचा विकास होईल, तेव्हांच तो सर्व जगाला हंसवील, गुंगवील व रमवील. दरींखोरीं, पर्वत व नद्या हीं सर्व अचल वाटतात,तशीं तीं खरोखर नाहींत. निसर्गाला चंचलतेची आवड म्हणून धरणीकंप होतात. खंडें दुभागतात; नद्यांचे प्रवाह फिरतात; तान्हीं मुलें हालचाल करतात आणि माकडांचीं माणसें बनतात.सूर्य एकनिष्ठपणानें एकाच जागीं चिकटून राहिला असता तर कोण भयंकर आपत्ति कोसळली असती! त्याचा तो गुण गणला असता. पण त्याचें कौतुक करणाऱ्या माणसांचे उन्हानें काळे कुळकुळीत कोळसे बनतील, त्याची वाट काय? निसर्गामध्यें कोठेंही एकनिष्ठपणा आढळत नाहीं. आणि म्हणूनच अप्राप्त वस्तूच्या महत्त्वाप्रमाणें त्याचें महत्त्व वाढलें आहे व एकनिष्ठपणाचें मोठें स्तोम माजलें आहे. निसर्गामध्येंही न आढळणारा हा गुण मनुष्यप्राण्यांत क्वचितच दिसला, तर त्यांत मोठेंसें नवल नाहीं. एकनिष्ठपणानें जगाला आदर्श होणाऱ्या रामानें पुढल्याच अवतारांत चंचलपणाची कमाल करण्यांत कमीपणा मानला नाहीं. रामाच्या धीरगंभीर वृत्तीशीं कृष्णाच्या उनाड, खेळकर, पोरकट वृत्तीचा किती तरी विरोध दिसून येतो. हे दोन्ही विष्णूचेच अवतार! त्याला स्वत:च्या वृत्तींतला फरक रुचला आणि पचला.रामावताराच्या एकनिष्ठेचा विकास कृष्णावताराच्या चंचलपणानें झाला, यावरून काय समजावें? धर्म हा मानवांचा आधार असें आमचे धर्मगुरू सांगतात; पण धर्मविषयक मतें तरी ठाम राहिलीं आहेत, असें नाहीं; कालमानाप्रमाणें तीं बदलत जातात. मुंडण करून अरण्याचा रस्ता धरला, कीं मोक्ष सुलभ झालाच असें जुनें मत होतें; पण आतां लोकसेवा हा मोक्षाचा मार्ग ठरला आहे. चार आश्रमांपैकीं दोन खंगत जाऊन आतां दोनच उरले आहेत, असें म्हणायला हरकत नाहीं. मोक्षाची कल्पना आतां निराळ्याच तत्त्वावर येऊन बसली आहे. नाक धरून निश्चल बसून समोर देव उभा करण्याची अद्भुत शक्ति गेली!

लोकसेवेची धडपड करून आतां मोक्ष मिळवावा लागतो. पतिनिष्ठेच्या कल्पना सर्वकाळीं सारख्याच राहिल्या नाहींत. नकळत फसून घडलेल्या पातकानें अहिल्येला पाषाणाच्या पायरीस नेलें; अनेकपतिव्रत आचरणारी द्रौपदी पंचकन्यांत अहिल्येच्या जोडीस येऊन बसली. चौफेर नजर टाकल्यास सृष्टीमध्यें सुद्धां चंचलपणा भरलेला आढळेल. सृष्टीला स्त्री न म्हणतां निसर्ग या नांवानें हाक मारली, तर पुरुषी चंचलणाची साक्ष पटेल! चंचलपणाशिवाय बहुधा पुरुषांचें पाऊल हालणार नाहीं. मग त्याकरितां स्वर्गातून पाताळापर्यंत कां उडी मारा ना! कमीअधिक प्रमाणांत आढळणारा हा चंचलपणा मनुष्यस्वभावांत जास्त असतो आणि त्याबद्दल त्याला दोष देण्याचें वास्तविक कांहींच कारण नाहीं. निसर्गाच्या चंचलपणाला व्यवहारी स्वरूप देणें हें मनुष्याचें कर्तव्य होऊन बसलें आहे; तें साध्य झालें, म्हणजे सुधारणेच्या पायऱ्या चढणें सुलभ होतें.

चंचलपणाला एकीकडून दोष देतांना अत्यंत चंचल वस्तूवर धर्माचा आणि शाश्वत सुखाचा पाया रचायचा हा केवढा अविचार! स्त्रीजातीला चंचल म्हणायचें, आणि चंचलांत चंचल असा जो स्त्रियांचा केशकलाप त्याच्यावर धर्मनीतीची आणि पतीच्या मोक्षाची भिस्त ठेवायची याला काय म्हणावें! एकनिष्ठेचा निश्चलपणा वाखाणतांना चंचल केसांना शास्त्रकारांनीं डोक्यावर घेतल्यामुळेंच फार अनर्थ घडला! चराचर सृष्टीमध्यें आढळणाऱ्या चंचलपणाच्या अतिरेकाची मूर्ति म्हणजे डोकीवरचा लांब केस. केसाइतकें हलकें जगांत दुसरें काय आहे? नुसत्या बारिकशा फुंकरानें सुद्धां केस हालतो. त्याचें रूप तरी सर्व काळ सारखें राहतें म्हणावें, तर तेंही नाहीं. बालकांचें रूपांतर जसें प्रौढ आणि वृद्ध यांत होतें, तसे केसांचे रंग पाहावे तर नाना तऱ्हेचे! कोणाचे काळे, कोणाचे पिंगट, कोणाचे सोनेरी तर कोणाचे रुपेरी. बालकासारखें केसांचें रूप कालमानाप्रमाणें बदलत जातें.

केसाला मनुष्याच्या आयुष्याचे तीन टप्पे सुचविणारा हेर समजण्यास हरकत नाहीं. बाल्यांतून प्रवास करतां करतां तारुण्याची सीमा दर्शविणारा काळा कुळकुळीत केस आपल्या मालकाशीं इतका एकजीव झालेला असतो, कीं त्याच्याबरोबर स्वतःही आपलें रूप पुरेपुरें बदलून टाकतो. हें जरी खरें असलें, तरी इमान आणि विश्वासघात हे जितके परस्परविरोधी, तितकेच ते केसांच्या बाबतींत मिळूनमिसळून वागतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. केंस धन्याची आपत्ति स्वतःवर ओढवून घेतो, पण धन्याला नको असलेला वयोमानांतला फरक न बोलतां जगजाहीर करतो. वाढत्या प्रौढपणाबरोबर खेळकर विनोद कमी होऊन माणसाच्या अंगीं करडेपणा येतो. तो लगेच केसांच्या करडेपणांत दिसूं लागतो. भरज्वानींत डोकावणाऱ्या त्या पांढऱ्या तंतूनें–केसानें धन्याचा गळाच कापला असें म्हटलें तर चूक काय होईल? त्याला कितीही चापूनचेपून लपवा, त्याचा स्वभाव कांहीं जात नाहीं! संधि मिळेल तेव्हां तो डोकें वर काढणार. एखाद्याचें पूर्वायुष्य काळ्याकुट्ट कृत्यांनीं भरलेलें असलें, व पुढें त्याला उपरति होऊन तो अंतर्बाह्य शुद्ध बनला मग तें शुद्धाचरण लोकांना कळावें असा त्याला ध्यास लागतो. तसाच केसांना आपला ढवळा रंग जाहीर करण्याचा ध्यास लागत असावा! अखेर डोकीवरून गळून पडणारे केस आपल्या टकल्या धन्याला अखेरच्या देहपतनाची सूचना देतात असें कोण म्हणणार नाहीं?

केसांबद्दल स्त्रियांना तेवढें बंधन घालण्यांत आलें आहे. शुभअशुभाची कल्पना स्त्रीच्या केसांशीं निगडित झाल्यामुळें तिच्या केसांच्या कापणीनें अशुभाची पेरणी होते. पौराणिक काळीं पुरुषही केंस वाढवीत होते; पण 'हा भार सहन होइना' अशी डोक्याकडून तक्रार येऊं लागली व पुरुषांच्या केशकलापाचें आकुंचन होतां होतां शेंडीचा अवतार झाला. आतां केंस आणि फॅशन यांच्या चुरशीच्या सामन्यांत केसांचा पराभव होऊन नाना 'कटांच्या कटकटी' केसांच्या कपाळीं आल्या.

स्त्रियांच्या केशरचनेमध्येंही काळ असाच फरक पाडीत आहे. करकचून बांधलेला वेणीचा खोपा ही एकदा शालीनतेची खूण होती; ती आतां चुकून सुद्धां दृष्टीस पडावयाची नाहीं. खोपा गेला आणि अंबाडा मनगुटीस बसला; तोही जाऊन नुसतीच वेणी पाठीवर लोळू पाहत आहे. दहा वर्षांपूर्वीं पाठीवर फडफडणारी वेणी असभ्यपणाची ध्वजा मानली गेली असती; पण तिरंगी निशाणाबरोबर तें धारण करणाऱ्या स्वयंसेविकांच्या

...ळया वेण्या सन्मानास चढल्या. कसेंही असलें, तरी केशभूषा ही स्त्रीच्या सौंदर्याची खूण; लांब सडक, काळेभोर केस असणें हें एक सौंदर्याचें प्रमुख लक्षण अशीं कथाकादंबऱ्यांतून विपुल केशभाराचीं वर्णनें खच्चून आढळतात. केसांची निगा राखणें हें स्त्रीच्या जीवनांतील एक प्रमुख कर्तव्य होऊन बसलें आहे. कामिनींना आपल्या कुंतलांचें महत्त्व वाटतें म्हणून निरनिराळीं केशसंवर्धक गणलेलीं सुगंधि द्रव्यें प्रचारांत आलीं. ही सौंदर्यदृष्टि असणारीं स्त्री-गिऱ्हाइकें नसतील, तर त्या द्रव्यांच्या दुकानदारांची गत काय ? अविवाहित तरुणींना केसांचें महत्त्व वाटतें, त्याहूनही सुवासिनींना वाटतें. केशकर्तनाची नुसती कल्पना देखील त्यांना काळीज कापणारी वाटेल ! कै. हरिभाऊंच्या यमुनेवर पतिनिधनाहूनही भयंकर प्रसंग आला तो वपनाचा ! कायमचें अंधारांत बसायला लावणारें केशवपन टळावें, म्हणून स्त्रिया मृत्यूला देखील कवटाळण्यास तयार ! केसाला कोणत्याही तऱ्हेनें धक्का लावण्याची धर्मानें पूर्ण मनाई केली होती. एखाद्या विक्षिप्त सुवासिनीला कधींकाळीं केशकर्तनाची हौस वाटलीच, तर प्रयागास जाऊन वेणीदान करायला परवाना धर्मानें दिला होता. तेंही मद्रासी बायकांना सर्व वेणीचें दान आणि इतरांना चार आंगळें ! पण इतर सर्वांप्रमाणें केशरक्षणालाही चंचलपणा आला आहे. आतां स्त्रियांचा केशकर्तनाकडे कल झुकूं लागला आहे. एका काळीं पूर्वेकडून पश्चिमेकडे सर्व गोष्टी जात असत. तो काळ बदलून आतां फॅशनचा सूर्य पश्चिमेला उगवून पूर्वेकडे मावळायला येतो. त्यांतलीच ही केशकर्तनाची फॅशन आहे. Old order changeth yielding place to new' म्हणून टेनिसन म्हणतो तें हें ?

विपुल केशभार असलेल्या एखाद्या रूपगर्वितेला या नवीन डोकावणाऱ्या फॅशनचें वाईट वाटो ! पण त्या फॅशनच्या सोयी हिंदी स्त्रीवर्गाच्या माथ्यावर आज ना उद्यां बसणार असें दिसतें. केसांना ताळ्यावर आणण्यांत स्त्रियांचा जितका वेळ जातो, तितका दुसरा कशांतही जात नसेल, वाऱ्याच्या नुसत्या झुळकेबरोबर केसांचा तोल सुटतो. केसांचे दुर्गुण एकट्या देवयानीनेंच जाणले होते. 'तूं मलिन कुटिल नीरस जडहि पुनर्भव पणेंही कच साच' वगैरे विशेषणांनीं तिनें त्यांची चांगलीच पूजा केली. तरी कचांनीं स्त्रियांना पुनः भुरळ पाडली; पण आतां देवयानीचा उपदेश पुनः ताजा होऊं पाहत आहे. केशकर्तनाची जी ही नवीन प्रथा पडत चालली, तिच्यामुळें स्त्रियांचा फारसा वेळ आरसेमहालांत जाण्याची भीति नको. कोणत्याही तेलाच्या भुरळीनें केस कुरळ करण्याचा आणि नवऱ्याचा खिसा हलका करण्याचा हव्यास त्यांना वाटणार नाहीं. माळी रडवें तोंड करून गुंफलेल्या वेण्या कुसकरीत विन्मुख जाईल, पण रोजची दोन आण्यांची बचत झाल्यामुळें यजमानांचा चेहरा हंसतमुख होईल.

ही फॅशन पूर्वीं असती, तर द्रौपदीची वेणी दुःशासन कोठून ओढता ? भीमसेनावरील वेणीबंधनाची प्रतिज्ञा करण्याचा प्रसंग टळला असता ! कदाचित् व्यासांना भारतही रचावें लागलें नसतें आणि Rape of the lock सारख्या काव्यांचा जन्म झाला नसता. पण तीं काव्यें होऊन गेलीं; आता या फॅशनला विरोध करण्याचें कारण नाहीं. लांबलचक केशपाशावर काव्य रचणारे कवि निपजण्याची आशा आतां दिसत नाहीं; मग 'बॉबिंग' आणि 'शिंग्लिंग' यांना 'चान्स' कां देऊं नये ? पण फॅशन चंचल आहे. कदाचित् ती स्त्री म्हणून असेल ! आवडीनिवडीमध्यें कालांतरानें फरक होत जाणारच. पोषाख, कुंकू व केस यांमध्यें वेळोवेळीं फरक होत गेले. नवीन तऱ्हा अंमलांत आणणारे फॅशनप्रिय जरी लोकांचें टीकाविषय होऊन बसले, तरी टीका करणारेच हळूहळू त्यांचें अनुकरण करतात. दुसऱ्याला हंसणाऱ्यावर हंसून घेण्याची पाळी कधीं तरी आल्याशिवाय राहत नाहीं. फॅशन बदलते, ती रहाटगाडग्यासारखी बदलते. काल जुनी झालेली फॅशन उद्यां नवी होऊन बसेल; तसें आज फॅशन होऊं पाहाणारें केशकर्तन परवां फॅशनबाह्य ठरून केशसंवर्धन हीच फॅशन व्हायची. History repeats itself. तसेंच Fashion repeats itself असें म्हणणें सत्याला सोडून नाहीं.

# परदेश-गमन

सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीचे एक चिटणीस रा. रा. **गजानन हरि जांबोटकर**, एम्. ए., बी. टी. हे बुधवार ता. २२ ऑगस्ट १९३४ रोजीं लॉइड ट्रीस्टीनो कं.च्या "कॉन्टेव्हेर्डे" आगबोटीनें अध्यापनशास्त्राचा विशेष अभ्यास करण्याकरितां विलायतेस गेले रा. जांबोटकर यांचा मूळ गांव बेळगांव हा असून तेथेंच त्यांचें प्राथमिक व दुय्यम शिक्षण झालें. उच्च शिक्षणासाठीं ते कर्नाटक कॉलेजांत दाखल झाले, व अत्यंत चिकाटीनें व दीर्घोद्योगानें शिष्यवृत्तींच्या मदतीनें तें त्यांनीं संपादन केलें. १९२२ मध्यें ते मुंबई विश्वविद्यालयाची बी. ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर त्यांनीं बेळगांव येथील बेनन स्मिथ मिशन हायस्कूलमध्यें शिक्षकाची नोकरी धरून एस्. टी. सी. व एम्. ए. या परीक्षा दिल्या. सेकंडरी ट्रेनिंग कॉलेजांत एक वर्ष अभ्यास करून १९३३ मध्यें त्यांनीं मुंबई-युनिव्हर्सिटीची बी. टी. परीक्षा दिली. नंतर लवकरच त्यांनीं मुंबईस येऊन बाबू पन्नालाल जैन हायस्कूलमध्यें शिक्षकाची जागा पत्करली व तेथें ते अद्यापपर्यंत काम करीत आहेत. वरील दोन्ही शाळांत उत्तम शिक्षक म्हणून त्यांनीं लौकिक संपादन केला असून विद्यार्थ्यांतही ते लोकप्रिय आहेत. समाज-सेवेचीही त्यांना आस्था आहे. गेलीं ४ वर्षें ते सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीच्या कार्यकारी मंडळावर काम करीत होते व अलीकडे ते त्या संस्थेचे एक चिटणीस होते. सारस्वत ब्राह्मण-सेवासंघ, दादर, या संस्थेचेही ते एक प्रमुख उत्साही सभासद असून तेथें मॅट्रिक्युलेशनच्या विद्यार्थ्यांसाठीं कांहीं मित्रांच्या मदतीनें अभ्यासाचे वर्ग त्यांनीं चालविले होते. गेलीं ३ वर्षें त्यांना मुंबई विश्वविद्यालयानें मॅट्रिकच्या परीक्षेसाठीं इंग्रजीचे परीक्षक नेमिलें होतें. अशा रीतीनें सुमारें एक तप शिक्षणकार्यांत घालवून ते गेल्या महिन्यांत लंडन युनिव्हर्सिटीच्या टी. डी. परीक्षेचा अभ्यास करण्याकरितां परदेशीं गेले. अनेक संस्थांतर्फे जे समारंभ होऊन त्यांना प्रेमाचा निरोप देण्यांत आला, ते त्यांच्या लोकप्रियतेचे निदर्शक होत. नियोजित अभ्यासक्रमांत सुयश मिळवून ते सुखरूपपणें मातृभूमीस परत येतील अशी आम्हांस उमेद आहे.

× × ×

पॅरॅगॉन प्रॉड्क्टस कंपनीचे भागीदार रा. रा. **एस्. के. नाडकर्णी** हे जपानांतील खनिज झऱ्यांचीं स्थानें पाहून कोणत्या ठिकाणीं राहिलें असतां आर्यावर्तीय रोगपीडितांना सुखचें व काटकसरीचें होईल हें शोधून काढण्यासाठीं त्या देशास ता. २५ जून १९३४ रोजीं गेले. अशा ठिकाणीं शुश्रूषालय व डॉक्टर यांची योजना केली असतां युरोपकडील सफरीपेक्षां शेंकडा ५० ते ७० पर्यंत खर्चाची बचत होईल असा अंदाज आहे.

× × ×

रा. रा. **दत्ताराम सखाराम राजाध्यक्ष**, बी. एस्सी. (कै. रावबहादूर सखाराम विश्वनाथ राजाध्यक्ष यांचे द्वितीय चिरंजीव) हे युनायटेड स्टेट्स् ऑफ अमेरिका येथील लुइसिआना युनिव्हर्सिटींत शुगर टेक्नॉलॉजीचा अभ्यास करण्याकरितां ता. २८ जुलै १९३४ रोजीं पी. ॲन्ड ओ. कंपनीच्या "राजपुताना" या टपालच्या बोटीनें विलायतेस रवाना झाले. आम्ही त्यांचें अभीष्ट चिंतितों.

× × ×

रा. **युगंधर प्रभाकर भांडारकर**, (रा. ब. गोपाळ प्रभाकर भांडारकर, एक्झिक्युटिव्ह एंजीनिअर, यांचे चिरंजीव) हे विमानविद्येचा विशेष अभ्यास करण्यासाठीं लॉइड ट्रिस्टीनो कंपनीच्या "व्हिक्टोरिया" आगबोटीनें ता. ९ ऑगस्ट १९३४ रोजीं विलायतेस गेले. त्यांचें शिक्षण इंटरमिजिएट सायन्स परीक्षेपर्यंत झालें असून विमानविद्येचें 'ए' लायन्स त्यांनीं मिळविलें आहे. 'बी' लायन्स संपादन करण्याकरितां ते आतां परदेशाची सफर करीत आहेत. त्यांच्या धाडसी वृत्तीचें आम्हांस कौतुक वाटत असून त्यांना इच्छित कामांत विजयश्री मिळो असें आम्हीं इच्छितों.

× × ×

रा. रा. **शशिधर हरिहर भट**, बी. एस्सी. हे ता. १८ ऑगस्ट रोजीं टपालच्या आगबोटीनें आय्. सी. एस्. परीक्षेचा अभ्यास करण्याकरितां इंग्लंडला

गेलें. रा. भट हे मॅट्रिक परीक्षेत इलाख्यांतील सर्व विद्यार्थ्यांत पहिले आले होते. तसेंच विश्वविद्यालयाच्या पुढील सर्व परीक्षा ते पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले आहेत; त्यांना हिंदुस्थानसरकाराकडून शिष्यवृत्ति मिळाल्याचें कळतें. आम्ही त्यांना सुयश चिंतितों.

× × ×

**प्रो. काशीनाथ रामचंद्र गंजीकर,** बी.एस्सी. (बॉम्बे), एम्. ए.(केंब्रिज), आय्. इ. एस्. हे आपल्या पत्नी, व भाची कुमारी अनसूया वागळे, बी. ए., यांच्यासह "व्हिक्टोरिया" आगबोटीनें ता. ९ ऑगस्ट १९३४ रोजीं व्हिएन्ना येथें गेले. प्रो. गुंजीकरांच्या पत्नी मुंबईविश्वविद्यालयाच्या पदवीधर असून, सुस्वभावी व राहणीनें साध्या अशा आहेत. त्यांची प्रकृति गेलें १॥ वर्ष बरीच नादुरुस्त असून दुर्दैवानें त्यांची दृष्टीही गेल्याचें कळतें. इकडील नामांकित तज्ज्ञांचे पुष्कळ उपाय करूनही यश न लाभल्यामुळें, औषधोपचार व जरूर तर शस्त्रक्रिया करण्यासाठीं ते त्यांना घेऊन व्हिएन्ना येथें गेले आहेत. तेथें हे इलाज करणें शक्य न झाल्यास अमेरिकेंतील बोस्टन शहरीं त्यासाठीं जाण्याचा त्यांचा विचार आहे. सौ. गुंजीकर यांची प्रकृति निखालस सुधारून, त्या आपल्या मुलांबाळांत लवकर परत येवोत अशी आमची ईश्वरापाशीं प्रार्थना आहे.

* * *

**रा. ब. स. वि. राजाध्यक्ष गौ. सा. ब्रा. फॉरिन एज्युकेशन सोसायटीनें** यंदा रा. **अनंत रावजी कामत,** बी. एस्सी. व रा. **मारुतिराय शशिधर घारसे,** बी. एस्सी. यांस प्रत्येकीं ३००० रुपये उच्च शिक्षणासाठीं परदेशीं जाण्यास कर्जाऊ शिष्यवृत्त्या मंजूर केल्या आहेत. हे दोन्ही विद्यार्थी फर्ग्युसन कॉलेजांतून यंदाच्या बी. एस्सी. परीक्षेत पहिल्या वर्गांत सन्मानानें उत्तीर्ण झाले असून, रा. कामत यांना गणितविषयांत शेंकडा ९० मार्क व रा. घारसे यांस पदार्थविज्ञानशास्त्रांत शेंकडा ८० ( सर्वांत जास्त ) मार्क सदर परीक्षेत मिळाले आहेत. रा. कामत हे गणितशास्त्राचा विशेष अभ्यास करण्यासाठीं व आय्. सी. एस्. परीक्षेस बसण्यासाठीं व रा. घारसे हे इलेक्ट्रिकल इंजीनिअरिंगचा अभ्यास करण्याकरितां विलायतेस जात आहेत. मुंबई-विश्वविद्यालयाच्या मागील सर्व परीक्षांत या दोघांनींही पहिला वर्ग पटकाविला होता. यामुळें त्यांच्या पुढील यशाबद्दल आम्हांस विश्वास वाटतो. त्यांना आम्ही सुयश चिंतितों.

\+ + +

**सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीच्या** प्रस्तुतच्या कार्यकारी मंडळानें नुकाच कांहीं नवीन अभिनंदनीय उपक्रम सुरू केला आहे. मुंबई व उपनगर येथील संस्थेच्या विद्यार्थ्यांना जरूर पडेल तेव्हां विना वेतन शारीरिक तपासणी करून औषधोपचार करणें हा त्यांपैकीं एक उपक्रम होय. अर्थात् स्वज्ञातींतील दयार्द्र अंतःकरणांच्या डॉक्टर लोकांच्या मदतीशिवाय ही गोष्ट जुळून येणें शक्य नव्हतें,हें अगदीं उघड आहे. संस्थेच्या विनंतीस मान देऊन डॉ. श्री. सौ. नलिनीबाई वसंतराव कालेलकर, एल्. सी. पी. एस्.; डॉ. कुमारी चंपू शंकरराव रेगे, एम्. बी., बी. एस्.; डॉ. कृष्णराव यशवंत रेगे, एम्. एस्.; डॉ. जनार्दन नारायण करंडे, एम्. डी.; डॉ. शांताराम जगन्नाथ नाडकर्णी, एल्. ए. ॲन्ड एस्.; डॉ. जगन्नाथ शिवराम रेगे, एम्.बी.बी.एस्., डॉ. दिनकर शंकर नाडकर्णी, एम्. बी., बी. एस्.; व डॉ.शंकर विष्णु वायंगणकर, एम्. बी., बी. एस्. यांनीं या कामीं जरूर ती मदत करण्याचें कबूल केलें, हें त्यांस खचित भूषणावह असून तें त्यांच्या परोपकारबुद्धीचें द्योतक आहे.

दुसरा उपक्रम कार्यकारी मंडळीचे एक उत्साही सभासद कॅ. डॉ. काशीराम विष्णु कामत भांगले, एम्. बी., बी. एस्., ए. आय्. आर. ओ. यांनीं मंडळीच्या स्थानिक विद्यार्थ्यांची दर सहामाहीस वैद्यकीय तपासणी (Medical Inspection) करून त्याबद्दल रीतसर नोंद ठेवण्याचें काम आस्थेनें हातीं घेतलें आहे.

तिसरी गोष्ट म्हणजे जून महापासून विद्यार्थ्यांच्या संभाषणात्मक सभा दर पंधरावड्यास नियमितपणें भरविण्यांत येत असून त्यांना त्या वेळीं एखाद्या उपयुक्त विषयावर सदुपदेश करण्यांत येत असतो.

वरील सर्व गोष्टींमुळें विद्यार्थ्यांचा संस्थेबद्दल आपलेपणा वाढेल व त्यांचा एकंदरींत फायदा होईल असा आम्हांस भरंवसा आहे. मंडळीचे हल्लींचे उत्साही अध्यक्ष रा. रा. शंकरराव वर्दे यांची विद्यार्थ्यांसंबंधीं कळकळ अवर्णनीय असून वरील उपक्रमाचें बरेंचसें श्रेय त्यांच्या स्फूर्तीस व सक्रिय सहानुभूतीस आहे हें येथें नमूद करणें अवश्य आहे.

स्थळ प्रत
सं. ........ नं. २८६
ता. २४/१/३५




वर्ष १३ वें　　नोव्हेंबर–डिसेंबर १९३४　　अंक ६

हिज मास्टर्स व्हॉइस, ओडियन, कोलंबिया व ट्वीन वगैरे कंपन्यांचे

**नवीन कोरे रेकॉर्डस् व**

**ग्रामोफोन मशीन्स**

**मिळण्याचें एकच ठिकाण.**

ऑथॅराईज्ड एजंटस्—

# जी. जे. घैसास आणि कंपनी,

**रामचंद्र बिल्डिंग, गिरगांव ट्राम टर्मिनस, मुंबई**

**फोन नं. २४१४१**

नवीन व कोऱ्या रेकार्डसूचा भरपूर स्टॉक नेहमीं तत्पर.

Printed by R. K. Tatnis, at Shree Laxmi Narayan Press, 364 Thakurdwar, Bombay No. 2 and Published by S. L. Kapadi for the Maharashtra Saraswat Mandal, at the Saraswat Brahman Samaj, Girgaum, Bombay 4
Editor:-S. M. Varde, B. A., LL. B.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स यांचा

# बाळसकाढा

नंबर १-२ वापरा.

सर्वत्र मिळतो

द. कृ. सांडू ब्रदर्स,

आर्यौषधी कारखाना चेंबूर-ठाणे

दुकान-दवाखाना-ठाकुरद्वार-मुंबई-नं. २

शाखा-पोयबावडी-परेल.

सर्वत्र मिळतो

# धी इंडिया प्रॉव्हिडंट कंपनी लिमिटेड

**( कलकत्ता )**

स्थापना १९१०] **लाईफ फंड आठ लक्ष रुपयांवर** [ सरकारी सिक्युरिटी

कलकत्ता येथील सुप्रसिद्ध इंडियन इन्शुअरन्स जर्नल लिहितें, " हिंदुस्थानांतील विमाकंपन्यांत ज्याप्रमाणें ओरियंटल ही सर्वांत श्रेष्ठ व उच्च दर्जाची गणली जाते, त्याचप्रमाणें प्रॉव्हिडंट कंपन्यांत सदर्हू एकच कंपनी गणली जाते. " हींत १८ ते ५० वयाच्या स्त्रीपुरुषांस वैद्यकीय तपासणीशिवाय दरमहा सहा आण्यांपासून दोन रुपयेपर्यंत हप्ता भरून १०० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंतची विम्याची पॉलिसी घेतां येते. तरी गरजूंनीं ह्याच कंपनींत आपला विमा उतरून आपला फायदा करून घ्यावा.

**गांवोगांव भरपूर एजंट्स पाहिजेत. लिहा अगर समक्ष भेटाः—**

भेटण्याची जागा व वेळ—
**घाटकोपरवाला बिल्डिंग, मुगभाट, गिरगांव.** कोणत्याही दिवशीं सायंकाळीं ६ ते १० ( स्टॅं. टा.)

**आर. एम्. दिवाडकर** आणि **कंपनी,**
मुंबई इलाख्याचे मुख्य एजंट्स,
**माझगांव,** मुंबई नं १०.

सं. ........ नं. २५ ६/७
२५/१/३
ठा. ग्रं.

॥ श्री ॥

# महाराष्ट्र सारस्वत

द्वैमासिक

वर्ष १३ वें | नव्हेंबर–डिसेंबर १९३४ | अंक ६ वा

## संपादकीय

महाराष्ट्र सारस्वताच्या तेराव्या वर्षाचा शेवटचा अंक आज वाचकांच्या हातीं पडत आहे. नियमितपणा संभाळण्याचे आमचे प्रयत्न जरी पूर्णपणें यशस्वी झाले नाहींत, तरी त्या कामीं निराश होण्यासारखा विलंब अद्याप झाला नाहीं, हें सामान्यतः मान्य होईल अशी आम्हांस आशा आहे. दुमाहीचा अंक त्याच दुमाहींत प्रसिद्ध व्हावा या स्वतः बंधनकारक मानलेल्या नियमाचें उल्लंघन होऊन हा आजचा अंक दुमाहीनंतर आठवडयाबाहेर प्रसिद्ध होत आहे, हें उघडच आहे. या नियमभंगाची कबुली देतांना, स्वतःचें समर्थन करण्याच्या भरीस न पडतां, त्याबद्दल आमच्या आश्रयदात्यांनीं महाराष्ट्र सारस्वतावर करडी नजर करूं नये अशी विनंती करतों.

× + ×

शक्य तितकें ज्ञातिवृत्त देण्याचा आमचा प्रयत्न कितपत यशस्वी झाला आहे, हें या अंकावरून दिसून येईल. महाराष्ट्र सारस्वतानें स्वदेशांत जागोजाग पांगलेल्या स्वकीयांची सार्वजनिक खुषखबर शक्य तितकी देत जावी, हा उद्देश प्रमुखतः नजरेसमोर ठेविला आहे. तो उद्देश कित्येकांना योग्य वाटत नाहीं. परंतु ज्ञातीसाठीं निघालेल्या मासिकाचें तें प्रमुख कार्य आहे, असें आम्हांस वाटतें, हें कित्येक वेळां आम्हीं स्पष्ट केलें आहे. तें कार्य प्रथम करून नंतर शक्य ते इतर वाचनीय आणि विचारप्रवर्तक लेख देण्यास आमचे कडून बिलकुल कसूर होत नाहीं. महाराष्ट्र सारस्वताला 'केसरी' 'विविध वृत्त' किंवा 'मनोरंजन' यांचें रूप देणें जरी जास्त सुसाध्य असलें, तरी त्याची योजना त्यासाठीं नाहीं, हें आमच्या नजरेसमोर नेहमीं असतें. ज्ञातिभावनेला जातिवेडाचें किंवा जातिद्वेषाच रूप न यावें अशी पूर्ण खबरदारी घेऊन स्वज्ञातीयांच्या उपयोगी पडण्याचा आमचा उद्देश कितपत सिद्धीस गेला आहे, तें ठरविणें वाचकांकडे आहे.

× × ×

गेल्या अंकांतील 'घरचा अहेर' आमच्या कित्येक मित्रांच्या रोषाला पात्र झाला. परंतु अप्रिय असें सत्य स्पष्ट सांगण्याचें नेहमींचें प्रायश्चित लेखकाच्या व आमच्या वांटयास आलें, त्याचा विषाद कां मानावा ! 'अहेर' प्रेमाचा होता, हें मात्र आमचे इष्टमित्रही कबूल करतील अशी आशा आहे. स्थलाभावीं या अंकांत 'अहेरा'ला जागा मिळाली नाहीं, तरी सारस्वतांच्या राष्ट्रिय कर्तव्यच्युतीची जागृति करून देणाऱ्या आमच्या एका तरुण मित्राचा 'सारस्वत आणि मुंबईतील महाराष्ट्र' हा लेख या अंकांत आहे. तिकडे आम्ही वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों

× × ×

महाराष्ट्र शारदेची आणि स्वज्ञातीची या द्वैमासिकाच्या द्वारा आजवर केलेली सेवा गोड करून घेतली, त्या वाचकवर्गाचे आभार मानून त्यांचें महाराष्ट्र सारस्वतावरील प्रेम अखंड राहून त्याजकडून अंगीकृत कार्य वाढत्या उत्साहानें व्हावें आणि तें करण्यास सर्वांचें सहाय्य मिळावें अशी देवी सरस्वतीच्या चरणीं प्रार्थना आहे.

# सारस्वत आणि मुंबईतील महाराष्ट्र

लेखकः—' वत्सगोत्रोहम् अपत्नीकम् '

कोणी कितीही डोळेझांक करण्याचा प्रयत्न केला, तरी महाराष्ट्रिय समाजाची मुंबईत व महाराष्ट्र ह्याची हिंदुस्थानांत पिछेहाट झाली आहे, हें नाकबूल करतां येण्यासारखें नाहीं. या पिछेहाटीला अनेक कारणें आहेत. त्यांतील एक अत्यंत महत्त्वाच्या कारणाचा संबंध सारस्वत ब्राम्हण समाजाकडे पोहोंचतो. बारकाईनें विचार केला, तर महाराष्ट्राच्या पिछेहाटीला, विशेषतः मुंबईतील महाराष्ट्रीय समाजाच्या पिछेहाटीला, सारस्वत जात कांहीं अंशीं कारण आहे, असें निराळ्या शब्दांत म्हणावें लागेल. महाराष्ट्राला जर पूर्वीचें पद आणून द्यावयाचें असेल, तर महाराष्ट्रांतील सारस्वत समाजानें आपल्यावरील जबाबदारी पार पाडण्याची दक्षता ठेवली पाहिजे, हेंही त्यामुळें ओघानेंच ठरतें.

सारस्वतांना महाराष्ट्राचा अभिमान नव्हता, असें बरळणाऱ्या डॉ. केतकरांसारख्या अगर त्यांच्या लायकीच्या जातिद्वेष्ट्यांना माझ्या वरील विधानाचा अर्थबोध होणार नाहीं, अगर तें त्यांना पटणार नाहीं. तथापि त्यांना न पटलें, तरी विधानाच्या खरेपणाला मुळींच बाध येत नाहीं. सारस्वत त्रैमासिकाचा जो वाचक हा लेख समग्र वाचण्याची यातायत करील, त्याला माझें हें म्हणणें सहज पटेल.

महाराष्ट्राच्या पिछेहाटीला अल्पसंख्याक असा सारस्वत ब्राम्हण समाज जबाबदार आहे, हें म्हणणें वरवर पाहणाऱ्याला विलक्षण, व कांहींसें असंबद्धही वाटेल. तथापि बारकाईनें विचार करणारा चटकन कबूल करील कीं, सारस्वत ब्राह्मण आपल्यावरील जबाबदारीला जागले नाहींत, म्हणूनच मुंबईत महाराष्ट्रिय समाजाला-म्हणजे पर्यायानें हिंदुस्थानांत महाराष्ट्राला दुय्यम दर्जाला जाऊन बसावें लागलें.

प्रथम ही गोष्ट ध्यानांत घट्ट बाळगली पाहिजे कीं, सारस्वत समाज अत्यंत अल्पसंख्य व तोही मुख्यत्वें फक्त कोंकणांत राहणारा असला, तरी महाराष्ट्राच्या इतिहासांत तो शिवाजी महाराजांच्या कालापासून स्पृहणीय भाग घेत आला आहे. तथापि इतिहास कालांत, राजाची गादी प्रधानानें बळकावण्यापेक्षां बऱ्या वाईट कशाही राजाशीं एकनिष्ठ राहणें ज्यारत सन्मानाचें मानण्यांत येत असल्यामुळें व राजनिष्ठेचा गुण सारस्वत समाजांत पक्का मुरल्यामुळें, त्या काळीं त्यांना दुय्यम स्थान होतें. इतिहास कालांत या समाजाचें दुय्यम स्थान राहण्याला दुसरी एक प्रतिकूल परिस्थिति कारण झाली होती. आतांप्रमाणें पूर्वीही महाराष्ट्राचें वातावरण जातिद्वेषधुंद होतें. अशा परिस्थितींत सारस्वतांसारख्या कर्तबगार पण अल्पसंख्य समाजाला महाराष्ट्रसमाजाचें नेतृत्व पकडणें शक्य नव्हतें. इतिहासांत विशेष महत्त्वाच्या नसलेल्या पुरुषांचे वंशज आज संस्थानिकांच्या मानावर असून तो मान एकाच सारस्वताच्या वांट्याला यावा याचेंही हेंच कारण होय. तथापि इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर जातीपेक्षां कर्तबगारीला जास्त वाव व मान मिळूं लागला व त्या वातारणांत मुंबई इलाख्याच्या राजधानींत–महाराष्ट्राच्या मुंबई शहरांत सारस्वत लोकांनीं आपल्या कर्तबगारीचें तेज पाडलें. व्यापार-उदीम, कलाकौशल्य, शिक्षण, राजकारण व राज्यकारभार वगैरे सर्व क्षेत्रांत मुंबई शहरांत सारस्वतांनीं मानाचें स्थान पटकाविलें. यामुळें अर्थातच मुंबईसारख्या हिंदुस्थानच्या पहिल्या प्रतीच्या शहरांत महाराष्ट्र समाजाला महत्त्व प्राप्त झालें.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत मुंबई शहरांत झालेल्या बहुतेक सार्वजनिक चळवळींत, तसेंच सरकार दरबारांत, सारस्वतांनीं मानाचा भाग उचललेला आढळतो; ही गोष्ट मुंबईत त्या वेळीं महाराष्ट्रिय समाजाचें स्थान किती मानाचें होतें, तें स्पष्ट करते.

स्थळ प्रत
सं: ........ नं. २२५/५
ठाणे.



याचाच परिणाम साहजिक महाराष्ट्राला हिंदुस्थानांत विशेष महत्त्व मिळण्याच्या कामीं महत्त्वाचा हातभार लावण्याकडे झाला. त्या वेळीं महाराष्ट्राचें केंद्र पुण्याकडे होतें. तथापि पुणें हें आतांप्रमाणें तेव्हांही दुसऱ्या प्रतीचें शहर असल्यामुळें त्या शहरांतील महाराष्ट्रिय वर्चस्वापेक्षां मुंबईचें महाराष्ट्रिय नेतृत्वच महाराष्ट्राला इतर प्रांतांत महत्त्व आणण्याला कारणीभूत झालें. हिंदुस्थानच्या पहिल्या प्रतीच्या शहरांत ज्या प्रांतीयांचें महत्त्व असेल, त्या प्रांताची देशावर छाप पडणें हें क्रमप्राप्तच होतें.

तथापि यानंतर मनु पालटला. वरील स्थिति विसाव्या शतकाला आरंभ होण्यापर्यंत टिकली. विसाव्या शतकाच्या सुरवातीचीं कांहीं वर्षेंपर्यंत मुंबई शहरांत सारस्वत समाज आपल्या जबाबदारीला जागा होता; तथापि त्यानंतर त्याला शैथिल्य येऊं लागलें. सारस्वत हा जातीचा आळशी असून ख्यालीखुशालीकडे त्याचा विशेष ओढा असल्यामुळें हळू हळू त्याला आपल्यावरील जबाबदारीचें महत्त्व वाटेनासें झालें व तो आपल्या स्थानापासून भ्रष्ट होऊं लागला. अशा रीतीनें, ऱ्हासला सुरवात झाली, तरी चरितार्थाची उपाधि जोरानें जाणवली नसल्यामुळें आपला ऱ्हास होत आहे याची कल्पना आली नाहीं व कल्पना आली असली तरीही तो थांबविण्याची त्यांनीं यातायात केली नाहीं. या अनास्थाबुद्धीमुळें या शहरांत महाराष्ट्राचें नेतृत्व कायम ठेवण्याची खटपट त्यांच्या हातून झाली नाहीं व अशा रीतीनें त्यांनीं गेल्या शतकाच्या शेवटीं मुंबई शहराचें महाराष्ट्रियांकडे असलेलें नेतृत्व हळू हळू दुसऱ्या समाजांच्या हातीं जाऊं दिलें.

मुंबई बेट भौगोलिक दृष्ट्या महाराष्ट्राचा विभाग असलें, तरी त्या बेटाला महत्त्व प्राप्त करून देण्याचें श्रेय महाराष्ट्राला अगर मराठेशाहीला नाहीं. प्रथम पोर्तुगीजांनीं व मागून ब्रिटिशांनीं हें बेट आपलें ठाणें केल्यामुळें त्यांनींच त्याची वसाहत व भरभराट घडवून आणली. अर्थात् हा काळ महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याचा असल्यामुळें स्वराज्यसुख भोगत असलेल्या एकाही महाराष्ट्रिय समाजानें मुंबई शहराच्या उभारणींत भाग घेतला नाहीं. तें साहजिकही होतें. स्वराज्यकालीं ब्रिटिश लोक शत्रु असल्यामुळें, त्यांच्याशीं सहकार्य करण्याचा विचार एकाही महाराष्ट्रियाला शिवला नसता. याच्या उलट पारशी समाजाची स्थिति होती. पारशी लोक एतद्देशीय नसल्यामुळें, शिवाय ते अल्पसंख्याक असल्यामुळें जो पक्ष जोरदार दिसेल, त्याच्याशीं सहकार्य करण्याची त्यांची प्रवृत्ति होती. मुंबई शहराच्या बाबतींत त्यांचाच प्रथम इंग्रजांशीं संबंध आला. त्याच्या मागोमाग गुजराती लोकांनीं या शहरांत प्रवेश केला. त्यांच्यामागून गोव्यांतून सारस्वत इकडे आले. सारस्वतांचा या शहराशीं इतका जुना संबंध आहे. सारस्वतांच्या पूर्वीं या बेटावर येथील कांहीं जुने स्थायिक महाराष्ट्रिय समाज होते. परंतु या शहरांत स्वतःला महत्त्व प्राप्त करून घेण्याचा पहिला मान महाराष्ट्रिय समाजांत सारस्वतांनींच प्रथम मिळविला. सारस्वतांनीं येथें पाय टाकतांच व्यापारांत व राजकारणांत त्यांनीं आपला प्रवेश करून घेतला. त्या वेळीं हें शहर उदयोन्मुख होतें व कर्तबगारीला येथें वाव होता. सारस्वतांनीं ही संधि वायां जाऊं दिली नाहीं. मुंबई शहराच्या वातावरणांत त्यांनीं आपल्या महाराष्ट्रिय संस्कृतीची छाप पाडली व हळूहळू या समाजांचा परकेपणा लोपून ते येथील स्थायिक झाले. साधारणपणें अठराव्या शतकाच्या शेवटची ही हकीगत आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीला महाराष्ट्राचें स्वराज्य लुप्त झालें व त्याबरोबर शासनसंस्थेचें केंद्रही पुण्याहून मुंबईला आलें. अर्थात् मुंबईच्या प्रगतीला जोर आला व इतर महाराष्ट्रिय समाजही हळूहळू या शहरांत येऊं लागले. १९ व्या शतकांत मुंबईंत महाराष्ट्रिय समाज वाढत होता. व त्याबरोबरच मुंबईच्या संस्कृतीवर महाराष्ट्रियत्वाची छापही

वाढत होती. शिवाय राजकारभार, शिक्षण, व्यापार व इतर सार्वजनिक बाबी यांत सारस्वतांनीं मानाचीं स्थानें पटकावून मुंबईचें नेतृत्व आपल्याकडे म्हणजे पर्यायानें महाराष्ट्रियांकडे ओढून आणण्याची खटपट चालविली होती. ही खटपट शेवटीं बऱ्याच अंशीं यशस्वीही झाली. तिला पूर्ण यश येणार होतें व आज मुंबईत ज्या स्थानीं पारशी व गुजराती बसले आहेत त्या स्थानीं महाराष्ट्रिय विराजतांना दिसले असते. पण अकस्मात् सारस्वतांना दुर्बुद्धि आठवली. त्यांची जन्मजात अनास्थाबुद्धि व आत्मघातकी अल्पसंतुष्टता जागी झाली. त्यांनीं ऐन वेळीं, महाराष्ट्रियांच्या मुंबईतील वाढत्या विश्वासाचा विश्वासघात केला व त्या योगानें या शहराचे मालक होणारे महाराष्ट्रिय येथें करकून, हमाल व मजूर, असल्या दुर्दैवी जिण्याचे धनी झाले. मुंबईतील महाराष्ट्रियांच्या या दशेचें सारें पाप एकट्या सारस्वत ब्राह्मणांच्या कपाळीं बसतें. सारस्वतांना हें म्हणणें रुचणार नाहीं; तथापि तें अक्षरशः खरें आहे.

१९ व्या शतकांत मुंबईत सारस्वत पुढें होते. त्या काळीं माडगांवकर, लाड, खोटे, तेलंग, वागळे, दाभोळकर वगैरे घराणीं भरभराटीला आलीं होतीं. या घराण्यांतील कर्ते पुरुष मुंबईच्या सार्वजनिक जीवनांत पुढारी गणले जात. सरकारी अधिकारी, शिक्षण-संस्था, म्युनिसिपालटी, व्यापार, राजकारण, युनिव्हर्सिटी वगैरे बाबतींत वरील घराण्यांपैकीं अगर त्यांबाहेरील अनेक सारस्वत पुढें होते. मुंबईच्या व्यापारांत आज सारस्वतच नव्हे, तर कोणताही महाराष्ट्रिय समाज पुढें नसला, तरी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत व २० व्या शतकाच्या पहिल्या कांहीं वर्षांत सारस्वतांनीं यशस्वी व्यापार केला आहे, असें दिसून येतें. परंतु सारस्वत आकुंचित वृत्तीचे असल्यामुळें थोडेसे पैसे हातांत घोळतांच त्यांची तृप्ति झाली व व्यापार वाढविण्याऐवजीं ते तो आवरण्याच्या मार्गाला लागले. एकाच उदाहरणावरून हें पटण्यासारखें आहे. एके काळीं पुस्तकविक्रीचा धंदा बराचसा सारस्वतांच्या हातीं होता. त्या काळचीं कांहीं दुकानें आज नाममात्र राहिलीं आहेत, आणि तारापुरवाला यांसारख्या व्यापारी वृत्तीच्या इसमानें आपलें दुकान गडगंज करून त्यावर अलोट संपत्ति मिळविली आहे.

सारस्वतांनीं मुंबईतील महाराष्ट्रियांचा विश्वासघात कसा केला, हें समजून घेणें कठीण नाहीं. कोळी, पाठारे प्रभु, पळशे, सारस्वत इत्यादि चारदोन समाज वगळल्यास मुंबईतील इतर महाराष्ट्रिय समाज परस्थ आहे. शिवाय हे समाज येथें राहत असले, तरी त्यांच्यामध्यें स्थानिक भावना निर्माण झालेली नाहीं. पेन्शन घेऊन कधीं एकदांचा गांवीं जातों, अशी त्यांची नेहमींची भावना असते. (मुंबई शहरांत मध्यम वयाचे लोक फार असून त्या मानानें उतार वयाचे लोक फार कमी आहेत, हें शिरगणतीचे आंकडे नजरेखालून घालणाऱ्याला दिसेलच.) येथील 'टाइम्स' पत्रानें म्हटल्याप्रमाणें 'मुंबईतील लोकवस्तीचें मूळ बाहेरच्या गांवांतून आहे,' या समाजांतील लोक मुंबईला येतात, ते उद्योगधंद्यासाठीं. हें माझें शहर आहे, या शहराच्या उन्नति-अवनतीवर माझी भरभराट अथवा ऱ्हास अवलंबून आहे; माझे पूर्वज येथेंच होते व पुढील पिढ्याही याच भूमीवर नांदणार; दंगा झाला तर 'पुंडलीक वरदे' म्हणत पुण्या-साताऱ्याकडे मला जातां येणार नाहीं, अशी या शहराबद्दल जिव्हाळ्याची भावना उपरोक्त चार समाज वगळल्यास इतरांच्या मनांत जागी झालेली नाहीं. ही भावना, ते समाज संपन्न अगर सधन असते, तरच त्यांच्यामध्यें निर्माण झाली असती; आणि संपन्न व सधन व्हावयाला त्या समाजांतील लोकांनीं नोकरीऐवजीं दुसरा एखादा उत्पादक धंदा चरितार्थाचें साधन म्हणून स्वीकारणें भाग होतें. परंतु तसें त्यांना करतां आलें नाहीं. त्यांना व्यापारांत शिरण्याला संधि मिळाली नाहीं व त्यामुळें त्यांना नोकरीखेरीज दुसरा मार्ग उरला नाहीं. सारस्वतांची अनास्थाच या प्रकाराला कारण झाली.

वास्तविक महाराष्ट्राच्या प्रकृतीला व्यापार मानवलेला नाहीं; तथापि गेल्या शतकाच्या शेवटीं अथवा या शतकाच्या पहिल्या दशकांत सारस्वतांनीं मुंबईत यशस्वी व्यापार केला. त्या वेळीं सारस्व-

२२८

तांनीं इतर बाबींप्रमाणें व्यापारांतही चांगला जम बसविला होता. याचा फायदा घेऊन एक तर त्यांनीं स्वतः त्या क्षेत्रांत पूर्ण वर्चस्व इस्तगत करावयाचें होतें,अथवा मिळविलेल्या संपत्तीचें अजीर्ण झाल्यामुळें त्यांनीं व्यापारांतून निघावयाचें होतें. म्हणजे मुंबईंत उद्योगधंद्यासाठीं नुकतेच जे इतर महाराष्ट्रिय समाज येत होते, त्यांचा तरी त्यांत प्रवेश करून द्यावयाला पाहिजे होता. परंतु सारस्वतांनीं यापैकीं एकही गोष्ट केली नाहीं. ही जात अत्यंत आकुंचित दृष्टीची असल्यामुळ, माझा व्यापार वाढवून गजांत लक्ष्मी मिळवीन, अशी महत्त्वाकांक्षा त्यांपैकीं एकालाही शिवली तर नाहींच, उलट दुसऱ्याला आंत येऊं देण्यापूर्वीच त्यांनीं व्यापारांतील आपलें पाऊल बाहेर काढलें. यामुळें इतर महाराष्ट्रियांना व्यापाराची वाट बंद झाली. याचा परिणाम ते संपत्तीच्या मार्गाला मुकण्यांत म्हणजे मुंबईंतील बहुसंख्य समाज निर्धन राहण्यांत झाला. या निर्धनतेनें हळू हळू पिछेहाटीला जन्म दिला. सगळे गुण कांचनाच्या आश्रयाला राहातात. नेतृत्व हाही एक गुणच असल्यामुळें तोही कांचनाच्या आश्रयाला राहतो. मुंबईंत झालेल्या गेल्या राष्ट्रिय चळवळीनें हें पूर्णपणें सिद्ध केलें आहे. महाराष्ट्रियांकडे संपत्ति असती, तर या शहराच्या नेतृत्वानेंही त्यांच्या घरीं पाणी वाहिलें असतें. परंतु ते दरिद्री राहिले. त्यांना व्यापारांत प्रवेश मिळाला नाहीं, हेंच त्याचें कारण ! आणि हा मज्जाव सारस्वतांनीं स्वतःला मिळालेल्या जुनेपणाचा ( सिनिऑरिटी ) फायदा घेऊन, त्यांचा व्यापारांत प्रवेश घडवून आणला नाहीं, म्हणूनच त्यांच्या नशिबीं आला. महाराष्ट्राला मुंबईंत महत्त्वाच्या पदावर चढविण्याची आपली जबाबदारी सारस्वत विसरले, हें या हकीकतीवरून दिसून येईल.

सांपत्तिक दृष्ट्या सोडलें, तरी इतर बाबतींतही सारस्वतांनीं महाराष्ट्राला असाच अनुभव आणून दिला आहे. अव्वल इंग्रजींत या समाजानें बुद्धीचा स्वतंत्रपणा दाखविला खरा; परंतु चाकर राहून आपलें बुद्धिसर्वस्व धन्याच्या कारणीं वाहावयाचें ही तहत मराठेशाहीपासून त्यांनीं दाखविलेली गुलाम वृत्ति ऐन वेळीं जागी झाली व आर्यांच्या या बुद्धिमंत शाखेनें आपली कर्तबगारी स्वतंत्र क्षेत्रांत दाखविण्याऐवजीं, तिला दुसऱ्यांच्या चाकरींत राबविलें. [ सा. दी. व. संघाच्या गेल्या महोत्सवाच्या वेळीं अहवाल वाचतांना एका गृहस्थांनीं सारस्वत ही कारकुनांची जात आहे असे वस्तुस्थितिपूर्ण परंतु शरम आणाणारे उद्गार काढले होतेच. ] यामुळें महाराष्ट्राच्या कीर्तींत भर घालणाऱ्या सार्वजनिक संस्था या शहरांत स्थापन करण्यासाठीं अवश्य लागणारी बुद्धिमत्ता दुर्मिळ झाली व त्यामुळें मुंबई हें महाराष्ट्रिय कारकुनीच्या कर्तबगारीचें क्षेत्र होऊन गेलें. पुण्यांत चित्पावन व द्रविड ब्राह्मण निरनिराळ्या अनेक संस्थांद्वारें महाराष्ट्राच्या विद्याफलांचें जतन व संवर्धन करीत आहेत. तेंच काम कोल्हापुरांतून महाराष्ट्राचा इतिहासप्रसिद्ध मराठा समाज करीत आहे.तीच कामगिरी मुंबईंत करण्याची जबाबदारी सर्वस्वी सारस्वतांवर होती. पण या कर्तव्यपराङ्मुख समाजाला त्याचें काय होय ! स्वतःची सामाजिक ज्ञातिसंस्था नांवारूपाला आणून चिरस्थायी करणें ज्या समाजाला जमत नाहीं, तो समाज इतर सार्वजनिक संस्थांच्या बाबतींत काय करणार हें तर्कानेंच जाणावें.

वरील विवेचनावरून महाराष्ट्राच्या पिछेहाटीला सारस्वत समाज कसा जबाबदार आहे, तें दिसून येईलच. ही पिछेहाट थांबवून महाराष्ट्राला प्रगतिपथावर आणण्याची जबाबदारीही सारस्वतांवर आहे, हें क्रमानेंच सिद्ध होतें. ही जबाबदारी त्यांनीं पार पाडलीच पाहिजे, व हें घडून येण्यासाठीं मुंबई सारस्वतांचें शहर आहे, त्यांचे गणगोत इथें आहेत,त्यांच्या पूर्वजांचीं चरित्रें मुंबईच्या जुन्या इतिहासाशीं निगडित आहेत; त्यांची मालमत्ता इथें आहे; त्यांच्या संस्था, त्यांचीं देवालयें, त्यांचें सर्वस्व येथें आहे, ही लुप्त होऊं लागलेली भावना तरुण सारस्वतांच्या मनांत फिरून दृढमूल झाली पाहिजे, आणि इतकें झाल्यावर सारस्वत तरुण, शिवछत्रपतींच्या, जिवबालखबांच्या, तेलंग भांडारकरांच्या आणि खुद्द आपल्या महाराष्ट्राचे पांग फेडील यांत काय नवल !

# स्त्रियांचीं संमेलनें

(मुंबई येथील सारस्वत ब्राह्मण समाजाच्या सरस्वती महोत्सवांत महिला दिनाच्या दिवशीं कु. नीरा मोंडकर, बी.ए., बी.टी. यांचें झालेलें भाषण.)

या सरस्वतीसंमेलनांत आजचा दिवस महिला-दिन आम्हां स्त्रियांकरितां म्हणून योजलेला असतो. आज कांहीं तरी बोलावं म्हणून मला सांगितलं आणि मी तें कबूल केलं खरं पण मग मात्र विचार पडला. आपणांपैकीं अनेकजणी मला वडील आहेत. माझ्यापेक्षां ज्ञानानं आणि अनुभवानं श्रेष्ठ अशांपुढं मी काय बोलावं ? शिवाय पुस्तकी ज्ञान आणि व्यवहारज्ञान हीं एकत्र सांपडतीलच असा नेम नाहीं. एका मुलाची गोष्ट सांगतात कीं, त्याच्या आईनें दोन पैसे देऊन त्याला मिरच्या कोथिंबीर आणायला सांगितले. तो बाजारांत जाऊन मिरच्यांच्या टोपलीजवळ उभा राहिला. आपली विक्री होईल म्हणून दुकानदार आशाळभूतपणानें त्याच्याकडे पाहूं लागला. आणि हा त्याच्याकडे गोंधळून पाहूं लागला. शेवटीं कांहींच न घेतां तो परतलेला पाहून दुकानदाराला त्याच्या तऱ्हेवाईकपणाचें हंसूं आलें. घरीं आला तों आई म्हणते, "आणल्या का रे बाबा, मिरच्या कोथिंबीर ! दे लौकर, माझा खोळंबा झाला आहे." "नाहीं ग आई, मी तुला विचारायला विसरलों, कुठल्या पैशाच्या मिरच्या आणि कुठल्या पैशाची कोथिंबीर तें सांग नीट. म्हणजे पैसे बरोबर पाहून ठेवीन." मुलाची अशी ही तल्लख बुद्धि पाहून बिचाऱ्या आईनें कपाळाला हात लावला !

तेव्हां त्या मुलासारखी हास्यास्पद स्थिति तर होणार नाहीं ना ? मी बोललें तर आपण काय म्हणाल, ही भीति वाटत आहेच. पण सारस्वतांची देवी सरस्वती हिची सेवा करण्याची ही एक संधि आहे. आपण सर्वजणी मला मायबहिणींप्रमाणें आहां. कांहीं वेडेंवाकडें बोललें तरी संभाळून घ्याल, बोलेन त्यांत कांहीं विचार करण्यासारखं असेल त्याचा विचार कराल, चुकेल तिथं सांवराल असा मनाला धीर देऊन बोलण्याचें धाडस करतें.

स्त्रिया आणि संमेलनें हे शब्द एकून वीस वर्षांमागें कांहीं माणसं बिचकलीं असतीं. आज कोणी बिचकणार नाहीं आणि खरोखर पाहिलं तर बिचकण्याचं कारणही नाहीं. तसं कारण पूर्वींही नव्हतं. फक्त संमेलन शब्दाचा खरा अर्थ चांगलासा कळला नव्हता, त्यांत सगळं इंगित होतं. समेलनं भरावीं तर पुरुषांनीं, असं वाटत असे. तसं खरं पाहूं गेलं तर संमेलनाची उणीव पहिल्यानं पुरुषांना वाटली तें साहजिक होतं. एकाच जातीच्या एकाच शेजारांतल्या किंवा एकाच स्थितींतल्या पुरुषांना आपोआप एके ठिकाणीं येणं मोठं कठीण असतं. सगळा दिवस उद्योगधंद्यांत जायचा. फुरसतीच्या वेळांत संसाराचं काम असायचं. सणासुटीच्या दिवशीं मिळालं तर चार स्नेही मंडळीची किंवा नात्यागोत्याच्या माणसांची भेट व्हायची, अशी मुंबईसारख्या शहरांत स्थिती असते. आपण बायका हळदीकुंकवाच्या निमित्तानें तरी चैत्रवैशाखांत दहावीस वेळां आणि एरवीं वर्षांतून दोनतीन वेळां एका ठिकाणीं येतों. तसं कांहीं पुरुषमंडळींना निमित्त नसतं. म्हणून त्यांना मुद्दाम संमेलनं करावीं लागतात. त्यासाठीं जिवाचा आटापिटा करावा लागतो. वर्गणी जमवा, दुसरा एकादा खर्च कमी करा, जागा ठरवा, कार्यक्रमाची यादी करा, असा मारे धुमधडाका उडवून देतात ! पण हें संमेलनाचं कार्य आम्ही स्त्रिया वर्षांतून प्रत्येक घरीं चारपांच वेळां करतों. त्याला संमेलन म्हणत नाहीं, हळदीकुंकूं म्हणतों; आणि आमच्या जुन्या पद्धतींत कालमानाप्रमाणें फरक पडायला पाहिजे, तो पडलेला नाहीं. हळदीकुंकवाचं संम्मेलनांत कसं रूपांतर येईल त्याला वळण कसं देतां येईल, याविषयीं कांहीं विचार माझ्या मनांत आले होते. आज येथें बोलण्याचा हुकूम झाला,

स्थळ प्रत
सं. ......
ता. ......

तेव्हां त्याच गोष्टी इथं सांगाव्या असं मनांत ठरविलं. तुम्हांला त्या आवडून तसं करतां आलं तर पाहा. नाहीं तर माझ्या बडबडीचा त्रास तरी मानणार नाहीं असं मी समजतें.

मीं सांगितलंच, कीं संमेलनाचं पुरुषांना मोठं प्रस्थ वाटतं; पण आम्हां बायकांच्या तें अंगवळणीं पडलं आहे. आपणांपैकीं प्रत्येक विवाहित भगिनी वर्षांतून चारदोन वेळां हळदीकुंकू करते. त्यासाठीं थोडाबहुत खर्च होतो. प्रत्येक घराचा मालक एका संमेलनासाठीं वर्गणी देतो, तितकाच किंवा त्याहून जास्त खर्च प्रत्येक गृहिणी एका हळदीकुंकवासाठीं करते. त्यांतून कित्येक वेळां फळं, भांडीं वगैरे जिन्नस वांटायाचे असतात, त्याला खर्च कांहीं कमी येत नाहीं. सगळ्या प्रकारच्या पूजेच्या आरंभीं तांदळांची जरूर लागते, तशी सर्व कार्यांना पैशाची जरूर लागते; परंतु आपापल्या ऐपतीप्रमाणं हळदीकुंकवाचे समारंभ करणाऱ्या बायकांना हा पैशांचा प्रश्न फारसा नडणार नाहीं.

बायकांचं जिणं चुलीपुरतं असा पूर्वी समज होता. 'रांध वाढ आणि उष्टीं काढ' या ठराविक चाकोरीबाहेर त्यांना पडतां येत नसे. आपल्या घरांतनं पाऊल देखील बाहेर पडण्याची मुष्कील. योग्य करण्याकरतां परपुरुषाबरोबर दोन शब्द बोललं तर मर्यादातिक्रम झाला असं समजण्यांत येत असे. अशी स्थिति ज्या वेळीं होती त्या वेळीं देखील बायका असल्या तरी त्या माणसं आहेत हें समजून हळदी कुंकवासारख्य समारंभाची योजना झाली. नात्यागोत्याच्या, शेजार-पाजारच्या बायकांस एकमेकींना भेटतां यावं, चारदोन सुखदुःखाच्या गोष्टी करतां याव्या, एकमेकींचीं सुख-दुःख सांगून ऐकून मन हलकं व्हावं, यासाठीं या समारंभाचा उपयोग होत असे व अजूनही होतो.

अशी संमेलनासाठीं आपणांस फारशी यातायात करायला नको. चैत्रगौरीच्या किंवा इतर हळदी-कुंकवासारखीच पण थोडीशी निराळी पद्धत स्वीकारली, तर तीं सहज भरतां येतील. हळदीकुंकूं संध्या-काळीं तीनचार वाजल्यापासून सात वाजेपर्यंत चालतं.

आज जशा आपण इथं जमलों आहों, तशा एक-मेकींना हळदीकुंकूं देण्यासाठीं दर महिन्यास किंवा दोन दोन अथवा तीन तीन महिन्यांनीं तरी वर्षांतून चार-सहादां जमलों, तर तेंच संमेलन झालं. फरक इतकाच कीं, सर्वजणींनीं निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या घरीं न जातां एकाच वेळीं एका ठिकाणीं जमावं. ही समाजाची जागा नेहमीं दुपारीं मोकळीच असते. आपणांपैकीं कांहीं जणींच्या घरीं मोठाले दिवाणखाने असून दुपारचा वेळ मोकळे-पणाचा असूं शकेल. अशा ठिकाणीं एकाच ठरलेल्या वेळीं जमलों, तर संमेलनाचं मुख्य काम झालं. अशा संमेलनांत ठराव करायला नकोत आणि मतंही घ्यायाला नकोत. नुसत्या एकमेकींच्या ओळखी झाल्या, तरी पुष्कळ सुखदुःखाच्या चार गोष्टी बोलून आनंदानं चार घटका जातील. त्यांतच आपणां-पैकीं कोणी तरी नेहमींच्याच गोष्टीसंबंधानं चार शब्द सांगितले तर इतरांनाही त्याविषयीं कांहीं तरी सांगावंसं वाटेल. हल्लीं बऱ्याच मुलींना चांगलं गातां येतं, वाद्य वाजवतां येतं, त्यांनीं गायन किंवा वादन केलं, तर मनाची आणखी करमणूक होईल. चारदोन तास आनंदानं घालवायचे असं मनांत आणलं तर तें सहज करतां येईल. एका ठिकाणीं जमलं म्हणजे काय काय करावं तें सहज सुचतं. पुरुषांच्या संस्था अशाच रीतीनं निघाल्या आहेत. बायकांसाठीं कांहीं तरी करावं; आमच्या आयुष्यांतही कांहीं तरी सुधारणा होत जावी; असं पुरुषांनाही वाटत असतं. या सरस्वती महोत्सवामध्यें आजचा महिला दिन यासाठींच ठेवण्यांत येतो. पण आम्हाला काय

पाहिजे तें आमच्या आम्ही एकत्र जमलों असतां जसं आम्हाला सुचेल, तसं त्यांना सुचणार नाहीं. असं एकत्र जमायला सुद्धां बायकांना अनेक अडचणी आहेत. शाळेंतील मुलं घरीं यायची वेळ असते, लहान मुलांना बरोबर आणायचं म्हणजे स्वतःला कांहींसा संकोच वाटतो, एखादं घरचं काम अशाच वेळीं निघतं, हें सगळं खरं; पण त्यांतूनही उपाय काढला पाहिजे. वर्षांतून चारसहा दिवस शाळेकरी मुलांची आपण नसतां घरीं यायची सोय करावी लागेल. हळूहळू लहान मुलांनाही मोठ्या माणसांच्या घोळांत बसायची संवय झाली, तर तो एक लाभच आहे. कोणतीही नवीन गोष्ट करायची म्हणजे थोडीबहुत अडचण सोसावी लागते.

असो. आजच्यासारखं एकत्र कसं जमतां येईल व या महिलादिनाचा काय उपयोग करतां येईल, याविषयीं मला सुचलं तें सांगून या उत्सवांत सरस्वतीची सेवा करतां आली तशी मीं केली. देवीनं आणि तुम्ही ती गोड करून घ्यावी.


**मंगेश ब्रदर्स**

**यांचे**

**हातानें बनविलेले**

**( मशिनमध्यें नव्हे )**

सर्व तऱ्हेचे व सर्व जातींना लागणारे उत्कृष्ट मसाले,सांबार,मिरची भुकी (तिखट),हळदीची भुकी, रुचकर लोणचें, चटण्या, खमंग भाजणी, उडदामेथी, मेतकूट वगैरे चोख मालापासून बनविलेले जिन्नस वापरुन स्वतःची खात्री करा. तुमच्या खात्रीकरितां अर्ध्या आण्याचा नमुना खालील ठिकाणीं येऊन घ्यावा.

ब्रँच नं. १

**आंबेवाडी पोस्टाशेजारीं, गिरगांव.**

ब्रँच नं. २

**चिराबाजार मार्केटमध्यें.**



**बाई यमुनाबाई एल्. नायर हॉस्पिटलाचे खास नेमलेले ऑप्टिशियन्स**

# भांडारे आणि कंपनी, चष्मे बनविणार

लंडन आणि ऑक्सफर्ड येथील डोळ्यांच्या इस्पितळांतून अनुभव घेऊन आलेल्या क्वालिफाइड सर्जनकडून शास्त्रशुद्ध पद्धतीनें डोळे काळजीपूर्वक फुकट तपासून चष्मा दिला जातो; तसेंच डोळ्यांच्या सर्व विकारांची पूर्ण चिकित्सा करून योग्य तो इलाज केला जातो.

आम्हीं सर्व तऱ्हेच्या रोल्ड गोल्ड, इमिटेशन टारटॉइज शेल व फुल-व्यु फ्रेमचा भरपूर स्टॉक ठेवतों. क्रीसस पंकट्ल, अंब्रल, क्रुक्स वगैरे उत्तम, उंची व डोळ्यांना थंडावा देणाऱ्या अशाच लेन्सिस वापरण्यांत येतात.

डोळ्यांस लागणारीं सर्व औषधें आमच्याकडे मिळतात, व नुकत्याच सुरवात झालेल्या मोतीबिंदुवर आमचा इलाज केल्यास, पुढें शस्त्रक्रियेची जरुरी राहत नाहीं. इस्पितळांतून चष्म्याचे नंबर आणणाऱ्यास खास किफायत भाव.

पत्ता— **स्टान हाउस,** २१० चर्नीरोड, प्रार्थना समाजजवळ, गिरगांव, **मुंबई**

# डॉ. सौ. मालिनीबाई सुखठणकर

या येत्या २२ जानेवारी रोजीं होणाऱ्या मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या निवडणुकीसाठीं गिरगांव-वॉर्डातर्फे उभ्या राहिल्या आहेत. केवळ एक सारस्वत भगिनी म्हणूनच नव्हे, तर गिरगांव वॉर्डातील उमेदवारांपैकीं एक अत्यंत लायक, अनुभवी आणि योग्य उमेदवार म्हणून त्यांना निवडून देण्याची आम्हीं शिफारस करतों. सौ. मालिनीबाई यांचा विद्यार्थी दशेंतील व त्यानंतरचा सार्वजनिक आयुष्यांतील जीवनक्रम त्यांच्या योग्यतेची साक्ष देईल.

मुंबईंत एक प्रख्यात वकील रा. शांताराम नारायण हे सौ. मालिनीबाईंचे पितामह असून त्यांच्या मातुःश्रींचे वडील रा. सुंदरनाथ दीनानाथ खोटे हे देखील मुंबईंतील एक प्रसिद्ध नागरिक होते. इ. स. १९१६ सालीं त्यांचा विवाह रा. भालचंद्र सीताराम सुखठणकर, सॉलिसिटर यांच्याशीं झाला. सौ. मालिनीबाईंचें शिक्षण स्टूडंट्स् लिटररी अँड सायंटिफिक सोसाटीच्या हायस्कुलांत झाल्यावर एल्फिन्स्टन आणि ग्रँट मेडिकल कॉलेजांतून त्यांचा शिक्षणक्रम पुरा झाला. इंटर एम्. बी. बी. एसच्या परीक्षेंत त्या पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाल्या व क्वीन एम्प्रेस रौप्य-पदक, कामा सुवर्णपदक आणि मेडिसिन आणि सर्जरी या विषयांतील प्रावीण्याबद्दल स्कॉलर्शिप मिळून त्या १९१७ सालीं एम्. बी. बी. एस्. परीक्षा उत्तीर्ण झाल्या. १९१९ ते १९२१ पर्यंत त्या कामा हास्पिटलच्या हाऊस सर्जन होत्या. १९२३ ते १९२८ मध्यें त्यांनीं त्या हॉस्पिटलच्या चिल्ड्रन्स वार्डमध्यें ऑनररी फिजिशनचें काम केलें. १९२९ सालीं सहा महिने ऑनररी फिजिशन म्हणून ग्रँट मेडिकल कॉलेजच्या क्लिनिकची व्यवस्था त्यांच्याकडे होती. चार वर्षें त्या कॉंग्रेस फ्री हॉस्पिटलच्या ऑ. फिजिशन आहेत. अनेक सार्वजनिक संस्थांत त्यांनीं कार्य केलें आहे.

मुंबई-म्युनिसिपालिटीच्या स्कूलसकमिटीचे स्वीकृत सभासद म्हणून त्यांची निवड १९३० सालीं करण्यांत आली. १९३२ सालीं झालेल्या मुनिसिपल निवडणुकींत गिरगांव वॉर्डातर्फे सर्वांत जास्त मतें मिळून त्या पहिल्या नंबरास निवडून आल्या व १९३३–३४ सालीं स्कूलसकमिटींत स्वीकृत सभासद म्हणून निवड झाल्यापासून अवघ्या तीन वर्षांत त्यांनीं केवळ आपल्या कर्तबगारीनें त्या कमिटीच्या अध्यक्षस्थानीं एकमतानें निवडलें जाण्याचा अपूर्व मान मिळविला.

मुंबई शहराच्या सार्वजनिक जीवनशीं असलेल्या कित्येक पिढ्यांचा निकट संबंध, सांपत्तिक सुस्थिति, सार्वजनिक कार्याची हौस व तें करण्याच्या साधनांची अनुकूलता, विद्वत्ता, अनुभव, कर्तबगारी वगैरे अनेक गुणांनीं युक्त अशा सौ. मालिनीबाईंना मतें देऊन निवडून देणें हें डी वार्डासारख्या सुविद्य आणि कर्तव्य जाणणाऱ्या मतदारांचें नागरिक या नात्यानें कर्तव्य आहे.

ज्ञातिकक्षेपलीकडील सार्वजनिक कार्यांत भाग घेणाऱ्या व्यक्ति आमच्या ज्ञातींत दिवसेंदिवस दुर्मिळ होत आहेत. मुंबईंतील देवालयांचे मालक, अनेक सार्वजनिक संस्थांचे चालक, हाउसिंग सोसायट्यांची स्थापना करणारे अशा संबंधानें ज्ञातीचा सार्वजनिक संबंध मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनशीं अनेक प्रकारें येत असतो. तेथें कांहीं स्वकीय व्यक्ति असणें आवश्यक आहे. मुंबई-म्युनिसिपालिटींत अधिकारांच्या जागीं सारस्वतांचा भरणा फार झाला आहे, अशी कांहीं दिवसांपूर्वी येथील गुजराती वृत्तपत्रांत झालेली हाकटी ज्यांना अद्याप कळली नसेल, त्यांचें तिकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे.

सौ. मालिनीबाई यांची अनेक पुरुषांनाही हेवा वाटण्यासारखी सार्वजनिक कामगिरी ध्यानांत घेऊन त्यांना निवडून द्यावें, अशी सर्व मतदारांना पुनः एकवार शिफारस करून आम्हीं डॉ. सौ. मालिनीबाई यांना येत्या निवडणुकींत सुयश चिंतितों.

—श्री. सौ. डॉ. मालिनीबाई शिवाय पुढील उमेदवार म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या निवडणूकीस उभे आहेत त्यांनाही आम्ही यश चिंतितों:—

रा. रा. एस्. के. पाटील ( डी. वॉर्ड )
रा. रा. एन्. बी. परुळेकर ( ई वॉर्ड );
रा. रा. पी. डी. धुमे ( एफ् वॉर्ड );
डॉ. डी. जी. तेंडुलकर ( एफ् वॉर्ड );
रा. रा. पी. डब्लू. वाघ. ( जी वॉर्ड ) )

—आरवंदें येथील सुप्रसिद्ध रेगे घराण्यांतील आमचे सन्मान्य बंधु रा.रा. गंगाधर जगन्नाथ रेगे, एम्. ए. (डेप्युटी सुपरिंटेंडंट ऑफ पोलिस, क्रिमिनल इंटेलिजन्स ब्युरो, गव्हर्मेंट ऑफ इंडिआ, ) मुंबई, यांना नूतन वर्षानिमित्त झालेल्या पदवीदानसमारंभांत 'रावबहादूर' व रा. रा. विठ्ठल वामन वेलंगी, (मामलेदार, अंकोला) यांना 'रावसाहेब' ह्या पदव्या मिळाल्या याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करितों.

—रविवार ता. ६ जानेवारी रोजीं मुंबई येथील सारस्वत ब्राह्मण समाजगृहांत श्री.व्ही.जी.दळवी यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या सभेंत पुढील ठराव झाला.

" संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषदेचें नववें अधिवेशन मुंबई येथें लवकरच भरविण्यांत यावें असें या सभेचें मत आहे. त्याप्रमाणें मुंबई येथें परिषद् भरविण्याची परिषदेच्या जनरल सेक्रेटरींना विनंति करण्यासाठीं व परिषद् भरविण्याची योजना करण्यासाठीं ह्या सभेनें ३१ गृहस्थांची कमिटी नेमिली असून त्या कमिटीला सभासद स्वीकृत करणें, आपल्या कामासाठीं नियम करणें व परिषद् भरविण्याचे सर्व उपाय योजणें असे अधिकार दिले आहेत. या कमिटीची प्रथम सभा बोलावण्यास रा. शं. पुं. वर्दे, रा. ल. स. कापडी व र. शां. केंकरे यांस निमंत्रक नेमिलें असून बॅरिस्टर श्री. वि. ग. दळवी यांस कमिटीचे अध्यक्ष नेमिलें आहे. तसेंच कमिटीच्या पहिल्या सभेचा कोरम पांच सभासदांचा ठरविला आहे. "



## न्यू डायमंड इलेक्ट्रिक वर्क्स

**इलेक्ट्रिक इंजीनियर्स, लायसेन्स्ड् कॉन्ट्रॅक्टर्स आणि जनरल मर्चंट्स,**
१४१, गिरगांव, मुंबई नं. ४ ( मॅजेस्टिक सिनेमासमोर ) प्रोप्रायटर:—बी. पी. नाडकर्णी

**आश्रयदात्यांस विनंती:—**

आमच्या येथें इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशन्सचीं कामें उत्तम, सुबक व मनपसंतीनुसार बंगले, घरें, चाळी तसेंच वर्कशॉप्स् किंवा बाहेरगांवीं सिनेमाचीं कामें उत्तम प्रकारें केलीं जातील.

इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशन करण्यापूर्वी आमचा खास सल्ला घ्या.




**एव्हर रेडी पॉकेट टॉर्चिस्**

**जर्मन डेमन बॅटरीज्**

**टॉर्चिस् मिळतील**

किंवा वरील पत्त्यावर पत्रव्यवहार करा. म्हणजे **स्वस्त तितकें महाग**
हलक्यासलक्या मालास भुलून न जातां आमच्याकडील स्वस्त, सुबक व टिकाऊ व " इलेक्ट्रिक कन्झम्शनास" कमी असे "स्टोन" ट्रेडमार्कचे दिवे वापरून खात्री करा. एकदम घेणारास विशेष सवलत.
**ता. क.**:—आमच्या येथें शुभप्रसंगीं टेंपररी इल्युमिनेशनचीं कामें मनपसंतीनुसार करण्यांत येतील.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ...... नं. २२६
ता. २-१-३५
ठाणे

# कै. न्यायशास्त्री भवानीशंकर सुखठणकर

येथील सेंट झवियर कॉलेजांतील संस्कृत व मराठी भाषांचे अध्यापक न्यायशास्त्री पं. भवानीशंकर शास्त्री सुखठणकर हे बुधवार ता. २-१-३५ रोजीं दुपारीं १२ वाजण्याच्या सुमारास काळपुळीच्या आजारानें वयाच्या सुमारें ६० व्या वर्षी दिवंगत झाले, हें कळविण्यास आम्हांस अत्यंत खेद होत आहे. भवानीशंकर शास्त्री यांना मधुमेहाचा विकार



होता. त्यांच्या मानेवर काळपुळी उठल्यावर डॉ. कूपर यांच्या चरक क्लिनिकमध्यें सुमारें १०।१२ दिवसामागें शस्त्रक्रिया करण्यांत आली; परंतु त्या योगानें आपली प्रकृति सुधारण्याच्या पंथास लागण्याऐवजीं अधिक खालावून आपला मृत्यु संनिध आला आहे, असें निश्चित वाटल्यामुळें शास्त्रीबुवांच्या आग्रहावरून मंगळवारीं मध्यरात्रीं त्यांना त्यांच्या बिऱ्हाडीं पोंचविण्यांत आलें. घरीं जाण्यापूर्वी आपल्या गळ्यांतील यज्ञोपवीत शस्त्रक्रियेसाठीं काढून टाकल्याचें त्यांच्या ध्यानांत येऊन शास्त्रीबुवांचा जीव तळमळला आणि घरीं जाऊन यज्ञोपवीत धारण करून ब्राह्मण्याच्या स्थितींत आपण इहलोक सोडावा, अशी इच्छा शास्त्रीबुवांनीं दर्शविली होती. पुढें घरीं आल्यावर त्यांनीं गीतादि ग्रंथांचें श्रवण चालविलें. या लहानशा प्रसंगांत शास्त्रीबुवांच्या जीवनाचें रहस्य सांठविलेलें आहे, असें आम्हांस वाटतें. शास्त्रीबुवांचें सारें आयुष्य ब्राह्मणांच्या गीतोक्त स्वभावज गुणांची अभिवृद्धि करण्यांत गेलें असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. शास्त्रीबुवांचें घराणें पिढीजाद विद्याव्यासंगाचें होतें. त्यांचे एक पूर्वज महेश्वरभट्ट यांनीं लिहिलेली अमरकोशावरील टीका लक्षांत घेतल्यास संपादिलेल्या ज्ञानाचा किंवा विचारांचा प्रसार करण्याची त्यांची प्रवृत्ति कळण्याला उशीर लागणार नाहीं. घराण्याच्या प्रस्तुत परंपरेला अनुसरून शास्त्रीबुवा लहानपणीं काशीस गेले आणि तेथें त्यांनीं बारा वर्षे दर्शन शास्त्रांचा अभ्यास केला. न्यायशास्त्रांत त्यांच्या बुद्धीची गति विशेष असल्यामुळें त्यांनीं बनारस संस्कृत कॉलेजांत न्यायशास्त्राची परीक्षा देऊन न्यायशास्त्री ही पदवी हस्तगत केली. या पदवीबरोबरच त्यांना न्यायशास्त्रपारंगतीचें पदकही प्राप्त झालें होतें. न्यायशास्त्राबद्दल त्यांची इतकी ख्याति होती कीं, न्यायशास्त्री हें जणूं काय त्यांचें दुसरें नांवच बनलें होतें. विद्यार्जन संपवून शास्त्रीबुवा मुंबईस परत आल्यावर त्यांच्या अध्यापनकार्याला प्रारंभ झाला. शास्त्रीबुवा म्हणजे सौजन्याची केवळ मूर्ति होते. अविश्रांतपणें आपला शहरांतील ठिकठिकाणचा उद्योग करणारी ठेंगणी लहानसा पांढरा फेटा डोक्यास घट्ट बांधलेली, पेशवाई थाटाचा अंगरखा अंगांत घातलेली आणि ठराविक वेळीं ठराविक ठिकाणीं भेटणारी शास्त्रीबुवांची हंसतमुख मूर्ति यापुढें दिसणारी नसल्यामुळें त्यांच्या परिचितांना कांहीं काळ तरी चुकल्या चुकल्यासारखें वाटेल यांत संशय नाहीं. शास्त्रीबुवा एवढे विद्वान आणि मानमान्यता पावलेले; परंतु आपल्या एखाद्या विद्यार्थ्याचाही नमस्कार स्वीकारतांना त्यांच्या ठिकाणीं इतका विनय दिसा-

वयाचा, कीं विद्वत्ता आणि विनय यांच्या साहचर्याचें प्रत्यक्ष दर्शन घडून कृतार्थता वाटावी! शास्त्रीबुवांच्या विद्वत्तेचा लाभ सेंट झेवियर कॉलेजांतील संस्कृत मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांना तर मिळतच होता, परंतु खासगी रीतीनें माजी न्या. मू. पाटकर, प. वा. न्या. मू. सर लल्लूभाई शहा, मुंबई इलाख्याचे माजी अकौंटंट जनरल मि. राघवन् यांसारख्या बड्या हुद्देदारांनीं देखील त्यांच्या विद्वत्तेचा लाभ घेतल्याचीं उदाहरणें आहेत. शास्त्रीबुवा १९१९ सालापासून झेवियर कालेजांत अध्यापन करीत होते. त्यांचे एक प्रकारें वरिष्ठ जोडीदार फादर झिमरमन हे त्यांना सदैव गुरुस्थानीं मानून त्यांचा आदर करीत असत. झाला वेदान्त बक्षिसाच्या उच्च परीक्षेला शास्त्रीबुवा परीक्षक असत, यावरून त्यांची विद्यापीठांतील प्रतिष्ठा कळून येणारी आहे. शास्त्रीबुवा जुन्या पद्धतीनें विद्यार्जन केलेले पंडित होते, परंतु त्यांनीं कालानुसार पाश्चात्य राहणींतील कांहीं सद्गुण आपलेसे केले होते व त्यापैकीं एक सद्गुण म्हणजे कमालीचा वक्तशीरपणा हा होय. एकदा कांहीं मंडळीच्या आग्रहावरून शास्त्रीबुवांनीं ब्रह्मसूत्राचें शांकर भाष्य सारस्वत ब्राह्मण समाजाच्या जागीं सांगण्याचें काम पत्करलें. दिवस थंडीचे आणि वेळ रात्रीची असल्यामुळें ज्यांच्या उत्साहासाठीं शास्त्रीबुवांनीं ही कामगिरी स्वीकारली. त्या मंडळींत सदर वर्गाची आणि वेळाची चुकवाचुकव दिसूं लागली, परंतु शास्त्रीबुवा कधींही ठरलेला दिवस आणि काळ चुकले नाहींत. शास्त्रीबुवांचा बहुतेक सारा काळ अध्ययन अध्यापनांतच खर्ची पडत असे व त्यामध्यें इतकी विविधता होती कीं, वक्तशीरपणाशिवाय व सर्वगामी प्रखर विद्वत्तेशिवाय आपल्या जबाबदाऱ्या इतक्या बिनबोभाट रीतीनें त्यांना पार पाडतां आल्या नसत्या. शास्त्रीबुवांचा दुसरा गुण म्हणजे प्रसिद्धीबद्दल उदासीनता. आपल्या व्यवसायाबाहेर सार्वजनिक कार्याच्या धकाधकींत ते कधींही शिरले नाहींत. परंतु समाजाला अशा पुरुषांच्या जीवनाचा जितका मार्गदर्शक उपयोग होत असतो, तितका तो प्रत्यक्ष सार्वजनिक कार्यांतील चळवळ्या पुढाऱ्यांपासून सुद्धां होत नाहीं, ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. "समाजाच्या" नैतिक कण्याची मजबुती शास्त्रीबुवांसारख्या एकनिष्ठ स्वकर्तव्यरत व्यक्तीवर अवलंबून असते. मुंबईतील महाराष्ट्रीय समाजाचें शास्त्रीबुवा हे एक भूषण होते. मुंबईत महाराष्ट्रीय शास्त्रीमंडळाचा दिवसानुदिवस तुटवडा पडत असून नवीन पंडितांचा उदय दृष्टीस पडत नाहीं. भवानीशंकर शास्त्रीबुवांच्या आधीं वाक्शास्त्री गेले, आतां पं. भवानीशंकरांच्या मागें नांव घेण्याला पं. शित्रेशास्त्री व निर्णयसागरचे पं. पणशीकरशास्त्री आहेत. या दृष्टीनें विचार केल्यास भवानीशंकरशास्त्रीबुवांच्या निधनानें जुन्या विद्वत्तेची व महाराष्ट्र समाजाची किती दुर्भर हानि झाली आहे याची कल्पना करतां येईल.

## रा. रा. रेगे मामलेदार यांचें शोचनीय निधन

सोलापूर, येथील सेवानिवृत्त मामलेदार व इमारती लांकडाचे व्यापारी रा. रा. रंगराव रामचंद्र रेगे यांना थोडया दिवसांपूर्वी देवाज्ञा झाली, हें कळविण्यास फार वाईट वाटतें. घरची गरिबी असतां लहानपणीं त्यांनीं इंग्रजी शिक्षण संपादन केलें व ते सरकारी नोकरींत शिरले. नंतर आपल्या अंगच्या कर्तबगारीनें वाढत ते मामलेदार झाले. सोलापूर तालुक्याचे मामलेदार असतांना त्यांनीं मेसर्स रेगे अँड सन्स नांवाचा इमारती लांकडाचा कारखाना उघडला. सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनीं आपलें लक्ष या धंद्यांत घालून तो भरभराटीस आणला. गरिबांशीं ते अत्यंत प्रेमळपणानें वागत व अस्पृश्योद्धारासाठीं त्यांनीं व्यक्तिशः प्रयत्न केले होते. सारस्वत विद्यार्थीसाहाय्यक मंडळीचे ते हयात सभासद होते. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो-

# ज्ञातिसमाचार

## १ ज्ञातिसंस्थांचा परामर्ष.

१ सारस्वत सोशल युनियन, पुणें, रौप्य ज्युबिली महोत्सव:–ह्या संस्थेचा रौप्यमहोत्सव ता. १७आक्टोबर १९३४रोजीं मोठया थाटानें सोमवार पेठेंतील सारस्वत ब्राह्मण कॉलनींतील यूनियनच्या दिवाणखान्यांत साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगीं श्रीयुत गणपतराव सखाराम राजाध्यक्ष, आय. सी. एस. मुख्य पाहुणे असून, त्यांच्याच अध्यक्षतेखालीं महोत्सवाचा कार्यक्रम यशस्वी रीतीनें पार पडला. समारंभ दोन दिवस चालला होता. ता. १६ ला संध्याकाळीं बायकांच्या हळदी–कुंकवाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर रात्रौ ९॥ वाजतां श्री. कीर्तनेकृत "**कुलांगार**" ह्या नाटिकेचा प्रयोग युनियनच्या व्यायाममंडळाच्या मदतीकरितां कांहीं हौशी मंडळींनीं करून दाखविला. ह्या प्रसंगीं रा. गोडबोले व रा. कीर्तने व इतर नटमंडळी ह्यांनीं बरेच परिश्रम घेऊन नाटक यशस्वी रीतीनें पार पाडण्यांत फार हातभार लावला हें त्यांना सर्वस्वी भूषणावह आहे.

ता. १७ ला दसऱ्याच्या सुमुहूर्तावर सकाळपासून परत कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रथम पिंगपॉंगचा शेवटचा सामना मोठया चुरशीचा झाला व नंतर सर्व मंडळींचा अल्पाहार झाल्यानंतर दुपारीं ४ वाजतां मुख्य कार्यक्रमास श्रीयुत राजाध्यक्षांच्या अध्यक्षतेखालीं सुरुवात झाली. ह्या मंगल प्रसंगीं पुण्यांतील बरीच सारस्वत मंडळी हजर होती. यूनियनचे अध्यक्ष श्री. बाबासाहेब कामत, तसेंच मेजर दाभोळकर व त्यांच्या सन्मान्य पत्नी, श्रीयुत शांताराम बाळकृष्ण रेगे, एक्झिक्युटिव एंजिनिअर, पी. डब्लू. डी., श्रीयुत लक्ष्मण जगन्नाथ कामत, ऑनररी मॅजिस्ट्रेट, वगैरे मंडळी आलेली होती.

मुलींनीं ईशस्तवन म्हटल्यावर श्री. बाबासाहेब यांनीं चटकदार भाषण करून समारंभाचे नियोजित पाहुणे श्रीयुत राजाध्यक्ष व श्रीमती राजाध्यक्ष यांचा परिचय करून दिला. नंतर संस्थेचे सेक्रेटरी रा. नाडकर्णी ह्यांनीं स्वागतपर भाषण करून संस्थेनें २५ वर्षांत केलेल्या कामगिरीचा उल्लेख करून संस्थेवर कृपालोभ ठेवण्याची कळकळीची विनंती केली.

श्रीमती सौ. विमलाबाई राजाध्यक्ष यांच्या हस्ते खेळांच्या सामन्यांत बक्षिसें मिळविणाऱ्या मुलांमुलींना बक्षिसें वांटण्यांत आल्यावर श्रीयुत राजाध्यक्ष यांनीं थोडक्यांत पण समयोचित भाषण केलें. यूनियननें आतांपावेतों केलेल्या कामगिरीबद्दल अभिनंदन करून पुढें संस्थेनें कोणचे धोरण ठेवणें इष्ट आहे याबद्दल दोन उपदेशपर शब्द सांगितले. त्यानंतर रा. मोकाशी यांनीं पाहुण्यांचे, स्वयंसेवकांचे, तसेंच हार्मोनियमच्या शर्यतींत परीक्षकाचें काम केल्याबद्दल प्रे. पटवर्धन बुवा यांचे आभार मानल्यावर हारतुरे झाल्यावर पुढच्या गोड व शेवटच्या कार्यक्रमास रात्रीं ८॥ वाजतां सुरुवात झाली.

ह्या प्रसंगीं कु. सीता माविनकुर्वे व कु. सोहनी यांचें सुस्वर गायन, कु. दयानंद कामत यांचें पेटीवादन व कु. दुभाषी यांचे बुलबुलतरंग झाल्यावर येथील गांधर्व महाविद्यालयाचे मास्टर विष्णु यांचें मधुर व चटकदार गायन झालें व हा गोड समारंभ आटोपला.

२ सारस्वत–दीनवत्सल संघ. रौप्यज्युबिली–वृत्तांत-सारस्वत ज्ञातींतील असहाय स्थितींत असलेल्या किंवा अकस्मात् दुर्दैवानें बिकट प्रसंगांत सांपडणाऱ्या बंधु-भगिनींना सहाय्य करण्यासाठीं वरील संस्था मुंबईंत विजया दशमी शके. १८३० या दिवशीं स्थापन झाली. तिच्या कामगिरीचा हा २५ वर्षांचा अहवाल 'रौप्य–जुबिली–वृत्तांत' रूपानें प्रसिद्ध करण्यांत आला आहे.सन १९२४-२५ सालीं या संस्थेचा ट्रस्ट करण्यांत येऊन त्यास चिरस्थायी स्वरूप देण्यांत आलें.

संस्थेनें २५ वर्षांत केलेली कामगिरी अभिनंदनीय आहे. या संस्थेचे पहिल्या वर्षी सर्व प्रकारचे सभासद १५० होते. आज ती संख्या ८३९ असून त्यांत स्त्री-सभासद ७१ आहेत. पहिल्या वर्षी ज्ञातींतील ३ इसमांस ७५ रुपये मदत मिळाली होती. पंचविसाव्या वर्षी ९१ इसमांस ४१५२ रुपये मदत मिळाली आहे. पहिल्या वर्षी कायम फंड ११०८ रुपये होता. आज या फंडाची रक्कम ५३६१० रुपये असून त्याचें व्याज दरसाल ३३०४ रुपये येत असतें. सारस्वत ज्ञातीची मुख्य वस्ती मुंबई शहर, रत्नागिरी जिल्हा, सावंतवाडी संस्थान व गोवें प्रांत यांत आहे; अर्थात् संघाकडून झालेली आर्थिक मदत त्याच ठिकाणीं प्रमाणशः जास्त होणें साहजिक आहे. एकंदरींत संघानें चालविलेली कामगिरी फार उपयुक्त असून ज्ञातींतील समर्थ लोकांनीं या उपयुक्त संस्थेस सढळ हातानें मदत करून बंधु–भगिनी–वात्सल्याचें व परोपकाराचें श्रेय घेतल्यास संघ याहीपेक्षां श्रेयस्कर कार्य करील असा भरंवसा वाटतो.

३ **सारस्वत ब्राह्मण समाज, मुंबई.** सालाबादप्रमाणें ता. ९ ते १७ ऑक्टोबर १९३४ पर्यंत समाजाच्या विद्यमानें **श्री सरस्वतीमहोत्सव** साजरा करण्यांत आला. त्यावेळीं रा.रा. नरहर रघुनाथ फाटक, रा. रा. शंकर राव कान्तेबेट, रा रा. रामचंद्र विठ्ठल पवळेकर, रा. रा वसंतराव नारायण नाईक, कुमारी नीरा मोंडकर, रा. रा. भार्गवराम वि. वरेरकर, रा. एच् शंकर राव यांचीं व्याख्यानें ह. भ. प. निजामपूरकरबुवा यांचें 'धर्म' या विषयावर प्रवचन, ह. भ प कवीश्वरबुवा यांचें हरिकीर्तन, रा. रा. कृष्णराव टिपणीस यांचा फ्ल्यूट सोलो, नकला वगैरे, रा. रा. वसंतराव पै यांचें गायन, सतार, दिलरुबा, जलतरंगवादन, कुमारी जी. एम्. कर्नाड यांचें पेटीवादन, गायन वगैरे; कुमारी बेबी नाडकर्णी यांचें गायन;प्रो. कृष्णराव पंडित यांच्या नकला, रा. रा. सखाराम विठ्ठल पाटकर यांचें सतार वादन; बालमोहन मेळा, रोहिदास मेळा, शक्तीचे प्रयोग, व कुमारी चंद्रा राजाध्यक्ष व कुमारी पद्मावती यांचें गायन वगैरे उत्कृष्ट कार्यक्रम ठेवण्यांत आला होता. कु. चंद्रा राजाध्यक्ष (सेंट झेविअर्स कॉलेज) यांचें कर्णमधुर गायन फार बहारीचें होऊन तिचा सर्वमुखीं बोलबाला झाला. दसऱ्याच्या दिवशीं उत्सवांचा समारोप समाजाचे अध्यक्ष रा. रा. सीताराम नाईक, इंजीनिअर यांच्या अध्यक्षतेखालीं होऊन त्या वेळीं अध्यक्षांचे, तसेंच रा. रा. शंकर पुंडलिक वर्दे व रा. रा. भिकाजी सीताराम सबनीस यांचीं समाजगृहाच्या आवश्यकतेसंबंधीं भाषणें झालीं. अध्यक्षांच्या हस्तें कु. चंद्रा राजाध्यक्ष यांस एक लहानसा रौप्यकरंडक समाजाची आठवण म्हणून नजर केला.

**दीपावलिनिमित्त** समाजांत ता. ५-११-३४ रोजीं रात्रौ ९॥ वाजतां सॉलिसिटर दिवेकर यांचें गायन झालें व ता. ७-११-३२ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां कुमारी चंपा गुणजी (एल्फिन्स्टन कॉलेज) यांचें काव्यगायन झालें.

अलीकडे झालेल्या वार्षिक सभेंत निवडून आलेल्या व्यवस्थापक मंडळानें पुढील वर्षासाठीं आपल्यामधून खालील कार्यवाह नेमिले आहेतः—

**चेअरमन** रा. रा. शंकर पुंडलिक वर्दे. **ऑनररी सेक्रेटरीज्**– रा. रा. शांताराम विनायक केंकरे व रा. रा. नीलकंठ बाळकृष्ण रांगणेकर. **व्यवस्थापक**– रा. रा. लक्ष्मण नारायण दडकर. **खजिनदार**– रा. रा. नीलकंठ त्रिंबक देसाई व रा. रा. गोपाळकृष्ण दत्तात्रय कौशिक **ग्रंथालयाधिकारी**– रा. रा. वसंत जगन्नाथ पुनाळेकर व रा. रा. शंकर आनंदराव वागळे.

४ **सारस्वत ब्राह्मण सेवासंघ, दादर** या संस्थेचा ६ **वा रिपोर्ट** इंग्रजींत प्रसिद्ध करण्यांत आला असून तो ता. १४ ऑक्टोबर १९३४ रोजीं भरलेल्या संघाच्या वार्षिक सभेंत मंजूर करण्यांत आला. सदर अहवालावरून पुढील हकीकत कळून येतेः—

संस्थेच्या पटावर ता. ३१ डिसेंबर १९३४ रोजीं ३ पेट्रन्स, १० लाइफ मेंबर्स व १७० साधारण सभासद होते. लाइफ मेंबरांकडून यावयाची रु. ३६५ व साधारण सभासदांकडून यावयाची रु. ४४८-४-० मिळून रु. ८१३-४-० वर्गणीची बाकी सभासदांकडे येणें निघते. संस्थेनें मागील सालीं सुरू केलेलें व पुष्कळशी प्रसिद्धि पावलेलें **उद्यम-मंदिर** लोकाश्रयाच्या अभावीं बंद करावें लागलें. गेल्या रिपोर्टांत हातीं घ्यावयाच्या बऱ्याच गोष्टींचा निर्देश होता; परंतु त्या वृत्तांताच्या सालींही मूर्त स्वरूपांत आणतां आल्या नाहींत. ज्ञातींतील माजी थोर पुरुषांच्या पुण्यतिथि, दसरा सम्मेलन व मुलांमुलींच्या वक्तृत्वाच्या व शारीरिक मर्दुमकीच्या चढाओढी, स्त्रियांचीं सम्मेलनें, कोजागरी सम्मेलन, व्याख्यानें वगैरे द्वारें कर्तृत्व-स्वजागृति व मनोरंजन करण्याचा संस्थेनें यथामति प्रयत्न केला. विद्यार्थी-मंडळ ही संघाची एक शाखा असून तिची पुनर्घटना व कार्य रा. रा. गजानन हरि जांबोटकर, एम्. ए., बी. टी. यांच्या नेतृत्वाखालीं योग्य प्रकारें चाललें आहे. मंडळानें चालविलेल्या मॅट्रिकच्या क्लासांतील विद्यार्थ्यांपैकीं शेंकडा ५० विध्यार्थी त्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले. विद्यार्थी मंडळानें संघाच्या कार्यकारी मंडळीशीं वेळोवेळीं सहकार्य करून त्याच्या कार्यास सर्वांगीण मदत केली. संघाच्या हातीं रु. १२११ रक्कम शिल्लक आहे. संघाचें काम अधिक पद्धतशीर व मोठ्या प्रमाणावर व्हावें म्हणून स्वतःच्या मालकीच्या गृहाची संघास फार जरूरी असून त्या गोष्टीच्या पूर्ततेसाठीं सर्व सभासदांनीं आपल्या शक्ति एकवटाव्या अशी त्यांस कळकळीची विनंति अहवालांत केली आहे.

संघाचें **दसरा-सम्मेलन** रा. रा. आनंदराव नारायण नेरूरकर, बी. कॉम्. (इन्कम टॅक्स ऑफिसर) यांच्या अध्यक्षतेखालीं ता. १७-१०-१९३४ रोजीं छबिलदास हायस्कूलच्या जागेंत साजरें करण्यांत आलें. कुमारी बेबी नाडकर्णी इचें गायन, व रा. रा. मामा वरेरकरकृत "नवा खेळ" या नाटकाचा संपूर्ण प्रयोग वगैरे कार्यक्रम पार पडले.

चालू सालासाठीं संघानें पुढील कामगार नेमिले आहेत: — **अध्यक्ष**— रा. रा. परशुराम आबाजी कर्णीक; **चिटणीस**— रा. रा. सीताराम गोविंद कळसूलकर; **खजिनदार**—रा. रा. पांडुरंग गोविंदबक्षी; व्यवस्थापक— रा. रा. प्रभु. **विद्यार्थी सल्लागार**— रा. रा. मंगेश चिंतामण पागनीस, बी. एस्सी.

संघाचें सांप्रतचें कार्यालय श्रीशिवाजी पब्लिक स्कूल, कामाठी बिल्डिंग, लेडी जमशेटजी रोड, दादर (मुंबई) हें आहे.

५ **मेडिकल व डायेटिक क्लिनिक: मुंबईंतील एक नवीन आरोग्यमंदिर:** ही संस्था नं. १५४, लेडी जहांगिर रोड, हिंदु कॉलनी, दादर, येथें रविवार ता. ११ नोव्हेंबर १९३४ रोजीं सायंकाळीं स्टॅ. वे. ६ वाजता कॉंग्रेसचे सुप्रसिद्ध पुढारी शेठ जमनालाल बजाज यांच्या हस्तें उघडण्यांत आली. या समारंभास पुष्कळ डॉक्टर व नामांकित गृहस्थ व स्त्रिया हजर होत्या. **डॉ. गोविंद केशवराव देशपांडे**, एम्. डी. (बर्लिन) व डॉ. व्ही. डी. गुप्ते, बी. एस्सी., एम्. डी. (अमेरिका) यांनीं हें आरोग्यालय सुरू केलें असून तेच तिचे संचालक आहेत. या ठिकाणीं सर्व प्रकारची उत्कृष्ट आधुनिक पद्धतीवरील उपकरण-सामुग्री ठेवलेली आहे. दादर-माटुंग्यासारख्या वाढत्या सुशिक्षित लोकवस्तीच्या सोईसाठीं सूतिकागृहाचीसुद्धां तजवीज या संस्थेंत केली आहे, इतर डॉक्टर लोकांस, आपल्या रोग्यासाठीं शुश्रूषागृहाची आवश्यकता वाटल्यास त्या रोग्यांसही या रुग्णालयांत प्रवेश मिळेल. सदर संस्थेच्या उद्घाटणप्रसंगीं भाषण करितांना डॉ. गो. के. देशपांडे यांनीं हें रुग्णालय सुरू करण्याचा पुढीलप्रमाणें उद्देश सांगितला:—

"पथ्याहार हें वैद्यशास्त्राच्या दृष्टीनें एक महत्त्वाचें शास्त्र आहे; आणि त्या शास्त्रानुसार रोग्याचें खाणें-

पिणें कसें नियंत्रित करावें म्हणजे ज्या आहाराच्या योगानें रोग्याचें आरोग्य पूर्व स्थितीवर येईल असा आहार कोणता घ्यावा, प्रत्येक खाद्यपेयपदार्थांतील घटकद्रव्यें कोणतीं, निरनिराळ्या रुग्णावस्थेंत कोणत्या रोग्यास कोणतें अन्न हितावह होईल, या सर्व गोष्टींचें ज्ञान होतें. रोग्याची अशा प्रकारची पथ्याहाराची शास्त्रीय व्यवस्था असणाऱ्या रुग्णालयाची मुंबई-सारख्या शहरांत मोठी उणीव भासत होती; ती अंशतः तरी दूर करावी या उद्देशानें ही संस्था सुरू केली आहे."

यानंतर अध्यक्षांचें चालकांच्या अभिनंदनपर भाषण झाल्यावर, डॉ. गुप्ते यांनीं अध्यक्षांचे व निमंत्रित पाहुण्यांचे आभार मानले. नंतर अल्पाहार होऊन हा समारंभ आटोपला.

६ **सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी:** सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीची ३१ वी वार्षिक साधारण सभा रविवार, ता. २५ नोव्हेंबर १९३४ रोजीं दुपारीं स्टँ. वे. ३-३० वाजतां मुंबई येथें गिरगांवांत सारस्वत ब्राह्मण समाजगृहांत भरली होती. त्या वेळीं ६१ सभासद हजर होते. मंडळीच्या संस्थापकांपैकीं एक प्रमुख सभासद व आद्य कार्यकर्ते श्रीयुत **शिवराम नारायण रेगे** यांची अध्यक्षस्थानीं योजना करण्यांत आली होती.

गेल्या वार्षिक साधारण सभेचें मिनिट वाचून मंजूर करण्यांत आल्यावर व्यवस्थापकमंडळाचे अध्यक्ष श्रीयुत शंकर पुंडलीक वर्दे, बी. ए., एल्एल्. बी., यानीं सुश्राव्य भाषण करून " सभासदांस छापून वांटलेला मंडळीच्या ३२ वा वार्षिक वृत्तांत जमाखर्चाच्या आढव्यासह मंजूर करण्यांत यावा " असा ठराव मांडला; त्यास श्रीयुत विनायक मंगेश रांगणेकर यांनीं अनुमोदन दिल्यावर त्यावर श्रीयुत गणपत विश्वनाथ लाड, श्रीयुत मंगेश लक्ष्मण राजाध्यक्ष, एल्. एस्. ई., श्रीयुत नीलकंठ बाळकृष्ण रांगणेकर, बी. ए., श्रीयुत शंकर मंगेश पालेकर, बी. ए. जी., जी. डी. ए., श्रीयुत अच्युत गणेश कामत, बी. ए., बी. एस्सी., श्रीयुत वामन पुंडलिक वर्दे, बी. कॉम्. व श्रीयुत नीलकंठ त्रिंबक देसाई यांचीं भाषणें झाल्यावर तो ठराव सर्वानुमतें मंजूर झाला.

सदर अहवालावरून पुढील गोष्टी दिसून येतातः—

ही संस्था १९०२ मध्यें स्थापन झाली असून १९१४ मध्यें ती सरकारांत नोंदण्यांत आली व १९१८ सालीं तिच्या मालमत्तेचा ट्रस्ट करण्यांत आला. पहिल्या वर्षी या संस्थेचे सभासद ८४ होते; वृत्तांताच्या सालअखेर तिच्या पटावर १९ वाली, ११ सहाय्यक, ३९१ तहाहयात सभासद, व १,३९५ साधारण सभासद मिळून एकंदर १,८१७ सभासद आहेत.

वर्षअखेर मंडळीकडे कायम शिल्लक रु. ९६७०३७ असून त्यांपैकीं रु. २७,१०० अनाथविधवा शिक्षणासाठीं आहेत. या गोष्टीवरून मंडळीचें आजपर्यंतचें कार्य ज्ञातीच्या विश्वासास पात्र झाल्याचें स्पष्ट दिसून येतें.

मंडळीनें ३२ वर्षांमध्यें ज्ञातींतील ७७८ विध्यार्थ्यांच्या व विध्यार्थिनींच्या शिक्षणासाठीं रु. १,६८,६८१ खर्च केले. या संस्थेच्या मदतीनें शिक्षण पूर्ण केलेल्या बऱ्याच विध्यार्थ्यांनीं आपापल्या क्षेत्रांत उत्तम तऱ्हेचें यश संपादिलें आहे.

मंडळीनें ज्ञातींतील असहाय अशा गतभर्तृकांच्या शिक्षणासाठीं १९२०पासून अनाथ-विधवा-शिक्षण-फंड उभारण्यांत आला असून त्यांतून ५२ गतभर्तृकांच्या शिक्षणासाठीं रु. १४, ३३७ खर्च करण्यांत आले आहेत. हा द्रव्यनिधि उभारण्याचें बहुतेक श्रेय श्रीयुत पांडुरंग भास्कर ऊर्फ बापूसाहेब गोठोस्कर, बी. ए. यांस आहे. मंडळीकडे पुष्कळ ज्ञातिबंधु-भगिनींनीं दिवंगत प्रियजनांचें स्मरण राहावें या हेतूनें लहान-मोठ्या रकमा दिल्या असून त्यांतून दरसाल बक्षिसें व शिष्यवृत्त्या दिल्या जातात. हा स्मारक-निधि आजपावेतों रु. ७४,५४३ झाला आहे. वृत्तांताच्या सालीं मंडळीनें १९६ विद्यार्थ्यांस एकंदर रु. १५,३५७ शिष्यवृत्तींच्या रूपानें दिले असून

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ...... नं. 2441/32
226

त्यांपैकीं १,८६८ रु. १७ गतभर्तृकांच्या शिक्षणासाठीं खर्च झाले आहेत. या वर्षी मदतीसाठीं आलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांपैकीं १७३ अर्ज नामंजूर करावे लागले. यांपैकीं ९६ विद्यार्थी संस्थेच्या नियमांनुसार मदतीस पात्र असूनही त्यांचे अर्ज द्रव्याभावीं नाइलाजानें नाकारावे लागले. संस्थेच्या व्यवस्थापकमंडळानें या सालापासून मुंबई व उपनगर येथील मंडळीच्या विद्यार्थ्यांची दर ६ महिन्यांनीं वैद्यकीय तपासणी करून त्याबद्दलची व्यवस्थित नोंद करून ठेवण्याचें कार्य सुरू केलें आहे. गेल्या तपासणीमध्यें शेंकडा ३७ विद्यार्थ्यांची शारीरप्रकृति उत्तम, शेंकडा ४४ विद्यार्थ्यांची मध्यम, व शेंकडा १९ ची कनिष्ट असल्याचें दिसून आलें. तसेंच व्यवस्थापकमंडळाच्या विनंतीवरून ज्ञातींतील कांहीं सुप्रसिद्ध डॉक्टरांनीं मंडळीच्या मुंबई व उपनगर येथील विद्यार्थ्यांस जरूर पडेल तेव्हां मोफत औषधोपचार करण्याचें कबूल केलें आहे.

संस्थेचें व्यवस्थापकमंडळ व विद्यार्थी यांमध्यें मोकळ्या मनानें विचारविनिमय होऊन विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर व्हाव्या व त्यांच्या मनांत संस्थेविषयीं आपलेपणा उत्पन्न व्हावा आणि प्रौढ वयांत त्यांनीं ज्ञातीच्या व देशाच्या उत्कर्षाला पोषक अशी कामगिरी करण्यास समर्थ व्हावें या हेतूनें यंदापासून व्यवस्थापक मंडळानें मधून मधून संभाषणात्मक सभा भरविण्याचें सुरू केलें आहे. विद्यार्थ्यांच्या हजेरीवरून हा उपक्रम त्यांस इष्ट वाटत आहे असें दिसून येतें.

नंतर अध्यक्षांनीं सभासदांकडून आलेल्या मतपत्रकांवरून पुढील सभासद पुढील तीन वर्षांसाठीं व्यवस्थापकमंडळावर निवडून आल्याचें जाहीर केलें:-

( १ ) श्रीयुत यशवंत हणमंत सुखटणकर, ( २ ) श्रीयुत सदानंद लक्ष्मण कापडी, बी. एस्सी., ( ३ ) कुमारी नीरा लक्ष्मण मोंडकर, बी.ए., बी. टी., (४) प्रिन्सिपाल वसंतराव रामचंद्र नेरूरकर, एम्. ए., एस्. डी. सी., टी. डी. एम्, आर्. एस्. टी., व ( ५ ) डॉ. काशीराम विष्णु कामत भांगले, एम्. बी., बी. एस्. ए. आर्. ओ.

श्रीयुत आनंदराव नारायण नेरूरकर, बी. कॉम व श्रीयुत माधव महेश्वर मुझुमदार, बी. कॉम् यांना पुढील वर्षासाठीं पुन्हा हिशेबतपासनीस नेमण्यांत आलें.

नंतर वृत्तपत्रकार, निरनिराळया संस्था, स्वयंसेवक मततपासनीस, हिशेबतपासनीस, व्यवस्थापक मंडळ, यांचे आभारप्रदर्शक ठराव मंजूर करण्यांत आले.

कॉलेजांतील अगर वयांत आलेल्या विद्यार्थ्यांवर मदत-फेडीसंबंधानें कांहींतरी कायदेशीर बंधन असावें कीं काय या व्यवस्थापकमंडळानें सुचविलेल्या प्रश्नासंबंधानें श्रीयुत शंकर पुंडलिक वर्दे, बी. ए., एलएल्. बी., श्रीयुत नीलकंठ बाळकृष्ण रांगणेकर, बी. ए., श्रीयुत गणपत विश्वनाथ लाड, श्रीयुत सदानंद लक्ष्मण कापडी, बी. एस्सी., श्रीयुत मंगेश लक्ष्मण राजाध्यक्ष, एल्. एस्. ई., श्रीयुत श्रीपाद महादेव वर्दे, बी. ए., एलएल्. बी., श्रीयुत शंकर मंगेश पालेकर, बी. एजी., जी.डी.ए , श्रीयुत वामन पुंडलिक वर्दे, बी.कॉम् , श्री. अच्युत गणेश कामत, बी. ए., बी. एस्सी., श्रीयुत भिकाजी सीताराम सबनीस, बी ए., एलएल्. बी., श्रीयुत विठ्ठल भिकाप्पा प्रभू , बी. ए. व श्रीयुत यशवंत हणमंत सुखठणकर यांचीं भाषणें झाल्यावर त्या प्रश्नाचा विचार करून सर्व सभासद व स्मारक-फंड देणारे यांचें रेफरेन्डम घेऊन जरूर तर त्यासंबंधानें नियम, योजना वगैरे करण्यासाठीं एक स्पेशल कमिटी नेमण्यांत येऊन तिचे कन्व्हीनर श्रीयुत वामनराव वर्दे यांस निवडण्यांत आलें व सभेचें काम आटोपलें.

नंतर अध्यक्षांचें समयोचित भाषण झाल्यावर त्यांचे आभार मानण्यांत आले.

वरील सभेंत निवडून आलेल्या व्यवस्थापकमंडळानें सन १९३४-३५ साठीं पुढील कामगार नेमिले आहेत:—

अध्यक्ष—रा. रा. शंकर पुंडलिक वर्दे, बी. ए., एलएल्. बी.

चिटणीस—कुमारी नीरा मोंडकर, बी. ए., बी. टी. व रा. रा. यशवंत हणमंत सुखठणकर.

खजीनदार—रा. रा. सदाशिव विठ्ठल राजाध्यक्ष, जी. डी. ए., व रा. रा. अनंत गोविंद तेंडुलकर, एस्. टी. सी.

७ दाभोळकर रिचर्स स्कॉलर्शिप्स दाभोळकर स्कॉलर्शिप्स ॲडव्हायसरी बोर्डानें यंदा रा. दामोदर विठ्ठल कामत, बी. एस्सी. व रा. दत्त रामचंद्र नाडकर्णी, एम्. एस्सी. यांना प्रत्येकीं दरमहा ५० रु. च्या शिष्यवृत्त्या दिल्या आहेत. रा. कामत हे पुणें येथील मिटिरिऑलॉजिकल डिपार्टमेंटच्या लॅबोरेटरींत "The Measurement of the Earth-Air Electric Currents" या विषयावर संशोधन करीत असून, रा. नाडकर्णी हे मुंबई येथील रॉयल इन्स्टिटयूट ऑफ सायन्समध्यें "Synthesis of Flavonors" संशोधन करीत आहेत.

## २ अभिनंदन

बडोदें संस्थानांतील अमरेळी प्रांताचे सुभे रा. रा. मंगेश कमलाकर नाडकर्णी, बी. ए., एल्एल्. बी. हे सेवानिवृत्त झाल्यावर त्यांची नेमणूक धर्माधिकारी म्हणून पुनः करण्याबद्दल श्रीमंत महाराजसरकारांची विलायतेहून तार आल्यावर त्यांनीं त्या जागेचा चार्ज घेतला.

—पुणें येथील महाराष्ट्र चित्रकारमंडळातर्फे पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें रविवार ता. २१ ऑक्टोबर १९३४ रोजीं स्केचिंगची खुली चढाओढ झाली. स्केचिंगचा विषय "सर परशुरामभाऊ कॉलेज मैदानावरून दिसणारा पर्वतीचा देखावा" हा देण्यांत आला होता. या चढाओढींत पुण्यांतील बहुतेक शाळांतील ३४ विद्यार्थ्यांनीं भाग घेतला होता. या चढाओढीसाठीं प्रो. स. कृ. पिंपळखरे रा. रा. म. वि. आपटे व रा. रा. जी. एस्. देशमुख, यांचें परीक्षक-मंडळ नेमण्यांत आलें होतें त्यांनीं पहिलें बक्षिस-इचलकरंजी सुवर्णपदक-विद्यार्थी आर्. व्ही. साखळकर ( म. ए. सो. हायस्कूल ) व तिसरें बक्षिस कुमारी तारा रेगे ( हिंगणें विद्यालय ) यांस देण्याचें ठरविलें. हीं पारितोषिकें राजा रविवर्मा तृतीय स्मृतिदिन रोजीं पुण्याचे ॲडि. डिस्ट्रिक्ट मॅजिस्टेट रा. रा. एम्. बी. वैद्य यांच्या हस्तें देण्यांत आलीं.

—कानपूर येथील संगीत समाजातर्फें ता. २, ३ व ४ नोव्हेंबर १९३४ रोजीं भरलेल्या सहाव्या संगीत परिषदेंत पुण्याच्या तीन बालिकांचें कर्णमधुर गायन होऊन, त्यांस जमलेल्या तज्ज्ञांनीं पुण्याच्या तीन कोकिला या नांवानें गौरविलें. कुमारी सीता माविनकुर्वे ही स्वकीय बालिका त्यांपैकीं एक आहे.

—रा. रा. बी. राम राव, आय्. सी. एस्. यांना लंडन येथें असिस्टंट हायकमिशनर फॉर इंडिया या जागीं नेमण्यांत आलें आहे.

—रा. रा. एस्. एन्. कलबाग हे विह्ला पार्ले म्युनिसिपालिटीचे पुनः अध्यक्ष निवडून आले.

—रा. रा. आर्. एस्. दिवाडकर हे पुढील तीन वर्षांसाठीं न्यू सालसेट लोकलबोर्डाचे सभासद निवडून आले.

—गेल्या महिन्यांत झालेल्या शेवटच्या एल्. सी. पी. एस्. परीक्षेत पुढील विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेतः—

( १ ) कु. इंदिरा कृष्णराव कबीर, ( २ ) कु. सावित्री गंगाधर कामत, ( ३ ) कु. यशवंती भगवंतराव पाटकर व ( ४ ) कु. सीता जनार्दन तेंडूलकर.

—नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या "जस्टिस ऑफ धी पीस" च्या यादींत पुढील बंधु-भगिनींचीं नांवें आहेतः—

( १ ) रा. रा. राजाराम श्रीपाद बावडेकर आय्. सी. एस्., ( २ ) रा. रा. शिवराम विठ्ठल भांडारकर, बी. ए., एल्एल्. बी., ( ३ ) रा. रा. विठ्ठल

नारायण चंदावरकर, बी. ए. (कॅन्टाब.) बार ॲट-लॉ (४) रा. रा. मंगेश आनंदराव दाभोळकर (५) रा. रा. प्रभाकर आनंदराव दाभोळकर,(६ श्रीमती सौ. नलिनीबाई विश्वनाथराव दळवी, बी. ए (७) रा. रा. विश्वनाथ गणपत दळवी, बी. ए. एल्एल्. बी. (कॅन्टाब.) बार-ॲट-लॉ, (८) रा. रा. सुंदरराव रामराव डोंगरेकरी, बी. ए, एल्. एल्. बी., (९) रा. रा. नरसिंगराव शेषगिरि कौशिक, बी. ए.,(१०) लेडी भद्राबाई माडगांवकर. (११) रा. रा. वासुदेव विश्वेश्वरराव नाडकर्णी, बी. ए, एल्एल्. बी. (१२) डॉ. जनार्दन शंकर नेरूरर-कर, बी. एस्सी., एल्. एम्. ॲन्ड एस्., डी. पी. एच्. (कॅन्टाब), एफ्. आर्. एस्. आय्., (१३) रा. रा. रामचंद्र विठ्ठल परुळेकर, एम्. ए., एस्. टी. सी. (बॉम्.) टी. डी. (लंडन), एम्. इडी. (लीड्स्) (१४) रा. रा. शिवाजी कृष्ण परुळकर, एफ्. सी. आर्. ए. (१५) श्रीमती सौ. शांताबाई सीतारामपंत पाटकर, (१६) ले. क. राघवेंद्र राव, ओ. बी. ई., एम्. डी., डी. एस्सी. (लंडन), एफ. सी. पी. एस्. (बॉम्बे), (१७) रा. रा. अनंत राव वासुदेव सबनीस, बी. ए. (१८) रा. रा. डी. एन्. शिरूर,(१९) श्रीमती सौ. सुंदराबाई डी. शिरूर, (२०) डॉ. श्रीमती सौ. मालिनीबाई भालचंद्र सुख ठणकर, एम्. बी., बी. एस्. (२१) रा. रा. बळवंत कृष्णराव वागळे, बी. ए. (कॅन्टाब.)

मुंबई येथें नुकत्याच भरलेल्या हिंदी राष्ट्रीय सभेच्या ४८ व्या अधिवेशनाच्या व्यवस्थेंत खालील बंधुभगिनींनी भाग घेतला होता:—

रिसेप्शन् कमिटी:–उपाध्यक्ष-श्रीमती सौ. शांताबाई गणपतराव वेंगसरकर. चिटणीस– रा. रा. सदाशिव कानोजी पाटील.

कन्स्ट्रक्शन कमिटी:—ऑनररी इंजिनिअर्स आणि आर्किटेक्टस्–(१) रा. रा. शंकर दत्तात्रय प्रभावळकर, (२) रा. रा. गोपाळ आत्माराम कामतेकर, (३) रा. रा. जनार्दन गणेश परकी.

एक्झिबिशन कमिटी:–सभासद–श्री. सौ. शांताबाई वेंगसरकर.

मेडिकल कमिटी:–सभासद–डॉ. श्री. सौ. मालिनीबाई भालचंद्र सुखठणकर.

ॲम्बुलन्स:–डॉ. आत्माराम रामचंद्र रांगणेकर

रिक्वायरमेंट्स रिसेप्शन कमिटी:–चिट-णीस–रा. रा. कृष्णाजी नारायण देशपांडे.

प्रेसिडेंट्स् रिसेप्शन कमिटी:–उपाध्यक्ष–रा. रा. नारायण बलवत देशपांडे

मेस कमिटी:–सभासद—श्री. सौ. शांताबाई वेंगसरकर.

—पुणें येथें नाताळांत भरलेल्या प्रागतिक परिष-देच्या अधिवेशनाच्या स्वागतमंडळाचे रा. रा. बाबा-साहेब कामत यांस उपाध्यक्ष नेमिलें होतें.

—बॉम्बे आर्ट सोसायटीच्या विद्यमानें पुणें येथें कौन्सिलहॉलमध्यें ता. ३१-१०-१९३४ रोजीं भर-लेल्या ९ व्या कलाप्रदर्शनांत रा. रघुवीर गोविंद प्रभु चिमुलकर यांना पारितोषिक मिळालें आहे. तसेंच श्रीमती सौ. कमलाबाई डोंगरकेरी यांच्या स्टिल लाइफ या तैलचित्राला प्रशस्तीपत्र मिळालें आहे.

—कोल्हापूर येथें दक्षिण विभागच्या आंतर-कॉले-जीय मैदानी खेळाचे सामने ता. ३ ते ७ डिसेंबर पर्यंत झाले; त्यात बेळगांव येथील लिंगराज कॉलेजां-तील विद्यार्थी रा. के. वाय्. नाडकर्णी यांनीं बरींच पारितोषिकें मिळालीं आहेत.

—वेंगुर्लें म्युनिसिपल स्कूलबोर्डच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकींत रा. रा. कृष्णाजी महादेव नाबर, बी. ए., बी. टी. व रा. रा. हरि सदाशिव झांट्ये हे निवडून आले आहेत.

—ठाणें जिल्हा लोकलबोर्डाच्या अलिकडे झालेल्या त्रैवार्षिक निवडणुकींत वसई तालुक्यातर्फें रा. रा. पी. जे. गाळवणकर व रा. रा. काशीनाथ गाळवणकर हे निवडून आले आहेत

—पुणें येथील वाडिआ कॉलेज-डिबेटिंग-युनि-यनतर्फें चालू सालचे वक्तृत्वाचे सामने नुकतेच पार

पडून आयत्या वेळीं दिलेल्या विषयांत (Extempore Speeches) रा. बी. एन्. कामत यांना सर्व उमेदवारांत दुसऱ्या नंबराचें बक्षिस मिळालें.

## ३ सभा व संमेलनें

—एल्फिन्स्टन कॉलेज—महाराष्ट्र वाङ्मय मंडळाचें नववें वार्षिक सम्मेलन ता. २२ व ता. २३ सप्टेंबर १९३४ रोजी रा. रा. भार्गवराम ऊर्फ मामासाहेब वरेरकर यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडलें. अध्यक्षांनी उत्कृष्ट भाषण करून कॉलेजच्या विद्यार्थ्यांस स्वतः नाटक लिहून मराठी. वाङ्मयाची अभिवृद्धि करण्याचा उपदेश केला.

त्यानंतर विद्यार्थ्यांनीं व विद्यार्थिनीनीं मिळून 'उसना नवरा' या नाटिकेचा प्रयोग करून दाखविला तो उत्तम वठला. रा. रा. आनंद विनायकराव मुझुमदार यांचे अविश्रांत श्रम त्यास कारणीभूत झाले. त्याचप्रमाणें कुमारी चंपा गुणाजी, कुमारी चंद्रा कर्णीक, कुमारी सुमती मोने, कुमारी कमळ वागळे, रा. मं. ज. संझगिरी ही मंडळीही सदर यशांत वांटेकरी आहे.

—मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु बॅरिस्टर विठ्ठल नारायण चंदावरकर हे बेळगांव येथें ता. ३० ९-३४ रोजीं गेल्या वेळीं त्यांना स्थानिक ज्ञातिसमाजानें तेथील क्रीडा भुवनांत थाटाची मेजवानी दिली. समारंभास सर्व ज्ञातीचेच नव्हे तर सर्व धर्मांचे, पंथांचे व हुद्याचे लोक हजर होते. सदर वेळीं सन्मान्य पाहुण्यांचें झालेलें भाषण विनयपूर्ण होतें.

—सातारा येथील आर्योग्ल वैद्यक विद्यालयाच्या ता. १३ व १४ आक्टोबर १९३४ रोजीं झालेल्या १६ व्या वार्षिक सम्मेलनांत तेथील श्रीकृष्ण थिएटरमध्यें, रा. रा. पी. एम्. लाड, आय्. सी. एस्., असिस्टंट जज्ज, यांच्या अध्यक्षतेखालीं महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध कविद्वय रा. रा. गिरीश व रा. रा. माधव ज्यूलिअन यांचें सुश्राव्य काव्यगायन झालें. नंतर रा. रा. लाड यांचें समारोपादाखल अत्यंत विचारप्रवर्तक व मुद्देसूद असें भाषण झालें.

—गौड सारस्वत ब्राम्हण सभा या नांवाची एक संस्था कॅनरा जिल्ह्यांतील मंडळीनें नुक्तीच अस्तित्वांत आणली असून तिचें सम्मेलन डॉ. ए. एस्. पै, एल्. एम्. ॲन्ड एस्. यांच्या अध्यक्षतेखालीं ग्रँटरोड येथें मुझफर-आबाद हॉलमध्यें ता. १७ ऑक्टोबर १९३४ विजयादशमी रोजीं भरलें होतें. या संस्थेचे अध्यक्ष रा. रा. रामचंद्र कृष्ण प्रभू हे असून, डॉ. ए. व्ही. बाळिगा, एफ्. आर्. सी. एस्. (इंग्लंड) व रा. रा. एम्. डी. गायतोंडे हे उपाध्यक्ष आहेत.

—नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राम्हण को-ऑपरेटिव्ह बँक, लि. या संस्थेचें प्रथम ४ वार्षिक सम्मेलन रा. रा. डी. बी. नाडकर्णी, बी. एस्सी., एल्एल्. बी. यांच्या अध्यक्षतेखालीं ता. ११-११ १९३४ रोजीं न्यू भटवाडी रोडवरील 'लक्ष्मीबाग' येथें भरलें होतें.

— वाङ्मय सेवा-मंडळातर्फें बुधवार, ता. २१-११-१९३४ रोजीं रा. रा. श्रीपाद महादेव वर्दे, बी. ए., एल्एल्. बी., ॲडव्होकेट, यांचें "मराठी शाहिरी वाङ्मय" या विषयावर मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या दिवाणखान्यांत व्याख्यान झालें.

—न्यू सारस्वत युनिअन कोआपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या सभासदांचें सम्मेलन न्यू भटवाडी रोडवरील 'लक्ष्मीबाग' येथें रा. रा. भिकाजी सीताराम सबनीस, बी. ए., एल्एल्. बी., ॲडव्होकेट, यांच्या अध्यक्षतेखालीं ता. १८-११-१९३४ रोजीं पार पडलें; अध्यक्षांच्या हस्तें यशस्वी मुलांना पारितोषिकें वांटण्यांत आलीं.

—बेळगांव येथें आदर्शभूत व्यायामशाळेची प्राणप्रतिष्ठा युनिअन जिमखान्याच्या पटांगणावर ता. १७-११-१९३४ विजयादशमी रोजीं झाली. त्या वेळीं डॉ. गोविंद विष्णु हेरेकर, एम्. बी., बी. एस्. यांचें व्यायामाच्या आवश्यकतेसंबंधानें व्याख्यान झालें.

—पुणें येथें असलेल्या एल्फिन्स्टन कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांचें भोजन येथील लष्करांतील कॉर्नेलिया रेस्टॉरंटमध्यें ता. १-१२-१९३४ रोजीं मोठ्या-

थाटानें पार पडलें. या भोजन–समारंभाच्या वेळीं मुंबईविश्वविद्यालयाचे कुलगुरु बॅरिस्टर विठ्ठल नारायण चंदावरकर यांना मुख्य पाहुणे म्हणून बोलावण्यांत आलें होतें.

—नागपूर येथील मॉरिस सायन्स कॉलेजांतील शारदा मंडळाचा १० वा वार्षिक उत्सव सुप्रसिद्ध नाटककार रा. रा. मामासाहेब वरेरकर यांच्या अध्यक्षतेखालीं नुक्ताच पार पडला. त्या वेळीं त्यांनीं "मराठी भाषेची सद्यःस्थिती व वाढ" या विषयावर व्याख्यान दिलें.

—मुंबई येथील सारस्वत ब्राह्मण समाजाच्या विद्यमानें रा. रा. श्रीपाद महादेव वर्दे, बी. ए., एलएल्. बी., ॲडव्होकेट यांचें "नागरिक धर्म" या विषयावर ता. १५ डिसेंबर १९३४ रोजीं समाजगृहांत व्याख्यान झालें. अध्यक्षस्थान डॉ. श्रीमती सौ. मालिनीबाई भालचंद्र सुखठणकर, एम्. बी. बी. एस्., जे. पी. यांनीं स्वीकारलें होतें.

—डॉ. जनार्दन शंकर नेरूरकर, बी. एस्सी., एल्. एम्. ॲन्ड एस्. डी. पी. एच्. ( केंब्रिज), जे. पी. एफ्. आर्. एस्. आय्. यांचें नागपाडा नेबरहुड हाउसमध्यें 'शहराचें आरोग्य' या विषयावर ता. १८-१२-१९३४ रोजीं व्याख्यान झालें.

## ४ विद्यार्जनासाठीं परदेशीं गमन

**रा. मारुतिराय शशिधर घार्से** हे शनिवार ता. २२ सप्टेंबर रोजीं इलक्ट्रिक इंजीनियरिंग व वायरलेस टेक्नालॉजीच्या पुढील अभ्यासासाठीं इंग्लंडास रवाना झाले. यांस या शिक्षणासाठीं "रा. ब. एस. व्ही. राजाध्यक्ष गौ. सा. ब्राह्मण फॅा. ए. सोसायटी"ची फॉरेन स्कॉलर्शिप मिळाली असून ते वरील विषयांत प्राविण्य मिळविण्यासाठीं मँचेस्टर येथील कॉलेज ऑफ यत्नॉलजी या संस्थेत रुजू होणार आहेत.

रा. घार्से हे गोवा–आकशी येथील रहिवासी असून त्यांचा आतांपर्यंतचा हायस्कूल व कॉलेजमधील अभ्यासक्रम उच्च दर्जाचा आहे. इंटर सायन्सच्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत पहिल्या नंबरास डिस्टिंक्शनसहित पास होऊन फिजिक्स या विषयांत त्यांनीं ८० टक्के मार्क मिळविले आहेत. आजपर्यंत या विश्वविद्यालयांतील ह्या विषयांत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांत रा. घार्से यांनीं अघाडी मारून विश्वविद्यालयाचा आजपर्यंतचा रेकॉर्ड मागें टाकला. गणितविषयांतही त्यांनीं ८८ टक्के मार्क मिळविले आहेत. त्यांच्याविषयीं फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. जी. एस. महाजनी, त्याचप्रमाणें मि. जोग यांनीं आपलें अत्युत्तम मत प्रदर्शित करून त्यांस कॉलेजमधील बक्षिस व स्पेशल फेलोशिप देऊन त्यांचा गौरव केला. रा. घार्से यांचा इंग्लंडमधील पुढील अभ्यासक्रमही अत्यंत यशस्वी होईल असा आम्हांस भरंवसा आहे.

रा. गणपत विश्वनाथ दळवी हे शनिवार, ता. १३ आक्टोबर रोजीं आय्. सी. एस्. व बॅरिस्टर या परिक्षांचा अभ्यास करण्याकरितां विलायतेला गेले. ते सुप्रसिद्ध बॅरिस्टर रा. रा. व्ही. जी. दळवी व श्री. सौ. नलिनीबाई दळवी यांचे ज्येष्ठ चिरंजीव असून, यंदा रॉयल इन्स्टिटयूट ऑफ सायन्समधून ते मुंबईविश्वविद्यालयाची बी. एस्सी. परिक्षा पहिल्या वर्गांत सन्मानानें उत्तीर्ण झाले; इतकेंच नव्हे, तर त्यांना सदर परीक्षेंत केमिस्ट्री विषयांत सर्वांत अधिक मार्क मिळाले. पुढील शिक्षणक्रमांतही त्यांना आम्ही असेंच सुयश चिंतितों.

## ५ ज्ञाति-संस्थांच्या कार्यास उदार देणगी

ज्ञातींतील दानशूर गृहस्थ प. वा. रा. रा. विष्णुपंत जनार्दन शिरोळकर मुंबई ) यांनीं निरनिराळ्या संस्थांसाठीं व्यवस्थापत्रांत ठेविलेल्या रकमांपैकीं सारस्वत विद्यार्थी-साहाय्यक मंडळीकडे रु. २८००० मूळ किंमतीचे व सारस्वत दीन-वत्सल संघाकडे रु. १३,५०० ४ टक्के दराचे बॉम्बे म्युनिसिपल डिबेंचर्स मुंबईच्या ऑफिशिअल ट्रस्टी-

कडून देणगीदाखल नुक्तेच आले आहेत; स्वयंप्रेरणेनें या उदार देणग्या ज्ञाति-संस्थांस देऊन प. वा. रा. रा. शिरोळकर यांनीं त्यांच्या कार्यासंबंधीं आपली गुणग्राहकता व विश्वास व्यक्त केला याबद्दल त्या संस्था त्यांच्या सदैव ऋणी राहतील. त्यांचें स्तुत्य उदाहरण ज्ञातींतील इतर सधन मंडळीस स्फूर्तिदायक होऊन त्यांच्या दातृत्वाचाही ओघ असाच या संस्थांच्या कार्याकडे वळो असें आम्ही इच्छितों.

## ६ माननीयांचा सन्मान

पुणें येथील "डेक्कन एज्युकेशन सोसायटी" व "फीमेल हायस्कूल" (हुजुरपागा कन्या शाळा) या दोन सुप्रसिद्ध संस्थांस नुक्तींच ५० वर्षें पुरीं झालीं असून, तन्निमित्त साजरा करावयाचा सुवर्णमहोत्सव पहिली संस्था थोड्या दिवसांनीं साजरा करणार आहे. वरील मुलींच्या हायस्कूलचा सदर समारंभ ता. २६ नोहेंबर १९३४ रोजीं फलटण संस्थानाच्या अधिपतींच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें पार पडला. ५० वर्षांपूर्वी स्त्री-शिक्षणाचें काम हल्लीं इतकें सोपें नव्हतें. सदर शिक्षणकार्य करणाऱ्या मंडळीस त्यावेळीं सनातन व पुराणमतवादी लोकांच्या टीकेचा भडिमार सोसावा लागला अशा अनेक टीका-शास्त्रांच्या दिव्यांतून तावूनसुलाखून बाहेर पडलेल्या या शिक्षण-संस्थेला आज ५० वर्षांचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्याचा सुयोग आला याबद्दल संस्थेच्या कार्यकर्त्यांस व सहाय्यकांस आनंद व अभिमान वाटणें अगदीं साहजिक आहे. १८८४ सालीं ज्या दूरदर्शी गृहस्थांनीं ही संस्था स्थापिली त्यांत कै. डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर व कै. रा. ब. शंकर पांडुरंग पंडित हे त्यांत प्रमुख होते. या मंडळीनें स्त्री-शिक्षणाच्या द्वारा केलेली जनसेवा अमूल्य असून त्याबद्दल महाराष्ट्राच्या चालू व पुढील पिढ्या त्यांना शतशः धन्यवाद देतील यांत शंका नाहीं. त्यांनीं लावलेला ज्ञानवृक्ष अनेकांच्या द्रव्याच्या व परिश्रमाच्या सिंचनामुळें फोफावून त्याच्या शीतळ व गर्द छायेचा व फळांफुलांचा आस्वाद आजपावेतों हजारों इसमांस मिळाला यांतच मूळ संस्थापकांच्या तत्वांचा व आकांक्षांचा विजय झाला असून तो पाहाण्यास त्यांपैकीं आज कोणी विद्यमान नाहींत याबद्दल वाईट वाटतें. महाराष्ट्रांत अत्यंत उत्कर्ष पावलेल्या या दोन्ही प्रमुख शिक्षण-संस्थांच्या स्थापनेशीं व वाढीशीं वरील थोर ज्ञातिबंधूंचा निकट संबंध होता ही गोष्ट हल्लींच्या पिढीनें लक्षांत ठेवून त्यांच्या स्मृतीस कृतज्ञतापूर्वक वंदन केलें पाहिजे यांत शंका नाहीं.

* * *

आमचे सन्मान्य बंधु रा. रा. गणपतराव सखाराम राजाध्यक्ष, I.C.S. यांनीं मुंबई कायदे-कौन्सिलचे सेक्रेटरी या नात्यानें सुमारें पांच वर्षें काम करून ते आतां धारवाड येथें जिल्हा-न्यायाधिकारी म्हणून बदलून गेले आहेत. विद्वत्ता, कामाचा उरक, विनम्र स्वभाव, आनंदी व शांत चित्तवृत्ति, परोपकार बुद्धि, औदार्य, हाताखालील लोकांच्या कामाबद्दल पराकाष्ठेची गुणग्राहकता वगैरे आपल्या अंगच्या अनेक गुणांमुळें कौन्सिलांतील व बाहेरील लहान-मोठ्या मंडळींत ते फार लोकप्रिय झाले असल्यास नवल नाहीं. कायदे-मंडळाच्या गेल्या बैठकींत त्यांच्या कामगिरीबद्दल आभारप्रदर्शक ठराव पसार केला, त्यावेळीं अध्यक्ष, वरिष्ठ सरकारी अधिकारी व लोकनियुक्त प्रमुख सभासद यांनीं त्यांची जी स्तुति केली ती अगदीं यथार्थ नव्हती असें कोण म्हणेल ! केसरीसारख्या वृत्तपत्रकारानेंही वेळोवेळीं अशा प्रकारच्या झालेल्या त्यांच्या स्तुतींत आपला सूर मिळविला आहे ही गोष्टही येथें उल्लेखनीय आहे. नोकरींत त्यांच्यापेक्षां जुनीं माणसें असतांही, अलिकडे सहा महिने "रिमेंब्रन्सर ऑफ लीगल अफेअर्स व सेक्रेटरी टु गव्हर्मेंट, लीगल डिपार्टमेंट," या श्रेष्ठ जबाबदारीच्या जागीं त्यांची हंगामी नेमणूक करण्यांत आली होती, या

यांच्या वरिष्ठांचें त्यांच्या कर्तबगारीबद्दल काय मत आहे, त्याचा अंदाज करितां येईल. त्यांची आजपर्यंतची यशस्वी कारकीर्द लक्षांत घेतली, तर अशाच प्रकारची बढती व मानमान्यता त्यांना उत्तरोत्तर मिळून, ते मुंबई येथील उच्च न्यायमंदिरांतील न्यायाधीशाच्या जागीं विराजमान झालेले थोड्याच वर्षांत दिसतील अशी आशा करणें खचित धाष्टर्याचें होणार नाहीं.

× × ×

पश्चिम खानदेशाचे एक्झिक्युटिव्ह इंजिनियर रा. रा. दाजीसाहेब भाण्डारकर यांना इंदुर संस्थानांत चीफ इंजिनिअरच्या बढतीच्या जागेवर सन्मानपूर्वक पाचारण आल्यामुळें, धुळेकरांचा निरोप घेऊन ता. ३-१०-३४ रोजीं ते सहकुटुंब इन्दूरला रवाना झाले. यांच्या पत्नी सौ. अन्नपूर्णाबाई भाण्डारकर यांनीं धुळें शहरांत स्त्रीशिक्षणविषयक सार्वजनिक महत्वाचीं कार्यें केलीं. येथील कमलाबाई गर्ल्स इंग्लिश स्कूल हें तर त्यांच्या श्रमांचें चालतें बोलतें जिवन्त स्मारक असून, स्त्रियांच्या सांस्कृतिक संघटनासाठीं "महिला समाज" नांवाच्या क्लबाचा पायाही त्यांनीं घालून ठेवला आहे स्कूलबोर्डाच्या चेअरमन म्हणूनही त्यांची कामगिरी लोकमान्य आहे. "भाण्डारकर बाई" म्हणजे हव्या त्या रंजल्या-गांजल्यांचें हुकमी आश्रयस्थान असल्यामुळें, त्यांच्या प्रयाणामुळें शैकडों लोकांना दुःख झाल्यास नवल नाहीं. विशेषतः सन १९३३ च्या धुळें गिरणी सम्पाच्या प्रसंगीं गिरणी कामगारांच्या साहाय्याला धावण्यांत, स्वयंस्फूर्तीनें तनमनाबरोबरच धनाचीही शिकस्त केली, ती कोणाच्याही स्मरणांतून जाणें शक्य नाहीं. अशा जनसेवक बाईंचें जाहीर अभिनंदन करण्यासाठीं ता. २८ ऑक्टोबर १९३४ रविवार रोजीं सायंकाळीं ४ वाजतां धुळें येथील इन्द्रभुवन सिनेमांत, गिरणीकामगार युनियननें सत्कारसमारंभ साजरा केला. अध्यक्षस्थानीं तेथील लोकप्रिय लेडी डॉक्टर सौ. अष्टपुत्रे, L. C. P. S., यांची योजना झाली होती. सभेला सुमारें १५०० वर गिरणीकामगार आले असून, अनेक नागरिक स्त्रीपुरुष हजर होते. सभेंत विठ्ठलराव गायकवाड, शंकरसिंग ठाकोर, सुरजमल ( लवाद मुन्सफ ), नथूजी पारोळकर यांचीं समयोचित व कळकळीचीं भाषणें झालीं. सौ. अन्नपूर्णाबाईंना चान्दीच्या फ्रेममध्यें लाल मखमालीवर जरीकामानें विणलेलें हातोडा-विळ्याचें, मजूर चळवळीचें चिन्हांकित मानपत्र अर्पण करण्यांत आलें. अध्यक्ष सौ. डॉ. अष्टपुत्रे यांनीं समारोप केला. "मजूरकामगारांनीं शिस्तवार संघटनेकडे लक्ष पुरविल्यास, मी त्यांच्यासाठीं जी थोडाफार कायावाचामनें आणि धनें झिजलें, त्याची मला भरपाई मिळेल." इतकेंच उत्तर सौ. अन्नपूर्णाबाई भांडारकर यांनीं दिल्यावर, श्री. बोराळे ( हरिजन ) यांनीं सर्वांचे आभार मानल्यावर हा सत्कार समारंभ खलास झाला.

* * *

अहमदाबाद गिरणी मालक-संघाच्या सेक्रेटरींच्या विनंतीवरून तेथील गिरण्यांतील पगार -काटी- संबंधींचा गिरणी मालक व कामगार यांजमधील लढा मिटविण्यासाठीं मुंबई हायकोर्टाचे माजी न्यायाधीश रा. रा. सीताराम सुंदरराव पाटकर, बी. ए., एल्‌एल्. बी. यांना लवाद म्हणून नेमिलें आहे.

* * *

मद्रास युनिव्हर्सिटीतर्फे १९३२-३३ सालासाठीं देण्यांत येणारें रामानुजम् मेमोरिअल प्राइझ निरनिराळ्या विश्वविद्यालयाच्या अध्यापकांना वांटून देण्यांत आलें त्यांत फर्ग्युसन कॉलेजचे प्रो. डी. डी. कौसांबी हे एक आहेत.

गणित अगर तत्सम विषयांतील संशोधनपूर्ण पण नवीन अशा विषयावर ता. १ डिसेंबर १९३३ पूर्वी निबंध मागविण्यांत आले होते, व त्याप्रमाणें निबंध-परीक्षकांनीं आपला निकाल अलीकडे जाहीर केला.

* * *

"धी बँक ऑफ कोल्हापूर लि." या संस्थेच्या मालकीची नवी भव्य इमारत कोल्हापूर येथें ता. २६-१०-१९३४ रोजीं तेथील रेसिडेंट व ए. जी. जी. ले. कर्नल एच्. विल्बरफोर्स बेल, सी. आय्. ई. यांच्या पत्नींच्या हस्तें मोठ्या दरबारी समारंभानें उघडण्यांत आली. त्या वेळीं बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे चेअरमन सर रघुनाथराव सबनीस, सी. आय्. ई. यांनीं बँकेचें अभिनंदनीय यश पुष्कळ अंशीं बँकेचे सेक्रेटरीज्, एजंटस व म्यानेजर्स या नात्यानें काम करणारे मेसर्स शिरगांवकर ब्रदर्स यांना असून त्यांची सचोटी, व्यवहारदक्षता, चातुर्य, कर्तबगारी, बाणेदार वर्तन वगैरे गुणांची मुक्तकंठानें स्तुति केली.

कोल्हापूर बँक ही पेढी नुसत्या कोल्हापुरांतच नव्हे, तर सर्व दक्षिण महाराष्ट्रांत अत्यंत मोठी, सुव्यवस्थित व सुसंपन्न म्हणून प्रसिद्ध आहे. कोल्हापूर बँकेंत ठेवी रु.२८,८१,०००, रिझर्व्ह फंड रु.१,८३,००० असून बँकेला नफा रु. १,०५,००० झाला आहे. भागीदारांस शेंकडा रु. १२॥ खालीं डिव्हिडंड कधींच मिळालें नाहीं, यावरून संस्थेच्या यशाची कल्पना कोणासही करतां येईल. अर्थात् या यशाचा सर्वांत मोठा वांटा मेसर्स शिरगांवकर बंधु, सदर बँकेचे चालक, यांच्या वांट्यास येणें अगदीं साहजिक आहे.

× × ×

सहकारी चळवळींतील नाणावलेले कार्यकर्ते व सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष रा. रा. वामन पुंडलिक वर्दे, B. Com., F. R. E. S. (Lon.) यांनीं बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँकेंतील 'चीफ अकाउंटंट'च्या आपल्या जागेचा राजिनामा देऊन मेसर्स आर्. आर्. नाबर कंपनींत भागीदार या नात्यानें ते आतां दाखल झाले आहेत, हें जाहीर करण्यास आम्हांस संतोष वाटतो. ॲडव्हान्स्ड बँकिंग व करन्सी हे विषय घेऊन रा. रा. वर्दे १९१८ सालीं मुंबईविश्वविद्यालयाची बी.कॉम् परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर टाटा इंडस्ट्रिअल बँक, युनियन बँक व बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को. बँक यांत जबाबदारीच्या जागीं काम करून त्यांनीं आपल्या अंगची कर्तबगारी सिद्ध केली. अलीकडे कांहीं महिने तर ते शेवटच्या बँकेच्या मॅनेजरचें काम पाहत होते. आपल्या अनेक गुणांमुळें बँकेशीं प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध असणाऱ्या सर्व लोकांचें त्यांनीं प्रेम संपादन केलें असल्यामुळें, सेवानिवृत्त होण्याच्या वेळीं त्या मंडळीनें जाहीर समारंभ करून त्यांना एक नकशीदार रौप्य-तबक व पुष्प-पात्र अर्पण करून त्यांचा यथाशक्ति गुणगौरव करावा हें योग्यच होतें. रा. रा. आर्. आर्. नाबर हे बॉम्बे स्टॉक एक्सेंजचे सतत २५ वर्षें सदस्य असून त्यांनीं आपल्या कंपनीचें नांव त्या धंद्यांत चांगलेंच प्रस्थापित केलें आहे. रा. रा. नाबर यांचा शेअरच्या धंद्यांतील दीर्घकालीन अनुभव व रा. रा. वर्दे यांचें बँकिंग व तदनुषंगिक विषयांचें भरपूर व प्रत्यक्ष ज्ञान असा सुयोग जुळून आला असून त्यांच्या सेवेचा फायदा गरजू मंडळी घेतील यांत शंका नाहीं.

रा. रा. वर्दे यांनीं नोकरीची शृंखला उशीरां कां होईना—झुगारून देऊन ते स्वतंत्र धंद्यांत पडल्याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करून त्यांना त्यांत यश चिंतितों.

* * *

दक्षिण कानडा जिल्ह्यांतील सुप्रसिद्ध समाजसुधारक रावसाहेब के. रंगराव यांची कन्या कुमारी के. एम्. रंगराव M. A., L. T. (Madras), F.R.G.S. (Lon.) B. Sc. (Lon.) यांची नागपूर येथील स्त्रियांच्या पाठशाळेचे प्रमुख म्हणून नेमणूक झाली आहे हें वृत्त जाहीर करण्यांस आनंद वाटतो. सदर पाठशाळेंत स्त्रियांना अत्युपयोगी असे निरनिराळे विषय शिकविण्यांत येणार असल्यामुळें या प्रकारच्या शिक्षणाची ही पहिलीच संस्था असें म्हटलें पाहिजे. त्यांनीं लंडन व केंब्रिज येथें निरनिराळ्या विषयांचें अध्ययन करून उत्कृष्ट ज्ञान संपादन केलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत प्रतिसमोचार
सं. ........ नं. ........
ता. ........

रॉयल जॉग्रॉफिकल सोसायटीच्या तर त्या पहिल्याच स्त्री-सभासद आहेत. समाज-सेवेचेंही त्यांना बाळकडू मिळालें आहे. मद्रास रेड क्रॉस संस्थेच्या त्या सन्माननीय चिटणीस होत्या. मद्रास युनिव्हर्सिटींत भूगोल विषयाच्या त्या ऑनररी रीडर होत्या. तसेंच त्या विद्यापीठाच्या ॲकॅडेमिक कौन्सिल व बोर्ड ऑफ स्टडीज् यांच्या ते सदस्य होत्या. त्यांनीं निरनिराळया प्रकारचे खेळ, गर्ल-गाइड वगैरे उपांगांत सुद्धा त्यांनीं प्रावीण्य मिळविलें आहे. या सर्व गोष्टींमुळें त्यांची वरील शिक्षणसंस्थेच्या मुख्याधिकाराच्या जागीं झालेली नेमणूक सर्वतोपरी न्याय्य आहे असेंच म्हणावें लागेल. कुमारी के. एस्. रंगराव यांच्या कर्तबगारीचा, ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा मध्यप्रांतीय महिलावर्गास होईल अशी आम्हांस भरपूर उमेद आहे.

* * *

लंडन येथें यंदा झालेल्या इंडिअन सिव्हिल सर्व्हिसच्या चढाओढीच्या परीक्षेंत रा. रा. पी. आर. नायक. व रा. रा. बी. जी. राव हे दक्षिण कानडा जिल्ह्यांतील दोन बंधू उत्तीर्ण झाले हें नमूद करण्यास आम्हांस आल्हाद वाटतो. सिव्हिल सर्विससारख्या अत्युच्च नोकरींत सदर जिल्ह्यांतील २५ गृहस्थ आहेत ही गोष्ट तेथील लाकांच्या श्रेष्ठ बुद्धिमत्तेची द्योतक आहे.

* * *

रा. रा. मणिगे वामन राव, एम्. ए. यांना अलाहाबाद विद्यापीठानें १९३३ व १९३४ सालीं निरनिराळे विषय घेऊन एम्. ए. झालेल्या सर्व उमेदवारांत पहिले आल्याबद्दल व्हिक्टोरिआ ज्युबिली सुवर्णपदक देऊन त्यांचा सत्कार केला. विद्वान् सर्वत्र पूज्यते

* * *

पुणें येथील फीमेल हायस्कूलच्या सुवर्ण-महोत्सवाच्या चालू वर्षी त्या शाळेनें मुंबई-विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेस पाठविलेल्या ४७ मुलींपैकीं ४३ मुली उत्तीर्ण झाल्या असून, त्यांत कुमारी चंपा यशवंतराव गुणाजी या पहिल्या येऊन त्यांना विद्यापीठाची संस्कृत विषयाची यमुनाबाई दळवी शिष्यवृत्ति मिळाली. ह्या त्यांच्या यशाचा सदहू महोत्सवप्रसंगीं संस्थेच्या चिटणीसांनीं आपल्या भाषणांत उल्लेख केला. इतकेंच नव्हे, तर त्यांना ह्या संस्मरणीय प्रसंगीं समारंभाच्या अध्यक्षांच्या पत्नी, श्रीमती सौ. लक्ष्मीदेवी राणीसाहेब निंबाळकर, फलटण, यांच्या हस्तें स्वतःचें नांव कोरलेलें रौप्य-तबक नकशीदार रौप्य—पुष्पपात्र नजर केलें व कुमारी चंपाताई यांचें सर्व शिक्षण सदर शाळेंत झालें असून, येथील त्यांच्या अभ्यासक्रम उत्कृष्ट प्रतीचा होता. अशा या तरुण भगिनीचा पुण्यपत्तनस्थ प्रमुख संस्थेंत सार्वजनिक रीतीनें गौरव व्हावा याबद्दल कोणास अभिमान व कौतुक वाटणार नाहीं! कुशाग्र बुद्धीशिवाय आणखीही गुण त्यांच्या ठिकाणीं दिसून येतात. एल्फिन्स्टन कॉलेजांत मराठी वाङ्मय-मंडळातर्फे अलीकडे झालेल्या संम्मेलनाच्या कार्यव्यवस्थेंत त्यांनीं प्रमुख भाग घेऊन त्या वेळीं करण्यांत अलेल्या नाट्यप्रयोगांत मुलांबरोबर त्यांनीं प्रत्यक्ष भाग घेऊन आपलें काम सर्वांच्या पसंतीस उतरविलें. तसेंच त्या वेळीं झालेलें त्यांचें काव्यगायनही सर्वांस आवडलें. गेल्या दसऱ्याचा दिवशीं भरलेल्या दादरच्या सारस्वत ब्राह्मण सेवा संघाच्या वार्षिक वर्धापनदिनोत्सवप्रसंगीं मुलांमुलींनीं केलेल्या नाटकांतही त्यांचें अभिनयपटुत्व व एकंदर काम उत्तम ठरून त्याबद्दल अध्यक्षांच्या हस्तें त्यांना पहिलें बक्षिस—रौप्यपदक नजर करण्यांत आलें. कु. चंपाताई या कवयित्री असून त्यांनीं आपल्या छोट्या कवितांचा संग्रह दोन वर्षांपूर्वी लहान पुस्तकावलींतून प्रसिद्ध केला आहे. या सर्व गोष्टी त्यांच्या भविष्यकालीन कर्तृत्वाबद्दल आशा उत्पन्न करतात. कुमारी चंपा गुणाजी यांनीं निरनिराळ्या क्षेत्रांत मिळविलेल्या या यशाबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करितों व पुढेंही त्यांना असेंच सुयश चिंतितों.

* * *

मुंबईच्या सुविख्यात किंग एडवर्ड मेमोरिअल हॉस्पिटलचे ॲक्टिंग ऑनररी फिजिशिअन डॉ. सावळाराम गणपतराव वेंगसरकर, एम्. डी. हे युरोपखंडांतील निरनिराळ्या रुग्णालयांचें निरीक्षण करण्याकरितां "कॉन्टे व्हर्डे" या आगबोटीनें ता. २४ डिसेंबर १९३४ रोजीं विलायतेस रवाना झाले. डॉ. वेंगसरकर यांचा जन्म खारेपाटणनजिक मठखर्द येथें ता. २-२-१९०४ रोजीं झाला त्याचें शिक्षण ग्रँट मेडिकल कॉलेजांत होऊन ते १९२६ सालीं मुंबई-विश्वविद्यालयाची एम्. बी. बी. एस्. परीक्षा उत्तीर्ण झाले. के. इ. एम्. हॉस्पिटलांत हाउस फिजिशिअन, कॅज्युअल्टी ऑफिसर, होस्टेल सुपरिंटेंडंट, मेडिकल ट्यूटर वगैरे हुद्यांच्या जागीं काम करून वैद्यकीय शास्त्राचा त्यांनीं प्रत्यक्ष अनुभव व ज्ञान मिळविलें. १९२९ सालीं त्यांनीं एम्. डी. पदवी संपादन केली. नंतर त्याच हॉस्पिटलांत रेसिडेंट असिस्टंट फिजिशिअन व ऑनररी असिस्टंट फिजिशियन म्हणून त्यांनीं काम केलें. १९३१ पासून तों आजपावेतों ते ॲक्टिंग ऑनररी फिजिशिअन या नात्यानें तेथें काम करीत आहेत. डॉ. गिल्डर यांच्या अलीकडच्या ८ महिन्यांच्या गैरहजेरींत मुंबई म्युनिसिपालिटीच्या मेडिकल एक्झामिनरच्या मोठया जबाबदारीच्या जागीं—त्या जागेसाठीं पुष्कळ उमेदवार असतांही-त्यांची निवड झाली, यावरून त्यांच्या बुद्धिमत्तेची कोणासही कल्पना करितां येईल. तें काम चोख रीतीनें बजावून त्यांनीं आपली निवड न्याय्य ठरविली हें निराळें सांगणें नकोच. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालीं सुरू झालेल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळींत गेलीं कैक वर्षें प्रामुख्यानें भाग घेणाऱ्या व नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय महासभेच्या स्वागतमंडळाच्या उपाध्यक्ष श्रीमती सौ. शांताबाई वेंगसरकर या डाक्टर साहेबांच्या माता होत.

डॉ. वेंगसरकर हे परदेशगमनानें व अवलोकनानें आपल्या वैद्यकीय ज्ञानांत व अनुभवांत भर घालतील व स्वदेशीं परत आल्यावर त्या गुणांचा उपयोग मुंबईच्या जनतेच्या—विशेषतः गोरगरिबांच्या कल्याणार्थ—करितील अशी आम्ही उमेद बाळगितों.

## ७ नेमणुका

डॉ. सत्याश्रय गोपाळ पाणंदीकर, एम्. ए. (बॉम्बे), पीएच्. डी., डी. एस्सी. (लंडन), आय्. इ. एस्. यांना धारवाड येथें कर्नाटक कॉलेजांत प्रोफेसर ऑफ हिस्टरी ॲन्ड पोलिटिकल इकॉनॉमी नेमण्यांत आलें आहे.

—रा. रा. गोपाळ प्रभाकर भांडारकर, बी. ए. एल्. सी. ई., ए. एम्. आय्. ई., आय्. एस्. ई. एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, खानदेश, यांना ता. ३१-१०-१९३४ पासून दोन वर्षांसाठीं इंदूर संस्थानचे चीफ इंजिनिअर नेमण्यांत आलें आहे.

—रा. रा. गणपतराव सखाराम राजाध्यक्ष, एम्. ए. (केंब्रिज), बार-ॲट-लॉ, आय्. सी. एस्. यांना धारवाडचे डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज नेमण्यांत आलें आहे.

—डॉ. रघुनाथ दत्ताजी रेगे, बी. ए., एम्. एस्सी., डी. एस्सी., पीएच्. डी. ऑफ फिजिऑलॉजिस्ट यांची पदेगांव (पुणें) येथील शुगरकेन रिसर्च स्कीमचे प्रिन्सिपल ॲग्रिकल्चरल ऑफिसर म्हणून तात्पुरती नेमणूक झाली आहे.

—मेजर अनंत यशवंत दाभोळकर, एम्. सी., एम्. बी, बी. एस्., बी. एस्सी. (बॉम्बे) डी. पी. एच्., डी. टी. एम्. ॲन्ड एच्. (लंडन) आय्. एम्. यांना डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थ फॉर धी गव्हर्मेंट ऑफ बाम्बे या जागीं कायम करण्यांत आलें आहे.

—रावसाहेब रामकृष्ण नरसिंगराव नायमपल्ली यांना सुपरिंटेंडट ऑफ पोलिस, बॉम्बे सिटी, तात्पुरते नेमिलें आहे.

—रा. रा. विनायक दत्तात्रय मुझमदार, एम्. ए. यांना ता. १२-१०-१९३४ पासून सिंध

प्रांताचे असिस्टंट कमिशनर ऑफ इन्कम टॅक्स नेमण्यांत आलें आहे.

--रा. रा. यशवंत नीळकंठ नाडकर्णी, बी. ए., एलूएल्. बी., ॲडव्होकेट (ओ. एस्.)यांना तात्पुरतें प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट नेमण्यांत आलें आहे.

--प्रो. वासुदेव सदाशिव घुर्ये, एम्. ए. यांची जुनागड येथील बाहुद्दीन कॉलजचे तात्पुरते प्रिन्सिपॉल म्हणून नेमणूक झाली आहे.

## शहापूर येथील वाद्यांचा प्रश्न

### सांगलीच्या राजेसाहेबांकडे शिष्टमडळ

**'सारस्वत समाजाचीं मनें दुखविण्याचा हेतु नव्हता.'** गेल्या उन्हाळयांत शहापूर बेळगांव येथें मशिदीवरून वाद्यें वाजविण्याबाबत हिंदु मुसलमानांत तंटा झाला. त्याबाबत सांगली दरबारनें एक पत्रक काढून मशिदीवरून वाद्यें वाजविण्यासंबंधीं नियम प्रसिद्ध केले. सदर नियम आपल्या हक्कांवर गदा आणणारे आहेत, म्हणून आपली बाजू मांडण्यासाठीं शहापूर येथील हिंदु नागरिकांचें शिष्टमंडळ सांगलीस गेलें. सदर शिष्टमंडळाला श्री. राजेसाहेबांनीं ता. ५ डिसेंबर १९३४ रोजीं दुपारीं ३॥ वाजतां हुजूर ऑफिसांत मुलाखत दिली. शिष्टमंडळांत पुढील सहा गृहस्थ होते:— श्री. वासुदेवराव कित्तूर; डॉ. हेरेकर, श्री. हरिभाऊ सराफ, श्री. गिंडे, श्री. रामकृष्णपंत जोशी व श्री. नारायणराव नाईक. मुलाखतीच्या वेळीं हुजूर ऑफिसांत श्रीमंतांसमवेत सर मोरोपंत जोशी हजर होते. अंमलदारांपैकीं रा. ब. जी. आर. बर्वे (दिवाण), रा. ब. जी. व्ही. पटवर्धन, श्री. वाय. व्ही. कोल्हटकर व श्री. गोविंदराव कुटे ही मंडळी हजर होती.

शिष्टमंडळाचे प्रमुख श्री. कित्तूर यांचें भाषण डॉ. हेरेकर यांनीं वाचून दाखविलें; त्यांत वाद्यांबाबत दरबारनें केलेले नियम हिंदूंच्या हक्कांची पायमल्ली करणारे आहेत असें म्हटलें आहे. तसेंच सरकारी पत्रकांत केवळ "सारस्वत" समाजाचा उल्लेख आहे, त्याबद्दलही या समाजाबद्दल विनाकारण गैरसमज होत असल्याचें शिष्टमंडळातर्फे सांगण्यांत आलें, वाद्यांबाबतचा निबंध पूर्वीच्याच वहिवाटीस सोडून आहे व निजाम हैद्राबाद व बडोदा संस्थान येथेंहि असे निबंध घालण्यांत आले नसल्याचें श्रीमंतांच्या निदर्शनास आणण्यांत आलें उत्तरादाखल बोलतांना श्री. राजेसाहेब म्हणले कीं, वाद्याबाबतची आपली पूर्व वहिवाट दिवाणी कोर्टांत शाबीत करून घेण्यांत यावी सर्वसाधारणपणें शांतारक्षणासाठीं जे जरूर वाटेल ते उपाय करण्यांत आले आहेत; तसेंच सारस्वत समाजाचा सरकारी पत्रकांत उल्लेख करण्यांत, सारस्वत समाजाचीं मनें दुखविण्याचा दरबारचा मुळींच उद्देश नव्हता. या बाबतींत सरकारी रीत्या खुलासा करून झालेला गैरसमज दूर करण्यांत येईल. सर मोरोपंत जोशी यांनीं शिष्टमंडळांतील गृहस्थांशीं भाषण करतांना सांगितलें कीं, वाद्यें वाजविण्याच्या पूर्व वहिवाटीबद्दल दोन्हीही पक्षांना आपली बाजू खरी आहे असें वाटणार. त्यामुळें या हक्काची शाबिती दिवाणी कोर्टांत होणें इष्ट आहे. त्याशिवाय दरबारनें कोणतेंहि धोरण स्वीकारलें, तरी कोणत्या तरी एका समाजाला आपणांवर अन्याय झाला असें वाटणार

शिष्टमंडळातर्फे श्री. हरिभाऊ सराफ यांनीं श्री. राजेसाहेबांचे अभार मानलें. त्यानंतर थोडा वेळ शहापूरकडील क्षेम कुशलाची वीचारपूस श्रीमंतांनीं केली व शिष्टमंडानें श्रीमंतांचा निरोप घेतला.

## दुःखप्रदर्शक सभा.

मुंबई येथील सा. ब्रा. समाज, सा. दीनवत्सल संघ व सा. को. बँ. सोसायटी या संस्थांतर्फे ही दुःखप्रदर्शक सभा रविवार ता. ९ सप्टेंबर १९३४ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां सा. ब्रा. समाजगृहांत भरली होती अध्यक्षस्थानीं रा. रा. बाजी वि. नेरूरकर, B.A., L.L.B, वकील यांची योजना करण्यांत आली होती. सभेस रा. नीलकंठ आ. शिवेश्वरकर, वकील, रा. मणेरीकर वकील, डॉ. केरकर, रा. शंकरराव पुं. वर्दे, रा. भि. सी. सबनीस, वकील, रा. अनंतराव साखरदांडे, रा. ग. त्रि. लाड,

रा. शि. ना. रेगे वगैरे मंडळी हजर होती. अध्यक्षांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत रा. वामनराव केरकर यांची साधी राहणी व दीर्घ विद्याव्यासंग यांचा उल्लेख करून सा. बा. समाज व संघ या संस्थांच्या उन्नतीस ते बरेच कारणीभूत झाल्याचें सांगितलें. त्याच दिवशीं सकाळीं घडलेल्या रा. दिनकरराव वर्दे वकील यांच्या मृत्यूबद्दल दुःख प्रदर्शित करतांना ते म्हणाले कीं, वर्दे यांचा दीर्घ विद्याव्यासंग व ज्ञातिविषयक कामगिरी सर्वांगीण होती. सं. गौ. सा. ब्रा. परिषद, सा. वि. स. मंडळी, दाभोळकर स्कॉलर्शिप बोर्ड यांच्या कार्यकारी मंडळांत त्यांनीं काम करून ज्ञातीची उत्कृष्ट सेवा बजाविली आहे· अशा या प्रमुख व्यक्तींच्या निधनानें ज्ञातीचें बरेंच नुकसान झालें आहे. यानंतर रा. भिकाजी सी. सबनीस यांनीं दुःखप्रदर्शक ठराव वाचून दाखविला त्यावर शंकराव वर्दे, रा. ग. वि. लाड, व रा. शि. ना. रेगे यांचीं अनुमोदनात्मक भाषणें झालीं. अवघ्या एका महिन्याच्या आंत घडून आलेल्या केरकर, वर्दे, मोरमकर या त्रिवर्गांच्या शोकजनक मृत्यूबद्दल दुःख प्रदर्शित करून त्यांच्या निरनिराळ्या क्षेत्रांतील कामगिरीचें रा. शंकरराव वर्दे यांनीं वर्णन करून शोकप्रदर्शन केलें. रा. ग.वि. लाड यांनीं समाज व संघ यांच्या संस्थापनकालापासून या दोन संस्थांत रा. केरकरांची कामगिरी किती बहुमोल होती हें दाखवून, रा. वर्दे यांच्या सं. गौ. सा. ब्रा. परिषदेंतील कार्याचें महत्त्व व वक्ता व लेखक या नात्यानें ज्ञातींत त्यांचें स्थान किती उच्च दर्जाचें होतें तें दाखविलें व महाराष्ट्रांत प्रमुख गणल्या गेलेल्या विविध वृत्ताला आजचा उच्च दर्जा प्राप्त होण्यास ज्यांचे परिश्रम कारणीभूत झाले आहेत, त्यांत श्री. लक्ष्मी-नारायण छापखान्याचे मालक रा. अनंतराव मोरमकर यांचा किती महत्त्वाचा भाग होता हें सांगून या तिघांच्याही मृत्यूनें निरनिराळ्या बाजूनें समाजाचें नुकसान झाल्याबद्दल दुःखप्रदर्शित करून त्यांच्या कुटुंबियांवर आलेल्या आपत्तीबद्दल समाज त्यांचा भागीदार असल्याचें सांगितलें. शि. ना. रेगे यांच्या अनुमोदनात्मक भाषणानंतर वरील त्रिवर्गांच्या मृत्यूबद्दलचा दुखःवटयाचा ठराव सर्वांनीं उभे राहून पसार करण्यांत आला व तो त्यांच्या कुटुंबीयांकडे अध्यक्षांच्या सहीनें पाठविण्याचें ठरल्यावर सभा बरखास्त झाली.

श्री सारस्वतीभुवन गौडसारस्वत ब्राह्मणांची संस्कृत वेदपाठशाला नगर शिवमोग्गा डिस्ट्रिक्टः–वेदाध्यनादि स्वधर्माचरणांत आसक्ति नसलेल्या या कालांत येथील महाराजेश्री बि. पांडुरंगराव, यांनीं श्रद्धापूर्वक, कार्यदर्शि, महाराजेश्रीजवळि अनंतैया यांच्या प्रोत्साहनानें ह्या नगरच्या, आसपास गांवच्या वैदिक विद्यार्थ्यांच्या विद्याभिवृद्धीसाठीं एक पाठशाला श्रीशक १८५३ प्रजोत्पत्ति संवत्सर कार्तिक वद्य ५ सोमवार ता. ३०–११–१९३१ ह्या दिवशीं स्थापन करून, ती तीन वर्षेपर्यंत योग्य रीतीनें चालवून त्या विद्यार्थ्यांस, ब्राह्मण्यास संबंध असलेल्या १ आन्हिक भाग २ वेदाध्ययन ३ षोडष-कर्मप्रयोग ४ किंचित् ज्योतिष (मुहूर्तभाग) ५ संस्कृत भाषाज्ञान, ह्या विषयांत शिक्षण दिलें. उपाध्याय असलेले उत्तर कानडा जि. सिद्दापूरचे वैकुंठवासि, ब्रह्मश्री. विद्वन् गोपाल वामन भट्ट हे आणि त्यांच्या अवसानानंतर त्यांचे धाकटे बंधु ब्रम्हश्री. वे. पुंडलीक वामनभट्ट यांनींसुद्धां विद्यार्थ्यांस तयार करण्यास घेतलेले श्रम पूर्ण स्तुत्य आहेत. प्रतिवर्षी चालल्याप्रमाणें ह्या वर्षी ही परीक्षा ता. २८-११-१९३४ पासून ता. १।१२।३४ पर्यंत परस्थळीय विद्वानांच्या अध्यक्षतेखालीं झाली वार्षिकोत्सव नगर महाराजे श्रीमंत वामनराव यांच्या अध्यक्षतेखालीं सांग झाला. पाठशाला ( आरंभीं ९ विद्यार्थी होते; आतां तेरा विद्यार्थी आहेत,) त्यांत पांच विद्यार्थी येथचा अभ्यास ( अध्ययन ) आटोपून पुढच्या विशेष शिक्षणासाठीं गोवा प्रांत पर्तगाळी येथें असलेल्या श्री संस्थान गोकर्ण मठाधीशश्री स्वामींजवळ जाणार आहेत; महाराजे श्री. बी.पांडुरंग राव यांच्याप्रमाणेंच,उपपत्ति असलेले इतर महनीय लोकही वदिक विद्याभिवृद्धीस सहाय्य करून श्रेयःसंपादन करोत.

रा. शि. ना. रेगे वगैरे मंडळी हजर होती. अध्यक्षांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत रा. वामनराव केरकर यांची साधी राहणी व दीर्घ विद्याव्यासंग यांचा उल्लेख करून सा. बा. समाज व संघ या संस्थांच्या उन्नतीस ते बरेच कारणीभूत झाल्याचें सांगितलें. त्याच दिवशीं सकाळीं घडलेल्या रा. दिनकरराव वर्दे वकील यांच्या मृत्यूबद्दल दुःख प्रदर्शित करतांना ते म्हणाले कीं, वर्दे यांचा दीर्घ विद्याव्यासंग व ज्ञातिविषयक कामगिरी सर्वांगीण होती. सं. गौ. सा. ब्रा. परिषद, सा. वि. स. मंडळी, दाभोळकर स्कॉलर्शिप बोर्ड यांच्या कार्यकारी मंडळांत त्यांनीं काम करून ज्ञातीची उत्कृष्ट सेवा बजाविली आहे· अशा या प्रमुख व्यक्तींच्या निधनानें ज्ञातीचें बरेंच नुकसान झालें आहे. यानंतर रा. भिकाजी सी. सबनीस यांनीं दुःखप्रदर्शक ठराव वाचून दाखविला त्यावर शंकराव वर्दे, रा. ग. वि. लाड, व रा. शि. ना. रेगे यांचीं अनुमोदनात्मक भाषणें झालीं. अवघ्या एका महिन्याच्या आंत घडून आलेल्या केरकर, वर्दे, मोरमकर या त्रिवर्गांच्या शोकजनक मृत्यूबद्दल दुःख प्रदर्शित करून त्यांच्या निरनिराळ्या क्षेत्रांतील कामगिरीचें रा. शंकरराव वर्दे यांनीं वर्णन करून शोकप्रदर्शन केलें. रा. ग.वि. लाड यांनीं समाज व संघ यांच्या संस्थापनकालापासून या दोन संस्थांत रा. केरकरांची कामगिरी किती बहुमोल होती हें दाखवून, रा. वर्दे यांच्या सं. गौ. सा. बा. परिषदेंतील कार्याचें महत्त्व व वक्ता व लेखक या नात्यानें ज्ञातींत त्यांचें स्थान किती उच्च दर्जाचें होतें तें दाखविलें व महाराष्ट्रात प्रमुख गणल्या गेलेल्या विविध वृत्ताला आजचा उच्च दर्जा प्राप्त होण्यास ज्यांचे परिश्रम कारणीभूत झाले आहेत, त्यांत श्री. लक्ष्मी-नारायण छापखान्याचे मालक रा. अनंतराव मोरमकर यांचा किती महत्त्वाचा भाग होता हें सांगून या तिघांच्याही मृत्यूनें निरनिराळ्या बाजूनें समाजाचें नुकसान झाल्याबद्दल दुःखप्रदर्शित करून त्यांच्या कुटुंबियांवर आलेल्या आपत्तीबद्दल समाज त्यांचा भागीदार असल्याचें सांगितलें. शि. ना. रेगे यांच्या अनुमोदनात्मक भाषणानंतर वरील त्रिवर्गांच्या मृत्यूबद्दलचा दुखःवट्याचा ठराव सर्वांनीं उभे राहून पसार करण्यांत आला व तो त्यांच्या कुटुंबीयांकडे अध्यक्षाच्या सहीनें पाठविण्याचें ठरल्यावर सभा बरखास्त झाली.

श्री सारस्वतीभुवन गौडसारस्वत ब्राह्मणांची संस्कृत वेदपाठशाला नगर शिवमोग्गा डिस्ट्रिक्टः— वेदाध्यनादि स्वधर्माचरणांत आसक्ति नसलेल्या या कालांत येथील महाराजेश्री बि. पांडुरंगराव, यांनीं श्रद्धापूर्वक, कार्यदर्शि, महाराजेश्रीजवळि अनंतैया यांच्या प्रोत्साहनानें ह्या नगरच्या, आसपास गांवच्या वैदिक विद्यार्थ्यांच्या विद्याभिवृद्धीसाठीं एक पाठशाला श्रीशक १८५३ प्रजोत्पत्ति संवत्सर कार्तिक वद्य ५ सोमवार ता. ३०-११-१९३१ ह्या दिवशीं स्थापन करून, ती तीन वर्षेपर्यंत योग्य रीतीनें चालवून त्या विद्यार्थ्यांस, ब्राह्मण्यास संबंध असलेल्या १ आन्हिक भाग २ वेदाध्ययन ३ षोडष-कर्मप्रयोग ४ किंचित् ज्योतिष (मुहूर्तभाग) ५ संस्कृत भाषाज्ञान, ह्या विषयांत शिक्षण दिलें. उपाध्याय असलेले उत्तर कानडा जि. सिद्दापूरचे वैकुंठवासि, ब्रह्मश्री. विद्वन् गोपाल वामन भट्ट हे आणि त्यांच्या अवसानानंतर त्यांचे धाकटे बंधु ब्रह्मश्री. वे. पुंडलीक वामनभट्ट यांनींसुद्धां विद्यार्थ्यांस तयार करण्यास घेतलेले श्रम पूर्ण स्तुत्य आहेत. प्रतिवर्षी चालल्याप्रमाणें ह्या वर्षीं ही परीक्षा ता. २८-११-१९३४ पासून ता. १।१२।३४ पर्यंत परस्थळीय विद्वानांच्या अध्यक्षतेखालीं झाली वार्षिकोत्सव नगर महाराजे श्रीमंत वामनराव यांच्या अध्यक्षतेखालीं सांग झाला. पाठशाला ( आरंभीं ९ विद्यार्थी होते; आतां तेरा विद्यार्थी आहेत,) त्यांत पांच विद्यार्थी येथचा अभ्यास ( अध्ययन ) आटोपून पुढच्या विशेष शिक्षणासाठीं गोवा प्रांत पर्तगाळी येथें असलेल्या श्री संस्थान गोकर्ण मठाधीशश्री स्वामींजवळ जाणार आहेत; महाराजे श्री. बी.पांडुरंग राव यांच्याप्रमाणेंच,उपपत्ति असलेले इतर महनीय लोकही वदिक विद्यभिवृद्धीस सहाय्य करून श्रेयःसंपादन करोत.